# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

# वार्षिक वृत्त

**(सौर शके १९४०-४१)**

**दि.१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९**


पत्ता : ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००

फॅक्स : (९१)(२०)२४४९१८०६

संकेत स्थळ : www.jnanaprabodhini.org

ई-मेल : contact@jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**✻ सन्माननीय सदस्य ✻**

| | | |
|---|---|---|
| **डॉ. रघुनाथ माशेलकर** | - | माजी महासंचालक, CSIR,नवी दिल्ली |
| **श्री. अण्णा हजारे** | - | सामाजिक कार्यकर्ते |
| **श्रीमती अनु आगा** | - | उद्योजिका |
| **डॉ. जयंत नारळीकर** | - | माजी संचालक, आयुका, पुणे |

**✻ पदाधिकारी २०१८-२०२१ ✻**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | - | डॉ. रघुनाथ माशेलकर |
| **उपाध्यक्ष** | - | श्री. अण्णा हजारे<br>वा. विजय केळकर |
| **कार्याध्यक्ष** | - | श्री. श.बा तथा रवि पंडित |
| **संचालक** | - | वा. गिरीश श्री. बापट |
| **कार्यवाह** | - | श्री. वि.शं./सुभाष देशपांडे |
| **सहकार्यवाह** | - | श्री. वि. ध. गुर्जर |

---

## ज्ञान प्रबोधिनी कार्यकारी मंडळ

### ✻ निर्वाचित सदस्य ✻

१. श्री. श. बा./रवि पंडित (कार्याध्यक्ष)
२. वा. गिरीश श्री. बापट (संचालक)
३. श्री. वि. शं./सुभाष देशपांडे (कार्यवाह)
४. श्री. विश्वनाथ ध. गुर्जर (सहकार्यवाह)
५. प्रा. वा. ना. अभ्यंकर
६. श्री. रामकुमार राठी
७. श्री. मोहन चि. गुजराथी
८. वा. विवेक बा. कुलकर्णी
९. वा. सुधाताई कोठारी
१०. श्री. महेश आठवले
११. प्रा. महेन्द्र सेठिया
१२. प्रा. मनोज देवळेकर
१३. वा. अनघाताई लवळेकर
१४. प्रा. विवेक पोंक्षे (दिवंगत मार्च २०१९)

### ✻ संचालक नियुक्त सदस्य ✻

१५. प्रा. सुवर्णाताई गोखले
१६. श्री. प्रशांत दिवेकर
१७. प्रा. सविताताई कुलकर्णी
१८. प्रा. मिलिंद नाईक
१९. श्री. आशुतोष बारमुख

**(निगडी केंद्र या न्यासाच्या अंतर्गत आहे.)**

---

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **✻ मुख्य केंद्रे** | : | पुणे, निगडी, सोलापूर, हराळी (उस्मानाबाद) | | |
| **✻ उपकेंद्रे** | : | पुणे केंद्र | : | शिवापूर, वेल्हे, |
| | | निगडी केंद्र | : | साळुंब्रे |
| | | पुणे केंद्र | : | शिरवळ (जिल्हा सातारा) |
| **✻ विस्तार केंद्रे** | : | डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई (जिल्हा बीड) | | |

---

### ✻ संस्थात्मक सदस्य ✻

१) ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था
२) ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश
३) ज्ञान प्रबोधिनी सोलापूर
४) ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था
५) ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात. त्यातील काही सारांश या वृत्तात दिले आहेत.

# ✮ हितगुज

ज्ञान प्रबोधिनीच्या संस्थापकांनी लिहिलेल्या 'विकसता विकसता विकसावे' या पद्याला अनुसरून सन २०१८-१९ यावर्षाची वाटचाल झाली. क्रमिक शिक्षणामध्ये, पाचही केंद्रांवरच्या शालान्त परीक्षांचा लागलेला उत्तम निर्णय ही शिक्षणाची एक बाजू झाली. सर्वांगीण शिक्षणाचे जे बहुविध उपक्रम या सर्व ठिकाणी झाले त्यांचे एकत्रित दर्शन या वार्षिक वृत्तात घडू शकेल. विद्यार्थ्यांपुढे ज्या कार्यकर्त्यांचे आदर्श असतात त्यांची समाजाने घेतलेली दखल विविध पुरस्कारांच्या निमित्ताने वृत्ताच्या प्रारंभी दिली आहे. विभागशः वृत्ताचे तपशील आपल्याला खचितच आश्वासक वाटतील, अशी आशा आहे.

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या प्रयोगाचे यशापयश पाहण्यासाठी व नव्या काळात देशातील शिक्षणपद्धतीमध्ये आणखी काय केले पाहिजे याची चर्चा करण्यासाठी सप्टेंबर २०१८ मध्ये केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री मा. प्रकाशजी जावडेकर यांनी प्रबोधिनीस भेट दिली. शिक्षण प्रक्रियेमध्ये 'विशेष उद्दिष्ट गट' चालवण्यासाठी व अर्थकारण सांभाळण्यासाठी प्रशालेचे माजी विद्यार्थी घेत असलेला सहभाग पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. केंद्रशासनाच्या 'अटल टिंकरिंग लॅब' या धडपड प्रयोगशाळांसाठी प्रबोधिनीच्या निगडी, पुणे व हराळी येथील शाळांना मान्यता मिळाली आहे. 'नवोदय विद्यालयांच्या' सल्लागार समितीवर प्रबोधिनीचे शिक्षण उपकार्यवाह मा. विवेकराव पोंक्षे यांची निवड झाली, हे या भेटीचे मोठे फलित होय.

या आनंददायी घटनेपाठोपाठ सहा महिन्यातच एका दुःखद प्रसंगाला प्रबोधिनीला सामोरे जावे लागले. प्रबोधिनीच्या शैक्षणिक कार्याची समर्थपणे धुरा वाहणारे व वर उल्लेखिलेले प्रा. विवेकराव पोंक्षे यांचे १५ मार्च रोजी दुःखद निधन झाले. कर्करोगाशी त्यांनी ३-४ वर्षे निकराची झुंज दिली. क्रमिक शिक्षण आणि पूरक शिक्षण यामध्ये तसेच शहरातील विद्यार्थ्यांपासून ते अरुणाचल प्रदेशातील वनवासींपर्यंत विज्ञान शिक्षणाचा ज्ञानसेतू उभारणारे हे तपस्वी शिक्षक यावर्षी गमवावे लागले. महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी प्रशिक्षणासाठी चालविल्या जाणाऱ्या 'यशदा' या प्रशिक्षण केंद्राचे ते ज्येष्ठ प्रशिक्षक होते.

ज्ञान प्रबोधिनी-सोलापूर या न्यासाचे कार्यवाह म्हणून आणि पुणे प्रशालेचे प्राचार्य म्हणून प्रा. पोंक्षे यांनी १८ वर्षे काम केले. माजी विद्यार्थ्यांनी प्रा. पोंक्षे यांना वाहिलेल्या श्रद्धांजली चे संकलन 'तुमचे हे व्रत पुढे चालवू' या लेखामध्ये केलेले आहे. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी लवकरात लवकर भरून काढू, अशा निश्चयाने सर्व जण कामाला लागले आहेत.

प्रबोधिनीचे पुण्यात जे १७ विभाग चालतात त्यांच्या कामाचे संक्षिप्त प्रतिवृत्त या अंकात क्रमशः दिले आहे. प्रशालेच्या काही विद्यार्थ्यांनी केलेला जपान दौरा व अध्यापकांनी भारतामध्ये बंगळुरु, अहमदाबाद आणि दिल्ली येथील निवडक आदर्श शाळांचा केलेला अभ्यास दौरा या दोन्ही गोष्टी आगामी काळात प्रशालेच्या स्वरूपात भर घालणाऱ्या आहेत. प्रशालेच्या विविध उपक्रमांचे सविस्तर वर्णन करणारी 'प्रशालेय' ही वार्तापुस्तिका यंदा प्रकाशित झाली. प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीशराव बापट यांनी शिक्षणासंबंधी केलेल्या भाषणांवर आधारित 'राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण' हे पुस्तक प्रकाशित झाले.

छात्र प्रबोधन या विद्यार्थीप्रिय मासिकाची वाटचाल दमदारपणे चालू आहे. दिवाळीचे वेळी महाराष्ट्रभरात सुमारे ४0,000 अंकांची नोंदणी झाली. गेल्या काही वर्षात ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी वेगळा प्रकाशित होणारा सुबोध अंक व इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी प्रकाशित होणारा इंग्रजी अंक यांनीही आता भरीव संख्या ओलांडली आहे. मासिकातील निवडक लेखांचे संकलन करून जी पुस्तके प्रकाशित केली जातात, त्यातील नऊ पुस्तकांची दुसरी आवृत्ती यंदा निघाली, तर दोन पुस्तके नव्याने प्रकाशित झाली.

२०१२ पासून प्रबोधिनीचा जो दशवार्षिक कार्यसंकल्प मांडला गेला त्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाढते उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. नेतृत्व संवर्धन केंद्र हे त्यापैकी एक होय. प्रशासकीय सेवा व अन्य क्षेत्रात नेतृत्व करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण होण्याआधी पायाभूत कौशल्ये अवगत व्हावीत यासाठी सायंकालीन वर्ग या केंद्रातर्फे घेतले जातात. त्यात यंदा १५४ विद्यार्थी सहभागी झाले. पुण्यातील स्वरूपवर्धिनी या संस्थेच्या कार्यकर्त्यांसाठी १०० सत्रांचा एक अभ्यासक्रम घेण्यात आला, ही एक विशेष उल्लेखनीय बाब होय.

१९९५ पासून चालू असलेल्या प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राने देशामध्ये एक विशेष नाव कमावलेले आहे. वृत्तांत वर्षात १५७ विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे मार्गदर्शन आपल्या केंद्रातून घेतले. चार भिंतीतील मार्गदर्शनाबरोबर 'Know your Society' हा जो अध्यापनाचा भाग आहे तो अनुभवशिक्षणातून होतो आहे. पुणे जिल्ह्यातील वेल्ह्यापासून नगर जिल्ह्यातील हिवरे बाजार व स्नेहालय तर अरुणाचल प्रदेशातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, येथपर्यंत हे विद्यार्थी दौरे करून राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करतात. आपत्तिग्रस्तांना मदत व रक्तदान शिबिर हा आता त्यांच्या शिक्षणाचा नित्य भाग झाला आहे.

शिक्षणाला संशोधनाची जोड असावी या हेतूने चालू असलेल्या संशोधिकांमध्ये, प्रज्ञा मानस संशोधिकेने गेल्या वर्षी अनेक नवे संशोधन प्रकल्प केले. शालेय मुलांसाठी चांगल्या व वाईट स्पर्शाची ओळख करून देणारे जागृती अभियान एकूण १६ ठिकाणी झाले, त्यातून हा विषय सुमारे २५,००० मुलांपर्यंत पोहोचला आहे. विद्यावाचस्पती पदवीसाठी केल्या जाणाऱ्या मार्गदर्शनासोबत संशोधन पद्धती शिकवण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली. इयत्ता १०वी-१२वी नंतर कोणता अभ्यासक्रम निवडावा यासाठी ज्या अभिक्षमता चाचण्या घेतल्या जातात, त्याचा लाभ सुमारे ७,८०० विद्यार्थ्यांनी घेतला. यंदा त्यामध्ये उद्योजकतेच्या सुप्त क्षमता मोजणाऱ्या BEAM या चाचणीचाही समावेश होता. संस्कृत-संस्कृति संशोधिकेमार्फत मुख्य काम विविध संस्कार विधींचे पौरोहित्य करण्याचे चालते. वृत्तांत वर्षात ७,४०० संस्कार विधी संपन्न झाले. या विभागाने मुस्लिम स्त्रियांच्या जीवनावर शिक्षणाचा होणारा परिणाम याविषयाचा अभ्यास हाती घेतला आहे. याशिवाय विविध सामाजिक शास्त्रांचा एकत्रित अभ्यास करण्यासाठी एक 'सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र' स्थापन झाले आहे, त्यामध्ये वर्षभरात १९ वैचारिके झाली. अशा विषयांमध्ये रस असणारी कोणीही व्यक्ती या गटामध्ये सहभागी होऊ शकते.

ग्रामीण परिसरात पाणी आणि ऊर्जा या दोन विषयांवर प्रबोधिनीचे जे काम चालते, त्यामध्ये दुर्गम डोंगराळ भागातील धनगर वस्त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय अशा अंगाने भरीव काम झाले. विहीर खोदाई व पाणी साठवणासाठी Ferro-Cementच्या टाक्या यावर मुख्य काम झाले. त्यात गावकऱ्यांबरोबरच पुण्यातील युवकांच्या श्रमदानाचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. सौर ऊर्जेच्या तंत्रज्ञानाचा प्रसार होण्यासाठी प्रबोधिनीच्या विविध केंद्रांवर सौर panels बसवून विजेच्या खर्चात बचत केली आहे. ग्रामीण भागातही याचा प्रसार होण्यासाठी ३ watt च्या छोट्या panels चे soldering व जोडणी करण्याचे प्रशिक्षण गेल्या वर्षी पुणे व शिवापूर येथे झाले. कृषि-तांत्रिक विद्यालयाला हा विषय जोडून घेताना आता त्याला 'कौशल्य प्रशिक्षण केंद्र' असे संबोधित करू लागलो आहोत. कृषी हा विषय आता मुख्यतः हराळी केंद्रावर हाताळला जातो.

शहरी व ग्रामीण भागात 'स्त्री शक्ती प्रबोधन' हा विषय विविध अंगांनी आपण लावून धरला आहे. वेल्हे परिसरातून अनेक स्त्रिया या कार्यकर्ता वृत्तीने प्रबोधिनीचे काम करू लागल्या आहेत. पुणे शहरामध्ये 'संवादिनी' च्या माध्यमातून विविध प्रशिक्षण वर्ग तर 'नागरी वस्ती अभ्यासगटाच्या' योजनेतून महिला व मुलींचे नियमित मेळावे झाले. पुण्यात युवक विभागाची १५ शालेय दले व सहा महाविद्यालयीन दले चालू आहेत. त्यात नियमितपणे ५०० पर्यंत संख्या जमते. क्रीडा दले व शिबिरे यांना अभ्यास दौरे आणि विक्री उपक्रमांचीही जोड दिली गेली. युवती विभागाने आपल्या तीन दलांना अनुक्रमे कमलाबाई सोहोनी, कल्पना चावला व अहिल्याबाई होळकर अशी नावे दिली आहेत. आषाढी वारी मधील व गणेशोत्सवातील सहभाग हा या दलांसाठी एक आनंददायी अनुभव असतो.

युवक-युवतींनी नोकरी ऐवजी उद्योग व्यवसायाकडे वळावे असे प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजकता विकास केंद्राने गतवर्षात अनेक संपर्क केले. ४० जणांनी BEAM चाचणी देण्याबरोबरच आठ नव-उद्योजकांना व्यावसायिक मार्गदर्शन करण्यात आले.

प्रबोधिनीच्या निगडी केंद्राची वाटचाल जोमदारपणे चालू आहे. तेथील वास्तूचा विस्तार गतवर्षात सुरू झाला आहे. विविध उपक्रमांमध्ये पालक वर्ग घेत असलेला सहभाग ही मोठीच आश्वासक गोष्ट आहे. सोलापूर केंद्राने नियमित अध्ययन-अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांना सामाजिक अभ्यासाची संधी दिली व त्याला सामाजिक उद्योजकतेचीही जोड दिली. हराळी केंद्राने परिसरातील १५ गावांमध्ये किशोर-किशोरी विकास, प्रज्ञा विकास, छोटे सायंटिस्टस् इत्यादी उपक्रम हाती घेतले आहेत. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी विहिरींचे पुनर्भरण व ओढ्यांचे खोलीकरण असे उपक्रमही आता वाढत आहेत. साळुंब्रे उपकेंद्रात ११वी-१२वी Commerce चे वर्ग सुरू झाले आहेत. तंत्रशिक्षण केंद्रात Electrician course ची दुसरी तुकडी यशस्वीपणे पार पडली.

महाराष्ट्रातील विविध तालुके व अन्य गावी प्रबोधिनीचे प्रासंगिक उपक्रम वाढावेत असा प्रयत्न पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने चालू असतो. यातून निर्माण झालेली अंबाजोगाई, डोंबिवली व बोरीवली ही विस्तार केंद्रे चांगली स्थिरावली आहेत. तेथील स्थानिक कार्यकर्त्यांनी प्रबोधिनीचे अनेक उपक्रम स्वयंस्फूर्तीने हाती घेतले आहेत. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास (Medical Trust) यांच्या वतीने शिरवळ येथे चालू असलेल्या नेत्र रुग्णालयाचा लाभ गतवर्षात सुमारे १३,००० रुग्णांनी घेतला. त्या परिसरातील तसेच पुणे जिल्ह्यातील अनेक ग्रामीण स्त्री-पुरुष दीनानाथ रुग्णालयाच्या सवलतीच्या सेवांचा लाभ घेऊ शकत आहेत, ही आनंदाची गोष्ट होय.

गेल्या वर्षाचा आढावा घेताना झालेल्या बहुआयामी कामांच्या वाढीचे जसे समाधान आहे, तसे समाजाच्या वाढत्या अपेक्षांचे भानही कार्यकर्त्यांना आहे. प्रबोधिनीची वाटचाल अशीच गुणवत्तापूर्ण व वर्धिष्णू राहावी यासाठी आपल्यासारख्या वाचकांचे, देणगीदारांचे व हितचिंतकांचे पाठबळ नित्य लाभावे, हीच अपेक्षा.

आपले,

गिरीश श्री. बापट — संचालक

वि.शं./ सुभाष देशपांडे — कार्यवाह

# अंतरंग ....

पान क्र.


- **मध्यवर्ती कार्यक्रम** ............ ६
- **तुमचे हे व्रत पुढे चालवू** ............ ९
- **ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र**
  - १) ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ............ १०
  - २) शैक्षणिक उपक्रम संशोधिका ............ १३
  - ३) छात्र प्रबोधन ............ १८
  - ४) नेतृत्व संवर्धन केंद्र ............ २०
  - ५) स्पर्धा परीक्षा केंद्र ............ २२
  - ६) प्रज्ञा मानस संशोधिका ............ २६
  - ७) संस्कृत संस्कृति संशोधिका ............ २९
  - ८) सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र ............ ३१
  - ९) ग्रामविकसन विभाग ............ ३२
  - १०) कृषी तांत्रिक विद्यालय ............ ३४
  - ११) स्त्री शक्ती प्रबोधन - ग्रामीण ............ ३५
  - १२) स्त्री शक्ती प्रबोधन - शहरी ............ ३८
  - १३) जिजामाता दल ............ ४०
  - १४) नागरी वस्ती अभ्यासगट ............ ४१
  - १५) युवक विभाग ............ ४३
  - १६) युवती विभाग ............ ४६
  - १७) उद्योजकता विकास केंद्र ............ ४८
- **ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र** ............ ४९
- **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर** ............ ५३
- **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर : हराळी केंद्र** ............ ५५
- **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे** ............ ५८

**विस्तार केंद्रे**

  - १) डोंबिवली ............ ५९
  - २) बोरीवली ............ ६१
  - ३) अंबाजोगाई ............ ६३
- **विस्तार कार्य** ............ ६५
- **कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ** ............ ६७
- **सन्माननीय देणगीदार** ............ ६८


• **मुखपृष्ठाविषयी :** पुण्यातील प्रसिद्ध भित्तीचित्र चित्रकार मा. आभाताई भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी येथील १६० विद्यार्थ्यांच्या सहभागाने अकरा वर्गातील २४ x १२ फूट आकाराच्या भिंतींवर रंगविलेली चित्रे .

# ☆ मध्यवर्ती कार्यक्रम

## ♦ सन्मान ♦

१) **जैवतंत्रज्ञानासाठी पुरस्कार :** केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे विज्ञान भवन येथे २०व्या तंत्रज्ञान दिवसाचा कार्यक्रम झाला. यामध्ये ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथील प्रा. संगीताताई कुलकर्णी यांना जैवतंत्रज्ञान विषयाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी तसेच ग्रामीण भागात प्रचार-प्रसार करण्यासाठी केंद्रीय मंत्री डॉ. हर्षवर्धन यांच्या हस्ते 'जैवतंत्रज्ञान सामाजिक विकास पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथे २००२ पासून जैवतंत्रज्ञान विषय प्रा. संगीता कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने चालू आहे. प्रा. कुलकर्णी जैवतंत्रज्ञान दूत म्हणूनच ज्ञान प्रबोधिनीत काम करतात. इ. आठवीपासून हा विषय शिकविला जातो. आत्तापर्यंत १५०० हून अधिक विद्यार्थ्यांना जैवतंत्रज्ञान विषयात गोडी निर्माण व्हावी, अशा प्रयोगशील पद्धतीने शिकविण्यात आलेला आहे. यासह शेतकरी, बचत गटातील महिला व ग्रामस्थांना जैवतंत्रज्ञानाचे विविध उपयोग आणि फायदे सांगण्यात आले. याची दखल केंद्रीय जैव तंत्रज्ञान विभागाने घेतली.

२) **रोटरी लोकमान्य दिवाळी अंक २०१७** चा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार छात्र प्रबोधनला मिळाला आहे.

३) **सेवाव्रती पुरस्कार** : सप्टेंबर महिन्यात रत्नागिरी येथील भारत शिक्षण मंडळ आणि पटवर्धन हायस्कूल यांच्यातर्फे हराळी केंद्राला भूकंपग्रस्त क्षेत्रात केलेल्या शिक्षणकार्यासाठी 'गुरुवर्य अच्युतराव पटवर्धन शिक्षण सेवाव्रती पुरस्कार' देण्यात आला.

४) **शिक्षक भूषण व दुर्गा पुरस्कार** - दि. ६ ऑक्टोबर रोजी इंदूर येथे अखिल भारतीय शैक्षिक महासंघाच्या वार्षिक अधिवेशनात आ. स्वर्णलताताई भिशीकर यांना या वर्षीच्या अखिल भारतीय 'शिक्षक भूषण' पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच त्यांना दि. २९ ऑक्टो. रोजी दादर येथील वीर सावरकर सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमात 'दुर्गा पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

५) **पौरोहित्याविषयीचा पुरस्कार** - महिला दिनानिमित्त 'कविता रसिक मंडळी' आणि 'आर के सोनग्रा' फाऊंडेशन प्रस्तुत 'मंदिरात स्त्री-एक आदिम लढा' या विषयांतर्गत चित्रा चंद्रचूड, सुनीती गाडगीळ, वा. मनीषा शेटे यांना पौरोहित्याविषयीचा पुरस्कार देण्यात आला.

६) **ज्ञानयोगी पुरस्कार** - ग्रामीण भागात सतत सहा वर्षे उत्तम सामाजिक व शैक्षणिक कामगिरी बद्दल मातृमंदिर विश्वस्त संस्थेने ग्राम प्रबोधिनी विद्यालयातील शिक्षक श्री. गणेश भताने यांना 'ज्ञानयोगी पुरस्कार' प्रदान केला.

७) रोटरी क्लब ऑफ पुना नॉर्थ यांच्यातर्फे उत्तम शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल ग्राम प्रबोधिनी विद्यालयाचे शिक्षक श्री. लक्ष्मीकांत मुंढे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

---

### ♦ केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांची ज्ञान प्रबोधिनीस भेट

दि. १४ सप्टेंबर रोजी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी दुपारी १२ ते १.३० या वेळात ज्ञान प्रबोधिनीस भेट दिली. ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रयोग-प्रदर्शनाला, धडपड प्रयोगशाळेला त्यांनी भेट दिली व विद्यार्थ्यांशी, अध्यापकांशी संवाद साधला आणि ज्ञान प्रबोधिनीच्या वाटचालीची माहिती घेतली. यावेळी योजलेल्या सभेत ते म्हणाले, 'रूप पालटू देशाचे' हीच ज्ञान प्रबोधिनीची खरी ओळख आहे. शिक्षण अधिक चांगले करण्यासाठी, राष्ट्रीय धोरण करताना ज्ञान प्रबोधिनीच्या अनुभवाचा निश्चित उपयोग करू. विशेष बुद्धिमान विद्यार्थ्यांना देशासाठी घडविण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी गेली ५५ वर्ष प्रयत्नशील आहे. प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी समाजाच्या विकासात योगदान दिल्याने हा देशात एक वेगळा प्रयोग आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील शिक्षणक्षेत्र उत्तरदायी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. 'लर्निंग आऊटकम' वर भर दिला जात आहे. नॅशनल असेसमेंट सर्व्हे हेही महत्त्वपूर्ण पाऊल आहे. चांगले अध्यापक घडविण्यासाठी चार वर्षांचा इंटीग्रेटेड बी.एड. अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे.

ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वा. गिरीशराव बापट, कार्यवाह सुभाषराव देशपांडे, प्रा. यशवंतराव लेले, मा. वा. उषाताई खिरे, वाच. वा. ना. अभ्यंकर, वा. विवेक कुलकर्णी, प्रा. विवेक पोंक्षे प्राचार्य वा. मिलिंद नाईक, प्रा. रामभाऊ डिंबळे, मा. मोहनराव गुजराथी या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रशालेतील विक्रम जिरगाळे, चिन्मयी खरे यांनी त्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मा. प्रकाशजींनी समर्पक उत्तरे दिली. प्रा. संस्कृती बापट यांनी सूत्रसंचालन केले. विकसित कौशल्ये देशाच्या विकासासाठी उपयोगात आणणारे विद्यार्थी घडविण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी प्रयत्नशील आहे, असे ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वा. गिरीशराव बापट यांनी समारोपात सांगितले.

### ♦ रूप पालटू व्याख्यानमाला

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पा पेंडसे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सुरू केलेल्या 'रूप पालटू' व्याख्यानमालेचे चौथे पुष्प दि. १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० ते ८ या वेळात श्री. सुनील दाढे यांनी 'चिरंतन विकासातील आव्हाने' या विषयावर मांडणी करून गुंफले. मा. कै. अटलजींना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमास सुरुवात झाली. ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी प्रास्तविक तर मा. अजितराव कानिटकर यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. श्री. सुनील दाढे हे ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या १९७७च्या तुकडीचे विद्यार्थी असून १९८८ मध्ये केंद्रीय सेवेमध्ये निवड झाल्यापासून शासनाच्या विविध वरिष्ठ पदांवर कार्यरत आहेत. सध्या जयपूर येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यावरणीय अर्थान्वीक्षण संस्थेचे महासंचालक म्हणून कार्यरत आहेत.

'चिरंतन विकासातील आव्हाने' या विषयावर मांडणी करताना विकास आणि पर्यावरण यातील समतोल, भारतातील परिस्थिती, येणाऱ्या समस्या आणि आव्हाने यावर भर देऊन त्यावर मात करण्यासाठी काय करता येईल यावर भाष्य केले. आंतरराष्ट्रीय स्तरावर चालू असलेले या संदर्भातील मंथन, विविध देशांनी उचललेली पावले आणि सतरा निकषांवर आधारित असलेली वैश्विक उद्दिष्टे २०३० पर्यंत पूर्ण करण्यासाठीचे विविध पातळ्यांवरील नियोजन या विषयीचा पट समोर उभा केला. मा. संचालकांनी 'आर्टिफिशियल इंटलिजन्स् या सारख्या नव्या गोष्टींचा ताण घेऊ नये, ह्या गोष्टी कालानुरूप बदलत राहतात;' या विषयी उदाहरणे देऊन समारोप केला.

### ♦ मातृभूमी पूजन व पुस्तक अर्पण समारंभ

ज्ञान प्रबोधिनीत केलेले विविध शैक्षणिक प्रयोग व सूत्रे यांचे संकलन असलेल्या मा. गिरीशराव बापट यांच्या 'राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण' या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे लौकिक प्रकाशन न करता मातृभूमीला अर्पण केले. या समारंभात प्रथम मातृभूमी पूजन होऊन श्री. विशाल सोळंकी (शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य), डॉ. शरदराव कुंटे (अध्यक्ष, नियामक मंडळ, डेक्कन एज्युकेशन सोसायटी) यांच्या हस्ते पुस्तकार्पण झाले. मा. शरदराव कुंटे यांनी ''भारतको जानो, भारतको मानो, भारतके बनो और भारतको बनाओ'' या चतु:सूत्रीची मांडणी केली तर मा. श्री. सोळंकी यांनी सध्याची शिक्षण संस्काराची गरज याची मांडणी करून ज्ञान प्रबोधिनी हे प्रेरणापीठ झाले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

मा. गिरीशरावांनी प्रबोधिनीतल्या अनेक सूत्रांचे संकलन या पुस्तकात केले आहे. ''आपापल्या क्षेत्रात देशप्रश्न सोडवण्यासाठी लागेल ती जबाबदारी घेणारे कार्यकर्ते घडविणे हे प्रबोधिनीच्या शिक्षणाचे उद्दिष्ट आहे,'' असे त्यांनी यावेळी सांगितले. प्रत्येक कार्यकर्ता हा शिंपल्यातल्या मोत्यासारखा असला पाहिजे. जसे काम वाढेल तसे त्याच्यावरती संस्कारांचे थर चढून तो तेजस्वी झाला पाहिजे आणि तेजस्वी म्हणजे काय तर एका जागेवर न थांबता तो समाजापर्यंत पोचला पाहिजे. अशा शब्दांत ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीशराव बापट यांनी त्यांच्या समारोपात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना प्रबोधिनीच्या सगळ्या कार्यकर्त्यांकडून काय अपेक्षा आहेत हे मांडले.

### ♦ सेतुबंधन मेळावा

या वर्षीच्या पुणे केंद्राच्या दहाव्या सेतुबंधन मेळाव्याच्या निमित्ताने सकाळी १० वाजल्यापासूनच गडबड सुरू झाली होती. दि. २ फेब्रु. रोजी हा मेळावा झाला. नावनोंदणी, चहापान होऊन सगळेजण दिवसभराच्या कार्यक्रमात काय करायचे आहे या उत्सुकतेने सर्व उपासना मंदिरात जमले. ज्ञान प्रबोधिनीचे भूतपूर्व अध्यक्ष कै. डॉ. वसंतराव गोवारीकर यांची ही संकल्पना! देशाचे रूप पालटण्यासाठी देशप्रश्नांवर काम करायचे असेल तर देशपातळीवर प्रबोधिनीला माणसांचे पूल बांधावे लागतील आणि त्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये आपुलकी वाढावी लागेल हा या सेतुबंधनचा हेतू.

एकाडएक वर्ष केंद्र पातळीवर आणि सर्व केंद्रांचा असा हा मेळावा याच उद्देशाने होतो आहे आणि खरोखरच आम्ही सर्व एक आहोत ही भावना वाढीस लागून कामात उतरताना दिसते आहे. 'सहा समस्या एकच उत्तर, संघटनेविण सारे दुस्तर' या समर्पक पद्याने मेळाव्याची सुरुवात झाली. मा. अनघाताई लवळेकर यांनी प्रस्तावनेत या मेळाव्याची भूमिका स्पष्ट करत सगळ्यांचे स्वागत केले. त्यानंतर पहिले गटचर्चेचे सत्र होते. साधारण १७/१८ सदस्यांचा एक असे पंधरा गट केले होते आणि या गटांमध्ये 'माझा प्रबोधिनीतला पहिला दिवस' आणि 'प्रबोधिनीत येत्या काही वर्षात कोणत्या विषयावर काम व्हावे' या विषयावर कल्पनास्फोट. गटागटात खूपच चर्चा रंगली होती काहीजण स्मृती जागवताना भावुक झाले होते तर काहीजणांना इतरांचे ऐकल्यावर मी प्रबोधिनीत अजून लवकर यायला हवे होते असे मनापासून वाटत होते. गटातील चर्चेची निवेदने पाच पाच गट एकत्र येऊन झाली. प्रबोधिनीचे मुलींचे वसतिगृह ते आयुर्वेद संशोधन अशा अनेक कल्पनांवर विचार केले गेले. छात्र प्रबोधन आणि नेतृत्व संवर्धन केंद्र यांनी नियोजन केलेल्या उत्कृष्ट भोजन व्यवस्थेचा आस्वाद घेत गटागटात गप्पा रंगल्या होत्या.

खरंतर अशा जेवणानंतर काही ऐकणे किंवा चर्चा करणे अवघडच असते पण कोणीही कंटाळू नये याची काळजी घेत प्रज्ञा मानस संशोधिकेने गटकार्याचे नियोजन केले होते. वय किंवा विभाग याचा विसर पडून सर्वांचा गटकार्यात उत्साही सहभाग होता. एखादी कृती करताना सगळ्यांचे विचार आणि संघटन किती महत्त्वाचे आहे हे यातून कळले. प्रज्ञा मानस संशोधिका आणि शैक्षणिक संशोधन केंद्राच्या कामाच्या दोन चित्रफिती बघून या विभागाचे काय काम चालते अशी उत्सुकता असणाऱ्या सगळ्यांना त्यांच्या विस्तारणाऱ्या कामाचा अंदाज आला. यानंतर कोणालाच माहित नसलेला पण सगळ्यांना भावलेला असा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम झाला. यात काही विभागांत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सदस्यांचा छोटासा सन्मान केला गेला. मा. संचालकांनी केलेल्या समारोपानंतर संपूर्ण प्रार्थना होऊन मेळावा संपला.

## ✪ महाविद्यालयीन परीक्षा निर्णय २०१८-१९ ✪

**वेल्हे सहनिवास निवासी विद्यार्थिनी, वाणिज्य शाखा तृतीय वर्ष**

सुषमा रेणुसे - ७२%   मंगल तुपे - ७१%   अश्विनी खोपडे - ६५.३३%

**वेल्हे सहनिवास निवासी विद्यार्थिनी, वाणिज्य शाखा इ. १२वी**

सुनीता कचरे - ७८.१५%   दर्शना राजिवडे - ६९.५३%

**ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे, वाणिज्य शाखा इ. १२वी - सरासरी ७२.७२%**

प्रथम : पूजा आमले - ७६.४६%   द्वितीय : माधव राठोड - ६९.८४%   तृतीय : शीतल साळवे - ५९.०७%

## ✪ शालान्त परीक्षा - इ. १०वी निर्णय २०१८-१९ ✪

**▲ज्ञान प्रबोधिनी प्रशाला - १००% निकाल ▲**

शाळेची सरासरी - ९२.०५%
प्रथम : स्पृहा सरनाईक - ९८.२%
द्वितीय : आभा मराठे - ९७.८%
तृतीय : रेवती दिवेकर व साक्षी काळे - ९७.६%
संस्कृत १००/१०० - २८ विद्यार्थी
सामाजिक शास्त्र १००/१०० - ५ विद्यार्थी
गणित १००/१०० - १ विद्यार्थी
विज्ञान १००/१०० - २ विद्यार्थी

**▲ज्ञान प्रबोधिनी विद्यालय सोलापूर- १००% निकाल▲**

शाळेची सरासरी - ७७%
प्रथम : शरयू कोंडुभैरी - ९६.६०%
द्वितीय : ललिता लोंढे - ९४.२०%
तृतीय : सेजल महिंद्रकर - ९७.६%
संस्कृत १००/१०० - १ विद्यार्थी

**▲ज्ञान प्रबोधिनी विद्यालय हराळी - ९२.४% निकाल▲**

प्रथम : प्रतीक बिराजदार - ८७.८%
द्वितीय : गणेश मगर - ८७%
तृतीय : स्नेहलता सुरवसे - ८६.८%

**▲ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे - ९४.४४% निकाल▲**

प्रथम : विक्रांत कोथम्बिरे - ८९.६%
द्वितीय : रूपाली महाले - ८९.२%
तृतीय : संकेत खेडकर - ८५%

**▲ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी▲**

**१) गुरुकुल - ९४% निकाल**

प्रथम : साक्षी माने - ८८%
द्वितीय : श्रावणी लिमये - ८७%
तृतीय : जय आहेरकर - ८६.२%

**२) क्रीडाकुल - १००%**

प्रथम : गौरी दिघे - ८६%
द्वितीय : श्रीराम धुमाळ - ८३.२%
तृतीय : वैष्णवी शेरकर - ८२.२%

**३) मराठी माध्यम - १००% निकाल**

प्रथम : राधा येळगावकर - ९९.६%
द्वितीय : साक्षी कुलकर्णी - ९८%
तृतीय : वैभवी भोसले - ९७.६%
संस्कृत १००/१०० - ३ विद्यार्थी
गणित १००/१०० - १ विद्यार्थी

**४) इंग्रजी माध्यम - १००% निकाल**

प्रथम : रवी पवार ९६.४%
द्वितीय : शुभंकर पाटसकर ९२.६%
तृतीय : ऋतुपर्ण सोन्ना ९२.२%
संस्कृत १००/१०० - १ विद्यार्थी
गणित १००/१०० - १ विद्यार्थी

**▲ वेल्हे सहनिवास निवासी विद्यार्थिनी ▲**

अश्विनी कोंढाळकर - ६६%
श्रुतिका नांगडे - ६६.६०%
कोमल शिंदे - ५४.४०%

# ✯ तुमचे हे व्रत पुढे चालवू...



ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे माजी प्राचार्य विवेकराव पोंक्षे यांचे शुक्रवार, दि. १५ मार्च २०१९ रोजी वयाच्या अवघ्या ५८व्या वर्षी कर्करोगाने निधन झाले. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा विकास व्हायचा असेल तर शिक्षणात नेमके कोणते बदल केले पाहिजेत याची जाण असणारा एक द्रष्टा कार्यकर्ता-शिक्षणतज्ज्ञ काळाच्या पडद्याआड गेला.

त्यांचे शालेय शिक्षण तसेच बी.एड्.चे शिक्षण धुळे येथे झाले. १०वी व १२वी दोन्ही गुणवत्ता यादीत क्रमांक मिळवल्यावर पदार्थ विज्ञान शाखेतील पुढील शिक्षणासाठी ते पुण्यात आले. पुणे विद्यापीठातून पदार्थ विज्ञानातली उच्च पदवी विशेष प्राविण्यासह त्यांनी मिळवली. याच काळात ते ज्ञान प्रबोधिनीशी जोडले गेले. तरुण वयात त्यांनी दोन वर्षे अरुणाचल प्रदेशामधील विवेकानंद केंद्राच्या शाळेत तर नंतर पुणे जिल्ह्यातील शिवापूर येथील कृषी तांत्रिक विद्यालयात दोन वर्षे निवासी राहून अध्यापन केले होते. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे प्राचार्य म्हणून त्यांनी सलग १८ वर्षे काम पाहिले. भारताचा विकास खऱ्या अर्थाने व्हायचा असेल तर या देशातील लोकांना केवळ विज्ञानच नव्हे तर वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवण्याची गरज आहे हे त्यांनी ओळखले होते. धर्माचा लावलेला चुकीचा अर्थ व अंधश्रद्धा यात अडकलेल्या भारतीय मनाला तर्काधिष्ठित विचार करण्याची सवय लावून मुक्त केल्याशिवाय प्रगती होणार नाही याची त्यांना जाण होती आणि म्हणूनच स्वतः उत्तम भौतिकशास्त्रज्ञ बनूनसुद्धा एखाद्या प्रयोगशाळेत प्रयोग करत वेगवेगळे शोध-निबंध लिहित बसण्यापेक्षा समाजाचा विज्ञान शिक्षक होण्याचे काम त्यांनी स्वीकारले.

विज्ञान शिक्षक म्हणून त्यांची विषय शिकवण्याची हातोटी काही विलक्षण होती. त्यांची विषयावरची पकड इतकी मजबूत होती की विज्ञानाचे पुस्तक वर्गात नेण्याची त्यांना कधीच गरज पडली नाही. फक्त तत्त्वे, व्याख्या, सूत्रेच नाहीत तर त्यांना या सर्वांच्या शोधांचा इतिहासही तोंडपाठ होता. सरांनी विद्यार्थ्यांकडून करून घेतलेले विज्ञानातील प्रकल्प राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांत गाजले व बक्षीसे मिळवून गेले. विद्यार्थ्यांना चांगले प्रकल्प करता यावेत याकरिता त्यांनी विज्ञान प्रयोगशाळा अतिशय सुसज्ज व आधुनिक केल्या होत्या. दहावीपर्यंतच्या शाळेत पदवीपर्यंतचे प्रयोग करता यायचे. केवळ शहरी भागातच नाही तर ग्रामीण भागात देखील बुद्धिमत्ता असते हे जाणून ग्रामीण भागातील बुद्धिमान व चटपटीत मुलांसाठी 'ग्रामीण प्रज्ञा विकास योजना' या अभिनव उपक्रमाची नुसती संकल्पनात्मक मांडणी करून ते थांबले नाहीत, तर त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी विशेष पुढकार घेतला होता. ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी ज्ञान प्रबोधिनीतर्फे चालविण्यात येणाऱ्या 'साखरशाळा' उपक्रमातही त्यांचा हिरीरीने सहभाग असे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी छोटे सायंटिस्ट, ज्ञानसेतू, विवेक इन्स्पायर यांसारखे प्रकल्प त्यांनी हाती घेतले. या उपक्रमांमुळे समाजासाठी काही करायची इच्छा असणारे शहरी तरुण ग्रामीण भागाकडे पाहू लागले.

शिक्षक प्रशिक्षण हा त्यांचा आत्मीयतेचा विषय. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नवनवीन उपक्रम व अध्यापन पद्धती वापरणाऱ्या, तसेच नव्याने शिक्षण क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या युवा शिक्षकांसाठी दरवर्षी 'रूप पालटू शिक्षणाचे' शिबिर प्रबोधिनी आयोजित करते. त्यात महाराष्ट्रभरातून निवडक शिक्षक स्वखर्चाने येतात. ही सुरुवात विवेकरावांच्या प्रेरणेतूनच झाली. छात्र प्रबोधनच्या पायाभरणीतही त्यांचे भरीव योगदान होते. नावीन्यपूर्ण उपक्रम करणाऱ्या शाळांना सर आवर्जून भेटी देत असत. त्यांनी शेकडो शासकीय व खासगी प्रशिक्षणांमधून हजारो अध्यापकांना शिक्षणाची गुणवत्ता वाढण्यासाठी आवश्यक अशा अनेक विषयांचे मार्गदर्शन केले. त्यांनी अलिकडच्या काळात हाती घेतलेला प्रकल्प म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या पाठ्यपुस्तकातील QR Codes ना चित्रफितींची जोड देणे हा होय. दीक्षा पोर्टलमध्ये ज्ञान प्रबोधिनी एक भागीदार होणे याचे श्रेय त्यांनाच जाते. मानव विकास संसाधन मंत्रालयाच्या सर्व शिक्षा अभियानाचे महाराष्ट्र राज्याचे जेष्ठ मार्गदर्शक म्हणून ते काम करत होते. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत महाराष्ट्रातील माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांना त्यांनी यशदामार्फत वेळोवेळी मार्गदर्शन केले. भारताच्या पूर्वांचलातील राज्यांमधल्या विद्यार्थ्यांच्या संघटनेचे ते संस्थापक सदस्य होते.

आणखी किती सांगावे? त्यांच्या व्यक्तिमत्त्व वर्णनाला शब्दांची मर्यादा पडते. विवेकराव एकाच वेळी अनेक कामे करू शकत असत आणि म्हणूनच त्यांच्या कामाचे स्वरूप विविध प्रकारचे व व्यापक होते. हाडाचा शिक्षक, कुशल संघटक, उत्तम वक्ता, चिकित्सक संशोधक, कार्यकर्ता, सेवाव्रती अशी अनेक विशेषणे विवेकरावांना सहज लागू होतात. 'ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रभागाचे उपकार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी सोलापूर न्यासाचे कार्यवाह, शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे विभाग प्रमुख, शिक्षकांसाठी चालविण्यात येणाऱ्या 'ई-प्रशिक्षक'चे संपादक, बाल विज्ञान चळवळीचे संस्थापक सदस्य, राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद पुणेचे अध्यक्ष, केंद्र शासनाच्या नवोदय समितीचे सदस्य..' ही यादी न संपणारी आहे. अशा या ध्येयवेड्या, विज्ञाननिष्ठ कार्यकर्त्याला ज्ञान प्रबोधिनीतर्फे भावपूर्ण स्मरणांजली!

▲▲▲

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र

## १. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

### ♣ ज्ञान प्रबोधिनी, प्रशाला सुवर्ण महोत्सव ♣

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे ची स्थापना दि. ९ जून १९६९ रोजी झाली. सन २०१९-२० हे प्रशालेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने आगामी शैक्षणिक वर्षात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वृत्तांत वर्षातील घडामोडी-

**◆ संचालक भेट**

'देशप्रश्न सोडवणारे कार्यकर्ते तयार व्हावेत' यासाठी ज्ञान प्रबोधिनीची शिक्षणप्रणाली काम करते. हे काम सुरळीत चालू राहावे यासाठी ज्येष्ठांचे मार्गदर्शन हवेच. प्रशालेत होणाऱ्या कामाचे सादरीकरण आ. संचालकांच्या समोर करण्याची संधी यावर्षी संचालक भेटीच्या निमित्ताने मिळाली. दि. ५ ते ९ ऑक्टो. या कालावधीत आ. संचालकांनी प्रशालेस भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी प्रशालेतील प्रत्येक विद्यार्थ्याशी वर्गशः भेटींदरम्यान संवाद साधला. तसेच अध्यापक व कर्मचारी यांना गटश: बैठकींद्वारे मार्गदर्शन केले. चार दिवस चालेल्या या भेटीमध्ये प्रशालेतील इ. ५वी ते १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी आ. संचालकांसमोर आपल्या कौशल्यांचे सादरीकरण केले.

विद्यार्थी, अध्यापक, कर्मचारी या सर्वांना आ. संचालकांनी केलेल्या मार्गदर्शनाचे सार पुढीलप्रमाणे -

''बोलल्याप्रमाणे आपले गुण प्रकट व्हावयास हवेत. आपले पराक्रम हीच मातृभूमिची पूजा आहे, आपल्याला तप करून स्वर्ग जमिनीवर आणायचा आहे. यंत्र, ऋचा, विज्ञान, काव्य एकाच ठिकाणी पाहायला मिळणं हे प्रबोधिनीचे वैशिष्ट्य आहे. प्रबोधिनीत येऊन 'तेज' वाढले पाहिजे. तेज म्हणजे आपल्याला पाहून इतरांची प्रेरणा वाढली पाहिजे. आम्ही शुद्ध आहोत, आम्ही बुद्धिमान आहोत, आम्हाला कशाचाही त्रास होत नाही, हा मंत्र सतत म्हणायला हवा. प्रबोधिनीपणात कृती, गती, प्रगती व्हायला पाहिजे. प्रबोधिनीपण म्हणजे आजचे काम उद्या नाही, आपलं काम दुसऱ्यावर नाही, कालच्यापेक्षा आज पुढं गेलंच पाहिजे, रोज नवीन सुचलंच पाहिजे. मौन ते अभिव्यक्ती, एकांत ते लोकांत, एकाकी ते सर्वांशी, पुस्तकी ते अनुभवात्मक दोन्ही जमलं पाहिजे. शिक्षणाची पुढील उद्दिष्टे आपल्या समोर असायला हवीत. शालेय वयोगटासाठी - भारतावर प्रेम करावे (Love India), तर महाविद्यालयीन गटासाठी - भारताबद्दल विचार करा (Think India) यासाठी भाषा, वेशभूषा, सण, करमणूक, तारीख, स्वाक्षरी यात भारतीयत्व हवे. भारत देश हिंडून पाहिला पाहिजे, जाणला पाहिजे. (Live for India)''

**◆ प्रशालेतील विद्यार्थी व अध्यापक अभ्यास दौरे**

**१) जपान अभ्यासदौरा -** "Japan Asia Science Exchange Program' या विद्यार्थी विनिमय योजनेअंतर्गत प्रशालेतील दहा विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व अध्यापक श्री. प्रणव पुजारी यांनी जपानला दि. ७ ते १२ एप्रिल दरम्यान भेट दिली. तेथे होक्काइडो इंटरनॅशनल सायन्स फेअरमध्ये त्यांनी केलेले शास्त्रप्रकल्प सादर केले. प्रकल्प स्पर्धांमध्ये तीन विद्यार्थ्यांनी बक्षीसे मिळवली. विविध विषयांवरील तज्ज्ञांची व्याख्याने, गटकार्ये, कोसाईशाळेस भेट, होक्काइडो ऐतिहासिक गावास भेट असा भरगच्च कार्यक्रम होता. पुढील विद्यार्थी या दौऱ्यात सहभागी झाले होते -तन्वी जोशी, अनुष्का भोईर, आर्वा बावकर, कल्याणी नागुरे, साहिल केळकर, अथर्व बेंडाळे, जय पोटे, गौतम राजहंस, चिन्मय गुरूजी, विश्वजीत उगले.

**२) बंगळुरू अभ्यास दौरा -** दि २९ जाने. ते २ फेब्रु. या कालावधीत बंगळुरू येथे सहा अध्यापकांचा अभ्यास दौरा झाला. बंगळुरू परिसरातील राष्ट्रोत्थान विद्या केंद्राच्या शाळांना या दरम्यान भेट दिली. राष्ट्रोत्थान विद्या केंद्राचे सचिव श्री. गजानन लोंढे आणि प्राचार्य वसंत कुमार यांनी राष्ट्रोत्थान विद्या केंद्राची सुरुवात, शाळा आणि अन्य उपक्रम याविषयी माहिती दिली. राष्ट्रोत्थान विद्या केंद्राच्या 'तपस' प्रकल्पांतर्गत शिकणाऱ्या मुलांशी गटाने संवाद साधला. त्याशिवाय 'जीवन हेच शिक्षण' या सूत्रावर चालणारे आरोही एज्युकेशन ट्रस्ट, होसूर, जे. कृष्णमूर्ती यांच्या तत्त्वज्ञानावर चालणारे द व्हॅली स्कूल, पूर्णप्रमती शाळा, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स् स्टडीज इ. संस्थांना भेटी दिल्या.

**३) अहमदाबाद अभ्यास दौरा -** दि. २५ ते २८ फेब्रु. या कालावधीत अहमदाबाद येथे प्रशालेतील सहा व नवनगर विद्यालयातील तीन अशा एकूण नऊ अध्यापकांचा अभ्यास दौरा झाला. अहमदाबादमधील श्रेयस फाऊंडेशन, तपोवन संस्कार पीठ, रिव्हरसाईड स्कूल, महात्मा गांधी इंटरनॅशनल स्कूल, इन्स्टिट्यूट फॉर रुरल मॅनेजमेंट इ. संस्थांना भेट दिली. भेटीदरम्यान शाळांची कार्यपद्धती, उपक्रम व त्यांचे फलित याविषयी माहिती

घेतली. शाळा-मुख्याध्यापक व शाळा-समन्वयक यांच्याशी संवाद साधला.

**४) दिल्ली अभ्यास दौरा** - दि. ३१ मार्च ते ५ एप्रिल या कालावधीत दिल्ली येथे प्रशालेतील चार व नवनगर विद्यालयातील सात अशा एकूण अकरा अध्यापकांचा अभ्यास दौरा झाला. दिल्लीमधील राजकीय प्रतिभा विकास विद्यालय, आरंभ विद्यालय, अरविंदाश्रमाच्या मिरांबिका, मदर्स इंटरनॅशनल स्कूल तसेच सरदार पटेल विद्यालय, शिक्षण संचालनालय-नवी दिल्ली, सल्वान पब्लिक स्कूल इ. संस्थांना भेट दिली. भेटीदरम्यान शाळांची कार्यपद्धती, उपक्रम व त्यांचे फलित याविषयी माहिती घेतली. शाळा-मुख्याध्यापक व शाळा-समन्वयक यांच्याशी संवाद साधला.

### ◆ यश

- ▷ प्रशालेतर्फे नागरी वस्त्यांमध्ये चालणाऱ्या प्रकल्पास नातू फौंडेशनतर्फे रु. २५,०००/-चा पुरस्कार मिळाला.
- ▷ राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेच्या दुसऱ्या स्तरात कु. सानिका गुमास्ते, चि. अखिल अत्रे यांना शिष्यवृत्ती मिळाली. तसेच राज्यस्तरीय फेरीत पुढील आठ विद्यार्थ्यांची निवड झाली - कु. स्पृहा सरनाईक, कु. प्रियांका दाते, कु. गौरी ठोंबरे, चि. ओम चव्हाण, चि. प्रतीक चित्रे, चि. अर्थव सूर्यवंशी, चि. अर्थव चौरे, चि. अखिलेश विघाटे.
- ▷ भारत सरकारच्या नीती आयोगाने मुलांच्या कल्पनाशक्तीत वाढ व्हावी आणि उद्योजकता वाढीस लागावी म्हणून विविध तंत्रज्ञानांची ओळख करून देणारी अटल टिंकरिंग लॅब ही योजना चालू केली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या यादीनुसार (एकूण शाळा ३४३७) ज्ञान प्रबोधिनी प्रशालेला अटल टिंकरींग लॅब उभारण्यासाठी मान्यता मिळाली आहे. विविध निकषांची पूर्ती करणाऱ्या ठराविक शाळांना सरकार ही प्रयोगशाळा उभारण्यासाठी सुमारे २० लक्ष रुपये अनुदान देते.

### ◆ विविध उपक्रम

**१) विद्याव्रत** - 'सज्जनगड' येथे दि. २१ ते २३ जाने.  मुलींचे व दि. २३ ते २५ जाने. मुलांचे शिबिर झाले. व्रतार्थींचे जीवन जवळून बघणे व त्याचा स्वत: देखील थोडा अनुभव घेणे हा शिबिराचा हेतू होता. या शिबिरात उपासना, व्यायाम, श्रमकार्य, भजन, दैनंदिनी लेखन, वादविवाद, भित्तीपत्रके तयार करणे, विविधांगी विचार, अडथळ्यांची शर्यत, सज्जनगड नकाशा व इतिहास इ. सत्रांची योजना केली होती. आ. संचालकांनी शिबिरात दोन्ही गटांना मार्गदर्शन केले.

दि. ८ व ९ फेब्रुवारीला अनुक्रमे इ. ८वी मुले व इ. ८वी मुलींचा विद्याव्रत ग्रहण कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांना आशीर्वाद देण्यासाठी मुलांकडे श्री. संजयगुरूजी गोडबोले व मुलींकडे डॉ. स्वर्णलता भिशीकर यांना निमंत्रित केले होते.

**▷ विद्याव्रत व्याख्याने**

१. प्रास्ताविक : वा. मिलिंद नाईक - विद्याव्रत संकल्पनेची ओळख, आश्रम, कर्तव्ये, ऋण, आवश्यक व्रते यांची ओळख.

२. शारीरिक विकसन : सौगंधदादा देशमुख, मा. एकता जाधव शारीरिक विकसनाची विविध परिमाणे, त्यांची ओळख, क्रीडा आणि व्यायाम यांचे महत्व. मनुष्य आणि प्राणी यामधील मूलभूत फरक हा कि मनुष्य विचारपूर्वक स्वत:मध्ये बदल करू शकतो.

३. आहारशास्त्र : वैद्य प्रयाग सेठिया - आयुर्वेदानुसार आदर्श आहार संकल्पना.

४. व्यायामशास्त्र : वैद्य मंदार अक्कलकोटकर - आयुर्वेदानुसार व्यायाम संकल्पनेच्या संस्कृत मधील विविध व्याख्यांची ओळख.

५. मानसिक विकसन : वा. अनघा लवळेकर -मन आणि मनाचे पैलू.

६. भावनिक विकसन : वा. प्रणीता जगताप, वैद्य दीपक गुप्ते - भावनांचे तटस्थपणे मापन, भावनांची हाताळणी.

७. विद्याव्रत पोथीचा अर्थ : वा. भाग्यश्री हर्षे -संस्कृत श्लोकांचे आणि संदर्भांचे स्पष्टीकरण.

८. बौद्धिक विकसन : वा. मिलिंद नाईक -बुद्धिमत्तेचा उपयोग सृजन आणि संशोधनासाठी करणे म्हणजेच देशाला बलशाली करण्यात हातभार लावणे.

९. सामाजिक विकसन : सुवर्णा गोखले -ज्ञान प्रबोधिनीच्या ग्राम विकसन विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या महिला बचत गटाचे काम आणि त्या संबंधातील अनुभव कथन.

१०. आत्मगुणांचे विकसन : वा. गिरीशराव बापट - जाणिवेचे विविध स्तर आणि 'स्व' ची ओळख.

**२) गणेशोत्सव** - दि. १३ ते २३ सप्टें. २०१८ या कालावधीत गणेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दि. १३ सप्टें. रोजी गणेश प्रतिष्ठापना मा. श्री. राजेंद्र मुठे (विशेष कार्यकारी अधिकारी) यांच्या हस्ते झाली. दि. १४ ते २३ सप्टें. दरम्यान पुढील अतिथींच्या हस्ते पूजा व आरती झाली - डॉ. अनंतभूषण रानडे, श्रीमती हेमाताई डोळे, ब्रिगेडिअर अभय भट, डॉ. नीलांगी सरदेशपांडे, डॉ. मृण्मयी साठे, श्री. शशांक चांदोरकर. तसेच उत्तरपूजा श्री. राहुल खेले (संपदा सहाय्यक, ज्ञान प्रबोधिनी) यांच्या हस्ते झाली.

गणेशोत्सवानिमित्त इ. ५वी ते ८वीच्या गटासाठी विविध अभिव्यक्तींच्या सादरीकरणाची योजना केलेली होती, तर इ. ९वी, १०वीच्या गटासाठी विविध कार्यशाळांची योजना केलेली होती. त्याचे तपशील पुढील प्रमाणे -

**▷ अभिव्यक्ती- सादरीकरण (इ. ५वी ते ८वी)**

| विषय | सादरकर्ते |
|---|---|
| नृत्य | मधुराताई आफळे |
| तबला, मोहिनीवीणा, बासरी | श्री. मंगेश करमरकर व सहकलाकार |

| | |
|---|---|
| चित्रकारांच्या पत्रांचे वाचन | नितीन हडप, अमृत सामक |
| लेखक तुमच्या भेटीला | श्री. अनिल अवचट,<br>डॉ. अश्विनी धोंगडे |

▷ **कार्यशाळा ९वी, १०वी (मुले)**

| **विषय** | **मार्गदर्शक** |
|---|---|
| गणितीय प्रारूप | श्री. आदित्य पोंक्षे |
| सहा सोनेरी पाने | श्री. प्रांजल अक्कलकोटकर |
| आरेखन | श्री. रोहित हरीप, श्री. प्रणव पुजारी |

▷ **कार्यशाळा ९वी, १०वी (मुली)**

| **विषय** | **मार्गदर्शक** |
|---|---|
| वनस्पती वर्गीकरण शास्त्र | निवेदिता गडीकर,<br>ऋजुता देशमुख |
| पाककला | सौ. मीरा गोसावी |
| चित्रपट रसास्वाद | मृण्मयी वैशंपायन,<br>ओंकार प्रधान |

**३) अभिव्यक्ती विकसन तासिका व सादरीकरण** - इ. ५वी ते १०वीसाठी वर्षभर अभिव्यक्ती विकसन तासिकांची योजना केलेली होती. त्यात नृत्य, नाट्य, गायन, वादन, चित्रकला, शिल्पकला, वक्तृत्व आणि प्रतिभाशाली लेखन या विषयांचा समावेश होता. इ. ५वी, ६वीच्या विद्यार्थ्यांनी या आठही विषयांची वर्षभरात ओळख करून घेतली तर इ. ७वी ते इ. १०वीच्या विद्यार्थ्यांनी त्यातील आपल्या आवडीचा विषय निवडून त्यातील विविध कौशल्ये शिकण्याचा व आत्मसात करण्याचा वर्षभर प्रयत्न केला.

दि. ९ ते २१ एप्रिल या कालावधीत अभिव्यक्ती शिबिर झाले. यात सादरीकरणाच्या कार्यक्रमासाठीची तयारी व सराव घेतला गेला. दि. २५ एप्रिल रोजी मुलांचा व दि. २६ एप्रिल रोजी मुलींचा अभिव्यक्ती सादरीकरणाचा कार्यक्रम झाला. मुलांकडे सुप्रसिद्ध तबला वादक व प्रशालेचे माजी विद्यार्थी श्री. अरविंद परांजपे व मुलींकडे सुप्रसिद्ध नृत्यांगना व प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी सौ. धनश्री पुणतांबेकर ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

**४) विशेष उद्दिष्ट गट** - देशप्रश्न सोडवणारे कार्यकर्ते घडायचे असतील तर त्यांना या प्रश्नांची जाण योग्य वयातच यायला हवी. त्यासाठी गेली आठ वर्षे इ. ९वी, १०वी साठी हा उपक्रम चालू आहे. एप्रिल महिन्यात प्रत्येक गटाच्या मार्गदर्शकांचे इ. ९वीसाठी प्रास्ताविक व्याख्यान झाले. यावर्षी विद्यार्थ्यांनी निवडलेल्या प्रश्नगटातील विषयांत पुढील मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

| **विषय** | **मार्गदर्शक** |
|---|---|
| १) ऊर्जा | संतोष गोंधळेकर |
| २) अर्थशास्त्र | मेधाविनी वाटवे, वेदांगी पटवर्धन,<br>अपूर्वा अभ्यंकर |
| ३) ग्रामविकसन | सुनिता गायकवाड, सुवर्णा गोखले |
| ४) लोकशाही शिक्षण | मृण्मयी परळीकर |
| ५) राष्ट्रीय एकात्मता | सनतकुमार भाटे, मकरंद सुपनेकर |
| ६) मानसशास्त्र | राधिका कुलकर्णी |
| ७) सामाजिक आरोग्य | नीलांगी सरदेशपांडे |
| ८) पत्रकारिता | सुजाता देशमुख. |

◆ **विशेष व्याख्याने**

▷ **पाठ्यविषयांशी निगडित आणि काही अन्य विषयांवरील व्याख्याने**

| **विषय** | **वक्ते** | **विषय** | **वक्ते** |
|---|---|---|---|
| न्यूरोसायन्समधील संशोधन | उत्तरा टिपणीस | हवेचे प्रदूषण | भवताल संस्था |
| 'आर्मीतील संधी' | कर्नल अनुप बरबरे | विक्री कौशल्य | श्री. महेंद्र सेठिया |
| योगदिनानिमित्त व्याख्यान | श्री. राघव अष्टेकर | प्लॅस्टिक व पर्यावरण | श्री. राजीव बसर्गेकर |
| लेखन प्रकल्प कसे करावेत | अंजली रानडे, सुनिला गोंधळेकर | अग्निशामन प्रात्यक्षिक | प्रात्यक्षिक |
| कर्करोग जनजागृती | श्री. प्रशांत दुबे | कळ्यांचे ऋतू-पुस्तक प्रकाशन | सौ. आश्लेषा महाजन |

▷ **इ. १०वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्षेत्र निवडीसाठी विचारांना चालना देणारी व्याख्यानमाला**

| **विषय** | **वक्ते** | **विषय** | **वक्ते** |
|---|---|---|---|
| कार्यक्षेत्र निवडताना | श्री. विवेक वेलणकर | कार्यक्षेत्र निवडताना | डॉ. श्रीराम गीत |
| सागरविज्ञान - भूगोल | श्री. सुरेंद्र ठाकूरदेसाई | कृषिक्षेत्र | सौ. गौरी कापरे |
| पत्रकारिता | श्री. संजय तांबट | प्रशासकीय अधिकारी | श्रीमती मीनल पोटे |
| सैन्यदल | कर्नल श्री. अनूप बरबरे | डिझाईन | श्री. किरण सबनीस |
| ऊर्जा-संशोधन | श्री. संतोष गोंधळेकर | इर्मा (IRMA) | वा. अजित कानिटकर |

▲▲▲

## २. शैक्षणिक उपक्रम संशोधिका

### १) वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र -

- **प्रशिक्षण झालेली राज्ये** : महाराष्ट्र, आसाम, तेलंगण, अरुणाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, गोवा • प्रशिक्षणाचे दिवस : १०६
- **सहभागी शाळांची संख्या** : १९८ • प्रशिक्षणार्थी संख्या : १५९०
- **प्रकाशने :** 'ई - प्रशिक्षक' - प्रयोगशील शिक्षकांसाठीचे ई-मासिक - १२ अंक प्रकाशित

**प्रकल्प पद्धती - अध्ययन अनुभव व कौशल्य प्रशिक्षणाचे साधन**

| | | |
|---|---|---|
| **आसाम** - 'विवेकानंद केंद्र शिक्षा प्रसार विभाग, आसाम'<br>'माजुली'<br>विवेकानंद केंद्र शिक्षा प्रसार विभाग | २५ शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थी<br>५० शिक्षक आणि<br>२५० विद्यार्थी २० शाळा | विज्ञान अध्ययनासाठी संशोधनात्मक प्रकल्प<br>संशोधनात्मक पद्धतीचा परिचय<br>७५ प्रकल्प पैकी ६० प्रकल्प निवड |
| **तेलंगण** - परमिता ग्रुप स्कूल, करीमनगर (५वी ते ७वी)<br>३री-४थीचे विद्यार्थी | सहा शाळांमधील ८० शिक्षक<br>९० प्राध्यापक | प्रकल्प आधारित अध्ययन-अध्यापन<br>थीम बेस्ड प्रोजेक्ट |
| **महाराष्ट्र** - पुणे- दोन शाळा<br>वर्धा एक शाळा<br>चिपळूण - २० शाळा<br>पिंपरी चिंचवड -२० शाळा | ५० शिक्षक ३ दिवस<br>३५ शिक्षक ३ दिवस<br>४२ शिक्षक २ दिवस<br>२० शिक्षक १ दिवस | संग्रहात्मक प्रकल्प<br>प्रतिकृती तयार करणे<br>प्रकल्प पद्धती<br>प्रकल्प पद्धती परिचय |
| **प्रेरणा जागृती शिबिरे, पुणे**<br>'रूप पालटू शिक्षणाचे' | ३५ शिक्षक | व्यक्तिमत्त्व विकसन व प्रेरणा जागरण<br>शिक्षणविषयक विचार, अध्ययन - अध्यापन पद्धती |
| **शिक्षक प्रेरणा जागृती वर्ग**<br>चतुरंग प्रतिष्ठान, मुंबई व ज्ञान प्रबोधिनी<br>यांचा संयुक्त उपक्रम | ४० शिक्षक सहभागी<br>४ टप्प्यांमध्ये प्रशिक्षण | प्रेरणा जागरण, निरीक्षण व वाचन कौशल्य, क्षेत्रभेटी, सहाध्याय दिन, नियोजन कौशल्य, प्रकल्प पद्धती, गटकार्य, मातृभूमी परिचय सहली, व्यक्तिगत व गटाचे संकल्प, शैक्षणिक संस्कार, बौद्धिक विकसन, समर्थ भारत अनुभवकथन |

### स्व - विकास व कलारसास्वाद

'स्व-विकास व कलारसास्वाद' हे नवीन पाठ्यपुस्तक गेल्या वर्षीपासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले. या विषयावर पुणे, सातारा, चिपळूण, रत्नागिरी, कोल्हापूर येथील ५२ शिक्षकांसाठी दोन दिवसांची दोन शिबिरे घेण्यात आली.

### ई-प्रशिक्षक मासिक व मोबाईल App

'प्र'-शिक्षक मासिकाच्या 'ई' आवृत्तीचे या वर्षात १२ अंक प्रकाशित करण्यात आले. याचे ३८०० शिक्षक सभासद आहेत. याशिवाय 'प्रशिक्षक' हे नवीन मोबाईल ॲप्लिकेशन तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

**❊ अन्य प्रशिक्षणे ❊**

| | | |
|---|---|---|
| वर्ग व्यवस्थापन व प्रभावी अध्यापन | पुणे, वर्धा, अरुणाचल प्रदेश - ४० शाळा ३८८ शिक्षक- १९ दिवस | विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रेरणा जागृत करणे, शिक्षक-विद्यार्थी संवादाला सकारात्मक प्रतिसाद देणे, सर्वांना सहभागी करत शिकवणे अशा उद्देशांनी विविध कौशल्य, तंत्रे, प्रभावी अध्ययन-अध्यापन पद्धती |
| विषय अध्यापनातील नाविन्यपूर्ण प्रयोगांसाठी विषयशः प्रशिक्षण | प्रत्येक विषयातील अध्यापन प्रभुत्वासाठी विषयशः ११ दिवस ४१ शाळा ८० शिक्षक | संकल्पना निर्मिती व मांडणी, अनुभव योजणे, प्रभावी विषय अध्यापनासाठीची साधने, विषय अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर, मूल्यमापन |
| स्वयंअध्ययन कौशल्ये | ७ दिवसांची प्रशिक्षणे, २५ शाळांमधील १६५ शिक्षक व विद्यार्थी | स्वयं अध्ययन कौशल्ये- निरीक्षण कौशल्य, प्रश्नकौशल्य, वाचन कौशल्य, लेखन कौशल्य |

**पाठ्यपुस्तकांची परीक्षणे व मूल्यमापन**

कानपूर, शैक्षणिक विभागाने लिहिलेला अभ्यासक्रम तसेच प्राथमिक गणित, समाजशास्त्र, पर्यावरण, ICT या विषयांची एकूण ३४ पाठ्यपुस्तके व कार्यपुस्तिका यांचे केंद्राकडून परीक्षण करण्यात आले.

## २) बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र -

### छोटे सायंटिस्ट्स उपक्रम

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात छोटे सायंटिस्ट्स उपक्रमाने आठव्या वर्षात पदार्पण केले. केपीआयटी उद्योग समूहाच्या अर्थसाहाय्यातून चार मॉडेलद्वारे उपक्रम महाराष्ट्रात राबविला गेला.

**छोटे सायंटिस्ट्स अभ्यासक्रम** -इयत्ता ८ वी व ९ वी च्या नवीन अभ्यासक्रमावर आधारित विज्ञान संकल्पनांचा विचार करून प्रयोग व खेळण्यांची नव्याने मांडणी करण्यात आली. प्रयोग साहित्य पेटी संच , छात्र प्रबोधन सुबोध द्वैमासिक अंक भेट देण्यात आले.

**इन्स्पायर ॲवार्ड** - Innovation in Science Pursuit for Inspired Research - INSPIRE या केंद्र शासनाच्या स्पर्धेत आठ प्रकल्पांची राज्यस्तरावर निवड झाली.

**राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद** - पुणे जिल्ह्यातील एक आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील तीन प्रकल्प जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील दोन प्रकल्प राज्यस्तरीय आणि त्यातील एक प्रकल्प राष्ट्रीय पातळीवर निवडला गेला.

**समस्या परिहार स्पर्धा** -

या स्पर्धेला केपीआयटी कंपनीच्या कार्यस्थळावर मावळ-मुळशी तालुक्यातील २० शाळां, पिंपरी-चिंचवड म.न.पा. आठ शाळा ,पुणे म.न.पा.च्या दहा शाळा, प्रत्येक शाळेतून इ. ८ वी चे तीन व इ. ९ वी चे तीन असे एकूण सहा विद्यार्थी आणि त्यांच्यासोबत एक शिक्षक उपस्थित होते. केपीआयटीचे ५० अभियंते उपस्थित होते. बक्षीस वितरण पिंपरी-चिंचवड म.न.पा. चे माध्यमिक शिक्षणाधिकारी पराग मुंडे, व CSR विभागाचे विजय वावरे यांच्या हस्ते झाले.

**अटल टिंकरिंग कार्यशाळा**

| लाभार्थी | स्थळ | शाळा | विद्यार्थी | शिक्षक |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | बाल शिक्षण मंदिर | ५ | ३० | - |
| | बेस्ट हायस्कूल, अहमदाबाद | ५ | ३० | |
| | ज्ञान प्रबोधिनी, निगडी | ३ | २५ | - |
| शिक्षकांसाठी | विवेकानंद केंद्र विद्यालय, माजुली, आसाम | १७ | - | ३० |
| | ज्ञान प्रबोधिनी, पुणे | १७ | - | ३० |
| | विवेकानंद केंद्र विद्यालय, दिब्रुगड, आसाम | १६ | - | २३ |

**अटल टिंकरिंग लॅब** - भारत सरकारच्या नीती आयोगासोबत अटल टिंकरिंग लॅब या उपक्रमात केपीआयटीच्या अर्थसाहाय्यातून ज्ञान प्रबोधिनी मार्गदर्शक म्हणून काम करते.

ही लॅब असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांची समस्या परिहार स्पर्धा घेण्यात आली. त्यात सोळा शाळेतील ४८ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक सर्किट तयार करण्यास सांगितले होते. सर्किट तयार करत असताना जास्तीत जास्त समस्या सोडविणाऱ्या शाळांना विजेते घोषित करण्यात आले. बक्षीस वितरण केपीआयटी कंपनीच्या अधिकारी डॉ. सारिका केळकर, राहुल उपलव, श्री. सतरंजन यांच्या हस्ते झाले. केपीआयटी कंपनीचे वीस अभियंते यावेळी उपस्थित होते.

**अनुदानित आदिवासी आश्रमशाळा, पडसरे** -शापूरजी पालनजी ग्रुप (AFCONS) च्या मदतीतून 'छोटे सायंटिस्ट्स' उपक्रम आदिवासी आश्रमशाळा, पडसरे ता. सुधागड येथे राबविण्यात आला. इयत्ता ८वी व ९वीच्या एकूण १०० विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग होता. पुण्यात शिक्षकांसाठी दोन प्रशिक्षण वर्ग झाले. प्रशिक्षण घेतलेल्या विज्ञान शिक्षकांनी वर्षभरात एकूण ३६ विज्ञान तासिका घेतल्या. या कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहा विज्ञान संकल्पनांवर

**प्रशिक्षण - छोटे सायंटिस्ट्स मधील प्रत्येक मॉडेलमध्ये सहभागी स्वयंसेवक, शिक्षक आणि कार्यकर्ते यांचे प्रशिक्षण.**

| मॉडेल | कोणाद्वारे | ठिकाण | सहभागी शाळा | इयत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | केपीआयटी अभियंते = ३०० (मावळ- मुळशी तालुका) | पुणे जिल्हा | २० | ८वी आणि ९वी | १८७६ |
| २ | विज्ञान मित्र (शिक्षक) = ०५ | पुणे म.न.पा. | १० | ८वी | ४८६ |
| | पिंपरी-चिंचवड म.न.पा. | | ८ | ८वी | ३९० |
| | उस्मानाबाद जिल्हा | | १० | ८वी आणि ९वी | ८४७ |
| ३ | विज्ञान अध्यापक = ३८ | पुणे जिल्हा | ३८ | ८वी | २०१३ |
| ४ | महाविद्यालयीन विद्यार्थी = ६० | जालना जिल्हा | २५ | ८वी | १२३९ |
| | जे.ई.एस. महाविद्यालयाचे (जालना) ५० विद्यार्थी | चिपळूण तालुका | ५ | ८वी | २५२ |
| | एकूण कार्यकर्ते अध्यापक = ४०३ | एकूण शाळा | ११६ | एकूण विद्यार्थी | ७१०३ |

आधारित विज्ञान खेळणी/प्रयोगाचे प्रशिक्षण दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना या विज्ञान संकल्पना स्पष्ट करून सांगितल्या तसेच दैनंदिन जीवनातील उपयोजन सांगितले. दि. २४ जानेवारी रोजी याच विद्यार्थ्यांसाठी विज्ञान मेळावा आयोजित केला होता. विद्यार्थ्यांचे दहा गट करून प्रत्येक गटाला शापूरजी पालनजी ग्रुपचे अधिकारी कर्मचारी मार्गदर्शक म्हणून सहभागी होते.

**शालेय गुणवत्ता विकास कार्यक्रम** –प्रिसीयंट टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड आणि ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमान माध्यमिक विद्यालय, चिंचोशी, तालुका खेड, जिल्हा पुणे येथे या कार्यक्रमांतर्गत इयत्ता ८वीच्या वर्गासाठी वर्षभरात चार सत्रे घेण्यात आली.

## ३) प्रज्ञा विकास कार्यक्रम – पुणे

भारत फोर्ज लि., पुणे यांच्या मदतीतून चालणाऱ्या प्रज्ञा विकासच्या दुसऱ्या तुकडीसाठी पुणे शहरातील १. जनता वसाहत (पर्वती पायथा), २. वेताळबाबा वसाहत (हडपसर), ३. केशवनगर (मुंढवा) या तीन वस्ती विभागांमध्ये इयत्ता ६वी व ७वी तील नवीन विद्यार्थ्यांची चाचणी घेऊन निवड करण्यात आली. आठवड्यातून तीन दिवस सायंकाळी वर्ग घेतले जातात. यावर्षी विद्यार्थ्यांसाठी नियमित वर्गासोबत पुढील विशेष उपक्रम घेण्यात आले — **प्रदर्शन व सहाध्यायदिन सहल** - ISRO या भारतीय अवकाश संशोधन केंद्राने योजलेल्या अंतराळ प्रदर्शनात कृत्रिम उपग्रहांविषयी माहिती व त्याचे उपयोजन समजून घेतले. यावर्षी केळकर संग्रहालय, शनिवार वाडा तसेच राजीव गांधी E- Learning school मधील आकाशगंगा 3D emo, 7 Wonder park, कात्रज सर्पोद्यान मधील साप, प्राणी, पक्षी पाहिले. दिवाळीच्या सुट्टीत इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा राजगड किल्यावर रात्र ट्रेक झाला.

### विशेष सत्रांचे नियोजन :

**१) दहावी अभ्यास सत्र व करियर मार्गदर्शन** - केशवनगर व जनता वसाहतीतील पहिल्या तुकडीचे सुमारे २५ विद्यार्थी यावर्षी १० वी च्या परीक्षेला बसले. दहावीत शिकणाऱ्या मुलांसाठी अभ्यास विषयाच्या मार्गदर्शनासाठी (गणित, विज्ञान, सामाजिक अभ्यास) विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. कल चाचणीच्या अहवालावर करियर मार्गदर्शन केले.

**२) इंग्रजी संभाषण** - केशवनगर येथे इंग्रजी संभाषणासाठी झालेल्या मार्गदर्शनामुळे इंग्रजीची गोडी वाढायला मदत झाली. विद्यार्थी स्वतःची ओळख व विविध विषयांवर संवाद इंग्रजीत करू लागले.

**३) प्रकल्प स्पर्धा :** समस्या सोडविणे यामध्ये वस्तीतील समस्या कशा शोधायच्या त्यावर काय उपाययोजना राबविता येईल, यासंदर्भात केशवनगर येथे सत्र घेतले. त्यानुसार मुलांनी गट करून वस्तीतील समस्या शोधून त्या सोडविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे विचार केला.

**४) वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट व्हाव्या यासाठी** LED Battery बनविणे, spooky spoke, string telephone, simple mouthorgan असे मजेशीर विज्ञान प्रयोग व खेळणी तयार करून घेण्यात आली.

५) छात्र प्रबोधन अंकातील विविध लेखांवर गटचर्चा, गटकार्य घेण्यात आले. तसेच कुमारांसाठीच्या दिनदर्शिकेतील 'स्वयं शोध चाचणी' घेतली. त्यातील कलाकृती करून घेतल्या.

६) स्वयंअध्ययन कौशल्य या सत्रात अभ्यास पायऱ्या, वाचन, लेखन, मुलाखत, प्रश्न कौशल्य इ. कौशल्य विद्यार्थ्यांना शिकविण्यात आली.

### प्रज्ञा विकास कार्यक्रम - रोहा

एक्सेल उद्योग समूह, रोहा, यांच्या मदतीतून यावर्षी दुसऱ्या टप्प्यात रोहा तालुक्यातील सहा ग्रामीण, आदिवासी भागातील शाळेतील इयत्ता ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्ग घेण्यात आले. विर्जोली, सानेगाव, घोसाळे, शेणवी, खांब व चिले या शाळांतील सुमारे ९०० विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला.

ऑक्टोबर महिन्यात दोन दिवस पुण्यात ज्ञान प्रबोधिनीमध्ये शिक्षक प्रशिक्षण झाले तसेच विवेकानंद रिसर्च व ट्रेनिंग इन्स्टिट्यूट-रोहा येथे एक शिबिर झाले. सहा शाळांतील वीस अध्यापकांनी प्रशिक्षण घेतले. एक्सेल उद्योग समूहाच्या सामाजिक बांधिलकी विभागाचे प्रमुख श्री. राजकुमार कोरडे व श्री. सुशील रुळेकर यांनी शाळांना भेटी दिल्या.

**इयत्ता १०वीच्या नवीन अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन :** शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वीचा अभ्यासक्रम व परीक्षा पद्धतीमध्ये झालेल्या बदलामुळे, शालेय अभ्यास विषयांचे मार्गदर्शन चार केंद्रांवर सहा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या विविध उपक्रमांचा परिणाम म्हणून बोर्डाच्या परीक्षेत ९० टक्क्याहून अधिक गुण मिळविणारे पाच विद्यार्थी होते, तर ८० टक्क्याहून जास्त गुण मिळविणारे २१ विद्यार्थी होते. सर्व विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ २१ जूनला रोहा येथे संपन्न झाला.

### प्रज्ञा विकास कार्यक्रम - पडसरे

शापूरजी पालनजी ग्रुप, मुंबई यांच्या मदतीतून पडसऱ्याला छोटे सायंटिस्ट प्रमाणेच प्रज्ञा विकास कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता ७वीच्या विद्यार्थ्यांची सुरुवातीला पूर्व चाचणी व कार्यक्रमाच्या शेवटी उत्तर चाचणी घेण्यात आली. इयत्ता सातवीसाठी दरमहा दोन दिवसांची एकूण सात शिबिरे घेण्यात आली. त्यात ७० विद्यार्थी सहभागी झाले होते. इयत्ता ८ व ९वीतील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसांची दोन शिबिरे झाली. त्यात सुमारे १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**कौशल्य विकास व करिअर मार्गदर्शन -** शिरूर, जिल्हा पुणे येथील जनसेवा ग्रामविकास संस्थेचे, महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालय, पिंपळे जगताप, येथील माध्यमिक शाळेत बांसुरी फाउंडेशनच्या माध्यमातून इयत्ता ९वी व १०वीतील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास व करिअर मार्गदर्शन वर्ग झाले. या

प्रकल्पाच्या उद्‌घाटनासाठी बासुरी फाउंडेशनच्या श्रीमती अनुपमा प्रभू व श्री. दीपक सोंडकर उपस्थित होते. अभ्यास कौशल्य व विविध क्षेत्रातील करिअरची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी यासाठी एका वेळी दोन सत्रे, अशी वर्षभरात सात सत्रे झाली. शासनाने घेतलेल्या कल चाचणीच्या आधारे त्यांना पुढे नेमके कोणते शिक्षण घ्यावे याबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा करण्यात आली.

**अनुभव शाळा (खेळघर)** - भारत फोर्ज पुणे यांच्या मदतीतून पुण्यातील केशवनगर-मुंढवा येथील मध्यवस्ती व गायरान वस्ती तसेच हडपसर येथील महात्मा फुले वस्ती या तीन वस्त्यांमध्ये 'अनुभव शाळा' (खेळघर) सुरु आहे. हा उपक्रम वंचित घटकांतील ६ ते ११ या वयोगटातील १२० विद्यार्थ्यांसाठी चालवला जातो. स्वजाणीव, विचार कौशल्ये, अभिव्यक्ती कौशल्ये, कल्पकता, सर्वांगीण विकास (मानसिक, शारीरिक, सामाजिक) अभ्यासातील प्रगती, चांगले संस्कार, निरीक्षण शक्ती, जाणिवांचा विकास व्हावा यासाठी वेगवेगळे उपक्रम या सायंकालीन अनुभवशाळेमध्ये घेतले जातात. तसेच त्यांना पूरक आहार दिला जातो.

विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची माहिती असावी यासाठी वेगवेगळे सण साजरे केले. स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन साजरे करताना विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळेल असे उपक्रम आखले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, नृत्य, नाट्य, पोवाडा असे विविध कलागुण दाखवून दिले. केशवनगरच्या नगरसेविका मा. वंदना कोद्रे व डॉ. दादा कोद्रे यांनी उपस्थित राहून मुलांचा उत्साह वाढविला. हडपसरला डॉ. निलिमा चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

बालकामगार दिन, गांधी जयंतीच्या दिवशी विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातून रॅली काढत स्वच्छतेचा प्रचार केला. 'स्वच्छता ही सेवा' या संकल्पनेवर आधारित स्वच्छतेवर प्रकाश टाकणारे पथनाट्य केशवनगर व हडपसर येथील रस्त्यावर विद्यार्थ्यांनी सादर केले. 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून अनुभव शाळेचे ग्रंथालय विद्यार्थ्यांसाठी खुले करून प्रदर्शन मांडले होते.

**सहाध्यायदिन सहल** - २५ डिसेंबर रोजी सहाध्यायदिन सहल राजीव गांधी ई लर्निंग स्कूल, सेव्हन वंडर पार्क, राजीव गांधी प्राणी संग्रहालय, कात्रज येथे गेली होती. २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनाला विद्यार्थ्यांनी काही छोटे छोटे प्रयोग सादर केले. ८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. 'शिवजयंती'ला विद्यार्थ्यांनी शिवरायांबद्दल माहिती सांगितली. इतिहासातील कर्तृत्ववान पुरुषांची व महिलांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. परिसरात नेहमी उभ्या असलेल्या भाजी व फळवाल्यांची मुलाखत घेउन त्यांचे प्रश्न व आयुष्य समजून घेतले. हडपसर येथील विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी टॅबचा योग्य व पुरेपूर वापर केला.

### ज्ञान सेतू -

**इतर राज्यांतील कार्यशाळा** - एप्रिल ते डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये आसाम, जम्मू, मेघालय, मणिपूर, अरुणाचल, झारखंड या राज्यांमध्ये कार्यशाळा घेण्यात आल्या.

**ज्ञानसेतू मेळावा** - १५ ऑगस्ट २०१८ रोजी ज्ञानसेतू मेळाव्याचे आयोजन केले होते. मेळाव्याचा मुख्य हेतू हा जास्तीत जास्त जणांपर्यंत या उपक्रमाची माहिती पोचवणे आणि या उपक्रमातील सहभागाबद्दल माहिती देणे हा होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती पूनम मेहता आणि शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे प्रमुख प्रा. विवेक पोंक्षे उपस्थित होते.

**फोल्डस्कोप कार्यशाळा** - भारत सरकार कडून अनुदान प्राप्त प्रकल्पाअंतर्गत एप्रिल २०१९ रोजी दिल्ली येथे जैवतंत्रज्ञान विभागातर्फे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते त्यासाठी पूर्वा धोकटे उपस्थित होत्या . तिथे प्रशिक्षणाबरोबर विविध राज्यात (मुख्यतः ईशान्य भारत) कार्यशाळा घेण्यासाठी साहित्य पेटी देण्यात आली.

- **एकूण कार्यशाळा - ८७**
- **विद्यार्थी संख्या - ३७६९**
- **शिक्षक संख्या - ४५**
- **राज्ये - आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, झारखंड, छत्तीसगढ, महाराष्ट्र**

**ज्ञान सेतू - इतर राज्यांतील कार्यशाळा**

| कालावधी सन २०१८ | सहभागी स्वयंसेवक | एकूण कार्यशाळा | विद्यार्थी संख्या | राज्य |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-मे | ५३ | ९२ | ५५०० | आसाम, जम्मू, मेघालय, मणिपूर, अरुणाचल |
| जुलै | ४ | निवासी कार्यशाळा | ७० | आसाम (पार्वतीपूर) |
| सप्टेंबर | ५ | १० | ६०० | झारखंड |
| नोव्हें.-डिसें. | ४८ | २४० | | |
| नोव्हें.-डिसें. | ४ | निवासी कार्यशाळा | २० | आसाम (पार्वतीपूर) (गणित प्रकल्प) |
| **एकूण** | **७०** | **११२** | **६४३०** | |

### विवेक इन्स्पायर -

विवेक इन्स्पायर प्रकल्पाचे हे चौथे वर्ष. अरुणाचल प्रदेशातील विवेकानंद केंद्राच्या २२ शाळांमधील ८वी ते १०वीच्या निवडक सुमारे ३५० विद्यार्थ्यांसाठी क्षमता विकास, बुद्धिमत्ता संवर्धन आणि शालेय स्पर्धा परीक्षांची तयारी अशी शिबिरे घेणे हा या प्रकल्पाचा मुख्य हेतू आहे.

गेल्या शैक्षणिक वर्षात पाच दिवसीय शिबिरे, ठरलेल्या शालेय केंद्रांवरती (बालीजन, निर्जुली, रोइंग,

झिरो) झाली. यामध्ये ७वीसाठी निरीक्षण कौशल्ये व गटकार्ये, ८वीसाठी प्रकल्पाधारित शिक्षण, ८वी व ९वी National Merit cum Means Scholarship (NMMS) आणि State Merit Scholarship (SMS) या स्पर्धा परीक्षांसाठीची तयारी, ७वी व ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी पुणे Exposure visit, ७वी व ८वीसाठी रसास्वाद आणि स्थानिकांची अनुभव कथने झाली.

६ ते १६ डिसेंबर २०१८ या कालावधीत रोइंग आणि झिरो केंद्रांतील शाळांमधील ४३ विद्यार्थी आणि त्यांचे पाच शिक्षक पुण्याला आले होते. याच दरम्यान सहा दिवसांच्या छोट्या कार्यशाळांमधून विद्यार्थ्यांनी त्यांनी निवडलेल्या विषयांची दिग्गजांबरोबर ओळख करून घेतली. वेगवेगळ्या संस्थांना दिलेल्या भेटी, पाहिलेल्या शहरातील छोट्या छोट्या गोष्टी, स्थानिक विद्यार्थ्यांशी झालेल्या गप्पा-गोष्टी आणि दौऱ्याच्या शेवटी पाहिलेला कोकणातील समुद्र हे सगळे अनुभव मुलं आणि शिक्षकांसाठी वेगळे व नवीन होते.

## ४) शैक्षणिक साधन केंद्र -

### Movement of Open Online Learning (MOOL)

◆ **बालभारती :** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळासाठी विज्ञान, भूगोल आणि संस्कृत विषयाचे ९वी आणि १०वीसाठी QR Code व्हिडिओ निर्मितीचे काम करण्यात आले. हे साहित्य मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषांत उपलब्ध आहे. तसेच अन्य राज्यांतील विद्यार्थ्यांसाठी www.diksha.gov.in/explore या पोर्टलवर gyanqr असे शोधल्यावर ज्ञान प्रबोधिनी निर्मित व्हिडिओ पाहता आणि डाउनलोड करता येतात. यावर्षी ४५० eResourcesची निर्मिती करण्यात आली. HRD Ministry कडून ज्ञान प्रबोधिनी Champion partner म्हणून जाहीर झाली. त्यामुळे अन्य राज्यांतील QR CODE वर हे साहित्य जोडण्यासाठी उपलब्ध करण्यात आले आहे. या निर्मितीसाठी Maersk Global Service Centres (India) PVT. Ltd आणि Prescient Technologies, Pune या कंपनीच्या CSRची मदत झाली. पाठ्यपुस्तकातून महाराष्ट्रातील ३६जिल्हे, ३२ लाख मुले यांच्यापर्यंत ज्ञान प्रबोधिनी आणि बालभारती निर्मित eResources पोचले.

◆ **दीक्षा प्रकल्प :** दि. १३-१४ मार्च रोजी MSCERT आणि Columbia University for Sustainable Development Centre यांच्या संयुक्त विद्यमाने Student-centric digital content creation guideline for Maharashtra अशी कार्यशाळा घेण्यात आली. त्यात अनुभवी शिक्षक, बालभारतीचे तज्ज्ञ आणि दीक्षाच्या सहयोगी संस्था सहभागी होत्या. त्यामध्ये digital content तयार करण्यासाठीचे गुणवत्तेचे निकष (eResource creation guideline) विषयवार लिहिण्याचे काम केले गेले.

◆ **ज्ञान वाहिनी :** जम्मू काश्मीर ज्ञान वाहिनी उपक्रमामध्ये Jammu Kashmir Knowledge Network (JKKN) बरोबर तेथील सरकारी शाळांतील ९वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शनची १८ Online सत्रे घेण्यात आली. एका सत्रात ११ ते २० शाळा उपस्थित असतात. प्रा. सविता कुलकर्णी यांनी Career in Civil Services यावर मार्गदर्शन सत्र घेतले. वर्षभरात २२ जिल्ह्यांतील, २०० शाळांतील ३००० विद्यार्थी सहभागी झाले.

ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर येथील ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी एकूण दहा मार्गदर्शन सत्रे घेतली. ज्ञान प्रबोधिनी, निगडी आणि पुणे यांच्यासाठी प्रा. सविता कुलकर्णी यांनी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेची तयारी यावर मार्गदर्शन सत्र घेतले. विवेकानंद केंद्राच्या ३० मुख्याध्यापकांसाठी तिनसुखिया, आसाम येथे योजलेल्या बैठकीत प्रा. विवेकराव पोंक्षे यांनी प्रकल्प पद्धतीवर मार्गदर्शन केले. ज्ञान प्रबोधिनी निगडी, सोलापूर आणि विवेकानंद केंद्र विद्यालय, दिब्रुगड येथील ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी गणिताचा एक तास घेतला. याला ७५ विद्यार्थी आणि दहा शिक्षक उपस्थित होते.

ज्ञान प्रबोधिनी, पुणे आणि मिलेनियम नॅशनल स्कूल येथील चायनीज (Mandarin) भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी Maersk Global Service Centres या कंपनीमधील सहा सदस्यांनी तीन तास online सत्र घेतले. यामध्ये ३० मुले सहभागी होती. स्थानिक चायनीज लोकांशी चायनीजमध्ये बोलण्याचा पहिलाच अनुभव सर्व मुलांना मिळाला.

◆ **Learn Prabodhini Way :** शिक्षकांसाठी ऑनलाइन कोर्सेसचे www.learnprabodhiniway.com हे पोर्टल विकसित करण्यात आले. यातून ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण आणि अध्यापन पद्धतीची ओळख होईल. तसेच आपल्या वेळेनुसार आणि क्षमतेनुसार शिकता येईल. तसेच कौशल्य विकसन आणि आशयावर आधारित अभ्यासक्रम मराठी आणि इंग्रजी भाषेत येथे उपलब्ध आहेत. Study Skills, Classroom Management, मूलभूत गणित, मराठी भाषा अध्ययन हे चार अभ्यासक्रम दि. १ जून १८ पासून उपलब्ध झाले.

◆ **Compete Prabodhini Way :** ५वी आणि ८वी साठी शिष्यवृत्ती परीक्षेच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमासाठी १०० सराव प्रश्नपत्रिका www.competeprabodhiniway.com या पोर्टलवर विद्यार्थ्यांना उपलब्ध केल्या. तसेच होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा, NTS अशा वेगवेळ्या परीक्षांसाठी ३२५ मुलांनी याचा लाभ घेतला.

◆ **TCS Project :** Identifying and nurturing gifted and talented students हा कोर्स TCSiON च्या platform वर शिक्षकांसाठी उपलब्ध केला. TCSiON च्या मुंबई आणि हैद्राबाद branch साठी शास्त्र, गणित, आणि बुद्धिमता या विषयांचे सराव प्रश्नसंच तयार केले. या कामासाठी २० तज्ज्ञांनी काम केले.

▲▲▲

# ३. छात्र प्रबोधन

◆ **दृष्टिक्षेपात - छात्र प्रबोधन**

- नित्य, सुबोध, इंग्रजी दिवाळी अंकांचे प्रकाशन... ४०,००० अंकांची नोंदणी व वितरण.
- छात्र प्रबोधन नित्य दिवाळी अंकाला 'उत्कृष्ट बालकुमार दिवाळी अंका'चा प्रथम पुरस्कार, तर मुखपृष्ठाला उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त.
- वर्ग ग्रंथालय योजना... या वर्षात नव्याने १५९ वर्गांमध्ये प्रारंभ,
  २ वर्षात मिळून ३५१ वर्गांमधील १५,५०० विद्यार्थी सहभागी.
- वाचक शिष्यवृत्ती योजना... ६८ होतकरू विद्यार्थ्यांना वर्षभराची वर्गणी मोफत.
- छात्र प्रबोधन कार्यालयातील सदस्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी... ३ कार्यशाळा.
- कुमार साहित्य मेळावे... ३६ ठिकाणी, १५०० विद्यार्थी सहभागी.
- राज्यस्तरीय अभिवाचन व हस्तलिखित स्पर्धा... ११८ संघ, १०६० विद्यार्थी सहभागी.
- ९ पुस्तकांचे पुनर्मुद्रण/आवृत्ती तर २ पुस्तकांची नवीन आवृत्ती प्रकाशित.

## १. काही महत्त्वाचे उपक्रम

### ◆ कुमार साहित्य मेळावे

मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढावी, साहित्याविषयी रुची निर्माण व्हावी, गटात बोलण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, वादविवाद स्पर्धेतून विचारांना चालना मिळावी यासाठी 'कुमार साहित्य मेळावा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २०१८-१९ मध्ये एकूण ३६ ठिकाणी कुमार साहित्य मेळावे घेण्यात आले. डोंबिवली, इचलकरंजी, चिपळूण, भोर, पुणे अशा विविध ठिकाणी हे मेळावे अतिशय उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात पार पडले. यामध्ये सुमारे १,५०० विद्यार्थी सहभागी झाले होते. हे मेळावे घेण्यापूर्वी मेळावे घेणाऱ्या शिक्षकांची, कार्यकर्त्यांची कार्यशाळा घेण्यात आली. त्यात मेळावा कशाप्रकारे घेण्यात यावा? यासंबंधी मार्गदर्शन केले होते. छात्र प्रबोधनचे कार्यालयीन सदस्य, संवादिनीतील कार्यकर्त्या, गावोगावचे कार्यकर्ते व नेतृत्व संवर्धन केंद्रातील विद्यार्थी यांनी मिळून, हे सर्व कुमार साहित्य मेळावे घेतले.

३ ते ४ तासांच्या या मेळाव्यात अंकातील साहित्याच्या आधारे मौन व प्रकट वाचन, भाषिक खेळ व स्पर्धा, प्रतिभाशाली लेखन, सादरीकरण, गटचर्चा इ. कार्यक्रम घेतले गेले. मेळाव्यात विद्यार्थ्यांना 'छात्र प्रबोधन'चा प्रत्येकी एक अंक देण्यात आला. पुणे नगर वाचनालयातर्फे ३ठिकाणचे मेळावे प्रायोजित केले होते. उर्वरित ठिकाणी विद्यार्थ्यांकडून नाममात्र रु. १० शुल्क घेण्यात आले. शहरी भागातील विद्यार्थ्यांपेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद अत्यंत उत्सफूर्त, उत्साहपूर्ण होता.

### ◆ कुमारांसाठी दिनदर्शिका

खास कुमारांसाठी कृतिशीलतेला वाव देणारी दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली. यामध्ये ग्रेगोरियन दिनांक, वार, राष्ट्रीय सौर दिनांक व २०० पेक्षा अधिक दिनविशेषांचा समावेश करण्यात आला आहे. दिनविशेषांबरोबरच 'चला संकल्प करू' या सदरात मुलांनी नक्की करावे असे बारा संकल्प देण्यात आले. मुलांना स्वत:मधील ऊर्जा, क्षमता यांबरोबरच उणिवा ओळखण्यासाठी माझी कल्पकता, निर्णयक्षमता, भावनांविषयीची जाण, जबाबदारपणा इ. बारा विषयांवरील बारा 'स्वयंशोध' चाचण्या देण्यात आल्या आहेत. याचे गुणांनुसार गुणांकन कसे करायचे हे स्पष्ट केले आहे. दिनदर्शिकेच्या मागील बाजूस या गुणांनुसार स्वयं विकासासाठी करावयाच्या एकूण ७२ कृतींची यादी दिली आहे.

मुलांमधील कृतिशीलतेला, कल्पकतेला वाव देण्यासाठी दिनदर्शिकेच्या प्रत्येक पानाच्या मागील बाजूस एकूण बारा कलाकृती दिल्या आहेत. आकृत्या व त्या करण्यासाठी त्याची कृती देण्यात आली आहे. प्रत्येक महिना संपल्यावर पान फाडून मागील बाजूस दिलेल्या कलाकृती मुलांनी तयार करायच्या आहेत.

दिनदर्शिकेत मुलांनी दर महिन्याला QR Code द्वारा 'अवश्य वाचावे' असे 'छात्र प्रबोधन'मधून प्रकाशित झालेल्या साहित्यातील पद्य, कथा, कविता, ललित लेख यांचा खजिना मुलांसाठी उपलब्ध करून दिला आहे. याशिवाय विविध दृकश्राव्यांची जोड दिलेले एकूण ७० QR Code दिनदर्शिकेत छापले आहेत. चार हजार विद्यार्थ्यांनी या दिनदर्शिका विकत घेतल्या. दिवाळी अंकासोबत या दिनदर्शिकेची नोंदणी व वितरण झाले.

### ◆ विविध स्पर्धा

विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून अभिव्यक्त व्हावे, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांनी गटात काम करण्याचा अनुभव घ्यावा, सादरीकरण करताना त्यांचा आत्मविश्वास वाढावा या हेतूने छात्र प्रबोधनतर्फे राज्यस्तरीय 'अभिवाचन स्पर्धा' आणि राज्यस्तरीय 'तुम्हीच संपादक व्हा!' या

**पाहूया -** स्पर्धेतील प्रथम क्रमांकप्राप्त गटाने केलेल्या अभिवाचनाची झलक

**पाहूया -** दिनदर्शिका २०१९

**पाहूया -** प्रथम क्रमांक प्राप्त हस्तलिखित 'पारिजात'

हस्तलिखित स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन्ही स्पर्धांमध्ये मिळून सुमारे १,०६० विद्यार्थी सहभागी झाले. विभागवार व राज्यस्तरीय अशा दोन स्तरांवर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. एकूणच स्पर्धेची गुणवत्ता वाढावी यासाठी दोन्ही स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांसाठी विभागवार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या-त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळेत बोलावल्या होत्या.

**१) अभिवाचन स्पर्धा**

'छात्र प्रबोधन' व 'रंगगंध कलासक्त न्यास, चाळीसगाव'द्वारा संयुक्तपणे 'राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. इयत्ता ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये एकूण ६३ गटांमधून ५१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. २५ ते २९ सप्टेंबरच्या दरम्यान विभागवार सहभागी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेची प्रथम फेरी पुणे, डोंबिवली, जळगाव, अमरावती, नांदेड, मालेगाव येथे झाली. त्यानंतर त्यातील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या संघाच्या व्हिडिओ शुटिंगच्या सीडीच्याआधारे पुण्यामध्ये राज्यस्तरीय परीक्षण करण्यात आले. पुणे आकाशवाणीमध्ये सूत्रसंचालक म्हणून काम करणारे प्रसाद कुलकर्णी व छात्र प्रबोधनच्या कार्यकारी संपादिका शिल्पा कुलकर्णी यांनी या स्पर्धेचे अंतिम परीक्षण केले. या स्पर्धेत राज्यस्तरीय गटात पुण्यातील मा. स. गोळवलकर गुरुजी विद्यालय, पुणे यांना प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक टायनी एन्जल्स स्कूल - नांदेड, तृतीय क्रमांक एस.पी.एम. इंग्लिश स्कूल-पुणे यांना प्राप्त झाला. याशिवाय प. न. लुंकड कन्या शाळा, जळगाव व कुळगाव- बदलापूर नगर परिषद शाळा क्र. १५, बदलापूर या संघांना उत्तेजनार्थ व बारा संघांना विभागवार बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेच्या सर्व बक्षिसप्राप्त संघांना प्रशस्तिपत्रक आणि पुस्तक रूपाने बक्षिसे पाठवण्यात आली. या बक्षिसांसाठी 'राज्य मराठी विकास संस्थे'चे आर्थिक योगदान लाभले.

**२) हस्तलिखित स्पर्धा**

'छात्र प्रबोधन'तर्फे राज्यस्तरीय 'तुम्हीच संपादक व्हा!' हस्तलिखित स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी प्रथम पुणे, बारामती, नाशिक, आंबेजोगाई येथे 'छात्र प्रबोधन'तर्फे कार्यशाळा घेण्यात आली. हस्तलिखित स्पर्धेमध्ये एकूण ५५ गट सहभागी झाले होते. त्यात एकूण ५५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

विविध विभागातील संघांचा या स्पर्धेत उत्साहवर्धक सहभाग होता. वाङ्मयीन विविधता, संपादन कौशल्य, आशय दर्जा, मुखपृष्ठ, सजावट, शुद्धलेखन, हस्ताक्षर, सामुहिक कृती या निकषांद्वारे या हस्तलिखितांचे परीक्षण करण्यात आले. छात्र प्रबोधनच्या संपादक मंडळातील सदस्य नीलिमा करमरकर आणि माजी कार्यकारी संपादिका वर्षा कुलकर्णी यांनी हस्तलिखितांचे राज्यस्तरीय परीक्षण केले.

या स्पर्धेत निगडीतील ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाने तयार केलेल्या 'पारिजात' या हस्तलिखिताला प्रथम क्रमांक, 'प्रेरणा' बाल शिवाजी शाळा, अकोला यांना द्वितीय क्रमांक तर 'अंतर्नाद' एस.पी.एम इंग्लिश स्कूल पुणे यांना तृतीय क्रमांकाने गौरवण्यात आले. तसेच सात संघांना विभागवार गौरवण्यात आले. विजयचिन्ह, प्रशस्तिपत्रक व रोख रक्कम असे या स्पर्धेच्या बक्षिसाचे स्वरूप होते.

## २. कामातील नावीन्यपूर्ण भर

### ◆ अंकाला QR Code ची जोड

दिवाळी अंकापासून अंकातील साहित्याला QR Code ची जोड देण्यात आली आहे. अंकातील पानांची मर्यादा लक्षात घेता लेख, कविता व अन्य साहित्याबरोबरच त्या-त्या लेखांना पूरक असे साहित्य वाचायला, बघायला, ऐकायला मिळावे यासाठी QR Code ची जोड दिली आहे. गेल्या पाच अंकांमध्ये एकूण ५६ QR Code दिले आहेत.



**छात्र प्रबोधन वितरण केंद्रांची जिल्हानिहाय सद्यस्थिती**

▲▲▲

# ४. नेतृत्व संवर्धन केंद्र

### ◆ दृष्टीक्षेपात नेतृत्व संवर्धन केंद्र

प्रशासकीय व संघटनात्मक नेतृत्व विकसनाच्या एकूण चार तुकडया या वर्षात पूर्ण झाल्या. सर्व तुकड्यांमध्ये मिळून एकूण १५४ विद्यार्थी सहभागी झाले.

गुजरात अभ्यास सहल, संकल्प व्याख्यानमाला, ग्रेट-भेट मुलाखत स्पर्धा, छात्र प्रबोधन साहित्य मेळावे या उपक्रमांमध्ये ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी जबाबदारी घेऊन उपक्रम यशस्वी करून दाखवले.

युवोन्मेष या नेतृत्व विषयाला वाहिलेल्या मासिकाचा नियमित अंक २००० सभासदांपर्यंत, तर दिवाळी अंक ४००० जणांपर्यंत पोचला.

विविध महाविद्यालयांमध्ये नेतृत्व विषयक प्रासंगिक प्रशिक्षण कार्यशाळा व कृतिसत्रे - ५०० युवक-युवतींचा सहभाग

### ◆ नियमित कामाचे वृत्त

**१) प्रशासकीय नेतृत्वविकसन** - नेतृत्व पायाभरणी व स्पर्धा परीक्षा तयारीसाठी रोज सायं. ६ ते ८ व शनिवारी दु. ३ ते रा. ८ या वेळात जिज्ञासा १२ व १३ (बेसिक) व आकांक्षा - ६ (ॲडव्हान्स) असे नियमित वर्ग या वर्षी देखील झाले. महाराष्ट्राच्या विविध भागांतून शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या १२९ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात औपचारिक शिक्षण घेत हे वर्ग पूर्ण केले.

नित्य वर्गाच्या प्रक्रियांमध्ये या वर्षी नव्याने काही भर घातली. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी नियमितपणे अभ्यास करावा, या दृष्टीने वर्गात अभ्यास विषय शिकवण्याबरोबरच छोट्या-छोट्या उपविषयांवर दहा मिनिटांची सादरीकरणे, लेखी गृहपाठ, प्रत्येक विषयाची पाक्षिक परीक्षा या प्रक्रियांची भर अभ्यासक्रमात घालण्यात आली. या सर्वांच्या मूल्यमापन पद्धती ठरविण्यात आल्या. या बदलांना विद्यार्थ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. वर्षभरात सुमारे ६० विद्यार्थ्यांनी पथकप्रमुख म्हणून काम करण्याचा अनुभव घेतला. त्यांच्या नियमित बैठकी झाल्या. त्यात वर्गातील अभ्यासक्रमाबद्दल प्रतिसाद घेण्याबरोबरच पथकाने करण्यासारखे नवीन उपक्रम सुचवणे, चालू उपक्रमांमागची भूमिका पोचविणे व त्यावर चर्चा करणे इ. चा समावेश होता.

नेतृत्व पायाभरणीसाठी दरवर्षीप्रमाणे राजगड येथे रात्र गिरीभ्रमण सहल, १०० कि. मी. ची सायकल सहल, साहस शिबिर, ग्रामीण परिचय शिबीर, नेतृत्व कौशल्य प्रशिक्षणासाठी दोन नेतृत्व शिबिरे, गटकार्ये व जोडीकार्ये हे उपक्रम झाले. यातील ग्रामीण परिचय शिबिरांच्या रचनेत या वर्षी बदल केला. यापूर्वीच्या शिबिरांत सर्वेक्षण पद्धती वापरून गावाची गेल्या पन्नास वर्षांची कालरेषा तयार केली जायची. हे काम खूपच तांत्रिक होत होते. ग्रामीण जीवनाची अधिक जवळून ओळख व्हावी, गावगाडा कसा चालतो हे कळावे व त्यातून विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण व्हावी या हेतूंनी गटश: मुलाखती घेणे व त्याआधारे Case studies मांडणे असे काम विद्यार्थ्यांनी यावर्षी केले.

आकांक्षा वर्गाच्या अभ्यासक्रमात या वर्षी जिल्हा अभ्यास दौऱ्याची भर पडली. या वर्गातील पाच गटांनी तालुका अभ्यास दौरे पूर्ण केले होते. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून तीन दिवसांच्या जिल्हा अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले होते. या दौऱ्यात सौ. वर्षा शिंगण-पाटील (तहसीलदार), श्री. पंकज देशमुख (पोलीस आयुक्त, सातारा) व श्री. सत्यजित बढे (उप-कार्यकारी अधिकारी) या प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट झाली. रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, श्रमजीवी संघटनेचे श्री. बाळासाहेब कोळेकर, पाणी फाउंडेशनचे मार्गदर्शक श्री. अविनाश पोळ यांच्या भेटी संस्मरणीय झाल्या. माणदेशी बँक व फाउंडेशनचे व्यापक काम विद्यार्थ्यांनी बघितले. अशाप्रकारे जिल्ह्याच्या प्रशासकीय, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक पैलूंचा अभ्यास करण्याचा हा वेगवान प्रयत्न यशस्वी झाल्याचे जाणवले. या दौऱ्यात वर्गातील एकूण चौदा विद्यार्थी व दोन मार्गदर्शक सहभागी झाले होते.

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीव विस्तारण्यासाठी गुजरात अभ्यास दौरा करण्यात आला. यासाठी बेसिक बॅचचे दहा विद्यार्थी आणि दोन मार्गदर्शक सहभागी होते. आनंद, जामनगर, भूज, कच्छ, अहमदाबाद आणि पुंसरी या ठिकाणी भेटी झाल्या. गुजरातमधील प्रशासनाचा अभ्यास करणे, सामाजिक संस्थांचे काम समजून घेणे असा या सहलीचा उद्देश होता.

**२) संघटनात्मक नेतृत्व विकसन** - संघटना उभारून काम करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी एक वर्षाचा अभ्यासक्रम ठरवून पहिल्यांदाच असा वर्ग घेण्यात आला. स्वरूपवर्धिनी या संघटनेमधील २३ कार्यकर्ते व अन्य दोन इच्छुक सदस्य या वर्गात सहभागी झाले होते. ऑक्टो. १८ रोजी सुरू झालेल्या या वर्गाचा समारोप मे १९ मध्ये झाला.

'उन्मेष' या नावाने झालेल्या या प्रारंभिक वर्गात चार कौशल्ये — संपर्क व संवाद, नियोजन कार्यवाही, गटकार्य, अभ्यास विचार व चार क्षमता : स्व-ओळख व विकसन, सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण, ध्येय-प्रेरणा यांच्यावर आधारित अभ्यासक्रम

पूर्ण झाला. या वर्गात एकूण १०२ सत्रांत वर दिलेल्या विषयांची मांडणी झाली, त्यासोबत दहा दिवसांचे निवासी/अनिवासी कार्यक्रम झाले. एक दिवसीय गिर्यारोहण, साहस शिबिर, आंबेडकर विचार अभ्यास शिबिर, श्रमकार्य असे उपक्रम त्यात झाले. या वर्गामुळे सहभागी सदस्यांमध्ये अनेक सकारात्मक बदल झाल्याचे जाणवले. सर्वांना स्वत:कडे व वर्धिनीच्या कामाकडे सजगतेने बघण्याची सवय लागली, दैनंदिन समस्यांवर स्वत: मार्ग काढण्याची धडपड वाढली, काही जणांमध्ये नियोजनपूर्वक कामे करण्याची वृत्ती निर्माण झाली, जाणीवपूर्वक आत्मपरीक्षण करायचा प्रयत्न सुरू केला, नवीन, वेगळं, उपयुक्त काही शिकतो आहोत याची जाणीव झाली.

ज्ञान प्रबोधिनी आणि स्वरूपवर्धिनी या दोन्ही संघटनांमधील कार्यकर्त्यांच्या गटाने नियमितपणे चर्चा करत या वर्गाचा अभ्यासक्रम तयार केला. सहभागी सदस्यांमध्ये नक्की काय बदल झाले हे तपासण्यासाठी प्रज्ञा मानस संशोधिकेच्या मदतीने पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्यात आली. पुढच्या काळात अन्य संघटनांच्या कार्यकर्त्यांसाठी हा अभ्यासक्रम दिशादर्शक ठरेल याची खात्री वाटते.

### ◆ या वर्षातील विशेष उपक्रम

नेतृत्वाचे जे प्रशिक्षण आपण या वर्गात घेतो त्याचे उपयोजन करून बघण्यासाठी काही उपक्रमांमध्ये सहभागाचे आवाहन सर्व विद्यार्थ्यांना केले जाते. त्या उपक्रमांचे तपशील पुढे दिलेले आहेत. केंद्रातील सहभागी विद्यार्थ्यांपलीकडचा गट जमविणे, त्यांना एक उद्दिष्ट दाखवणे, ते पूर्ण करण्यासाठी काटेकोर नियोजन करणे व त्या नियोजनाची कार्यवाही करणे अशी संपूर्ण प्रक्रिया स्वयंस्फूर्तीने या उपक्रमांमध्ये सहभागी झालेल्या ४० जणांनी अनुभवली.

**१) संकल्प व्याख्यानमाला –** ही व्याख्यानमाला विद्यार्थ्यांद्वारे मॉडर्न महाविद्यालय, गरवारे महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे विद्यार्थी गृह अभियांत्रिकी महाविद्यालय या चार महाविद्यालयांत आयोजित करण्यात आली. संकल्पपूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींची अनुभवकथने महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर व्हावीत, या उद्देशाने या संकल्प व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. श्री. प्रशांत पाटील (प्रशासकीय अधिकारी), श्री. विवेक वेलणकर (माहिती अधिकार चळवळीतील कार्यकर्ते), श्रीमती मीरा बडवे (अंध विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या 'निवांत' संस्थेच्या संस्थापिका), सौ. सुवर्णा गोखले (ग्रामीण स्त्री शक्ती प्रबोधनाच्या कार्यातील प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या), श्री. निपुण धर्माधिकारी (अभिनेता, दिग्दर्शक), कु. वैदेही वैद्य (सदस्य, जागतिक फुटबॉल महासंघ), श्री. अधिक कदम (काश्मीरमधील युवती महिलांच्या शिक्षणात काम करणाऱ्या बॉर्डरलेस वर्ल्ड फौंडेशन संस्थेचे संस्थापक), श्री. संतोष गोंधळेकर (ऊर्जा क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या 'गंगोत्री' संस्थेचे संस्थापक) श्री. सारंग साठ्ये (भारतीय डिजिटल पार्टी या ई-वाहिनीचे संस्थापक) या सर्वांची अनुभवकथने, मुलाखती असे स्वरूप होते. या सर्व उपक्रमांच्या नियोजनासाठी नेतृत्व संवर्धन केंद्रातील २३ विद्यार्थी व त्या-त्या महाविद्यालयातील २५ धडपडणारे युवक, युवती या सर्वांनी जबाबदारी घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.

**२) ग्रेट भेट मुलाखत स्पर्धा –** ही स्पर्धा या वर्षी नव्यानेच आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना भेटण्याची, त्यांची मुलाखत घेण्याची संधी मिळावी आणि त्या निमित्ताने मुलाखत घेण्याचे कौशल्य विकसित व्हावे यासाठी ही मुलाखत स्पर्धा घेण्यात आली. एकूण २२ जोडया प्रत्यक्ष सहाभागी झाल्या होत्या. दीनानाथ रुग्णालयाचे डॉ. धनंजय केळकर, 'चैतन्य' संस्थेच्या श्रीमती सुधाताई कोठारी, पिंपरी-चिंचवड म.न.पा. चे आयुक्त, श्री. श्रावण हर्डीकर या व अशा विविध क्षेत्रांतल्या दिग्गजांच्या मुलाखती या मुलांनी घेतल्या. या सर्व उपक्रमाच्या नियोजनामध्ये नेतृत्व संवर्धन केंद्रातील सहा विद्यार्थी सहभागी झाले होते.

**३) छात्र प्रबोधन मेळावे –** हे मेळावे छात्र प्रबोधनच्यावतीने घेण्यात आले. नेतृत्व संवर्धन केंद्रातील एकोणीस विद्यार्थ्यांनी एकूण अकरा ठिकाणी मेळावे घेतले. प्रत्येक मेळाव्यामध्ये केंद्रातील तीन ते चार विद्यार्थ्यांनी त्या-त्या मेळाव्याची जबाबदारी घेऊन ते पार पाडले. या निमित्तानी सुमारे १००० विद्यार्थ्यांपर्यंत हे युवक पोचले. कथापूर्ती (छात्र प्रबोधन दिवाळी अंकातील एक कथा अर्धी वाचून दाखवायची व शाळेतील विद्यार्थी ती पूर्ण करतील), वादविवाद स्पर्धा, शब्दांचे खेळ व समारोप असे मेळाव्यांचे साधारण स्वरूप होते. या मेळाव्याद्वारे शालेय गटातील विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण व्हावी हा हेतू होता.

### ◆ निवडक विद्यार्थ्यांची मनोगते

**१) इंद्रायणी आपटे (जिज्ञासा १२)** : I have got much more than I expected from this course. Even my family members could witness positive changes in me. I have gained patience to work in the team, felt confident while communicating in public.

**२) परीक्षित नलावडे (जिज्ञासा १३)** : नेतृत्व पायाभरणीच्या सगळ्या उपक्रमांमुळे नेतृत्वाबद्दल बोलणे आणि वास्तवात नेतृत्व करणे यातला फरक प्रकर्षाने कळला आणि त्यानुसार स्वत:मध्ये बदल करता आले. भावनात्मकदृष्ट्या जास्त प्रगल्भ झालो!

**३) चेतन धोत्रे (उन्मेष)** : या वर्गात शिकलेल्या कौशल्यांचा स्व-रूपवर्धिनीच्या शाखेचं काम करताना खूप उपयोग झाला. शाखेच्या कार्यक्रमांचे पक्के नियोजन, त्याची उद्दिष्ट ठरविणे हे मला जमू शकले. हे करता-करता सामाजिक जाणीव तर वाढलीच पण व्यक्ती म्हणून माझा आत्मविश्वासही प्रचंड वाढला.

### ◆ केरळ आपत्तीग्रस्त मदतकार्य टप्पा२ (मनो-सामाजिक पुनर्वसन)

केरळ आपत्ती मदतकार्याचा दुसरा टप्पा म्हणून 'ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्र' आणि 'मैत्री संघटना, केरळ' यांनी आपत्तीग्रस्त लोकांना मानसिक, सामाजिक आधार देणारा उपक्रम केला.

उपक्रमाचा मूळ उद्देश आपत्तीग्रस्त लोकांचे म्हणणे संवेदनशीलपणे ऐकणे (listening Support) देणे आणि आपत्तीच्या भीषणतेमुळे सोसाव्या लागणाऱ्या मानसिक धक्क्याला सामोरे जाण्यासाठी आवश्यक मनोसामाजिक आधार देणे असा होता. प्रत्यक्ष उपक्रमाला सुरुवात करण्याआधी वीस स्वयंवसेवकांचे तीन दिवसांचे, वीस तासांचे प्रशिक्षण झाले. या मध्ये त्यांना SALT (Approach), Active Listening विषयाचे प्रशिक्षण अनुभवी तज्ज्ञांकडून मिळाले. एकूण चौदा विद्यार्थी यात सहभागी झाले व त्यातले तीन सदस्य पूर्ण एक महिना केरळ मध्ये राहिले. पहिल्या टप्प्यात ३२४ घरांमध्ये जाऊन संवाद साधला गेला. त्यापैकी ६० आत्महत्याप्रवण सदस्यांची घरे दुसऱ्यांदा भेटीसाठी निश्चित करण्यात आली आणि तिसऱ्या टप्प्यामध्ये वस्ती भेटी केल्या.

स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे तसेच सामान्यतः आयुष्यात देखील हा अनुभव विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरला आणि आयुष्याच्या ध्येयाबद्दलचे (Life Goals) चित्र आणखी स्पष्ट व्हायला मदत झाली.

### ◆ नियमित उपक्रम

**प्रशिक्षण वर्ग**

**अ) UPSC Facilitation Batch –** या वर्षामध्ये UPSC Facilitation Batch हा नियमित वर्ग घेण्यात आला. या वर्गामध्ये अभ्यासकौशल्य, वृत्तीघडण, क्षमताविकसन या विषयीचे उपक्रम घेण्यात आले.

या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात वैयक्तिक समुपदेशनाची सत्रे झाली. त्यांच्या अभ्यासातील व वैयक्तिक अडचणी समजून घेऊन सोडवण्यास मदत केली.

News Circle या उपक्रमामध्ये वर्तमानपत्र वाचन, बातम्यांचे विश्लेषण, गटचर्चा व वक्तृत्व कौशल्य याबद्दलचे मार्गदर्शन प्रा. शशी गोडबोले यांनी केले.

पूर्वपरीक्षेच्या तयारीसाठी संपूर्ण गुणांच्या पंधरा सराव चाचण्या घेऊन त्यातील गुणांचे विश्लेषण करून वर्गात प्रश्नपत्रिकेवर गटचर्चा झाल्या.

**अधिमित्र मार्गदर्शन –** केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा देऊन मुलाखतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले. या उपक्रमात चार विद्यार्थ्यांच्या गटाला एक मार्गदर्शक अशी योजना केली होती. यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील वैयक्तिक अडचणी सोडवण्यात मदत झाली.

**ब) वृत्तिघडण उपक्रम -** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेची तयारी करणाऱ्या व ज्यांचे परीक्षेचे एक अथवा दोन अयशस्वी प्रयत्न झाले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी दोन-दोन महिन्यांचे दोन वर्ग घेण्यात आले. या मध्ये स्वतःचे वेळापत्रक, वार्षिक नियोजन, अभ्यासाची उजळणी कशी करावी, तसेच टिपणकौशल्य, भावनिक व्यवस्थापन, ताण व्यवस्थापन, अभ्यासकौशल्य, साहित्य नियोजन, Critical Thinking अशा विषयांवर विविध सत्रे झाली. प्रा. सविता कुलकर्णी, वा. विवेक कुलकर्णी, डॉ. कौस्तुभ बोंद्रे, डॉ. दिपक गुप्ते, श्री. नचिकेत नित्सुरे यांनी या वर्गाला मार्गदर्शन केले.

**क) UPSC मुलाखत प्रशिक्षण वर्ग (प्रेरणा१८) -** केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुलाखत प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. व्यक्तिमत्त्व जडण-घडण, गटचर्चा, गटमुलाखती, अनुभवशिक्षण असे उपक्रम घेण्यात आले. या मध्ये ग्रामभेटी आयोजित करण्यात आल्या. प्रत्येक विद्यार्थ्याला Bio- Data वर आधारित वैयक्तिक मार्गदर्शन वा. विवेक कुलकर्णी यांनी केले. एकूण ५२ विद्यार्थ्यांनी या वर्गाचा लाभ घेतला.

Seminars साठी विद्यार्थ्यांना पुस्तके व चालू घडामोडी असे विषय देण्यात आले होते. एकूण २६ विद्यार्थ्यांनी १९ Seminars दिले. याचे परीक्षण करण्यात आले. News Analysis ची चार सत्रे झाली. वर्गाचे चार गटांमध्ये विभाजन केले व प्रत्येक गटामध्ये महत्त्वाच्या घडामोडींवर चर्चा झाली. ह्या उपक्रमाचे परीक्षण ज्येष्ठ विद्यार्थ्यांनी केले. या वर्गासाठी Know Your Self ची दोन सत्रे झाली. तसेच TED Videos दाखवण्यात आले. Mock Interview Videos दोन सत्रांमध्ये दाखवण्यात आले, व त्या नंतर त्यावर एकत्रित चर्चा झाली.

**२०१८-१९ वर्षातील वर्ग व विद्यार्थी संख्या**

| वर्ग | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| Facilitation Batch | ३६ |
| Aptitude Building Program 1 | ३३ |
| Aptitude Building Program 2 | ३६ |
| Prerana 18 | ५२ |

| खालील मान्यवरांनी प्रेरणा वर्गासाठी विविध विषयांवर मार्गदर्शन केले | |
|---|---|
| **नाव** | **विषय** |
| श्री. परिस देशमुख (IPS जयपूर, राजस्थान) | कायदा व सुव्यवस्था |
| श्री. अभिजित राऊत (IAS - CEO जिल्हा परिषद, सांगली ) | जिल्हा परिषद प्रशासन व त्यातील कामाचे विभाजन |
| वा. अजित कानिटकर | विविध क्षेत्रातील घटनांचा सहसंबंध |
| डॉ. सागर डोईफोडे (IAS, जम्मू काश्मीर) | जम्मू काश्मीर प्रशासकीय अनुभव |
| श्री. संतोष वैद्य (IAS जागतिक बँक ज्येष्ठ सल्लागार, अमेरिका) | प्रगत देशातील ध्येय धोरणे |
| श्री. महेश भागवत (IPS कमिशनर, तेलंगणा) | मागील वर्षीच्या मुलाखतीचा आढावा घेऊन मुलाखतीच्या प्रक्रियेबद्दल चर्चा |
| श्री. निसर्ग हिवरे (IAS, CEO आसाम ) | आसाम प्रशासकीय यंत्रणेचा परिचय व आव्हान |
| प्रा. सविता कुलकर्णी, वा. विवेक कुलकर्णी | Know Your Self |
| वा. विवेक कुलकर्णी, श्री. अक्षय हाके (IPS कर्नाटक), श्री. प्रवीण इंगवले (IPS मणिपूर), श्री. मुकुल कुलकर्णी (IRS IT), श्री. हर्षल पाटील (IRS IT), श्रीमती मैथिली कोरडे (IRS IT) | How to Prepare and Face Interview |

### ◆ वर्षारंभ उपासना

Faciliation Batch २०१८ तुकडीची वर्षारंभ उपासना व गुरुपौर्णिमा असा एकत्रित कार्यक्रम झाला. नवीन तुकडी व अभ्यासिका सदस्य असे २५०विद्यार्थी होते. मा. शशी गोडबोले सर पाहुणे म्हणून उपस्थित होते. वा. विवेक कुलकर्णी यांनी प्रास्ताविक करून वर्षारंभ उपासना व गुरुपौर्णिमा या दोन्हीची संकल्पना मांडली. अधिकारी, शिक्षक, अधिमित्र व कार्यालयीन सदस्य यांनी स्वामी विवेकानंद व ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक मा. आप्पा पेंडसे यांच्या प्रतिमा, राज्यघटना व संविधानाची प्रत यांना फुले वाहून कृतज्ञता व्यक्त केली. नवीन तुकडीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक, अधिमित्र, वा. विवेक कुलकर्णी, प्रा. सविता कुलकर्णी व मा. गोडबोले सरांना गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सत्कार केला. शिवाली वायचळ हिने गुरुवंदना सादर केली. मा. गोडबोले यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. नवीन तुकडीचे विद्यार्थी व अभ्यासिका सदस्य यांनी या वर्षातील एक सामाजिक, एक शैक्षणिक व एक व्यक्तिमत्त्व विषयक संकल्प ठरविले व ते सादर केले. यानंतर वर्षारंभ उपासना झाली.

### ◆ UPSC व MPSC अंतिम निकाल २०१७

**१) केंद्रीय लोकसेवा आयोग नागरी सेवा २०१७**

पदे : IAS, IPS, IFS, IRS

संख्या : २८

**२) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग राज्यसेवा २०१७**

पदे : उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी इ.

संख्या : ३०

### ◆ अभ्यास सहली व अनुभव शिक्षण

**१) अरुणाचल प्रदेश स्पर्धा परीक्षा वर्ग** - ज्ञान प्रबोधिनी, पुणे व सेवाभारती, अरुणाचल प्रदेश यांच्या सयुंक्त विद्यमाने अरुणाचल प्रदेश लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेसाठी इटानगर व नहरलगून येथे मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आला. सहा तुकड्यांमध्ये एकूण १६ विद्यार्थी मार्गदर्शकांनी काम केले. मार्गदर्शक म्हणून मुख्यपरीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी काम केले. सर्व विषयांच्या दोन सराव परीक्षा घेण्यात आल्या व उत्तरपत्रिका तपासून त्यावर चर्चा झाली. तीन वैकल्पिक विषयांचे मार्गदर्शनही झाले.

**२) ज्ञान प्रबोधिनी नागरीवस्ती उपक्रम** - जनता वसाहत येथे चालणाऱ्या प्रज्ञा विकास उपक्रमात तीन महिने एक उपक्रम राबविला. Facilitation Batch -३ या वर्गातील १५ विद्यार्थ्यांनी वस्तीतील मुलांना शैक्षणिक विषय, मनाचे श्लोक, प्राणायाम, विविध प्रकारची कौशल्ये, संगणक, प्रबोधिनीची पद्ये अशा विविध विषयावर रविवारी मार्गदर्शन केले.

दोनवेळा मुलांना प्रबोधिनीमध्ये आणून वास्तुतील चालणाऱ्या कामाचा परिचय करून दिला व संगणक कक्षात Power Point Presentation करण्याचे प्रशिक्षण दिले.

### ◆ SEVA (सेवा) - (Self Enhancement through Voluntary Action)

स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना समाजभान यावे आणि पुस्तकी ज्ञानाला अनुभवाची जोड मिळाली यासाठी सुरू केलेल्या SEVA उपक्रमाच्या अंतर्गत पुढील कार्यक्रम झाले.

**१) पाटील इस्टेट वस्ती जळीत** – पुण्यातील पाटील इस्टेट या वस्तीमध्ये लागलेल्या आगीमध्ये झालेल्या नुकसानाची पाहणी करून ज्ञान प्रबोधिनीच्या नागरीवस्ती अभ्यासगट व स्पर्धा परीक्षा केंद्र यांनी एकत्रितरित्या दि. १७ ते २० डिसेंबर या काळात तेथे जाऊन ३०० घरांचे सर्वेक्षण केले. स्पर्धा परीक्षा केंद्रातील ४२ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. लाभार्थी ओळखून त्यांना आवश्यक मदत करणे हा सर्वेक्षणाचा हेतू होता. सर्वेक्षणानंतर ज्ञान प्रबोधिनीने ३०० आपत्तीग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. आपत्तीग्रस्तांची विचारपूस, शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबत जनजागृती करत त्यांच्यासाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती केंद्राच्या विद्यार्थ्यांनी त्यांना दिली.

**२) सायकल सहल** – ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या चार सायकल सहली झाल्या. दि. २६ नोव्हेंबर या दिवशी भारताचे संविधान स्वीकारले गेले तसेच मुंबई वरील अतिरेकी हल्ला या दोन्ही घटनांचे औचित्य साधून शिवापूरला सायकल सहल गेली. एकूण ५५ कि. मी. चा प्रवास तीन मुली व वीस मुलांनी पूर्ण केला.

विद्यार्थी शिवापूरला प्रबोधिनीच्या कृषी तांत्रिक विद्यालयात निवृत्त प्राचार्य श्री. संजीव तागडे यांना भेटले. लेफ्टनंट कमांडर प्रशांत यांनी २००८ मधील मुंबई हल्ल्यातील अनुभव कथन केले. तेथूनच पुढे रांझे गावात यादवकालीन हेमाडपंथी प्रकालातील शिवमंदीरात विद्यार्थी गेले. मंदिराच्या आवारात बसून त्यांनी संविधान निर्मितीप्रेरणा आणि आजच्या काळातील त्याची उपयुक्तता यावर चर्चा केली.

**३) ग्रामभेट** – दि. २५ व २६ जानेवारी रोजी प्रेरणा तुकडीच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रामभेट झाली. वेल्हा तालुक्यातील वडगाव झांजे येथे सात विद्यार्थी गेले होते. विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत, गावाची आर्थिक स्थिती, आरोग्य सुविधा, स्वच्छता, शिक्षणाची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, वाहतूक व्यवस्था, गावातील बचतगट या सर्व गोष्टींचा अभ्यास केला. दि. २५ रोजी रात्री महिलासभेचे आयोजन करून मोठ्या प्रयत्नाने महिलांना त्यात सहभागी होण्यास प्रवृत्त केले व ग्रामसभेला येण्यास प्रोत्साहन दिले. दि. २६ जानेवारीला होणाऱ्या ग्रामसभेत सर्व विद्यार्थी सहभागी झाले. त्याचप्रमाणे घराघरांमध्ये जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधला.

**४) हिवरेबाजार व स्नेहालय अभ्यास सहल**– नियमित वर्गाच्या विद्यार्थ्यांची हिवरेबाजार व स्नेहालय येथे अभ्यास सहल झाली. हिवरेबाजारचे उपसरपंच श्री. मोहनराव छत्तर यांनी हिवरेबाजारचा संपूर्ण पट विद्यार्थ्यांसमोर मांडला. गावाचा झालेला कायापालट पाहून मुले भारावून गेली. तसेच स्नेहालयाच्या रूपाने समाजातील महत्त्वाचा उपेक्षित घटक विद्यार्थ्यांसमोर आला. श्री. गिरीश कुलकर्णी यांनी उभारलेले स्नेहालय पाहत असताना आपण ज्या प्रशासनाचा भाग बनू इच्छितो त्यामध्ये किती समाजभान व सहसंवेदना असणे आवश्यक आहे याची प्रकर्षाने जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

**५) वेल्हा-आंबवणे अभ्यास सहल** – अभ्यासिकेतील विद्यार्थिनींसाठी वेल्हे-आंबवणे येथील विविध सामाजिक संस्थांना भेटी अशी अभ्यास सहल आयोजित केली होती. यामध्ये २७ विद्यार्थिनी सहभागी झाल्या. ग्रामीण जीवन व तेथील समस्यांचा प्रशासकीय दृष्टीकोनातून अभ्यास असा या सहलीचा उद्देश होता.

जाताना नसरापूर येथे बनेश्वर वारकरी संप्रदाय शिक्षण संस्थेतर्फे चालवल्या जाणाऱ्या मुलांच्या वसतिगृहाला भेट दिली. वसतिगृहात त्यांना वारकरी संप्रदायाचे शिक्षण दिले जाते.

ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधन विभागातर्फे चालवल्या जाणाऱ्या 'जीवन ज्योती महिला सक्षमीकरण प्रकल्प' ला भेट दिली. महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन नोकरीसाठी सक्षम करण्याचे प्रयत्न संस्थेमार्फत केले जातात. तेथील मुलींसाठी स्पर्धा परीक्षांची सविस्तर माहिती केंद्राच्या दोन विद्यार्थिनींनी दिली.

त्यानंतर पासली खोरे येथील पाऊलवाट या संस्थेला भेट दिली. तेथे विविध प्रकारचे तांत्रिक शिक्षण गावातील युवकांना दिले जाते. महिलांसाठी लघुउद्योगाची कामे शिकवून त्यांना स्वावलंबी बनवण्यात येते. तेथे कुकुटपालन व गोपालन हे प्रकल्प पण चालवले जातात.

वेल्हे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला भेट दिली. तेथील विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या विद्यार्थिनींनी आरोग्य, स्वच्छता, चांगल्या सवयी आणि महिलांच्या समस्या याविषयावर पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृतीपर कार्यक्रम केला. त्या नंतर ज्ञान प्रबोधिनीतर्फे चालवल्या जाणाऱ्या 'जास्वंद मुलींचे वसतिगृह' येथे भेट दिली.

**६) पिंपरी चिंचवड महानगर पालिका भेट** – श्री. श्रावण हर्डीकर (IAS, आयुक्त, PCMC) यांनी नागरी प्रशासन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. PCMC च्या 'SARATHI' या योजनेबद्दल माहिती दिली. तसेच Mobility, Living Environment, Sports Health, Law Governance, E-Readings, Economic Growth अशा महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले.

**७) PMRDA भेट** – श्री. किरण गिते (IAS, Metropolitan Commissioner CEO, PMRDA) यांनी Urban infrastructure याविषयी माहिती दिली तसेच Metro चे महत्त्व सांगितले. पुणे व भारतातील इतर मोठी शहरे यांची भविष्यातील गरज यांची तुलना सांगितली. तसेच सरकारी योजना सामान्यांच्या उपयोगी असूनही त्यांच्या पर्यंत पोहोचत नाहीत हे सांगितले.

**८) गणेशोत्सव उपक्रम ज्ञान प्रबोधिनी कार्यकर्ते मुलाखती** – Facilitation Batch च्या विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रबोधिनीच्या विभागांमध्ये चालणाऱ्या कामाची ओळख करून घेण्यासाठी त्यात काम करणाऱ्या ज्येष्ठ सदस्यांची मुलाखत घेतली. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रबोधिनीत चालणाऱ्या वेगवेगळ्या कामांची माहिती झाली. एकूण पंधरा कार्यकर्त्यांच्या मुलाखती ३३ विद्यार्थ्यांनी घेतल्या व त्याचे अहवाल लेखन केले.

◆ **अन्य उपक्रम**

**१) रक्तदान शिबिर** - दि. १८ ऑगस्ट रोजी कै. आप्पांच्या स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबिर झाले. त्यामध्ये ५७ पिशव्या रक्त गोळा झाले. ते दीनानाथ मंगेशकर रुग्णालय रक्तपेढीला देण्यात आले.

**२) दिवाळी फराळ** - दिवाळीत अभ्यासिकेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी भाऊबीजेला दिवाळी फराळाचे आयोजन केले होते. एकूण ३२ विद्यार्थी व सविताताई यांनी उपासना करून फराळाचा आनंद घेतला. केंद्राचे माजी विद्यार्थी ऋषिकेश मारेवार (अन्न व औषध प्रशासन) यांनी फराळाचा सर्व खर्च केला.

**३) भोंडला** - नवरात्रीनिमित्त स्पर्धा परीक्षा केंद्र व नेतृत्व संवर्धन केंद्र यांचा एकत्रित भोंडला करण्यात आला.

◆ **अभिमानास्पद कार्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार**

**१) राष्ट्रीय पुरस्कार -**

अ) Award for Excellence in MGNREGA Administration and other Rural Development Work - स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी श्री. प्रशांत वडनेरे (IAS, जिल्हाधिकारी, थिरूअन्नामलाई, तामिळनाडू), श्रीमती पूनम गुहा (IAS, जिल्हाधिकारी, रायगडा, ओरिसा) व श्री. निलेश क्षीरसागर (IAS, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायपूर जि. प. आणि व्यवस्थापकीय NRLM, राज्य छत्तीसगड) या तिघांना भारत सरकारचा २०१७-१८ या वर्षाचा उत्कृष्ट प्रशासक म्हणून पुरस्कार मिळाला.

आ) श्री. प्रशांत वडनेरे यांनी थिरूअन्नामलाई, तामिळनाडू जिल्ह्यामधील पाण्याच्या दुर्भिक्षावर तोडगा म्हणून 'Tanneer, Tanneer' ही योजना अंमलात आणली. या मध्ये शासनाचे विविध विभाग व लोकसहभाग यातून विविध प्रकारचे ४५५५ बंधारे उभे राहिले. तसेच खाजगी कंपन्या व NGO नी अनेक पाण्याच्या टाक्यांचे शुद्धीकरण करून दिले. पहिल्या पावसात सर्व बंधारे भरल्यामुळे जमिनीखाली पाणीपातळी वाढली.

ब) श्री. निलेश क्षीरसागर यांच्या छत्तीसगड राज्याला शामाप्रसाद मुखर्जी रुर्बन मिशनसाठी उत्कृष्ट राज्य म्हणून पुरस्कार मिळाला. तसेच National Rural Livelihood Mission NRLM अंतर्गत Non-Farm Livelihood Development आणि Institution Building Capacity Building या दोन भागात दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. असे एकूण तीन पुरस्कार मिळाले.

क) श्रीमती पूनम गुहा यांना रायगडा, ओरिसा येथील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या उत्कृष्ट अंमल बजावणीसाठी पुरस्कार मिळाला.

२) श्री. राहुल नांगरे (अप्पर आयुक्त कस्टम) - यांना भारत सरकारचा विशेष उल्लेखनीय कामाविषयीचा २०१८-१९ या वर्षातील राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. सध्या ते लंडन येथे भारतीय उच्च आयुक्तालयात First Secretary म्हणून कार्यरत आहेत.

३) डॉ. अय्याज तांबोळी (IAS) - यांनी विजापूर, छत्तीसगड येथे जिल्हाधिकारी असतांना अत्यंत प्रतिकूल अशा नक्षलग्रस्त सामाजिक वातावरणामध्ये उत्कृष्ट काम केले. त्यांनी तेथे मोठे हॉस्पिटल उभे करून तेथील समाजासाठी आरोग्याची व्यवस्था निर्माण केली. या त्यांच्या कामाची दखल घेऊन Indian Express परिवाराने त्यांना Good Governance साठी रामनाथ गोयंका पुरस्कार प्रदान केला.

४) श्री. गजानन टोम्पे (DYSP) - खेड येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत असलेले गजानन टोम्पे यांची प्रथम नियुक्ती गडचिरोली येथे झाली. त्यावेळी त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी नक्षलवाद्यांचे निर्मूलन केले. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन पोलीस महासंचालक पदाने त्यांचा सन्मान करण्यात आला.

▲▲▲

## आजची प्रबोधिनी

### १. शिक्षण

**१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**
(माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)
**website : prashala.jnanaprabodhini.org**

**२. ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक -मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल मुलांसाठी मर्यादित सहनिवास)
**website : jnanaprabodhininigadi.org**

**३. ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)

**४. शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर**

**५. ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे** (माध्यमिक, मर्यादित सहनिवास)

**६. ज्ञान प्रबोधिनी, हराळी**
(प्राथमिक, माध्यमिक, मर्यादित सहनिवास)
**website : jpharali.org**

**७. कृषि विद्यालय, हराळी**

**८. शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे**
(बुद्धिमत्ता संवर्धन शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक साधन केंद्र)
**website : erc-pune.org**

**९.छात्र प्रबोधन, पुणे**
(मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)
**website : chhatraprabodhan.org**

**१०. अनौपचारिक शिक्षण प्रकल्प – पुणे, डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई**
(विकासिका, शिबिरे, विद्याव्रत, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यासगट इ.)

**११. स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे**
(केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन)

### २. संशोधन

**१. प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे**
(संशोधन, प्रशिक्षण, बुद्धिमापन, संवर्धन, समुपदेशन)
**website : jpip.org**

**२. संस्कृत संस्कृति संशोधिका, पुणे**
(संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य)

(पान ३७ वर पुढे चालू)

# ६. प्रज्ञा मानस संशोधिका

| ◆ एक दृष्टिक्षेप | २०१८-१९ | २०१७-१८ |
|---|---|---|
| व्यक्तींपर्यंत पोहोचलो | ३५००० + (ओळख स्पर्शाची २४८८२ सहित) | ११०००+ |
| संस्थांपर्यंत पोहोचलो | ८० + | ५०+ |
| नवीन निर्मिती | १ मला काय वाटते, ४ सामाजिक प्रज्ञा<br>१ प्रशिक्षण- प्रगतीशील कुटुंब | ६ चाचण्या, प्रशिक्षण |
| नवी प्रकाशने | ८ संशोधन निबंध | ५ शोधनिबंध, २ पुस्तके |
| इतर विभागांना मदत | ग्रामविकसन, संवादिनी, युवक विभाग, प्रशाला, नेतृत्व संवर्धन, हराळी केंद्र, सोलापूर केंद्र, निगडी केंद्र, स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) | ग्रामविकसन, संवादिनी, युवक विभाग, प्रशाला, नेतृत्व संवर्धन, हराळी केंद्र, सोलापूर केंद्र, निगडी केंद्र, स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) |
| नियुक्त सदस्य | ६० | ५० |
| सहयोगी सदस्य | ३० + | ३०+ |

## १. संशोधन

### १) चालू असलेले संशोधन/ कृती प्रकल्प

▷ **ओळख स्पर्शाची** : 'शालेय मुलांसाठी जाणीव जागृती अभियानातून चांगल्या व वाईट स्पर्शाची ओळख मुलांना करून देण्यासाठी शिक्षक हे माध्यम निवडणे' असा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा प्रकल्प संवादिनी आणि प्रज्ञा मानस संशोधिकेने सुरू केला. आत्तापर्यंत एकूण १६ ठिकाणी १८३ प्रशिक्षणातून ६५० जणांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. तसेच प्रशिक्षित सदस्य साधरण २४,८८२ मुलांपर्यंत पोहोचले आहेत.

▷ **आकांक्षा Careers of JPP Girls** : ज्ञान प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनींच्या करियरबाबत अभ्यास करणाऱ्या प्रकल्पाचे प्रदत्त संकलन चालू आहे. आत्तापर्यंत ५४ जणांचे फॉर्म भरून आले आहेत.

▷ **अंकुर प्रकल्प** : United Way of India च्या सहयोगाने सुरू केलेल्या प्रकलपाचा 'अंगणवाड्यांमधील कामाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे' हा मूळ उद्देश आहे. औरंगाबाद जवळच्या ग्रामीण भागातील सोळा अंगणवाड्यांमधून ० ते ६ वयातील एकूण ११५८ मुलांचे प्रदत्त संकलनाचे काम पूर्ण होऊन, Percent Frequency नुसार त्याचे तक्ते आणि आलेख बनवून अहवाल संबंधित संस्थेस सादर केला.

▷ नेतृत्व संवर्धन केंद्रातर्फे चालू असलेल्या विशेष वर्गासाठी २० सत्रांचा 'संपादन प्रेरणा प्रशिक्षण वर्ग' विभागातर्फे घेण्यात आला.

▷ Physiological and Psychological Effects of Chanting Gayatri Mantra on Healthy Population या प्रकल्पाची संशोधन साधने प्राप्त झाली आहेत. 'गायत्री मंत्र म्हणण्याचा प्रौढांवर होणाऱ्या मनोसामाजिक परिणामांचा अभ्यास करणे' हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

▷ **पी.एच.डी. केंद्र (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न) :** ज्ञान प्रबोधिनी संशोधन केंद्रातील Ph.D.च्या विद्यार्थिनी शिल्पा साळवेंचा Synopsis विद्यापीठात सादर झाला. त्यांच्या संशोधनाचा विषय 'The Effect of Gratitude Intervention on Dispositional Gratitude authenticity and Emotional Intelligence for late adolescents' आहे.

### २) विशेष : संशोधन पद्धती कार्यशाळा (Research Methodology Workshop)

सामाजिक संशोधन क्षेत्रात प्रवेश करू इच्छिणाऱ्या संशोधकांसाठी Qualitative and Quantitative Research in Social Sciences : Methods and Data Analysis या विषयावर दि. २२ ते २९ जुलै १८ दरम्यान कार्यशाळा योजली होती. मानसशास्त्र, शिक्षण-शास्त्र, योग, निसर्ग शास्त्र अशा विविध विषयांमध्ये Ph.D करत असलेले व काही Ph.D झालेले असे एकूण २२ संशोधक या कार्यशाळेत सहभागी झाले. नेतृत्व संवर्धन केंद्र, प्रशाला, शैक्षणिक उपक्रम संशोधिका व प्रज्ञा मानस संशोधिकेतील सदस्यांचा त्यात सहभाग होता. कार्यशाळेची प्रस्तावना वा. अनघा लवळेकर यांनी केली व संशोधन टप्प्यांचा व प्रक्रियेचा आढावा पहिल्या सत्रात घेतला. पहिले चार दिवस संख्याशास्त्रीय विश्लेषण पद्धती विषयीचे मार्गदर्शन व प्रत्यक्ष अनुभवसत्रे झाली. यासाठी डॉ. सुब्रतो रथ (Indian Statistics Institute, Pune), डॉ. अंजली राडकर (गोखले इन्स्टिट्यूट), प्रा. डॉ. पी. एच. लोधी, डॉ. मीनाक्षी गोखले यांनी मार्गदर्शन केले. तर पुढील चार दिवस Qualitative Research Method analysis या विषयी डॉ. सुजाता श्रीराम (TISS मुंबई), डॉ. शुभा रंगनाथन (IIT हैद्राबाद), डॉ. नीलम ओसवाल (पुणे) या सर्वांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समारोपाचे व्याख्यान 'Why and When to Use Mixed Research Methods' या विषयावर डॉ. संजय मेहंदळे, संचालक, हिंदुजा हॉस्पिटल संशोधन केंद्र यांनी दिले. त्यांच्या हस्ते सहभागी सदस्यांना प्रशस्तिपत्रके

देण्यात आली. वा. प्रणिता जगताप यांनी कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम केले.

### २. मनोमापन शास्त्र विभाग (संशोधन)

▷ व्यक्तींच्या मानसिक आरोग्याबाबत प्राथमिक स्तरावरील अंदाज व्यक्त करू शकणाऱ्या MHST तथा 'मनशोध'चे प्रमाणीकरण पूर्ण झाले व तसेच संगणकीकरणाचे कामही पूर्ण झाले. We Care India Foundation, Ahmedabad, Gujarat सोबत या चाचणीचे शिक्षणक्षेत्रातील उपयोजन करण्याबद्दल करार झाला.

▷ iTaP या इ. ७वी ते ९वी साठीच्या मानसपट तयार करणाऱ्या चाचणी संचाच्या सुधारित संचाचे नवीन मानदंड करण्यासाठी एकूण २३४ विद्यार्थांच्या प्रदत्तांवर सांखिकीय विश्लेषण केले गेले. आता प्रत्यक्ष संगणकीय चाचणीकाम सुरू झाले आहे. या संदर्भातील मार्गदर्शन कसे करावे यावरील एक दीर्घ प्रशिक्षण सत्र बारा जणांनी पूर्ण केले.

▷ 'रचना' चाचणी (Apt-D) च्या घटक लेखनाच्या कामाची आखणी (Plannig For item writing) झाली. रचना चाचणी मध्ये एकूण सात प्रकारच्या क्षमता आहेत. त्या पुढीलप्रमाणे — Cognitive Ability, Verbal Ability, Working Memory, Critical Thinking Ability, Creative Thinking Ability, Visual Spatial Ability, Social Ability.

▷ शालेय वातावरण (SCAN) चाचणीच्या उपयोजनासाठीची चार प्रकारची modules तयार केली आहेत. त्यातील पहिले module 'Orientation to concept of school climate for school staff' असे आहे. अशा प्रकारची सेवा नव्यानेच मनोमापन शास्त्र उपविभागातून दिली जात आहे.

### ३. मानव संसाधन विकास विभाग

▷ बजाज ऑटो कंपनीच्या सर्व आस्थापनांसाठी २०१४ ते २०१८ पर्यंत केलेल्या कामातील माहितीचे पुढील संशोधनाच्या दृष्टीने संकलन झाले असून सुरक्षा रक्षक, चालक यांच्या चाचण्यांच्या माहितीवरील काम आता चालू झाले आहे.

▷ प्रौढांसाठी 'प्रगतीशील कुटुंब' ही नवीन कार्यशाळा आखण्यात आली. वा. वनितातार्इ पटवर्धन व स्मिता निरगुडकर यांनी या विषयावरील दोन कार्यशाळा घेतल्या. त्यास दोन्ही मिळून ७० जण उपस्थित होते.

▷ वर्षभरातील चाचणीकाम : KUL, अनुलोम टेक्नोलॉजी, केमटेक, किर्लोस्कर ब्रदर्स, बजाज अलीयांन्झ, INA Bearing, काका हलवाई, वेदांत मेटल्स

▷ वर्षभरातील मनोमापन सेवा व प्रशिक्षण : ठाणे जनता सहकारी बँक, रुबी हॉल, महाराष्ट्र स्कील डेव्हलपमेंट

▷ वर्षभरातील मनोमापन साहाय्य : १. बाहेरील संस्था - स्वयंसिद्धा, लातूर ही पाळणाघर व बचतगट चालवणारी संस्था, अर्चांगल कन्सल्टन्सी-कोल्हापूर, दरडा केमिकल्स, सेवासदन संस्था, दीपगृह आश्रम, आदिवासी आश्रम शाळा- पडसरे, जीवन ज्योती केंद्र-आंबवणे २. प्रबोधिनी अंतर्गत-नेतृत्व संवर्धन, ज्ञान प्रबोधिनी-निगडी केंद्र, जास्वंद सहनिवास-स्त्री शक्ती प्रबोधन, ग्रामीण.

### ४. अभिक्षमता मापन, व्यवसाय मार्गदर्शन

| **१) चाचणी काम व प्रशिक्षण** | **संख्या** |
|---|---|
| अभिक्षमता मापन (iA) संगणकीय | २२९८ |
| अभिक्षमता मापन (iA) लेखी (मालेगाव, नाशिक, तळेगाव, रत्नागिरी, सातारा, औरंगाबाद, कोल्हापूर) | १५७७ |
| अभिक्षमता मापन (iA) लिंक Vendors | १०३ |
| अभिक्षमता मापन (iA) लिंक | ८६६ |
| Swayam | २१२ |
| BEAM (Battery of Entrepreneur Aptitude Measurement) | ४० |
| i Tap (Off line) | ८२६ |
| कमिन्स | १८९९ |
| **एकूण चाचणी काम** | **७८२१** |
| **२) व्यवसाय मार्गदर्शन प्रशिक्षण** | |
| पुणे, नागपूर, सातारा, मुंबई, कोल्हापूर, रत्नागिरी, गोवा, अकोला, परभणी, नाशिक | ५२ |

▷ अभिक्षमता मापन (iA) लेखी चाचणी : सार्थक संस्था, न्यू इंडिया स्कूल, ERC, स्वरूपवर्धिनी, न्यू व्हिजन संस्था, सरस्वती विश्व विद्यालय-तळवडे, भोजवानी स्कूल, गायकवाड ग्लोबल स्कूल, सेवा सहयोग, ध्रुव आकादमी, सेंट फिलिप्स, रीवर द डेल शाळा, फडके आकादमी, उत्कर्ष प्रकल्प, CYBAGE प्रकल्प, आर्मी स्कूल

▷ BEAM चाचणीसाठी मराठा चेम्बर्स ऑफ कॉमर्सच्या सहयोगातून Offline प्रणाली तयार झाली आहे. चाचणी संबंधी दि. ९ एप्रिल रोजी पत्रकार परिषद घेतली. तसेच चाचणीचे NCL सोबत सुद्धा काम झाले.

### ५. क्षमता विकसन विभाग

▷ बालांच्या क्षमता विकसन विषयांतर्गत खालील शिबिरे झाली-

| **शिबिर** | **उपस्थित संख्या** |
|---|---|
| बाल विकास शिबिर संख्या (१०) | ४७१ |
| क्षमता संवर्धन शिबिर (१) | ३८ |
| सुजाण पालकत्व कार्यशाळा (५) | १२० |

पुणे येथे निरंतर बाल विकासची वर्षभरात एकूण २४ व निरंतर कुमार विकासची दहा सत्रे पार पडली.

▷ **नवचेतना उपक्रम :** सेवा सहयोगच्या व थिसेन क्रुप कंपनीच्या सहाय्याने मनपा शाळा क्र. ८८, नेवाळे वस्ती, चिखली येथील इ. ५वी ते ७वी च्या मुलांसाठी हा उपक्रम पूर्ण झाला.

▷ 'Positive Virtues' आणि बालविकासच्या नेहमीच्या निरीक्षण सूची चे प्रमाणीकरण करण्याचे काम पूर्ण झाले.

▷ **प्रज्ञा मैत्र :** प्रज्ञावंत मुलांच्या पालकांसाठी होणाऱ्या मासिक सत्रांसाठी ६० वैयक्तिक सदस्य आहेत. सत्रांना सरासरी ३५-४० पालक उपस्थित

असतात. पहिले सत्र दि. १७ ऑगस्ट रोजी झाले. मे महिन्यात 'ओपन डे' झाला. ६२ पालकांना प्रश्नावली दिली होती. मागील वर्षातील २२ व नव्याने ३६ अशा ५८ पालकांनी पुढील वर्षीसाठी सदस्यत्व घेतले. या सत्रात पालकांना Multiple Intelligence बद्दल जास्त माहिती मिळावी म्हणून भित्तीचित्र (posters) प्रदर्शन भरवलं होतं. दर महिन्याला एक अशी नऊ सत्रे पूर्ण झाली आहेत.

▷ **प्रज्ञा प्रबोध (IGNITE)** : 'विद्यार्थ्यांमधील बुद्धिमंतांचा शोध घेऊन त्या बुद्धिमत्तेचा विकास करत, त्यांच्यामध्ये राष्ट्रघडणीची प्रेरणा जागृत करणे' असा उद्देश समोर ठेऊन सुरू झालेल्या या वर्गाचे निवासी शिबिर झाले. दि. १ ते ५ मे ३३ मुलांचे व दि. ८ ते १२ मे ३२ मुलींचे शिबिर झाले. या शिबिरांमध्ये पुढील विषय हाताळले गेले - संवाद कौशल्य, पपेट शो व पोवाडा विषयावरील कार्यशाळा, अटल टिंकरिंगची 'तंत्रज्ञान' विषयावर कार्यशाळा, चित्रपटातील भाग दाखवून चर्चा, सायकल सहल अनुभव कथन, 'शिवचरित्र कसे अभ्यासावे' याची मांडणी व 'कार्व्हरचे कथाकथन'. दल, उपासना, वैचारिके, Logo Designing, Theatre games, Intelligence games ही सत्रे झाली. मुलांची क्षेत्रभेट 'व्होल्क्सवेगन' कंपनीत तर मुलींची 'अभिनव फार्मर्स क्लब' येथे झाली. खेळघर कार्यान्वित झाले आहे. वर्गातील ३० विद्यार्थी खेळघरात सहभागी झाले आहेत.

सहकारनगर व सदाशिव पेठ भागात मुलींचा 'वाचनकट्टा' पालकांच्या पुढाकाराने सुरू झाला. दि. १२ जाने. ला युवक दिनाच्या निमित्ताने स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पूजन करून आजचा युवक कसा असावा याविषयी विद्यार्थ्यांनी चर्चा केली, वाचन, संकल्प केला. वर्गात होणाऱ्या वैचारिकात पाणी प्रश्नातील प्रबोधिनीचे दुष्काळी भागातील काम, भूमिका मुलांना समजावून सांगण्यात आली. दोन्ही वर्गांची सहल किल्ले लोहगड येथे आयोजित करण्यात आली होती. नवीन वर्षाच्या वर्गाचे सत्र दि. २१ जुलै रोजी सुरू झाले. यात ३८ मुले व ३४ मुलींची नोंदणी झाली आहे, त्यांचीही २० साप्ताहिक सत्रे पूर्ण झाली.

### ६. मार्गदर्शन व समुपदेशन

वैयक्तिक बुद्धिमापन मार्गदर्शनाअंतर्गत २५१ जणांचे चाचणीकाम झाले. प्रौढ समुपदेशनासंदर्भात ३८ जणांचे समुपदेशन झाले आहे.

### ७. शैक्षणिक

'शालेय मानसशास्त्र' अभ्यासक्रमाच्या १७-१८च्या तुकडीचा १००% निकाल लागला. १८-१९ वर्षासाठी ३० जणांचा प्रवेश झाला. 'प्रज्ञावंताचे शिक्षण' या अभ्यासक्रमाच्या १७-१८ च्या तुकडीचा ८५% निकाल लागला. १८-१९ वर्षासाठी सतरा जणांचा प्रवेश झाला. दि. ३ मार्च रोजी विद्यार्थ्यांनी 'प्रज्ञावंतता' या विषयाच्या जनजागृतीसाठी कार्यक्रम आयोजित केला होता. चित्रफित, भित्तीचित्र सादरीकरण असे त्याचे स्वरूप होते. एकूण १४६ शिक्षक व पालक यांनी त्यात सहभाग घेतला. 'बाल व कुमारांचे मानसशास्त्र' या अभ्यासक्रमाच्या २५व्या तुकडीचा निकाल दि. १३ एप्रिल रोजी लागला. एकूण ३४ पात्र प्रशिक्षणार्थींपैकी ३१ जणांनी परीक्षा दिली. २६व्या तुकडीच्या अभ्यासपत्रिका जमा करण्यास सुरुवात झाली आहे. या तुकडीत एकूण ४२ प्रशिक्षणार्थी आहेत.

**※ विशेष भेटी :** १) डॉ. केतकी बापट, Scientist 'F', Office of the Principal Scientific Adviser, to the Govt. of India आणि डॉ. ज्योती शर्मा, Associate Professor , Department of Education, Delhi University यांची ज्ञान प्रबोधिनीमध्ये चालणारे 'प्रज्ञावंताचे शिक्षण' या विषयासंदर्भात भेट झाली. २) अगस्त्य फौन्डेशन, बेंगलोर चे CEO अजिथ बासू यांची भेट झाली. ३) भारती विद्यापीठ नर्सिंग कॉलेज मधील २५ विद्यार्थी व ३ वरिष्ठ अधिकारी संस्था भेटीसाठी येऊन गेले.

**※ विशेष कार्यक्रम :** १) शालेय मानसशास्त्र व प्रज्ञावंताचे शिक्षण या अभ्यासक्रमाच्या नवीन तुकड्यांचा वर्षारंभ कार्यक्रम दि. १० सप्टें. रोजी झाला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. नितीन उमराणी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मा. यशवंतराव लेले यांची सुद्धा विशेष उपस्थिती कार्यक्रमात होती. २) ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेला देणगी मिळण्याच्या दृष्टीकोनातून दि. ३ नोव्हें. रोजी CA असलेल्या ज्ञान प्रबोधिनीच्या परिचित स्नेह्यांची दिवाळीनिमित्त स्नेहभेट आयोजित केली होती. त्याला दहा जण उपस्थित होते. ३) विभागातील नवीन व एक/दीड वर्षे झालेल्या सदस्यांसाठी विभाग व संशोधन संस्थेची ओळख व्हावी यासाठी दि. २ जाने. रोजी एक कार्यशाळा झाली. त्यात विभागाचा आराखडा, वर्तनसंकेत, बैठका, कार्यनैतिकता, कौशल्ये, प्रबोधन गीते यावर सत्रे झाली.

**※ विशेष निर्मिती :** विभागाचे संकेतस्थळ www.jpip.org पूर्ण नव्या स्वरूपात आंतरजालावर सुस्थापित झाले.

**※ विशेष सहभाग :** १) वा. अनघा लवळेकर यांचे विवेकानंद केंद्र कन्याकुमारी-नागपूर शाखा येथे भगिनी निवेदिता यांच्या १५० व्या जन्मशताब्दी समारोप कार्यक्रमात 'भगिनी निवेदिता-चिंतन आणि विचार' ह्या विषयावर प्रमुख वक्ता म्हणून व्याख्यान झाले. २) श्री धर्मस्थल मंजुनाथेश्वर महाविद्यालय, उजिरे (कर्नाटक) येथील 'Relationship Dynamics' वरील परिषदेत जाने. २०१९ मध्ये वा. अनघा लवळेकर यांनी 'Facets of Relationship' या परिसंवादात निमंत्रित वक्ता म्हणून सहभाग घेतला. 'Virtual Relationships' यावर त्यांनी विचार मांडले. ३) दि. १७ ते २० मे दरम्यान बोट्सवाना, दक्षिण आफ्रिका येथे ७व्या 'International Women's Group (IWG) Conference on Women and Sport' परिषदेत विभागाच्या सहयोगी सदस्या वा. ज्योती कानिटकर यांनी 'सतेज' प्रकल्पाचे भित्तीपत्र सादरीकरण केले. ४) 'Women in Seva' ह्या १७ फेब्रु. रोजी झालेल्या परिषदेत विभागाच्या तीन सदस्यांनी सहभाग घेतला.

▲▲▲

# ७. संस्कृत-संस्कृति-संशोधिका

| ◆ एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीत पुण्यातील पुरोहितांद्वारे झालेल्या संस्कारांचा आढावा | | | |
|---|---|---|---|
| **संस्काराचे नाव** | **एकूण संख्या** | **संस्काराचे नाव** | **एकूण संख्या** |
| वेदपूजन (उदकशांती) | २२९० | गणेश स्थापना | ६६ |
| अन्त्येष्टी (एकोद्दिष्ट श्राद्ध) | २०१८ | साठी शांती | ४२ |
| वर्षश्राद्ध | १४५२ | मंगळागौरी पूजन | ३० |
| सत्यनारायण पूजा | ४९८ | पंचाहत्तरी | २८ |
| विवाह संस्कार | १२९ | सहस्रचंद्रदर्शन शांती | २५ |
| उपनयन संस्कार | ११४ | साखरपुडा | २५ |
| वास्तुशांती | ३९३ | नामकरण | २५ |
| दाहकर्म | १७४ | लक्ष्मीपूजन | २३ |
| महालय श्राद्ध | ७६ | अन्य | ४९ |
| | | **एकूण** | **७४५७** |

## १. पौरोहित्य विषयक

### ◆ संस्कार कार्यक्रम

'ज्ञान प्रबोधिनी' शैक्षणिक संस्था म्हणून महाराष्ट्रात व भारतभरात जशी परिचित आहे तशीच गेल्या काही वर्षात ज्ञान प्रबोधिनीच्या वैशिष्ट्यपूर्ण पौरोहित्यासाठीही ओळखली जात आहे. संत्रिकेकडून 'सार्थता, सामूहिकता, शिस्त व समभाव' या चार सूत्रानुसार केले जाणारे संस्कार प्रतिवर्षी वाढतच आहेत. २०१८-२०१९ मध्ये पुण्यातील ३५ व डोंबिवली येथील तेरा महिला व पुरुष पुरोहितांनी एकूण ९१४० संस्कार केले.

पुणे केंद्रातील पुरोहितांनी केलेल्या संस्कारांचा आढावा वरील तक्त्यात दिलेला आहे. त्यात दिलेल्या संस्कारांव्यतिरिक्त दत्तक विधान, दोहदपूर्ती, प्रपौत्रदर्शन, देहदान, वृक्षारोपण, विहीर लोकार्पण यांसारखे क्वचित होणारे संस्कारही पुरोहितांनी केलेले आहेत. डोंबिवलीतील पुरोहितांनी एकूण १६८३ संस्कार केले. पंजाब व ईशान्य भारत सोडून भारतभर सर्वत्र मराठी, हिंदी व इंग्रजीतून संस्कार झाले.

### ◆ महत्त्वाचे कार्यक्रम

१. ज्ञान प्रबोधिनी पद्धतीच्या विवाह संस्कारात वधूवरांना संस्कारातील मूळ हेतू समजावून दिला जातो. याचा दिव्यांगांनाही लाभ मिळावा, या हेतूने पुण्यातील 'सक्षम' संस्थेने आठ दिव्यांग जोडप्यांच्या सामूहिक विवाहप्रसंगी या संस्काराविषयी माहिती देण्यासाठी संत्रिकेच्या पुरोहिता माधुरी करवडे यांना बोलावले होते.

२. संत्रिका व संवादिनी गटातर्फे प्रबोधिनी बाहेरील विद्यार्थ्यांसाठी सामूहिक विद्याव्रत संस्काराचे आयोजन केले गेले. त्याला ३७ विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. महेंद्रभाई सेठिया यांनी आचार्य पद भूषविले व मा. माधुरी करवडे अध्वर्यू होत्या.

३. ग्रामविकसन विभागाबरोबर विहिर लोकार्पणाच्या व अन्य कार्यक्रमात संत्रिकेच्या पुरोहिता उर्मिला बेटकर, माधुरी करवडे, विद्याश्री पुरंदरे उत्साहाने सहभागी झाल्या.

४. पुणे व लोहगाव येथे 'गणेश प्रतिष्ठापना' कार्यशाळा झाल्या. त्यात ४० सदस्य सहभागी होते.

५. गणेश प्रतिष्ठापनेचे ॲप्लिकेशन संत्रिकेने प्ले स्टोअरवर नि:शुल्क उपलब्ध केले होते. त्याचा लाभ १००० पेक्षा जास्त सदस्यांनी घेतला.

६. श्री. विद्याधर मराठे यांनी मा. रघुनाथजी माशेलकर यांच्याकडे गणेश प्रतिष्ठापना व सत्यनारायण पूजा सांगितली.

### ◆ पुरोहितांसाठी मार्गदर्शन

१. सकारात्मक वृत्तीची अधिकाधिक जोपासना करणे, परस्परपूरकता वाढविणे या उद्देशाने ऑक्टोबर २०१८ मध्ये पुरोहितांसाठी 'आनंदाची शोधयात्रा' कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये वाच. अनघा लवळेकर, डॉ. दीपक गुप्ते, व अनया निसळ यांनी मार्गदर्शन केले. त्यात २५ सदस्य सहभागी होते.

२. पौरोहित्य व्रत म्हणून स्वीकारायचे तर त्यासाठी पुरोहितांनी समाजाभिमुख, अभ्यासू, संवेदनशील असायला हवे. या विचारातून जून २०१८ मध्ये डोंबिवली व मार्च २०१९ मध्ये पुणे येथे पौरोहित्य व्रत संस्काराचे आयोजन करण्यात आले.

पुणे येथील गटाला मा. विश्वनाथ गुर्जर, मा. रामभाऊ डिंबळे, मा. सुभाषराव देशपांडे, आणि मा. संचालक गिरीशराव बापट यांनी

ज्ञान प्रबोधिनीच्या तत्त्वसप्तकाचे मार्गदर्शन केले. संत्रिकेचे विभागप्रमुख मा. विश्वनाथ गुर्जर आचार्य म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पुरोहितांना व्रतचिन्ह देण्यात आले. आ. यशवंतराव लेले या संस्कारासाठी आवर्जून उपस्थित होते, तर मा. सुभाषराव देशपांडे यांनी समारोप केला.

३) मा. संचालकांबरोबरील त्रैमासिक पुरोहित बैठकीत ज्ञान प्रबोधिनीच्या प्रार्थनेचा अर्थ व विवेचन असलेल्या पुस्तिकेचे वाचन व प्रश्नोत्तरे झाली.

४) संत्रिकेच्या सहविचार समितीची मा. संचालकांसह द्वैमासिक बैठक झाली. त्यामध्ये जिज्ञासापूर्ती या पुस्तिकेतील वाचन व प्रश्नोत्तरे झाली.

४) प्राचीन काळात होणारे  यज्ञ, त्याप्रसंगी वापरली जाणारी यज्ञीय उपकरणे व विविध आकाराची यज्ञकुंडे याची सविस्तर माहिती घेण्यासाठी पुरोहितांनी वैदिक संशोधन मंडळाला भेट दिली. वाच. भाग्यलता पाटसकर यांनी यज्ञ, कर्मकांड या शब्दांचे अर्थ उलगडत यज्ञ संस्थेचा इतिहास पुरोहितांना सांगितला.

## २. संशोधन

संत्रिकेमार्फत होणाऱ्या संस्कारांचे चिकित्सक  विश्लेषण करून कशा प्रकारची माहिती समोर येऊ शकते याचा आढावा घेण्यासाठी प्रज्ञा मानस संशोधिकेतील ज्येष्ठ संशोधिका वाच. वनिताताई पटवर्धन व श्री. संतोष जानराव यांच्या सहकार्याने १४४ विवाह संस्कार विधींच्या नोंदणीपत्रकाच्या आधारे मिळालेल्या माहितीचे प्राथमिक विश्लेषण करण्यात आले. यामध्ये पुरोहितांचे शिक्षण, पौरोहित्यातील अनुभवाची वर्षे, संस्काराची भाषा, विधीचे ठिकाण व यजमानांचे प्रतिसाद या मुद्द्यांचा विचार करण्यात आला. हा अभ्यास pilot study म्हणून करण्यात आला होता.

## ३. विविध प्रकाशने, व्याख्याने इ.

◆ **प्रकाशने**

१. ज्ञान प्रबोधिनीची धार्मिक संस्कारांमागील भूमिका स्पष्ट करणारे ‘धर्मविधींच्या अंतरंगात’ पुस्तक प्रकाशित झाले.

२. वाच. आर्या जोशी - सप्टेंबर २०१८, सा. विवेकमध्ये ‘गणेश चतुर्थीच्या पूजनाचे नवे आयाम’ लेख प्रसिद्ध.

३. वाच. सुजाता बापट - सप्टेंबर २०१८ कल्याण समर्थबोधच्या विशेषांकात ‘समर्थांची रामोपासना’ व रघुवीर समर्थ मासिकात ‘ओंकारस्वरूप गणेश’ लेख प्रसिद्ध.

४. वाच. मनीषा शेटे -२०१८ सप्टेंबर पासून मुंबईच्या दैनिक नवशक्ती मध्ये ‘चैतन्य साधना’ या विषयावर सदर चालू आहे.

◆ **मुलाखत**

१. लोकमत वृत्त वाहिनी फेसबुक पेजवर-अंजली राक्षे

२. thebetterindia.com वर - चित्रा चंद्रचूड यांची मुलाखत

◆ **व्याख्याने**

१. वाच. मनीषा शेटे - ‘संयमी जीवनाचा मार्ग’ - भाईंदर व पौड रस्ता, पुणे येथील संवादिनी गटासमोर व्याख्यान.

२. वाच. आर्या जोशी - ‘ज्ञान प्रबोधिनीची संस्कार विषयक भूमिका’ - कोकणातील मोहपाडा येथे (उपस्थित महिला - २२)

३. विविध समाजगटांना पौरोहित्याच्या माध्यमातून जोडून घेण्याचा प्रयत्न म्हणून संत्रिकेतील उज्ज्वला पवार यांच्या पुढाकाराने जाने. २०१९ मध्ये ‘महाराष्ट्र परीट महिला मंडळ’, पुणेच्या वतीने संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू समारंभाच्यावेळी सुरेखा लिखिते यांचे आणि फेब्रु. २०१९ मध्ये ‘इंदिरा महिला बचत गट’, घोरपडे पेठ, पुणे येथे माधुरी करवडे यांचे ‘आपले सण आणि आपले मन’ वर व्याख्यान झाले. (उपस्थित महिला - अनुक्रमे २५० आणि ७० ते ८०).

▲▲▲

### विविध प्रकाशने - संस्कृत संस्कृती संशोधिकेत उपलब्ध

१) संस्कृत साहित्याचा इतिहास- ७ भागांची पुस्तकमाला- वाच. सुरुचि पांडे

भाग १ वेद व वेदांगे
भाग २ ब्राह्मणे-आरण्यके-उपनिषदे
भाग ३ रामायण, महाभारत आणि पुराणे
भाग ४ संस्कृत काव्य
भाग ५ दशरूपके
भाग ६ भारतीय तत्त्वज्ञान
भाग ७ प्राचीन भारतीय विद्या

२) गरूडपुराणोक्त आयुर्विज्ञान - प्रा. शुभांगी तांबट

३) तुमच्याही लक्षात राहील - वाच. वा.कृ.कोठुरकर

४) प्राचीन भारतीय द्यूत - वाच. म. अ. मेहेंदळे

५) हस्त्यायुर्वेद - अनुवाद - वाच. अ.पां .देशपांडे, वाच. रा. ब. गोगटे

६) भगिनी निवेदिता- एक चिंतन : शास्त्र, शिक्षण, कला दिलीप कुलकर्णी, संध्या गुळवणी, चारुता पुराणिक

७) Earthquakes -References From Rigveda to Rajatarangini - Mr.Y.S.Lele, Mr.V.S.Lele, Mrs. Shubhangi Tambat

८) Engineering Geometry of Yajna-kundas & Yajna-mandapas- Dr. R.P.Kulkarni

✻ याशिवाय विविध प्रकारच्या संस्कार तसेच पूजा विधी पोथ्या

# ८. सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र

### ◆ सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र रचना

२०१८ एप्रिलमध्ये सर्व विभागप्रमुखांना सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्राच्या अभ्यासगटात केंद्रातील सदस्यांच्या सहभागाविषयी पत्र पाठवून, त्यांच्याशी चर्चा करून, विभागातील सदस्यांशी चर्चा करून, एक यादी बनविण्यात आली होती. विभागातर्फे सहभागाचे तीन प्रकार केले गेले १. समन्वयक - अभ्यासगटाच्या उपक्रमांचा, आशयाचा विभागात समन्वय, वापर, संक्रमण करणे. अभ्यास करणे, मांडणी करणे, २. अभ्यासक - अभ्यासात सक्रिय सहभाग, गटात मांडणी करणे, ३. सहभागी सदस्य - अभ्यासगटाच्या बैठकीत आवश्यक अशा विषयांनुसार सहभागी होणे, ग्रहण केलेल्या आशयाचा विभागातील कामात आवश्यकतेप्रमाणे वापर करणे. या प्रक्रियेतून १० समन्वयक, २० अभ्यासक, २३ सहभागी सदस्य निश्चित करण्यात आले. अभ्यासकांनी स्वत:हून एखादे पुस्तक अभ्यासून गटासमोर मांडणी करावी असे ठरले आहे.

## १. वैचारिके

२०१७-१८ पासून आंतरविद्याशाखीय अभ्यासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून वैचारिके आयोजित करण्यात आली. 'देशप्रश्न, त्यावरील उत्तरांच्या दिशा समजून घेणे व त्यासाठीचा दृष्टिकोन विकसित करणे' असे विषयसूत्र ठरविण्यात आले होते. त्याला अनुसरून २०१८-१९ मध्ये एकोणिस वैचारिके झाली. या वैचारिकांच्या विषयांचे सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल - १. तत्त्वज्ञान, २. अस्मिता, ३. उत्क्रांती, ४. मानसशास्त्र, ५. पुस्तकांची मांडणी, ६. भौगोलिक प्रदेशाचा विविध अंगांनी अभ्यास.

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या 'अस्मिता' ह्या विषयाने प्रारंभ केला. 'अस्मिता' या सूत्राच्या अंतर्गत 'राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात 'महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद', 'शहरी नक्षलवाद-भीमा-कोरेगाव दंगलीच्या अनुषंगाने', 'सामूहिक अस्मितेकडे सारे विचारप्रवाह कसे पाहतात?', 'स्वसंकल्पना - स्वरूप, मापन, घडण', 'The clash of civilization', हे विषय हाताळण्यात आले. 'उत्क्रांती' या सूत्राच्या अंतर्गत 'Basic introduction to evolutionary theory and its far-reaching implications', 'नर-मादी जनुकीय हितसंबंध', 'Introduction to Evolution Game Theory' हे विषय हाताळण्यात आले. मानसशास्त्राच्या अंतर्गत 'मानसशास्त्राच्या विविध शाखा व देशप्रश्न', 'Cognitive Bias, Nature-Nurture' या विषयांवर मांडणी झाली. तसेच 'स्त्री-पर्व' 'सेपिअन्स', 'गोफ जन्मांतरीचे', 'वारूळपुराण' या पुस्तकांवर देखील मांडणी झाली. अंतर्गत व बाह्य अभ्यासकांचा या मांडणीमध्ये सहभाग होता.

ज्ञान प्रबोधिनी अभ्यासगटाच्या WhatsApp गटावर १३८ सदस्य आणि Google Group वर २३५ सदस्य आहेत. वैचारिकांची ध्वनिमुद्रणे Google Drive च्या माध्यमातून Google Group वर असलेल्या सदस्यांना उपलब्ध असतात. WhatsApp गटावर वैचारिकांच्या अनुषंगाने किंवा प्रासंगिक महत्त्वाच्या विषयांवरच्या माहितीची, प्रश्नांची देवाणघेवाण व चर्चा होते.

## २. चिंतन गट

या प्रक्रियेतून आलेल्या समन्वयकांचा मिळून सामाजिक शास्त्र अध्ययन चिंतनगट तयार झाला आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या मंगळवारी गट नियमितपणे भेटतो. चिंतनगटाच्या काही प्रासंगिक बैठकी देखील होतात. चिंतनगटाच्या बैठकींना सर्वसाधारणपणे सहा ते आठ जणांची उपस्थिती असते. पुढील वैचारिकांची योजना, संभाव्य उपक्रम व काही अभ्यासाचे विषय याबद्दल चिंतनगटात चर्चा होते.

चिंतन व अभ्यासगटातील सदस्यांबरोबर चर्चा करून विविध देशप्रश्न, त्यातील गुंतागुंत, त्यावरील उत्तरांच्या दिशा समजून घेणे व त्यासाठीचा दृष्टीकोन विकसित करणे असा उद्देश निश्चित करण्यात आला. तसेच दीर्घकालीन कामासाठी विचारसरणी बरोबरच, तत्त्वज्ञान व इतिहास-संस्कृतीचा अभ्यास करणे आवश्यक असते हे लक्षात घेऊन आंतरविद्याशाखीय अभ्यासाच्या दृष्टिकोनातून १०० पुस्तकांची यादी तयार करण्यात आली. सुरुवातीच्या टप्प्याला त्यातील ५६ पुस्तके विकत किंवा भेट या स्वरूपात ग्रंथालयात आलेली आहेत. त्यातील काही पुस्तकांचा अभ्यास करून वैचारिकांमध्ये मांडणी करायला सुरुवात झालेली आहे. २४ सदस्यांनी अशाप्रकारे मांडणी करण्याचे नोंदविले आहे.

'मुस्लिम स्त्रियांना शिक्षणामुळे मिळणारी संधी व प्रेरणा' या विषयाचा चिंतन गट सुरू झाला असून यामध्ये वाच. मनीषा शेटे, मानसी बोडस, राज्यश्री क्षीरसागर या सदस्यांचा सहभाग आहे. या विषयाचे प्रकल्पात रूपांतर करण्यासाठी काय प्रकारचा विचार करावा लागेल याविषयी गटात चर्चा सुरू असून सध्या महिन्यातून एकदा गटातील सदस्य प्रत्यक्ष भेटतात. या विषयासंदर्भात वाच. वनिताताई पटवर्धन, हमीद दलवाई इस्लामिक सेंटरच्या इला दलवाई, मुस्लिम महिलांवर काम केलेल्या लेखिका प्रतिभा रानडे यांच्याशी गटाच्या चर्चा व भेटी झाल्या. २०१७-१८ मध्ये तेरा मुस्लिम महिलांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यावर आधारित दीर्घ लेख तयार करण्याचे काम चालू आहे.

▲▲▲

# १. ग्राम विकसन

### ◆ पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

भोर व वेल्हे तालुक्यातील डोंगराळ भागातील दुर्गम गावांमधील पाणी टंचाई निवारणाच्या उपक्रमावर गेली पाच वर्षे विभागातर्फे विशेष भर देण्यात येत आहे. यासाठी शासनाच्या अधिकृत पाणीटंचाईग्रस्त गावांच्या यादीचा आधार घेण्यात येत आहे. तीन वर्षांहून अधिककाळ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावांना यात प्राधान्य देण्यात येते. पाणी टंचाई निवारणाच्या या उपक्रमात झरे विकास, नवीन विहीर खोदाई, जुन्या विहिरींचे खोलीकरण व रुंदीकरण, नवीन नळपाणी पुरवठा योजना, जुन्या नळपाणी योजनेची दुरुस्ती, पाणी साठवण टाकीचे बांधकाम आदी विषय लोकांच्या सहभागातून हाताळण्यात येतात. श्रमदान व लोकवर्गणी याआधारे प्रत्येक गावाचा सहभाग निश्चित करण्यात येत असतो. कामापोटी येणाऱ्या खर्चाच्या मोठ्या रकमेची तजवीज पुण्यातील विविध कंपनांच्या सीएस्आर निधीतून करण्यात येत असते. पाणी टंचाई निवारणाचा हा कार्यक्रम ग्रामस्थ, श्रमकार्यासाठी येणारे गट, हितचिंतक, विविध कंपन्यांच्या सहकार्यातून सातत्याने चालू आहे.

## पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

### ◆ झरे विकास व विहीर खोदाई उपक्रम

गेल्या वर्षी खोदकाम पूर्ण झालेल्या विहिरींभोवती संरक्षक कठडे बांधण्याचे काम वेल्ह्यातील बार्शीचामाळ (शेनवड) व वांगणीवाडी येथे प्राधान्याने करण्यात आले. भोरमधील साळूंगण व वेल्ह्यातील पिंपरी येथे या वर्षी नव्याने काम चालू करून तेथील विहिरींचे खोदकाम पूर्ण करण्यात आले. पिंपरी येथे जुन्या सामुदायिक विहिरीचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यात आले. पाठोपाठ तेथील संरक्षक कठड्याचे कामही पूर्ण करण्यात आले. पूर्वी खोदकाम केलेल्या डोपेखिंड (जाधववाडी) व गेळगाणे-कचरेवस्ती येथील विहिरींची खोदकामे या वर्षी पूर्ण करण्यात आली. मिरकुटवाडी येथे फक्त विहीर खोलीकरण करण्यात आले. गुंजवणे-धनगरवस्ती येथील विहिरीचे नव्याने काम चालू केले असून तेथील खोदकाम प्रगतीपथावर आहे. बांधकाम करण्यात आलेल्या सर्व विहिरीच्या जागांचे शासनाच्या नावे बक्षिसपत्र करण्यासाठी मोठ्या चिकाटीने पाठपुरावा करून ती मिळवण्यात आली.

सर्वच गावांमध्ये ग्रामस्थांनी विहीर खोदकामामध्ये मोठ्या प्रमाणात श्रमदान केले. ग्रामस्थांच्या श्रमदानाला प्रबोधिनीच्या युवक विभागातील युवकांची मोलाची साथ मिळाली. कंपन्यांच्या अधिकारी-कर्मचारी सदस्यांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या सर्व कामासाठी प्रामुख्याने पर्सिस्टंट फौंडेशन व केपीआटी टेक्नोलॉजी या कंपन्यांच्या सीएस्आरचे अर्थसाहाय्य लाभले. प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, संत्रिका विभागातील पुरोहितांनी जमा केलेल्या देणग्या व वैयक्तिक देणगीदार याद्वारेही निधी संकलन करण्यात आले.

### ◆ नळपाणी पुरवठा योजना

गुहिणी (ता. भोर) या गावामध्ये नळपाणी योजनेसाठी स्वतंत्र थ्री फेज वीज जोडणी झाली. यासाठी मोठा पाठपुरावा करण्यात आला. वीजमीटर गावाच्या ग्रामपंचायतीच्या नावे आला आहे. त्यामुळे विहिरीतील पाणी उचलण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वीजपंपाची जोडणी पूर्ण करण्यात आलेली आहे. आता या गावाची नळपाणी योजना खऱ्या अर्थाने पूर्णत्वास गेली आहे. पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी जिल्हा परिषद निवडणुकांवर बहिष्कार टाकणारे हेच ते गाव. सुमारे १५ वर्षांहून अधिक काळ उन्हाळ्यात कायम टँकरने पाणी पुरवठा करणारे हे गाव आता टँकरमुक्त झाले आहे !

कांबरे खुर्द हे भोर तालुक्यातील भाटघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील चाळीस धरणग्रस्त गावांपैकी एक गाव आहे. हे गाव टंचाईमुक्त होण्यासाठी या गावात नळ-पाणी पुरवठा योजनेचे काम या वर्षी हाती घेऊन पूर्ण करण्यात आले. भाटघर धरणाच्या पाण्याच्या डोहापासून सव्वा किलोमीटरची पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असून सबमर्सिबल पंप बसविण्यात आला आहे. ग्रामस्थांनी या कामासाठी ५० हजार रुपयांची लोकवर्गणी गावातून उभी केली आहे. तालुक्याच्या टंचाईग्रस्त गावांच्या यादीतून आता हे गाव हद्दपार झाले आहे.

अमेरिकेतील ॲराझोना विद्यापीठातील ६ विद्यार्थ्यांनी इंजिनिअर्स विदाऊट बॉर्डर्स (EWB) या संस्थेच्या माध्यमातून वरोती खुर्द (ता. वेल्हे) गावास गेल्यावर्षी दोन वेळा भेट दिली होती. त्यांनी तेथे गोळा करून पाठविलेल्या अर्थसाहाय्यातून वरोती खुर्दच्या नळ-पाणी योजनेचे काम पूर्ण करण्यात आले आहे. आता पाठपुरावा चालू आहे तो वीज मंडळाकडून अधिकृत वीज जोड मिळण्यासाठी.

### ◆ फेरोसिमेंट टाकी बांधकाम

या वर्षी पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी एकूण दोन गावांमध्ये फेरोसिमेंट टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. वेल्हे तालुक्यातील खोपडेवाडी (१२००० लि.), खिळदेववाडी (१५,००० लि.) येथे या टाक्या बांधून पूर्ण करण्यात आल्या. या दोन टाक्यांचे वैशिष्ट्य म्हणजे यावर फेरोसिमेंट तंत्रज्ञानाच्या आधारेच झाकणे बसविण्यात आलेली आहेत. गेल्या वर्षी बांधलेल्या सात टाक्यांवर या वर्षी फरश्या टाकून झाकणे

बसविण्यात आली आहेत. फेरोसिमेंट तंत्रज्ञानाबाबतच्या प्रशिक्षणाला विभागातील एका कार्यकर्त्याला मुंबईला जलवर्धिनी संस्थेत पाठविण्यात आले होते.

### ◆ लोकार्पण कार्यक्रम

वरोती खुर्द (ता. वेल्हे) येथे बांधून पूर्ण झालेल्या विहिरीचा लोकार्पण कार्यक्रम पर्सिस्टंट फौंडेशनच्या अध्यक्षा सोनाली देशपांडे यांच्या हस्ते संपन्न झाला. या प्रसंगी फौंडेशनच्या सीएस्आर अधिकारी योगिता आपटे, वैभव निकम तसेच माजी सरपंच विलास गांडले, अठरा गाव मावळ समितीचे अध्यक्ष शंकर पवार व सचिव लक्ष्मण शिंदे , बापू कुमकर हे उपस्थित होते. विहिरीसाठी जमीन दान स्वरूपात देणारे विश्वास केळकर हेही याप्रसंगी उपस्थित होते. गुंजवणे ग्रामपंचायतीमधील दरडीगेवाडी (ता. वेल्हे) येथील विहिरीचे लोकार्पण पर्सिस्टंट सिस्टिम्स्च्या व्यवस्थापिका (मनुष्यबळ) चित्रा बुजरूक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच प्रकाश निढाळकर, माजी सरपंच गुलाब रसाळ, पोलीस पाटील बाळकृष्ण रसाळ हे उपस्थित होते. कुसारपेठ (ता. वेल्हे) येथील विहिरीचे लोकार्पण पर्सिस्टंट सिस्टिम्स्चे व्यवस्थापक (अर्थ) राजेश राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

पिंपरी (ता. वेल्हे) येथे या वर्षी बांधून पूर्ण झालेल्या विहिरीचे उद्घाटन पूजा कास्टिंग प्रायव्हेट लिमिटेडचे श्री. अनिल कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ईनरव्हील क्लबच्या राष्ट्रीय अध्यक्षा स्मिता पिंगळे या होत्या. यावेळी ईनरव्हील क्लबच्या जिल्हा अध्यक्षा रेणू गुप्ता, ईनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईडच्या अध्यक्षा ॲड. प्रतिभा जोशी-दलाल उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला जोडूनच खोपडेवाडी (ता. वेल्हे) येथील नव्याने बांधलेल्या पाणी साठवण टाकीचे उद्घाटन श्रीमती पिंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. दिवसभराच्या या कार्यक्रमासाठी पुण्याहून ईनरव्हीलचे पंधरा सदस्य आवर्जून आले होते हे विशेष नमूद करण्यासारखे आहे!

कोंडगाव (ता. भोर) येथे बांधून पूर्ण झालेल्या विहिरीचे उद्घाटन टाटा मोटार्सचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. सुनील सवाई यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मित्र संस्थेचे संस्थापक व ज्ञान प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते अनंतराव अभंग होते. या प्रसंगी टाटा मोटार्सचे अन्य वरिष्ठ अधिकारी व्यंकट कृष्णन, अतुल पटवर्धन, विश्वास देव्हारे, सीएस्आर प्रमुख अचिंत्य सिंग व मयुरेश कुलकर्णी तसेच मुंबई गावमंडळाचे अध्यक्ष सुरेश दिघे व सतीश गोरे हे उपस्थित होते.

कांबरे बुद्रुक (ता.भोर) येथील नळपाणी योजनेचे उद्घाटन केपीआयटी टेक्नोलॉजीजचे अध्यक्ष श्री. रवि पंडित यांच्या हस्ते या वर्षी करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमापूर्वी नळपाणी योजनेचे जलपूजन निर्मलाताई पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केपीआयटीचे निर्मला पंडित, अनुप कांबळे, सीएस्आर प्रमुख तुषार जुवेकर तसेच पोलीस पाटील नथुराम सुकाळे, जगन्नाथ स्वामी व सुदाम ओंबाळे हे उपस्थित होते. उंबरमाळ (ता. भोर) येथे गेल्या वर्षी कार्यान्वित झालेल्या नळपाणी योजनेचे उद्घाटन प्रबोधिनीचे शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख प्रशांत दिवेकर यांच्या हस्ते या वर्षी करण्यात आले. यावेळी केपीआयटीचे सीएस्आर प्रमुख तुषार जुवेकर तसेच माजी सरपंच लालासाहेब शिळीमकर, जगन्नाथ स्वामी, ग्रामसेवक एम के सोनवणे हे उपस्थित होते. उंबरमाळ गावाने नळपाणीयोजनेसाठी ५० हजार रुपयांचा लोकवाटा उभा केला हे उल्लेखनीय आहे!

## पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम

### ◆ लोकसहभागातून शेतबांध दुरुस्ती व जमीन सपाटीकरण

भोर व वेल्हे तालुक्यातील दोन गावात या वर्षीही शेतबांध दुरुस्ती व जमीन सपाटीकरणाचे काम लोकसहभागातून हाती घेण्यात आले. एकूण ७४ शेतकऱ्यांच्या शेतावरील काम पूर्ण झाले. यात दरडीगेवाडी (मेट पिलावरे) येथील चार शेतकरी, कोंडगाव (ता. भोर) येथील ७० शेतकऱ्यांचा समावेश आहे. या सर्व कामात शेतकऱ्यांनी स्वतःच्या ५० % लोकवर्गणीतून हे काम करून घेतले हे विशेष नमूद करण्यासारखे आहे. उर्वरित ५० % खर्चाची व्यवस्था ईनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईडच्या अर्थसहाय्यातून करण्यात आली. यात अनेक शेतकऱ्यांनी सपाटीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर स्वखर्चाने दगडांच्या ताली घालून घेतल्या आहेत.

### ◆ श्रमकार्य उपक्रम

वेल्हे तालुक्यातील खोपडेवाडी व शेनवड या दोन गावांमध्ये तर भोर तालुक्यातील गुहिणी या गावात एकूण चार वनराई बंधारे सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयाच्या पुढाकाराने या वर्षी घालण्यात आले.

या चार बंधाऱ्यातील ओढ्यात साठलेल्या पाण्यामुळे परिसरातील विहिरींचा पाणीसाठा वाढण्यास तसेच पुढील दोन ते तीन महिने जनावरांसाठी पाणी उपलब्ध होण्यासही मदत होणार आहे. या उपक्रमात युवक (४४), युवती (२०) अशा एकूण ६४ जणांनी सहभाग घेतला. कुंबळे गावात नेतृत्व संवर्धन केंद्रातर्फे ३२ मुले व २२ मुलींनी मिळून एक वनराई बंधारा घातला. याशिवाय मेट पिलावारे व वरोती खुर्द येथे ४७ सदस्यांनी श्रमदान करून या गावात प्रत्येकी एक बंधारा घातला. या सर्व श्रमदानाच्या एकूण उपक्रमांमध्ये युवकांसह माहिती तंत्रज्ञान (आय. टी.) कंपन्यांतील कर्मचाऱ्यांनी हिरीरीने सहभाग घेतला. युवक विभागातर्फे वेल्हे तालुक्यातील अनेक गावांमध्ये श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. त्यात एकूण १६८ युवकांनी विहिरीतील डबर काढण्यासाठी श्रमदान केले. पर्सिस्टंट फौंडेशनच्या ३१ सदस्यांचा

डोपेखिंड येथे डबर काढण्याच्या श्रमदानात सहभाग होता.

**सौर ऊर्जा प्रकल्प**

शिवापूर येथे सौर पॅनेल व सौर दिवे जुळणी प्रशिक्षणात पुण्याच्या ग्रामीण भागातील तरुणांबरोबरच बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील सात प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. प्रशिक्षणाचे उद्‌घाटन पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मनोज राठोड यांच्या हस्ते झाले. शिवापूर येथे दुसऱ्यांदा झालेल्या प्रशिक्षणात सहा जण सहभागी झाले होते. हराळी येथे झालेल्या महिनाभरासाठीच्या प्रशिक्षणात पाच जण सहभागी झाले होते. जपानी सौर प्रशिक्षक ताजिमा तोशिओ व श्री. ओकी यांनी प्रबोधिनीच्या पुण्यातील सौर जुळणी प्रशिक्षण केंद्राला भेट दिली व चालू कामकाजाची माहिती घेतली.

पाणी फौंडेशनच्या दुष्काळ निवारणाच्या कामात स्वतः श्रमदान करण्यात तसेच ग्रामस्थांना एकत्र आणण्यात हिरीरीने पुढाकार घेणाऱ्या निवडक १५० व्यक्तींना सौर दिवे सन्मानपूर्वक देण्यात आले. पुण्यातील कल्पनाताई देसाई यांनी दिलेल्या ८० हजार रुपयांच्या देणगीतून या उपक्रमाची रचना करण्यात आली.

बीड जिल्ह्यातील निमला (ता. धारूर) या गावी एकूण ७६ सौर पॅनल्स आणि दिव्यांची विक्री सवलतीच्या दरात करण्यात आली. ग्रामस्थांना सौर दिवे जुळणीचे प्रशिक्षणही यावेळी देण्यात आले.

पुण्यात विद्यार्थी वयोगटासाठी आयोजित केलेल्या सौर दिवे व पॅनेल्स जुळणी सशुल्क प्रशिक्षणात एकूण २० जण सहभागी झाले होते.

▲▲▲

# १०. कृषी तांत्रिक विद्यालय, शिवापूर

◆ शिवापूरच्या कृषि-तांत्रिक विद्यालयाची वाटचाल१९८३ पासून चालू आहे. ग्रामीण भागातल्या शेकडो तरुणांना त्यामुळे आजवर त्यांच्या-त्यांच्या गावाजवळ रोजगार प्राप्त झाला आहे व उदरनिर्वाहासाठी शहराकडे होणारे स्थलांतर काही प्रमाणात कमी झाले आहे. महाराष्ट्रातील शहरीकरणाचा रेटा एवढा वाढला आहे, की पुण्याच्या परिसरातील ३० ते ५० कि. मी. परिघातील गावे आता अर्धशहरी तयार झाली आहेत. औद्योगीकरणसुद्धा तिथवर पोहोचले आहे. त्यामुळे शेतीवरचा भर साहजिकच कमी झाला आहे.

१९८० च्या दशकात शेती आणि उद्योग बरोबरीने वाढविण्यासाठी ''कृषि-तांत्रिक विद्यालय'' असे संयुक्त नाव या विभागाला ठेवले गेले. कालपरत्वे आजूबाजूच्या खेड्यांमधील शेतीच्या गरजा कमी झाल्याने या विद्यालयाला आता ''कौशल्य प्रशिक्षण केंद्र'' असे म्हटले आहे. शेतीवरचा भर मराठवाड्यामध्ये आपल्या हराळी केंद्रामध्ये देऊन तेथे कृषि महाविद्यालय अनेक वर्षे चालू आहे, हे आपण जाणताच.

शिवापूर येथे तंत्रशिक्षणातील काही जुने व काही कालोचित नवे विषय घ्यावेत असे ठरवून दोन कौशल्यांवर गतवर्षात काम झाले, त्याचा हा वृत्तान्त.

**◆ कातारी (टर्नर) अभ्यासवर्ग**

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही कातारी (टर्नर) हा अभ्यासवर्ग चालू होता. तो पाच विद्यार्थ्यांनी पूर्ण केला. आजूबाजूच्या उद्योगांमध्ये आपल्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. गेली अनेक वर्षे या विभागाची धुरा सांभाळणारे मुख्याध्यापक श्री. संजीव तागडे या वर्षी सेवानिवृत्त झाले असल्याने प्रात्यक्षिकांचे शिक्षक श्री. धोत्रे यांनी एकहाती हा वर्ग घेतला. संगणकाधारित यंत्रावर (CNC) काम करण्यासाठी येथे शिकविले जाते. तथापि, हे यंत्र मध्यंतरी नादुरुस्त झाल्याने त्याच्या दुरुस्तीसाठी दोन अभियंत्यांच्या फेऱ्या केंद्रात झाल्या आहेत. लवकरच या यंत्राचे वेगळे प्रशिक्षण आपण सुरु करणार आहोत.

**◆ सौर घट जुळणी प्रशिक्षण वर्ग**

गतवर्षात एकूण दोन सौर प्रशिक्षण वर्ग झाले. यामधील एक वर्ग हा एका आठवड्याचा निवासी झाला तर दुसरा पंधरा दिवसांचा अनिवासी झाला. सौर क्षेत्रात काम करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या लहान उद्योजकांनी यात रस दाखवला आहे. एकूण १५ विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला. यातील विद्यार्थ्यांमार्फत हराळी व पुणे येथे सौर घट बनवण्यास सुरुवात झाली. प्रथम वर्गाचे उद्‌घाटन मा. कार्यवाह सुभाष देशपांडे व COEP महाविद्यालयाचे डॉ. मनोज राठोड यांच्या उपस्थितीत झाले. शिवापूर फाट्याजवळील MX POWER या सौर घट बनवणाऱ्या कंपनीशी यानिमित्ताने आपले अभ्यासक्रम व औद्योगिक पातळीवर बोलणे सुरु झाले आहे. दर तीन महिन्यात एक प्रशिक्षण वर्ग, असे याला स्वरूप देण्याचा मानस आहे.

▲▲▲

# ११. स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

◆ **नवीन गटांमध्ये कामाचा विस्तार...**

**कातकरी समाजासाठी काम :** गेल्या वर्षी पासून सुरू केलेल्या कातकरी समाजाच्या कामाला तेरा युवतींचा गट जोडला गेल्याने चांगली गती आली आहे. या कामाची दिशा अधिक नेमकी व्हावी म्हणून युवतींचे कातकरी जीवन अभ्यास सत्र झाले. कातकरी अभ्यासक विंझरमधील डॉ. महादेव डोंगरे यांनी या विषयी मुलींना मार्गदर्शन केले. त्यानुसार युवतींनी ३५ कातकरी कुटुंबांची सर्वेक्षणे केली. आपल्या प्रयत्नांमुळे पंधरा कातकरी मुले आवडीने शाळेत जायला लागली आहेत.

◆ **किशोरी**

**१) वासंतिक मेळावे :** एप्रिल२०१८ मध्ये गावोगावी वासंतिक मेळावे घेण्यासाठी ३५ युवतींचे प्रशिक्षण घेतले. त्यांनी दि. १० ते २६ एप्रिल मध्ये ३७ गावांत ११२७ मुला-मुलींसाठी मेळावे घेतले. ३७ पैकी दहा गावे हराळी केंद्राची होती. या निमित्ताने मेळावे घेणाऱ्या गटामध्ये गट भावना वाढली.

**२) तासिका :** भागातील नऊ शाळांमध्ये नियमित कामाचा भाग म्हणून व्यक्तिमत्त्व विकसनाच्या वीस तासिका झाल्या. त्यात कौशल्य विकासाबरोबर व्यक्तिगुण विकसनासाठी प्रशिक्षण दिले. तासिकांच्या संपर्कामुळे दि. २२ ते २४ डिसें. मध्ये किशोरींचे नवनिर्मिती विषयावर तंबूतील शिबिर बोरावळे गावी झाले. नऊ शाळेतून ९५ मुली, बारा मार्गदर्शिका अशा एकूण १०७ जणी शिबिरात होत्या. या शिवाय जिजामाता जयंती निमित्त १३ जानेवारी रोजी किशोरींची तेरा किमी अंतराची सायकल फेरी आयोजित केली होती. त्यात सहा गावांतील २६ जणी सहभागी झाल्या.

**३) रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन व कॅडेन्स कंपनी सदस्य यांची शाळांना आगळी देणगी :** किशोरी विकासाचे उपक्रम घेत असणाऱ्या शाळेमध्ये कॅडेन्स कंपनीचे वीस सदस्य आले होते. या सर्व शाळांना खेळाचे साहित्य व शास्त्रीय प्रयोग करण्यासाठीचे साहित्य त्यांनी देणगी दिले. प्रयोगाच्या साहित्यातून होणारे प्रत्यक्ष प्रयोगही करून दाखवले.

**४) वेल्ह्याचा जास्वंद गिरिकन्या निवास :** यावर्षी ३४ जणींसाठी निवास व्यवस्था केली. त्यापैकी २३ जणींनी नवीन प्रवेश घेतले. दरवर्षीप्रमाणे निवासाला ना. ग. परांजपे प्रतिष्ठानच्या नेहाताई व स्मिताताई या विश्वस्तांनी भेट दिली. तिथे चालणाऱ्या 'शनिवारची शाळा' या उपक्रमाला व सर्व मुलींचा वर्षभराचा भोजन खर्च त्यांनी देणगी रूपाने दिला. निवासातील मुलींसाठी शनिवारच्या शाळेची एकूण ३२ सत्रे झाली. त्यात पुणे सहली पासून वेगवेगळे विषय शिकेपर्यंत नवनवीन अनुभव मुलींनी घेतला. त्यात अभ्यासाची तयारी कशी करावी अशी सत्रे सुद्धा झाली. संगणकाच्या साहाय्याने अभ्यास करायला मुली शिकल्या. शाळेत चांगले यश मिळाले. कोंढावळे गावच्या शीतल ढेबे हिला ५वीची शिष्यवृत्ती मिळाली. केवळ निवासात रहात असल्यामुळे तिला योग्य मार्गदर्शन मिळाले.

◆ **युवती**

यावर्षी १२० युवतींसाठी तीन कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये नियमित पाक्षिक तासिका झाल्या. त्यामध्ये व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला. या संपर्कामुळे दिवाळीच्या सुट्टीत दि. १८ ते २० नोव्हें. या दिवसात वेल्हे येथे ३५ युवतींचे साहस शिबिर झाले. या शिवाय वर्षभरात २६ गावांतील १८७ युवतींसाठी गाव पातळीवर एक दिवसाचे कौशल्य प्रशिक्षण वर्ग झाले. त्यात क्विलिंग वस्तू, मणीकाम असे एका दिवसात येणारे छोटेसे कौशल्य शिकविले. युवती गटाने स्वच्छता अभियानाअंतर्गत गावातील गावकरी व मुला-मुलींसोबत ग्राम स्वच्छता केली. ३५ जणींची राजगड साखर कारखाना व परांजपे ऑटो कास्ट कारखान्यास भेट झाली.

युवतींनी 'ओळख स्पर्शाची' या विषयावर संवादिनी सदस्यांकडून प्रशिक्षण घेऊन शिवगंगा-गुंजवणी भागातल्या सोळा शाळांमध्ये १००० विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतली. यामुळे युवतींचा आत्मविश्वास वाढला. यावर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे युवतींचा मोठा गट कार्यशक्ती म्हणून कामाला उभा राहिला. त्यांची संघटन बैठक नियमित वर्षभर घेतली. युवतींनी कौशल्य प्रशिक्षण, ओळख स्पर्शाची कार्यशाळा घेणे, कातकरी समाजातील काम जबाबदारी घेऊन केले.

**१) जीवनज्योती महिला सक्षमीकरण केंद्र :** ज्ञान प्रबोधिनी मार्गदर्शित जीवनज्योती महिला सक्षमीकरण केंद्राला चार वर्षे पूर्ण झाली. वर्षभरात जून व जानेवारी अशा दोन तुकड्यांमध्ये शिवण, पार्लर, नर्सिंग व संगणक असे प्रशिक्षण घेउन ३०० जणी उत्तीर्ण झाल्या. या मुलींसाठी साप्ताहिक दलही घेतले. त्यांच्या व्यक्तीविकासासाठी वैचारिक घेणे, शिक्षक बैठक घेणे, हिशोब देखरेख असे काम केले. या केंद्रातून शिकलेल्या युवती-महिलांना शिवणावर आधारित उद्योगातून रोजगार संधी मिळावी, यासाठी तेथे कौशल्य ज्योती उद्योग केंद्र चालविले जाते. याची वर्षाची उलाढाल रु. ४.६० लाख आहे. या केंद्रात मासिक गरोदर महिला तपासणीही झाली. त्याचा लाभ साधारण ७५ गावांतल्या १६० हून अधिक गरोदर महिलांनी घेतला. अंगणवाडीताईंचे गुणवत्तावाढीसाठी प्रशिक्षण घेतले. त्याला ८५-९० गावांची उपस्थिती असायची. प्रशिक्षणाचा समारोप संमेलनाने झाला. असे संमेलन हे तालुक्यातीलच नाही तर जिल्ह्यातील अंगणवाडीताई यांचे प्रथमच झाले. हा उपक्रम स्टरलाईट टेक फौंडेशनच्या आर्थिक मदतीने झाला.

## ◆ नव चैतन्य उपक्रम-दल

इ. १ली ते ७वी तील मुला-मुलींसाठी नव चैतन्य उपक्रम म्हणजे दल गेल्या तीन वर्षांपासून आपण चालवतो. यावर्षी तेरा गावांत सोळा ठिकाणी दले सुरू आहेत. प्राथमिक शाळेतील मुलांसाठी शाळेच्या वेळात दल घेतले. मैदानावरील खेळ, व्यायाम या बरोबरच पद्य पाठांतर अशीही योजना केली होती. त्यात साधारण १९० मुले-मुली सहभागी होत होती. ही दले स्थानिक पालिकांना प्रशिक्षण देऊन त्यांनीच घेतली. त्याचा एक भाग म्हणून एका गावात खेळघर चालू केले तर काही गावात ग्रंथालये सुरू केली. सर्व गावांत स्पर्धा घेऊन त्याचा बक्षीस समारंभ २६ जानेवारीच्या शाळेच्या कार्यक्रमात केला. त्यामुळे गावाने त्याची वेगळ्या प्रकारे दखल घेतली. बालदिनानिमित्त दि. १४ नोव्हें. रोजी मेळावा घेतला त्याला सहा गावांतून ७५ मुले व १३ मार्गदर्शिका आल्या होत्या.

## ◆ हिरकणी

वय वर्षे ०-६ वयोगटात मुले असणाऱ्या ग्रामीण भागात रहाणाऱ्या आईला या उपक्रमात आपण 'मुले वाढवताना' असे प्रशिक्षण देतो. यावर्षी नऊ गावांत एकूण १४० मातांचे प्रशिक्षण झाले. गेल्या वर्षी ज्यांचे प्रशिक्षण झाले अशांचा मेळावा घेतला. प्रशिक्षणाची जबाबदारी स्थानिक माजी हिरकणींनी घेतली. आता चौदा जणींचा गट हे काम अतिशय आनंदाने करतो आहे. गटबांधणी नीट व्हावी म्हणून गटाची निवासी सहल सज्जनगडावर झाली.

## ◆ बालवाडी

वस्तीवर कमी संख्येमुळे जिथे शासकीय बालवाडी नाही, अशा सात ठिकाणी आपण बालवाडी चालवतो. बहुतेक वस्त्या गावापासून दूर असल्यामुळे तेथील मुले शिक्षणापासून वंचित रहात होती. या सोयीमुळे ती मुले आता शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकली. शाळेतल्या नियमित पालक सभेमुळे पालकांचा सहभाग हे आपल्या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. देवपाल गावाच्या बालवाडीला टाटा मोटार्सच्या रिटायर्ड अधिकाऱ्यांनी दिलेल्या देणगीतून रंग दिला. सगळ्या बालवाडीत एकूण ८० विद्यार्थी आहेत.

दल, हिरकणी व बालवाडी हे काम करणारा २०-३० वयोगटातला लग्न झालेला १७ स्थानिक कार्यकर्त्यांचा गट नियमित बैठकीतून अतिशय चांगला बांधला गेला आहे.

## ◆ बचतगट

या वर्षी आपण ५१ गावात साधारण २०० बचत गट चालवले. त्यापैकी ३३ गावे वेल्ह्यातील आहेत. बरीचशी दुर्गम आहेत. आता बँकेतून आवश्यक असेल तर बँकेतून कर्ज हा नियमित कामाचा भाग झाला आहे. गटातील महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे हे सुद्धा महत्त्वाचे झाले. आता बचत गटाचे काम हे सुरुवातीचे काम असते. एकदा गट सुरु झाला की स्वयंरोजगार प्रशिक्षण, आरोग्य, नेतृत्व विकसनाचे काम सुरू होते, ते तपशीलात पुढे देत आहे.

**१) एकल महिला :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या आर्थिक सहकार्याने आपल्या भागातल्या एकल महिलांचे सर्वेक्षण केले. त्यात तीन महिन्यांत दहा गावातल्या ५२ जणींचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात प्रामुख्याने एकल महिला शासनाच्या योजनेच्या लाभार्थी होऊ शकत असूनही का होत नाहीत याचा अभ्यास केला. शासकीय रचनेत सुद्धा पुरुष प्रधान रचनेच्या अडचणी काय असतात हे त्यामुळे स्पष्ट झाले. या प्रकल्पाचा अहवाल शासनाला सादर केला. या निमिताने आजपर्यंत आपल्या भागातल्या ३०० पेक्षा जास्त एकल महिलांची माहिती गोळा केली.

**२) माहेरघर :** महिलांच्या मनावरचा त्यातही एकल महिलांच्या मनावरचा ताण हलका करायचा तर त्यांना दैनंदिन कामातून २-४ तास सुट्टी मिळायला हवी. त्यासाठी आपण 'माहेरघर' सुरू केले. याचे उद्घाटन दि. २१ फेब्रु. रोजी केले. त्याला २३ गावातून ४६ महिला प्रतिनिधी आल्या होत्या. अमेरिकेत रहाणाऱ्या नंदाताई काळे यांनी यासाठी आर्थिक मदत केली.

**३) स्वयंरोजगार :** स्थानिक महिलांना उद्योग करण्याची संधी मिळावी म्हणून आपण गावोगावी काम करतो. त्यात शिवण वर्ग घेण्यापासून विक्री पर्यंत मदत करतो. यंदा विविध वर्गांतून जणींना कौशल्य प्रशिक्षण दिले तर रू. २.१० लाखाच्या विक्रीला मदत केली. बचत गटातून कर्ज देतो तसे बाजाराशी संबंधित रोज व्यवसाय करणाऱ्यांना रोज फेडायचे (डेली कलेक्शन) तत्त्वावर रू. तीन लाख रुपयांचे कर्ज तेरा जणींना दिले. त्यांनी ते व्यवसायातून चोख फेडले. यंदा हा नवीन प्रयोग होता.

**४) आरोग्य :** आपण ग्रामीण भागात ज्येष्ठ महिलांसाठी कॅन्सर संदर्भात जागृती कार्यक्रम घेतो. त्यासाठी डॉ. शुभांगी कानिटकर कार्यकर्ता वृत्तीने नियमित येतात. या वर्षी दहा कार्यक्रम झाले, त्यामध्ये १७३ जणी व्याख्यान ऐकायला आल्या तर ११४ जणींनी गर्भाशयाच्या संबंधी तपासणी केली. ८२ जणींनी पॅपस्मिअरची तपासणी करून घेतली. या तपासणीमुळे अनेकींवर वेळेवर उपचार होऊ शकले ज्यामुळे त्यांचे आयुष्य वाढले व अधिक सुखकर झाले. आपण अशा तपासणीची योजना केली नसती तर कदाचित यातल्या कोणी दवाखान्यातही गेल्या नसत्या.

या शिवाय पाटणकर हॉस्पिटल मार्फत दरमहा दोन वेळा गरोदर महिला तपासणी झाली ज्यात महिन्याला किमान १०० जणी येत होत्या. दरमहा दोन वेळा डॉ वैदेही केळकर व डॉ अनुजा महाजन या प्रशालेय माजी विद्यार्थिनींनी जबाबदारी घेतल्यामुळे आंबवण्याला दात तपासणी झाली तर शिरवळच्या मेहता रुग्णालयाच्या मदतीने ज्येष्ठ नागरिकांची नऊ ठिकाणी डोळे तपासणी झाली.

**५) नेतृत्व बैठक :** दर महिन्याला होणाऱ्या गाव प्रतिनिधींच्या नेतृत्व बैठका यावर्षीही झाल्या. आंबवणे केंद्र : नवदिशा तर वेल्हे केंद्र : नवचेतना अशा दोन स्वतंत्र मासिक बैठकींमध्ये साधारण ३० जणी सहभागी झाल्या होत्या.

**६) नवरात्र मेळावे :** स्थानिक नेतृत्व विकसनाची संधी मिळावी

म्हणून गाव पातळीवर नवरात्र मेळाव्यांचे आयोजन केले. सात दिवसांत ४५ गावात १३४७ जणी मेळाव्यात सहभागी झाल्या. मेळावा घेणाऱ्या ४०-५० जणींचा गट यानिमित्त बांधला गेला. गावात धडपड करून काम करणाऱ्यांचा मेळाव्यात साडी देउन सत्कार केला. ही सत्काराची साडी पुण्याच्या अनेक मैत्रिणींनी मदत म्हणून / नवरात्रीतली ओटी भरण्यासाठी दिली होती. एरवी चर्चा न होणारे अनेक विषय या मेळाव्याच्या निमिताने चर्चेत आले.

**७) प्रतिज्ञा ग्रहण :** कुठल्यातरी बैठकीच्या सदस्य असणाऱ्या १२२ गाव प्रतिनिधींचे निवासी तंबू शिबिर झाले. त्यात ३२ गावांमधून महिला आल्या होत्या. शिबिरात प्रबोधिनी परिचयाची सत्रे झाली. सर्वसाधारण प्रबोधिनीपण व विशेष प्रबोधिनीपणावर चर्चा केली. दुसऱ्या दिवशी प्रतिज्ञा ग्रहण झाले. त्यात दोन तृतीय, सहा द्वितीय व २९ प्रथम अशा प्रतिज्ञा घेणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना मा. संचालकांनी प्रतिज्ञा देऊन मार्गदर्शन केले.

**८) स्त्री शक्ती जागर :** दि. ३ जाने. सावित्रीबाईंची जयंती ते दि. १२ जाने. राजमाता जिजाबाई जयंती या दरम्यान ११ कार्यक्रम योजले. त्यात सावित्रीबाई व जिजामाता यांचे चरित्र कथन, काही प्रशिक्षणे व बैठकांची योजना केली होती. तसेच जागतिक महिलादिनानिमित्ताने स्त्री शक्ती प्रबोधन गटातील १७९ जणींनी एकत्र सिटी प्राईड अभिरुची येथे 'आनंदी गोपाळ' हा चित्रपट पाहिला. ३८ गावांतून १५० पेक्षा जास्त ग्रामीण महिला त्यामध्ये सहभागी झाल्या. तसेच संवादिनी, मध्यवर्ती कार्यालय, नेतृत्व संवर्धन केंद्र, युवती विभाग या विभागांतील युवती/महिलांचा सहभाग यामध्ये होता.

**९) आरोग्य सखी :** जाने. २०१९ पासून बजाजच्या आर्थिक साहाय्याने आरोग्य सखी प्रकल्प सुरू झाला. या प्रकल्पा अंतर्गत आरोग्याची जाणीव जागृती कार्यक्रम व तपासणी शिबिरे घेणे अपेक्षित आहे त्याचे काम सुरू झाले. स्थानिक महिला आरोग्य कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण झाले व गट कामाला लागला!

**१०) टेलीमेडिसिन :** करंजावणे आरोग्य केंद्राच्या १२ आशांसोबत रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड यांच्या आर्थिक मदतीने हा प्रकल्प सुरू केला. यात टॅबच्या मदतीने रक्तातील हिमोग्लोबिन, साखर, रक्तदाब व तपमान अशा तपासण्या गावोगावी करायला सुरुवात केली.

**११) कै. लीलाताई तांबे शैक्षणिक संकुल:** वेल्ह्यात सुरू करायच्या या प्रकल्पासाठी या वर्षी आपण जागा खरेदी केली.

### ◆ रामसीता पुराणिक तंत्रनिकेतन, शिवापूर

या वर्षी शिवण, हस्त कौशल्य व विशेष कौशल्य धरून २८ प्रशिक्षण वर्गांमधून २०७ जणींचे प्रशिक्षण केले. केक, चॉकलेट व ओरीगामीच्या वस्तू ही नवी भर. याच बरोबर खोपी गावात महिलांसाठी दोन महिन्यांचा संगणक वर्गही घेतला. शिवापूर केंद्राबरोबरच आता गावागावात जाऊनही आपण असे वर्ग घेतो.

▲▲▲

(पान २५ वरून पुढे चालू)

## आजची प्रबोधिनी

### ३. ग्रामविकसन
**१. नैसर्गिक संसाधने – गुंजवणी खोरे, हराळी**
(पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)
**२. तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, शिवापूर**
**३. सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प – साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई**

### ४. आरोग्य
**१. दीनानाथ रुग्णालय व्यवस्थापन, पुणे**
website - dmhospital.org
**२. नेत्र रुग्णालय, शिरवळ**

### ५. नेतृत्व संवर्धन
**१. युवक विभाग – पुणे, निगडी, सोलापूर**
**२. युवती विभाग – पुणे, निगडी**
**३. नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे**
(प्रशिक्षण वर्ग, शिबिरे, कार्यशाळा)

### ६. स्त्री शक्ती प्रबोधन
**१. संवादिनी – पुणे (मध्यवर्ती, पौड रस्ता, औंध), सोलापूर, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर, ठाणे, शिरुर,**
(समतोल द्वैमासिक, मासिक बैठक, गप्पाकट्टा इ.)
**२. स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)– शिवगंगा व गुंजवणी खोरे**
(बचत गट, आरोग्य, किशोरी-युवती विकास, स्वयंरोजगार)

### ७. राष्ट्रीय एकात्मता
**१. नागरी वस्ती अभ्यास व सल्ला मार्गदर्शन केंद्र, पुणे**
**२. ईशान्य भारत शैक्षणिक विस्तार प्रकल्प**
(अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण वर्ग)
**३. ज्ञानसेतू प्रकल्प**
(ईशान्य भारत, छत्तीसगड, झारखंड, जम्मू आणि काश्मिर)

### ८. सामाजिक उद्योजकता
**१. उद्योजकता विकास कक्ष, पुणे**

✦ मुख्य कार्यालय ✦
**ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ 030**
☎ ०२०-२४२०७००० www. jnanaprabodhini.org

# १२. स्त्री शक्ती प्रबोधन (शहरी)

### ◆ संवादिनी विशेष- द्विदशकपूर्ती कार्यक्रम

संवादिनी हा मध्यमवयीन शहरी महिलांचा गट आहे. गटाची सदस्य संख्या अंदाजे २०० आहे. २००० साली सुरु झालेल्या संवादिनी गटाने या जानेवारीत विशीत पदार्पण केले. द्विदशकपूर्तीनिमित्त झालेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे —

**पदयात्रा** – दि. ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुलेंच्या जन्मदिनी भिडेवाडा ते फुलेवाडा अशी पदयात्रा काढली. शाहू चौक व फुले वाडा या दोन ठिकाणी झालेले 'लढा अस्तित्वाचा' या पथनाट्याचे सादरीकरण, उपासना व मा. स्वर्णलताताई भिशीकर यांनी लिहलेल्या 'सावित्री ज्योतीबांचे सुम्बरान' मधून केलेले क्रांतीज्योतीचे स्मरण या सर्वांमुळे पदयात्रा हा प्रत्येक संवादिनीसाठी अविस्मरणीय अनुभव ठरला. यात एकूण ७३ जणींनी सहभाग घेतला.

**घिसर रायदंडवाडी भेट** – दि. ६ जाने. रोजी, ४३ जणींनी वेल्हे गावाजवळील घिसर–रायदंडवाडीला भेट दिली. ग्रामीण संपर्क वाढविणे हे ध्येय, तर शहरी व ग्रामीण स्त्री–शक्ती एकत्रीकरण हा हेतू डोळ्यापुढे ठेवून या भेटीचे आयोजन केले. घिसरला सुलाताई व रायदंडवाडी येथील कुंदाताई या द्वितीय प्रतिज्ञित आणि आशाताई या तृतीय प्रतिज्ञित ग्रामीण कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

**संवादिनी कुटुंब मेळावा** – हा मेळावा दि. ३ फेब्रु. रोजी झाला. गटातील सदस्यांचे कुटुंबिय संवादिनीशी जोडले जावेत, त्यांचा परस्परांचा व संवादिनीच्या कामाचा परिचय व्हावा, त्यातून संबंध अजून दृढ व्हावेत हा या मागचा हेतू होता. तीन किंवा चार संवादिनींची कुटुंबे एकत्रित अशा १३ गटांमध्ये कुटुंबांचा परस्परांत औपचारिक ओळखीबरोबर अनौपचारिक संवाद घडवून आणला. त्यात कुटुंबातील संवादिनी ही 'संवादिनी' कुटुंबात आल्यानंतर तिच्यात काय बदल झाला हे कुटुंबातील सदस्यांनी सांगितले. यावेळी कामातील वेगळे योगदान लक्षात घेऊन सुजाता गोखले, परिमला पांडे, समता झावरे आणि सुनिता भन्साळी यांना प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे व संचालक मा. गिरीशराव बापट यांच्या हस्ते 'कृतीशील संवादिनी' हा पुरस्कार देण्यात आला.

**चक्री उपासना** – जाने. २०१९ ते जाने. २०२० या कालावधीत संवादिनी सदस्यांच्या घरी उपासना करण्याचे नियोजन केले आहे. दि. १ व २ जाने. रोजी सराव उपासना झाली. दि. ३ जाने. पासून सदस्यांच्या घरी उपासना सुरु झाली. आत्तापर्यंत ८६ संवादिनींच्या घरी उपासना झाली. संवादिनी कार्यालयात, मध्यवर्ती संवादिनी, पौड रस्ता संवादिनीत, शिरूर संवादिनी, औंध व डोंबिवली या ठिकाणी, जानेवारी ते मार्च या कालावधीत एकूण १२२२ जणींनी उपासना केली.

### ◆ प्रदीर्घ बैठक

प्रदीर्घ बैठक दि. १६ व १७ जूनला घेण्यात आली. दि. १६ जून रोजी वर्षारंभ उपासना झाल्यानंतर मा. कुमुद भार्गव यांचे 'कुटुंब व कार्यकर्ता' या विषयावर व्याख्यान झाले. या वर्षीचा कार्यसंकल्प मांडला गेला. द्विदशकपूर्ती नियोजनाच्या निमित्ताने एकत्रित चर्चा झाली. येत्या काळात आपण कोणत्या बाबतीत अभ्यास व काम करू शकतो, याबद्दल कल्पनास्फोट केला, त्यातून खूप वेगवेगळ्या विषयांशी संबधित काम करण्यास वाव आहे असे लक्षात आले. दि. १७ जून रोजी मा. अदितीताई हर्डीकर यांचे 'राष्ट्र आणि भगिनी निवेदिता' या विषयावर व्याख्यान झाले. नंतर 'रूप पालटू देशाचे- माझा सहभाग' या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. शेवटी मा. संचालकांचे 'प्रबोधिनीपण- कृती, गती, प्रगती' या विषयावर मार्गदर्शन सत्र झाले. नवीन नियुक्त्या जाहीर करून समारोप झाला. (उपस्थिती पहिल्या दिवशी ३१, दुसऱ्या दिवशी २६.)

### ◆ समतोल द्वैमासिक

'गुणवत्ता जीवनाची' हा सूत्र विषय असलेल्या समतोल दिवाळी अंकाचे प्रकाशन दि. २० ऑक्टो. रोजी झाले. स्वतः गुणवत्तापूर्ण जीवन जगणाऱ्या, इतरांच्या जीवनाची गुणवत्ता वाढविणाऱ्या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, जव्हार येथील प्रगती प्रतिष्ठानच्या संस्थापक कार्यकर्त्या मा. सुनंदाताई पटवर्धन यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या वर्षभरात एकूण ४८ नवीन लेखक आणि कवी यांनी समतोल मध्ये लेखन केले. एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीत समतोलसाठी पुढील विषय हाताळले गेले - जलसाक्षरता, दान, गुणवत्ता जीवनाची (दिवाळी अंक), वाचन संस्कृती, स्वभावाला औषध..., तंत्रज्ञान आणि आपण.

### ◆ उमलत्या वयाशी जुळवून घेताना..

उमलत्या वयाशी जुळवून घेताना.. हा किशोरवयीन मुलामुलींसाठी शास्त्रीयदृष्ट्या लैंगिकता प्रशिक्षण देणारा उपक्रम आहे. यामध्ये पालकांसाठी व महाविद्यालयीन गटासाठीही कार्यशाळा घेतल्या जातात. दि. ३ व १८ सप्टें. या दोन दिवशी बालशिक्षण शाळेतील ८० मुलींसाठी विशेष कार्यशाळा घेतली. यात अतिशय सोप्या भाषेत 'पंचकोश विकसना'बद्दल सत्र घेतले. नंतर शारीरिक बदल हा विषय 'आरोग्यदायी सवयी (Healthy Habits)' व 'फुलपाखराचे जीवनचक्र' या फिल्म्सच्या मदतीने मांडला. त्यावेळेस पाळीदरम्यानची स्वच्छता, सॅनीटरी नॅपकीनची विल्हेवाट अशा गोष्टींचा उल्लेख आवर्जून केला.

एप्रिल १८ ते मार्च १९ या कालावधीत गटातर्फे झालेल्या विविध कार्यशाळांचे तपशील खालीलप्रमाणे :

| कार्यशाळा-नाव | कार्यशाळा | संख्या |
|---|---|---|
| उमलत्या वयाशी.... | १९ | १,१२४ |
| तरुणाईची आव्हाने | ३ | ३५८ |
| बहर जोपासताना | १ | ४७ |
| प्रशिक्षक-प्रशिक्षण | ३ | ७२ |
| ओळख स्पर्शाची (पालकांसाठी) | १ | २५० |
| ओळख स्पर्शाची (मुलांसाठी) | ३६ | ५८३६ |
| ओळख स्पर्शाची (प्रशिक्षक-प्रशिक्षण) | २ | २०३ |

### ◆ पालवी

ज्ञानदा गुरुकुल व नगरकर हायस्कूल येथे जुलै १८ ते मार्च १९ या कालावधीत ५वी व ६वी च्या मुलामुलींसाठी २८ व ७वीच्या मुलामुलींसाठी १५ तासिका घेतल्या. सेवासदन संस्थेच्या शाळेत ५वीच्या मुलींसाठी सप्टें. १८ ते १९ या कालावधीत १८ तासिका घेतल्या. यात पालवीच्या १० सदस्यांनी सहभाग घेतला व आपण एकूण ७० मुलांपर्यंत पोहोचलो.

**विशेष प्रकल्प** - संवादिनीचे सर्व गट मिळून एका शाळेत एकत्र असा एक प्रकल्प करत आहोत. सेवासदन शाळेतीलच ५वीचा वर्ग या साठी निवडला आहे. या वर्गावर इ. १० वी पर्यंत वेगवेगळ्या तासिका होतील. या तासिकांच्या आधी, मध्ये आणि शेवटी प्रज्ञा मानस संशोधिका विभागाच्या मदतीने चाचण्या घेतल्या जातील. या प्रमाणे जून २०१८ पासून इ. ५वी च्या वर्गावर 'पालवी' या गटाने तासिका सुरु केल्या आहेत. त्यांच्या एकूण २२ तासिका आत्तापर्यंत झाल्या आहेत. या प्रकल्पात सुसूत्रता यावी म्हणून प्रत्येक गट आपापल्या विषयांची/ अभ्यासक्रमाची पुनर्मांडणी करत आहे.

### ◆ विद्याव्रत संस्कार

प्रबोधिनीबाहेरील १३ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांपर्यंत विद्याव्रत पोहोचविण्यासाठी संवादिनीच्या 'विद्याव्रत संस्कार' गटातर्फे विविध शाळांमध्ये या संस्काराच्या व्याख्यानमाला घेतल्या जातात. प्रशिक्षकांसाठीच्या प्रशिक्षणाच्या अंतर्गत दि. १ सप्टें. पासून महिन्यातून दोनदा विद्याव्रत व्याख्यानावरील तासिका सुरु झाल्या. विद्याव्रताच्या पोथी मधील श्लोकांचा शब्दश: अर्थ समजून घेण्यासाठीचे सत्र ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या माजी पर्यवेक्षिका वा. भाग्यश्रीताई हर्षे यांनी घेतले. विद्याव्रत गटाने पूरक प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. त्याचा लाभ इतर गटातील सदस्यांनीही घेतला.

एप्रिल १८ ते मार्च १९ या कालावधीत गटातर्फे झालेल्या विविध कार्यशाळांचे तपशील खालीलप्रमाणे :

| शाळा | प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १ शहरी | तासिका | २ |
| २ शहरी | व्याख्यान | ३ |
| ३ ग्रामीण | व्याख्यान | १ |
| ४ इतर शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी (मिश्र गट) | व्याख्यान | १ |
| ५ शहरी + ग्रामीण | पाठपुरावा | २ |

या अंतर्गत एकूण ३७० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलो.

### ◆ मासिक बैठक

| महिना | विषय | वक्ते | उपस्थिती |
|---|---|---|---|
| एप्रिल १८ | बस्तर अभ्यासभेट - अनुभव कथन | मा. सुभाषराव देशपांडे, मा. विवेकदादा गिरीधारी | ५० |
| जून | My Life My Dream | मा. माधुरी कानिटकर | ८४ |
| जुलै | सुनीताबाई देशपांडे-कर्तृत्व, मातृत्व, दातृत्व | मा. सुषमा निसळ, मा.अनुराधा देशपांडे | ५१ |
| जुलै | श्रेयस आणि प्रेयस | मा. स्वर्णलताताई भिशीकर | ९५ |
| ऑगस्ट | शब्दवैभव कार्यशाळा | मा. आरती देवगावकर | ५५ |
| सप्टे. | वंचितांचा दिलासा | मा. डॉ. अभिजित सोनावणे | ६६ |
| ऑक्टो. | समतोल दिवाळी अंक प्रकाशन | मा. सुनंदा पटवर्धन | ११० |
| ऑक्टो. | भोंडला आणि द्विदशकपूर्ती कार्यक्रम रूपरेषा बैठक | वा. अनघा लवळेकर | ७० |
| नोव्हें. | ओळख उपासनेची | वा. अनघा लवळेकर | ४६ |
| डिसें. | काळजी घेणाऱ्यांची काळजी | मा. रोहिणी पटवर्धन | ५४ |
| जाने. १९ | संवादिनी कुटुंब कुटुंबातील संवादिनी | वा. अनघा लवळेकर | ५७ |
| फेब्रु. | संवादिनी कुटुंब मेळावा | | ३१५ |
| फेब्रु. | संवादिनी : उपक्रम माहिती व परस्पर परिचय | वा. अनघा लवळेकर | २४ |
| मार्च | निब्बान (निवृत्ती-संकल्पना) | वा. मनीषा शेटे | ६६ |

◆ **विकासिका गट**

संवादिनीमध्ये नव्याने येऊ लागलेल्या सदस्यांसाठी मुख्यत्वे हा गट सुरु झाला. ३० ऑगस्ट रोजी गटाचे विवेकानंद अभ्यास शिबीर झाले. इ.५वी, ६वी व ७वी च्या विद्यार्थ्यांचे सामाजिक भान वाढावे यासाठी हा गट काम करतो. विकासिका गटाने विविध शाळांमध्ये घेतलेल्या तासिकांचा तपशील खालील प्रमाणे :

| | महिना | शाळा / संस्था | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | जुलै | वसंतराव वैद्य विद्यालय | २७ |
| २ | ऑगस्ट | सिद्धिविनायक क्लास | ७५ |
| ३ | सप्टेंबर | विद्याविकास शाळा | ५५ |
| ४ | नोव्हेंबर | कन्याशाळा मेळावा | १५० |
| ५ | जानेवारी | ताम्हिणी आणि आसदे | ३७ / ३९ |
| ६ | फेब्रुवारी | ताम्हिणी आणि आसदे | ३७ / ३९ |

◆ **कौशल्य गट**

संवादिनीमधील समुपदेशनाचे औपचारिक शिक्षण घेतलेल्या सदस्यांचा समावेश कौशल्य गटात आहे. कौशल्य गटाने एप्रिल १८ ते मार्च १९ या कालावधीत घेतलेल्या विविध कार्यशाळांचा तपशील खालीलप्रमाणे —

गटाने एकूण तीन शहरी शाळा आणि १२ ग्रामीण शाळांमध्ये एकूण ५८ सत्र घेतली. त्याद्वारे एकूण १०७५ विद्यार्थ्यांपर्यंत आपण पोहोचलो. कार्य संकल्पात मांडलेल्या उद्दिष्टांपेक्षा जवळ जवळ दुप्पट मुलांपर्यंत आपण पोहोचलो.

▲▲▲

## १३. जिजामाता दल

१. दलातील अनेक जणींनी गीतेतील १३व्या अध्यायावरील विषयावर, ‘देहातीत होणे म्हणजे काय?’ यावर वाचन केले. गीतेचा चौथा अध्याय शिकून झाला. तसेच पुरुषसुक्त व कालभैरवाष्टकम् याचे पठण झाले.

२. वा. वनितातार्इ पटवर्धन यांच्या ‘प्रगतीशील कुटुंब’ कार्यशाळेस दलातील तीन सदस्या उपस्थित होत्या. तसेच ताईंनी देखील दलाला भेट देऊन सदस्यांशी संवाद साधला. प्रज्ञा मानस संशोधिकेची सुरुवातीपासूनची वाटचाल त्यांनी सांगितली. या विभागाची गरज, त्याला समाजातून असलेली मान्यता या विषयीदेखील ताईंनी सांगितले.

३. दलाच्या संचालक भेटीच्यानिमित्ताने ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

४. वर्षारंभाच्या कार्यक्रमात आ. संचालक गिरीशराव बापट यांनी प्रबोधिनीत सध्या चालू असलेल्या नवीन प्रकल्पांची माहिती दिली. तसेच प्रतिज्ञाग्रहणाविषयी मार्गदर्शन केले. प्रतिज्ञा का व कशी घ्यायची? याविषयी सांगितले. प्रतिज्ञा कोणत्याही वयात घेता येते. त्यामुळे आपण प्रबोधिनीशी अधिक जोडले जातो. असेही त्यांनी सांगितले.

५. नवरात्राच्या निमित्ताने भोंडला, प्रश्नमंजुषा, स्तोत्रपठण इत्यादी कार्यक्रम झाले.

६. संगीतातार्इ कुलकर्णी यांना जैव तंत्रज्ञानातील कामाबद्दल मिळालेल्या पुरस्काराच्या निमित्ताने त्यांचा कौतुक सोहळा करण्यात आला.

७. संत्रिका सदस्या वा. सुजाता बापट यांनी संत्रिकेची माहिती दिली. तसेच गुरुपौर्णिमेनिमित्त झालेल्या व्याख्यानात त्यांनी शिष्य कसा असावा या विषयाची मांडणी केली.

८. अंजलीतार्इ गोखले यांनी शेक्सपिअर व त्यांची नाटके या विषयाची दलाच्या सदस्यांसमोर मांडणी केली.

९. दलातील ज्येष्ठ सदस्या नलिनीतार्इ आपटे यांचे दुःखद निधन झाले. दलातील सदस्यांनी विविध स्तोत्रे शिकण्यात ताईंचा मोठा वाटा होता. दलातील सर्व सदस्यांतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

▲▲▲


**ज्ञान प्रबोधिनी... सर्वांची... सर्वांसाठी**

**ज्ञान प्रबोधिनीच्या पुण्यातील विभागांद्वारा प्रौढ गटासाठी होणारे उपक्रम**

१) संवादिनी – स्वयंविकासातून समाज परिवर्तन या हेतूने महिलांसाठी दरमहा कार्यक्रम – २४२०७२२२

२) पौरोहित्य प्रशिक्षण वर्ग – द्वारा संस्कृत संस्कृति संशोधिका – २४२०७१४६

३) शिक्षक प्रशिक्षण – द्वारा वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र – २४२०७१९४

४) मानसशास्त्राशी व त्याच्या उपयोजनाशी निगडित विविध प्रशिक्षण वर्ग– द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका २४२०७१४२

याशिवाय संग्राह्य प्रकाशने, विविध संस्कार व पूजांचे अर्थपूर्ण पौरोहित्य, मानसशास्त्रीय चाचण्या व समुपदेशन इ. अनेक सेवा उपलब्ध.

# १४. नागरी वस्ती अभ्यास गट

### ◆ राष्ट्रीय एकात्मतेसाठी संपर्क, संवाद, उपक्रम...

राष्ट्रीय एकात्मता ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याची एक महत्त्वाची दिशा आहे. देशाच्या सीमावर्ती राज्यांमध्ये प्रबोधिनीचे अनेक विभाग कार्यरत आहेत. पुण्याच्या नागरी भागात देशभरातील जास्त करून महाराष्ट्रातील अनेक गावांमधील कुटुंबे राहतात. ती अठरापगड समाज गटातील आहेत. त्यांच्या सोबत नागरी वस्ती अभ्यास गट पुढील मुख्य आठ उपक्रमांद्वारे काम करत आहे. १) वस्ती भेटी - संपर्क संवाद समाजदर्शन, सर्वेक्षण : गरजा, आस्था, प्रश्नांचा अभ्यास, २) सल्ला प्रशिक्षण केंद्र - वैयक्तिक व गट समुपदेशन, ३) प्रेरणा जागृती कार्यक्रम - अ) किशोरी/युवती : दले, बैठका, मेळावे, प्रशिक्षण वर्ग, सहली, ब) युवक विकास : सर्वेक्षण, मेळावे, प्रशिक्षण, क) महिला विकास : मासिक बैठक, वार्षिक मेळावा, ४) व्यक्तिमत्व विकास शिबिरे, ५) नेतृत्वगुण विकसनासाठीचे उपक्रम, ६) समाज ऐक्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम, ७) सेवा योजना - आरोग्य व अन्य मदत कार्य, ८) उद्योजकता - कला कौशल्य व व्यावसायिक प्रशिक्षण, उद्योग मार्गदर्शन.

### ◆ वस्तीभेटी व कुटुंब सर्वेक्षण

प्रासंगिक आपत्तीमुळे वस्तीमध्ये मदत कार्याच्या प्रक्रियेमध्ये तीन वस्त्यांमध्ये कुटुंब सर्वेक्षण झाले. दांडेकर वस्तीमध्ये ३७८ कुटुंबांचे, पाटील इस्टेट या वस्तीमध्ये ३०८ कुटुंबांचे तर काशीवाडी या वस्तीमध्ये ३५ कुटुंबांचे सर्वेक्षण झाले. या व्यतिरिक्त नवीन वस्ती जोडत असताना मार्केटयार्ड येथील आंबेडकर वस्तीमध्ये ३०० कुटुंबांचे सर्वेक्षण झाले. एकूण १,०२१ कुटुंबांचे सर्वेक्षण झाले.

### ◆ प्रेरणा जागृती कार्यक्रम

**१) किशोरी विकास -** किशोरी गटासाठी आठ वस्त्यांमध्ये साप्ताहिक दले नियमितपणे चालवली गेली. या वर्षी साप्ताहिक दलामध्ये १५० किशोरी सहभागी झाल्या. या शिवाय पाच वस्त्यांमधून २०९ किशोरी उन्हाळी शिबिरामध्ये सहभागी झाल्या. शिबिरात मुख्यतः कागदी वस्तू बनवायला शिकवल्या. यामध्ये आकाश कंदील, फुलांचा गुच्छ, पेन होल्डर अशा वस्तू शिकवल्या.

ज्ञान प्रबोधिनीमध्ये घेतलेल्या तीन शिबिरांमध्ये १४९ किशोरी सहभागी झाल्या. या शिबिरामध्ये कलासत्र, गटकार्य उदा. गणपती बनवणे, विद्याव्रत पूर्व तयारीसाठी लागणारी व्याख्याने यांचा समावेश होता. वस्तीमधील मुलींना बर्ची नृत्य शिकवले व या मुलींनी ज्ञान प्रबोधिनीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत भाग घेऊन चांगल्या प्रकारे सादरीकरण केले.

**२) किशोर विकास -** या गटासाठी तीन वस्त्यांमध्ये नियमित साप्ताहिक दल चालते. या वर्षी ५० किशोर दलात सहभागी झाले.

ज्ञान प्रबोधिनीमध्ये घेतलेल्या सात मेळाव्यांत २९२ किशोर सहभागी झाले. त्यामध्ये मुख्यतः पद्य, अभंग, मैदानी खेळ, बर्चीनृत्य सराव, सूर्यनमस्कार तसेच बौद्धिक खेळ यांचा समावेश आहे. कला सत्रामध्ये वारली चित्रकला, गणपतीचे चित्र काढणे इ., विज्ञान प्रयोग, गटचर्चा व वाचन सत्रामध्ये युक्त आहार विहार आणि इंद्रिय संयमन हे लेख व उजळती वाट लेख, संचलन सराव व मातृभूमि-पूजन, अनुभव कथन यांचा समावेश होता.

**३) युवती विकास -** युवतींसाठी दोन प्रकारे काम चालते. पहिल्या प्रकारात वस्तीमध्ये राहणाऱ्या आणि मार्गदर्शिका म्हणून काम करणाऱ्या युवतींचे प्रशिक्षण आणि दुसरा प्रकार म्हणजे वस्तीतील इतर युवतींसाठी उपक्रम. यावर्षी वस्तीतील १४५ युवतींसाठी पाच मेळावे आयोजित केले गेले. त्यामध्ये खेळ, पद्य, मातृभूमि-पूजन, वादविवाद स्पर्धा, भविष्यातील उपक्रम, करियर संदर्भात चर्चा असे उपक्रम होते. तसेच कलासत्रामध्ये ओरिगामी व वर्तमानपत्रापासून बनवलेले पेन होल्डर शिकवले. त्याशिवाय बर्चीनृत्य व नाटक सादरीकरण असेही उपक्रम झाले.

नऊ मार्गदर्शिकांकरिता पूर्ण मे महिना पोवाडा प्रशिक्षण झाले. तसेच सर्व नऊ मार्गदर्शिका आषाढी वारीमध्ये आळंदी ते पुणे या टप्प्यात सहभागी झाल्या होत्या.

**४) युवक विकास -** वस्तीतील युवकांसाठी दोन मेळावे आयोजित केले गेले. यातील एक मेळावा ज्ञान प्रबोधिनीमध्ये झाला, तर एक मेळावा गांधी वस्तीमधील बुद्ध विहार येथे झाला. यामध्ये परिचय, विवेकानंद व्याख्यान, मातृभूमि-पूजन, अनुभव कथन अशा प्रकारचे उपक्रम झाले. दोन्ही मेळावे मिळून २९ युवक सहभागी झाले.

**५) महिला विकास -** सावित्री दलाच्या उपक्रमांमध्ये मुख्य उपक्रम मासिक बैठकी हा आहे. वर्षभरात दलाच्या बारा बैठकी झाल्या व त्यात ४६८ महिला सहभागी झाल्या. मासिक बैठकीमध्ये निरनिराळे शारीरिक तसेच बौद्धिक खेळ घेतले जातात. वक्तृत्व सत्र, वाचन सत्र तसेच नवीन वर्षात करण्याचे संकल्प असे उपक्रम घेतले. गटचर्चेमधे स्त्री भृणहत्या या विषयावर पथनाट्य व सामाजिक दडपण असणारे मुद्दे व त्यावर उपाय यावर चर्चा केली. संवादिनी गटामार्फत लढा अस्तित्वाचा हे स्त्रीभृण हत्येवर आधारित पथनाट्य सादर केले गेले. एकूण १८९ जण सहभागी झाले. रोज घरी करता येण्यासारखा २० मिनिटांचा व्यायाम शिकवला. कलासत्रामध्ये संस्कारभारतीची रांगोळी शिकवली. आयुर्विमा या विषयावर व्याख्यान आयोजित केले.

त्याचबरोबर उद्योजिका प्रशिक्षण हा उपक्रम ही चालू आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम व उद्योजिका प्रशिक्षण अंतर्गत भरतकामाचे प्रशिक्षण, राखी प्रशिक्षण असे उपक्रम घेतले. वस्तीतील महिलांना विक्रीकरता संधी मिळावी म्हणून प्रबोधिनी प्रशालेच्या पाचवी प्रवेश परीक्षेच्या वेळी खाद्य पदार्थांची विक्री केली. वर्षभराच्या वाळवणाच्या पदार्थांच्या विक्रीसाठी रामनवमीला डहाणूकर कॉलनी मध्ये तर नंतर एकदा सरिता नगरी येथे विक्री उपक्रम झाला. दोन्ही ठिकाणी प्रतिसाद चांगला मिळाला. आता परत भेटून ग्राहक पक्के करणे असे पुढचे उद्दिष्ट असेल.

यावर्षी सावित्री दलाची निगडी-साळुंब्रे येथे सहल नेली होती. तसेच तीन वस्त्यांमध्ये महिला मेळावे झाले.

### ◆ सेवा मदतकार्य

२०१८ मध्ये पुण्यात दांडेकर वस्तीत कॅनाल फुटून पाणी शिरल्यामुळे नुकसान झाले. तर पाटील इस्टेट वस्तीमध्ये आग लागून नुकसान झाले. तर काशीवाडी येथे काही घरांचे नुकसान झाले. वरील तिन्ही वस्त्यांमध्ये आपल्या विभागाचे काम चालू आहे. आपल्या एखाद्या सुहृदाला संकटात ज्याप्रमाणे आपण मदत करतो, त्याच भावनेने या तिन्ही ठिकाणी आपण त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला.

दांडेकर वस्तीमध्ये घटना घडल्यानंतर दहा दिवसांनी वस्तीभेट करून, विजयादशमीला वही पूजन केले व १०० मुलांना वह्या वाटल्या. दप्तरे हवी असलेल्या मुलांची यादी बनवून त्यांना आपल्या आईसमवेत प्रबोधिनीमध्ये बोलावले. आपल्या अपेक्षेपेक्षा खूपच जास्त कुटुंबे आल्यामुळे तिथेच त्यांचे अर्ज भरून घेतले. उरलेले अर्ज वस्तीमध्ये जाऊन भरले. पाटील इस्टेट मधील दुर्घटनेत, घटना घडल्यानंतर काही दिवसांनी वस्तीभेट केली. स्पर्धा परीक्षेचे दहा विद्यार्थी व विभागातील दहा कार्यकर्त्या अशा मोठ्या गटाने तीन दिवसांत माहिती संकलन पूर्ण केले. हीच पद्धत काशीवाडी येथेही वापरली.

माहिती गोळा करून झाल्यानंतर प्रबोधिनी परिवारातील लोकांना आवाहन केले. आवश्यक त्या वस्तूंच्या मदतीचा ओघ सुरू झाला.

प्रत्येक कुटुंबासाठी एक पोते तयार केले व त्यावर त्यांचे नाव व नंबर लिहून अर्जातील वयाप्रमाणे कपडे व भांडी देण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक कुटुंबाला आठ किलो किराणा माल दिला. पाटील इस्टेट मधील लोकांना गरम पांघरुणे दिली व जळितग्रस्त लोकांना दोन किलोचे एक व अर्ध्या किलोचे एक अशी दोन पातेली दिली. वस्तू वाटपाच्या करताना सर्वेक्षणाच्या यादीमधील नाव तपासले व ओळखपत्र जमा करून घेतले.

दांडेकर वस्तीच्या दुसऱ्या टप्प्यातील वाटपाच्या वेळी सावित्री दलाचे उपक्रम सांगितले व स्नेहमेळाव्याचे निमंत्रण दिले. पाटील इस्टेटच्या वाटपाच्या वेळी स्पर्धा परीक्षा विभागाच्या विद्यार्थ्यांनी शासकीय योजना समजावून सांगितल्या. अल्पोपाहार व माहितीची देवाण घेवाण झाल्यावर त्यांच्या नावाचे पोते सही घेऊन त्यांना सुपूर्त केले. चार महिने सुरू असणाऱ्या या कामात महिला व युवती मिळून वीस जणींनी स्थिरपणे काम केले.

वस्तू वाटपाच्या वेळी सर्वच वस्तीतील लोकांनी कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की तुम्ही आम्हाला खूप प्रेमाने, आदराने वागवले, आम्हाला खाऊ दिला, संकटाच्या वेळी गरजेच्या वस्तू दिल्या, त्याचबरोबर आम्हाला शासकीय योजना समजावून सांगितल्या त्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

ही कृतज्ञता कोणा एका विभागाची नसून ज्ञान प्रबोधिनी परिवारातील सर्वांसाठी तसेच समाजाप्रतीही आहे. ही कृतज्ञता आपणा सर्वांपर्यंत पोहोचवते आहे.

▲▲▲


## ज्ञान प्रबोधिनी... सर्वांची... सर्वांसाठी

**ज्ञान प्रबोधिनीच्या पुण्यातील विभागांद्वारा पदवीपूर्व व पदव्युत्तर युवक-युवतींसाठी तसेच प्रौढ गटासाठी होणारे उपक्रम**

१) Preparatory & Foundation Courses - पदवीपूर्व गटासाठी ४-४ महिन्यांचे, शनिवार - रविवार चालणारे वर्ग (प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रात नेतृत्व करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी)-द्वारा नेतृत्व संवर्धन केंद्र- २४२०७१७९

२) UPSC, परीक्षा पूर्वतयारी वर्ग - द्वारा स्पर्धा परीक्षा केंद्र - २४२०७१३४

३) पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका- २४२०७१४४

४) 'मैत्र' समुपदेशन केंद्र - द्वारा संवादिनी - ९९७०१५३२३७

५) अभ्यासगट, गणेशोत्सव, विक्री उपक्रम, विज्ञान दल, कला दल, नागरी वस्ती व ग्रामीण प्रज्ञा कार्यक्रमात सहभाग - द्वारा युवक विभाग- नचिकेत - ७०३०५५९५०६, युवती विभाग - मेधाविनी - ९४२३१६२१३४

**पुण्याव्यतिरिक्त ज्ञान प्रबोधिनीच्या खालील केंद्र-उपकेंद्र-विस्तारकेंद्रांवरही विविध उपक्रम योजले जातात.**

निगडी - ०२०-२७६५४३८०, साळुंब्रे (जि. पुणे) - ०२११४-२८७२९०,

सोलापूर - ०२१७-२३१७७८२, हराळी (जि.उस्मानाबाद) - ८८८८०२६३८,

अंबाजोगाई (जि. बीड)- ९४२१३७३५३६, बोरीवली (मुंबई)- ९८६७३८३०३८, डोंबिवली (जि. ठाणे)-९९३०१०२९९८

# १५. युवक विभाग, पुणे

### ◆ युवक विभाग - संख्यात्मक आढावा

युवक विभागाचे सध्या दोन महत्त्वाचे उपविभाग आहेत - शालेय दले व महाविद्यालयीन दले. त्यांचा संख्यात्मक आढावा -

**शालेय दले**

| क्र. | दलाचे नाव व भागाचे नाव | सरासरी उपस्थिती / एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | भा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल (प्रशाला) सदाशिव पेठ | ८० / १२० |
| २. | स्वातंत्र्यवीर सावरकर दल (प्रशाला) सदाशिव पेठ | ९५ / १२० |
| ३. | छत्रपती शिवाजी दल, सहकारनगर | २० / ५० |
| ४. | क्रांतिवीर चाफेकर दल, कर्वेनगर | २२ / ६० |
| ५. | लक्ष्मणराव किर्लोस्कर दल, वारजे | २० / ५० |
| ६. | डॉ. वर्घीस कुरीअन दल, धायरी | २० / ४० |
| ७. | महात्मा फुले दल, सांगवी | १५ / ५० |
| ८. | आर्य चाणक्य दल, गोखलेनगर | १५ / ५० |
| ९. | सरदार वल्लभभाई पटेल दल, (निलज्योती) गोखलेनगर | २० / ४५ |
| १०. | डॉ. मेघनाद साहा दल (विज्ञान दल), सदाशिव पेठ | १२ / ३२ |
| ११. | धर्मवीर संभाजी दल, शुक्रवार पेठ | २० / १०० |
| १२. | फील्डमार्शल सॅम माणेकशॉ दल, बिबवेवाडी | १८ / ४५ |
| १३. | राजर्षी शाहू महाराज दल, हडपसर | १५ / ५० |
| १४. | गांधीवस्ती विस्तार दल, शिवाजीनगर | ८ / १८ |
| १५. | नांदेड सिटी विस्तार दल, सिंहगड रस्ता | १० / २० |
| | **एकूण** | **३९० / ८५०** |

**महाविद्यालयीन दले**

| क्र. | दलाचे नाव व भागाचे नाव | सरासरी उपस्थिती / एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | चंद्रशेखर आझाद दल, कर्वेनगर-कोथरूड | २० / १२० |
| २. | डॉ. विक्रम साराभाई (विज्ञान) दल, पुणे शहर/सदाशिव पेठ | १५ / ८० |
| ३. | नेताजी सुभाषचंद्र बोस दल, पुणे शहर/सदाशिव पेठ | २० / ७० |
| ४. | लोकमान्य टिळक दल, सहकारनगर | ५ / २० |
| ५. | चाणक्य दल (युवक गट), गोखलेनगर | ८ / २५ |
| ६. | शहीद भगतसिंह दल, पुणे शहर/सदाशिव पेठ | १२ / ५० |

महाविद्यालयीन युवकांची दले साप्ताहिक चालतात व अनेक वेळा वेगवेगळे युवक येत असतात. यावर्षी गणेशोत्सवात ३००+ युवक अनंतचतुर्दशीच्या एकाच दिवशी सहभागी झाले होते !

### ◆ वर्षारंभ

दि. १ जुलै रोजी युवक विभागाचा वर्षारंभ व प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम झाला. वर्षारंभाच्या कार्यक्रमात मार्गदर्शकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या वर्षी सदाशिव पेठ, कर्वेनगर, सहकारनगर, गोखलेनगर, गांधी वस्ती, पिंपळे गुरव, धायरी, वारजे, बिबवेवाडी, हडपसर, खराडी, सिंहगड रस्ता व कात्रज-कोंढवा अशा तेरा भागांमध्ये मिळून शालेय वयोगटासाठीची एकोणिस दले उभी करण्याचे नियोजन होते. शालेय व महाविद्यालयीन दलांवर मिळून सध्या बारा प्रतोद, दहा साहाय्यक प्रतोद, ३४ मार्गदर्शक, २८ दलप्रतिनिधी व तेरा गटप्रमुखांची नियुक्ती झाली.

### ◆ गणेशोत्सव

गणेशोत्सव हा शालेय आणि महाविद्यालयीन गटांचा एकत्रित असा महत्त्वाचा उपक्रम. वादन, बर्चीनृत्य, प्राणप्रतिष्ठापना, व्याख्याने इ. माध्यमांमधून ५००+ शालेय विद्यार्थी, ३००+ युवक, ५०+ मार्गदर्शक सहभागी झाले. उत्सवाच्या दहा दिवसांमध्ये गोखलेनगर, सेनादत्त पोलीस चौकी, सहकारनगर, अरण्येश्वर, बिबवेवाडी, नारायण पेठ, सांगवी, कोथरूड, कर्वेनगर, हडपसर, धायरी, काशीवाडी, गांधीवस्ती, मध्यवस्तीतील पेठा, कोंढवा, जांभूळवाडी अशा विविध ठिकाणी बर्चीनृत्याची २०+ प्रात्यक्षिके व गणेशचतुर्थी व अनंतचतुर्दशीच्या दिवशी एकूण मिळून नऊ मिरवणुका झाल्या.

सावरकर दलावरील युवकांनी 'गणेशोत्सव मेळे' ही संकल्पना पुन्हा वास्तवात आणण्याचा प्रयत्न केला. विविध सोसायट्या व मंडळे येथे जाऊन इ. ५वी ते ७वी या वयोगटातील ९० किशोर पद्य, नाटुकली अशा प्रकारच्या माध्यमातून मेळे भरवून गणेशोत्सवात उत्साहाने सहभागी झाले. या दलावरील एका पथकाने गणेशोत्सव पूजा साहित्य विक्री असा उपक्रम आखून तोही यशस्वी करून दाखवला.

या वर्षी तिसरा पथके मेळावा दि. २ सप्टें रोजी, रमणबाग प्रशालेमध्ये झाला. बर्चीनृत्य करणारा गट, ध्वजधारी गट, वादकगट असे सर्व मिळून एकूण ५८ पथकांतील सुमारे ८०० युवक सहभागी होते. एकमेकांचे सामाजिक काम समजून घेणे, सामूहिक बर्चीनृत्य करणे असा कार्यक्रम झाला. तसेच या वर्षी तिसरा मंडळे मेळावा दि. १९ ऑगस्ट रोजी ज्ञान प्रबोधिनी भवनात झाला. एकूण ३१ मंडळे मेळाव्यात सहभागी झाली होती. गणेशोत्सव मंडळांनी चालवलेल्या सामाजिक कामाचे आदानप्रदान असा हेतू याही मेळाव्याचा होता.

याशिवाय शालेय व महाविद्यालयीन विज्ञान दलांनी मिळून १८ ते २१ सप्टें. ह्या काळात वास्तूत '१४ वे विज्ञान प्रदर्शन भरवले. प्रदर्शनाचा विषय 'उष्णता' हा होता. प्रदर्शनात ४०+ युवक सहभागी झाले आणि २७ महाविद्यालयीन स्तरावरच्या प्रयोगांचे प्रदर्शनात सादरीकरण झाले. ६००० हून अधिक प्रेक्षकांनी हे प्रदर्शन अनुभवले. ह्याव्यतिरिक्त वास्तूबाहेर कोथरूड आणि गोखलेनगर मध्ये तीन ठिकाणी अशी प्रदर्शने घेण्यात आली. त्यांनाही चांगला प्रतिसाद लाभला.

### ◆ प्रजासत्ताक दिन ध्वजवंदन

सर्व महाविद्यालयीन दलांनी बाहेर पडून समाजात उतरून ध्वजवंदन घडवून आणावे अशी कल्पना मा. संचालकांनी मांडली होती. त्याला अनुसरून सर्व महाविद्यालयीन दलांनी मिळून पुणे आणि आसपासच्या परिसरात २५ ठिकाणी ध्वजवंदन घडवून आणले. यात एकूण ४५ युवक सहभागी झाले होते. तसेच ३० शालेय मार्गदर्शकांनी आपापल्या दलांच्या भागात ज्या ठिकाणी ध्वजवंदन होत नाही अशा ठिकाणी आवर्जून नागरिकांना सहभागी करून घेत ध्वजारोहण घडवून आणले. एकूण मिळून ५०० पेक्षा जास्त नागरिक या कार्यक्रमांमध्ये उपस्थित होते.

## शालेय दले

शालेय दलांवर इ. ५वी ते १०वी मधील विद्यार्थी १२ भागांमधील एकूण १५ दलांमध्ये सहभागी होतात. दैनंदिन दलांमध्ये एखाद्या मैदानावर सं. ६ ते ८ या वेळात पुण्यातील विविध शाळांमध्ये शिकणारे कुमार, किशोर आणि दल घेणारे दादा खेळासाठी जमतात. व्यायाम, खेळ, संचलन असा सर्वसाधारण रोजचा कार्यक्रम असतो. एक दोन आठवड्यांमध्ये एखाद्या विषयावर प्रासंगिक घेतात, पद्ये शिकवली जातात. सर्व दलांवर प्रासंगिक अभ्यासिका होते. मुलांच्या पालकांशी दादा संवाद साधत असतात. इ. ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचे विद्याव्रत हीच मध्यवर्ती संकल्पना आहे.

### ◆ युवक संघटन सचिव भेटी

वर्षभरात युवक संघटन सचिव मा. आशुतोष बारमुख यांनी शिवाजी दल, संभाजी दल, कुरियन दल, मेघनाद साहा दल, स्वातंत्र्यवीर सावरकर दल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल यांना भेटी दिल्या. दलाचे नियोजन आणि दलावर भेडसावणारे प्रश्न कसे सोडवायचे यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

### ◆ मार्गदर्शक प्रशिक्षण

गेले वर्षभर दर शनिवारी साय. ५.३० ते ९ या वेळामध्ये मार्गदर्शक दल चालू होते. क्रीडा भागात कबड्डी, व्हॉलीबॉल, फुटबॉल असे खेळ झाले. तर बैठकीच्या भागामध्ये पद्य, उपासना, अभंग निरुपण, पाकिस्तान निवडणुका, पुलवामा हल्ल्याच्या निमित्ताने काश्मीर प्रश्न अशी प्रासंगिक सत्रे तर राष्ट्रीय एकात्मता, प्रबोधिनीच्या इतिहासातून प्रबोधिनीची उद्दिष्टे समजून घेणे अशा सत्रांच्या मालिका झाल्या. कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे, वा. अनघा लवळेकर, वा. अजित कानिटकर, प्रा. प्रशांत दिवेकर, आशुतोषदादा बारमुख, नचिकेतदादा नित्सुरे यांची सत्रे झाली. दुर्गभ्रमण सहली नियोजन व घ्यायची काळजी यावर गणेश डांगी आणि नितीश नरखेडकर यांनी सत्रं घेतली. याबरोबरच उपक्रमांचे नियोजन व शोधबोध देखील दलावर झाले.

### हिवाळी शिबिरे

शालेय दलांवरील विद्यार्थ्यांची दि. १६ डिसें. ते १ जाने. दरम्यान खालील हिवाळी शिबिरे झाली.

| प्रकार | ठिकाण | मुले | मार्गदर्शक |
|---|---|---|---|
| किशोर गंमत शिबिर (५वी ते ७वी) | कर्वेनगर | ७१ | ८ |
| ग्रामीण परिचय शिबिर (८वी ते १०वी) | कोंढवली, वेल्हे | ५० | ८ |
| शहर परिचय शिबिर (७वी) | पुणे शहर | ३५ | ६ |
| क्रीडा शिबिर (५वी, ६वी) | ज्ञान प्रबोधिनी भवन | ७० | ७ |
| साहस शिबिर (८वी ते १०वी) | केळद, वेल्हे | ४७ | ९ |
| अभ्यास शिबिर (१०वी) | ज्ञान प्रबोधिनी भवन | ३७ | ४ |
| | | ३१० | ४२ |

### ◆ अभ्यास शिबिरे

दि. १६-१७ मार्चला शालेय मार्गदर्शकांचे 'विवेकानंद अभ्यास' शिबिर झाले. पूर्वतयारी म्हणून 'सारे विचार प्रवाह आमचेच' या पुस्तिकेचे वाचन आणि चर्चा झाली. शिबिरात विवेकानंदांच्या आधीची भारताची पार्श्वभूमी, विवेकानंद चरित्र, अधिमित्र विवेकानंद अशी सत्रे झाली. तसेच विवेकानंदांच्या भाषणांचे वाचन व चर्चा झाली.

### ◆ कुमार आंतरदलीय सामने

रविवार, दि.१७ फेब्रुवारी रोजी पुणे, निगडी आणि हराळी येथील कुमार विद्यार्थ्यांसाठी आंतरदलीय सामने आयोजित केले होते. हराळीतील ३८, निगडीतील ३५ आणि पुण्यातील १७१ असे एकूण २४४ विद्यार्थी व त्यांचे सुमारे ४५ मार्गदर्शक सामन्यांमध्ये सहभागी झाले. हँडबॉल आणि कबड्डी या दोन्ही खेळांचा सराव साधारण दीड महिना प्रत्येक दलावर चालू होता. या दोन्ही खेळांचे मिळून ५६ सामने झाले. तीन केंद्रांचे विद्यार्थी एकत्र असल्याने स्पर्धेबरोबर एकत्र संचलन, पद्य म्हणणे आणि सर्वांनी मिळून सामूहिक जोर मारणे असे कार्यक्रम योजले. स्वप्नीलदादा इंदापूरकरने सामूहिक पराक्रम-इतिहासातील उदाहरणे यावर प्रासंगिक केले. स. ८ ते ४ झालेल्या सामन्यांचा बक्षीस वितरणाने समारोप झाला.

### ◆ किशोर आंतरदलीय सामने

दि. २९ एप्रिल रोजी किशोर दलांचे आंतरदलीय सामने झाले. एकूण १० दलांमधील ३२५+ युवक व त्यांचे ३० दादा यांचे तीपन सांघिक खेळांचे चुरशीचे सामने आणि कडक शिस्तीत संचलन स्पर्धा झाली. विजेत्यांना बक्षीस वितरण केल्यानंतर यापुढे यशाकडे हे पद्य म्हणून कार्यक्रमाचा समारोप झाला.

## महाविद्यालयीन दले

या दलांवर ११वी पासून ते काही प्रमाणात शिक्षण संपवून व्यवसाय वा नोकरी करणारे युवक सामान्यतः सप्ताहातून एकदा येतात. त्यांच्यासाठी काही समवयस्क व काही वयाने मोठे युवक दादा म्हणून काम करतात. पुढील उपक्रमांद्वारा महाविद्यालयीन युवकांचे संघटन केले जाते -

### ◆ व्यक्तिमत्त्व विकसन व महाविद्यालयीन मार्गदर्शक प्रशिक्षण उपक्रम

१. या शैक्षणिक वर्षात आपल्या पदवीचे शिक्षण पूर्ण करून विविध ठिकाणी नोकरी किंवा शिक्षण यासाठी जाणाऱ्या युवकांसाठी Academic-Career-Life Goals या आशयाचे शिबिर २४ जून रोजी झाले. त्याची मांडणी आपण दल व प्रबोधिनीशी कसे जोडून राहू शकतो या हेतूने झाली. शिबिरात दोन दिवसांत एकूण २०-२५ युवक सहभागी झाले.

२. सर्व महाविद्यालयीन मार्गदर्शकांसाठी संवाद रचना, सकारात्मक निवेदन, Visualization आणि Delegation या विषयांची प्रशिक्षण कार्यशाळा दि. १६ व १७ नोव्हें. रोजी घेण्यात आली. यात २३ सदस्य सहभागी झाले. गणेशोत्सवातील सहभागातील उणीवांचा अभ्यास करून ही सत्रे आखण्यात आली होती.

३. अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षाला असणाऱ्या युवकांसाठी प्रकल्प विषयक सत्रे घेण्यात आली. यात ८ गटांमध्ये २५ हून अधिक युवक सहभागी झाले. सत्रांच्या शेवटी, दि. १२ जाने. आणि दि. ९ फेब्रु. रोजी, सहभागी गटांनी त्यांचे प्रकल्प आपले सहपाठी आणि त्या-त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींसमोर सादर केले.

४. १० फेब्रु. रोजी महाविद्यालयीन दलांचे आंतरदलीय सामने पार पडले. तेव्हा फुटबॉल, कबड्डी आणि क्रिकेट ह्या खेळांचे सामने झाले. अनुक्रमे ६, ५, ८ एवढे संघ आणि त्या माध्यमातून ७० युवक सहभागी झाले.

५. नियमित मार्गदर्शक बैठक व सहविचार बैठकीतून महाविद्यालयीन मार्गदर्शकांचे नियमितपणे प्रशिक्षण केले गेले. मा. संचालक, मा. कार्यवाह यांच्यासमवेत प्रासंगिक बैठका झाल्या.

### ◆ सामाजिक जाणीवेचा विकास व युवाशक्तीचे उपयोजन

१. मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांत, वेल्हे-भोर भागांतील डोपेखिंड, पिंपरी आणि गेळगाणे, साळूंगण या गावांमध्ये १० शनिवार-रविवारांमध्ये, १३० युवकांनी सुमारे ५५ मनुष्य-दिवस श्रमदान, सर्वेक्षण आणि संयोजन अशा प्रकारचे काम केले.

२. दिवाळीत लो. टिळक दलाने सहकारनगर भागात १९ गटांच्या माध्यमातून अंदाजे १००+ स्पर्धकांसाठी किल्ले स्पर्धा घेतली.

३. **निवासी विज्ञान शिबिरे :** ७ वे व ८ वे निवासी विज्ञान शिबिर अनुक्रमे दि. २८ मे ते १ जून व दि. २२ ते २५ डिसेंबर या दरम्यान संपन्न झाले. दोन्ही शिबिरात भाग १ मध्ये अनुक्रमे ३५ व ३७ आणि भाग २ मध्ये १० व ७ मुले सहभागी झाली. दोन्ही शिबिरांमध्ये मिळून २५ पेक्षा जास्त महाविद्यालयीन युवकांनी प्रशिक्षण दिले. सर्वसामान्य घटनांमधील कारकांमधील (चलांमधील) परस्परसंबंध (Correlation) शोधणे असा आशय भाग १ मध्ये असतो तर या कारकांमधील कार्यकारणभाव (Causal Mechanism) शोधणे ही प्रक्रिया भाग २ मध्ये होते.

### ◆ विषय परिचय शिबिरे

एखाद्या विषयाची अधिकाधिक बाजूंनी ओळख करून घेणे हे मर्यादित वेळात शक्य आहे. अभ्यासशिबिरांसाठी लागणारा वेळ पाहता अशी पुष्कळ छोटी विषयपरिचय शिबिरे यापुढच्या काळात आयोजित होतील. अशा शिबिरांचा थोडक्यात आढावा (कंसात उपस्थिती) -

आझाद आणि टिळक दल यांनी विवेकानंद अभ्यास शिबिर (२०), टिळक दलाने शिवचरित्र परिचय शिबिर (२५),
बोस दलाने स्वातंत्र्यसंग्राम अभ्यास शिबिर (२०),
चाणक्य दलाच्या युवक गटाने नेहरू अभ्यास शिबिर (१५),
बोस आणि साराभाई दलांनी निवडणुका अभ्यास शिबिर (२०),
आणि साराभाई दलाने Mathematical Modelling अभ्यास शिबिर (१०) अशी शिबिरे आपापल्या दलांवर घेतली.

मुख्यत: युवक विभागातील मोठ्या दादांनी आढावापर सत्र घेणे, काही वाचन घडवून आणणे आणि मग एखाद- दुसरे कृतिपर सत्र घेणे अशी या शिबिरांची रचना होती.

### ◆ अभ्यासदौरे

या वर्षी एकूण सात दौऱ्यांमध्ये मिळून साराभाई, बोस व आझाद दलांवरील ८३ युवक दोन महिन्यांमध्ये - छत्तीसगड, आंध्रप्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, सिक्कीम, आसाम, नागालँड, मणिपूर, मेघालय, उत्तराखंड व नवी दिल्ली अशा १२ राज्यांमध्ये गेले होते. प्रवासदरम्यान आजूबाजूचे लोक, बदलत जाणाऱ्या भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे, आदिवासी संस्कृतींचा अभ्यास आणि त्यांचे जीवन समजून घेणे, सरकारी अधिकाऱ्यांना भेटून सरकारच्या कामाचे स्वरूप, महत्त्व आणि स्तर समजावून घेणे आणि दुर्गम भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव समजावून घेणे अशा अनेक प्रकारच्या अनुभवांचे शिक्षण दौऱ्यांमध्ये सहभागी युवकांना मिळाले. छत्तीसगडमध्ये पुढील काळात प्रबोधिनीचे संपर्क केंद्र उभे राहावे या हेतूने पायाभरणी झाली, तर आसाममध्ये विवेकानंद केंद्राबरोबरचे काम नवीन पातळीवर गेले. सर्वच दौऱ्यांमध्ये देश नुसता पाहण्यासाठी न जाता, काहीवेळा शिबिरे घेण्याचाही अनुभव युवकांनी घेतला. त्याने प्रबोधिनीचे त्या त्या संस्थांशी असलेले संबंध दृढ होण्यात मदत झाली.

### ◆ विक्री उपक्रम

**१) मूर्ती विक्री :** बोस दलातील युवकांनी २०० गणेशमूर्तींची विक्री करून एकूण १,३८,००० एवढ्या रकमेची उलाढाल केली.

**२) कंदील विक्री :** चंद्रशेखर आझाद दलातील २० युवकांनी रू. १,८०,००० इतकी उलाढाल असणारी कंदील विक्री केली.

▲▲▲

# १६. युवती विभाग

◆ **विविध केंद्रे युवती - गोवा अभ्यास सहल**

दि. ४ ते ९ मे या कालावधीत प्रबोधिनीच्या पुणे, निगडी, सोलापूर, हराळी आणि वेल्हे या पाच केंद्रांवरील अठरा युवतींची अभ्यास सहल गोवा इथे झाली. किशोरी आणि युवती गटावर काम करणाऱ्या मार्गदर्शिका व विभागप्रमुख यामध्ये सहभागी झाल्या होत्या. विविध ठिकाणी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची ओळख होणे, अनुभवांविषयी देवाण-घेवाण होणे, एकत्र कामाच्या संधी दिसणे आणि त्यातून चालू काम आणखी मोठे करायची प्रेरणा मिळवणे, या हेतूने हा गट एकत्र जमला होता. दि. ४ मे रोजी मा. संचालकांबरोबर सर्व गटाची बैठक झाली. यामध्ये संचालकांनी सहलीचा उद्देश, युवती संघटन मुख्य आणि त्यातून होत जाणारे सहभागी सदस्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन, तसेच 'स्व'च्या पलीकडचा विचार याविषयी सविस्तर मांडणी केली. या सहलीत गोव्यातल्या भेटींसोबतच विविध विषयांवर गटात वाचन, चर्चा व्हाव्यात असे नियोजन केले होते. सर्वसाधारण प्रबोधिनीपण, प्रबोधिनीने स्वीकारलेले चार आदर्श राष्ट्रपुरुष, युवतींच्या पथकांना ज्यांची नावे दिली जातात अशा आदर्श स्त्रिया, हिंदुत्व आणि भारतीयत्व या संकल्पना, उत्तरदायी कार्यकर्ता म्हणजे काय?, ज्ञान प्रबोधिनीच्या प्रार्थनेचा अर्थ अशा विषयांवर चर्चा झाली. 'जिज्ञासापूर्ती' या मा. संचालकांच्या प्रश्नोत्तररूप चिंतन पुस्तिकेत वरील विषयांसंदर्भात असलेल्या लेखनाचे वाचन झाले. तसेच गौरी कापरे, प्रतिभा स्वामी, अस्मिता बारसावडे आणि अनघा देशपांडे या ज्येष्ठ युवतींनी त्यांना जाणवलेले स्वतःच्या कामातले प्रबोधिनीपण आणि त्यांचे अन्य संस्थांमधले आणि प्रबोधिनीतल्या वेगवेगळ्या विभागांमधले कामाचे अनुभव, याविषयी गटासोबत संवाद साधला. ही अनुभवकथने सर्व गटासाठी प्रेरणादायी आणि आपण आत्ता जे काम करतो आहोत, ते का व कसे करतो आहोत यावर विचार करायला लावणारी ठरली. एका सत्रामध्ये सर्वांनी आपण करत असलेले काम आणखी दहा वर्षांनी कसे असेल याविषयीची आपली स्वप्ने गटात सगळ्यांना सांगितली आणि अन्य सर्वांनी ती स्वप्ने पूर्ण करण्यात आपला सहभाग कसा असेल असा प्रतिसाद दिला.

दि. ५ ते ८ मे या कालावधीत गोव्यामध्ये डॉ. दत्ताराम देसाई (सामाजिक कार्यकर्ते), श्री. रमेश तवडकर (माजी कृषी व क्रीडामंत्री), श्री. दत्तप्रसाद शिरसाट (वरिष्ठ डेप्युटी अकाऊंटंट जनरल, गोवा), श्री. जितेंद्र आमशेकर (शिक्षक), श्री. चिन्मय आमशेकर (संस्कृत भारतीचे कार्यकर्ते) अशा व्यक्तीभेटी आणि राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्था (श्री. गोविंद रानडे, वरिष्ठ शास्त्रज्ञ), मातृछाया मुलींसाठीचा अनाथाश्रम (कालिंदीताई जोशी, कार्यवाह) व पोर्ट ट्रस्ट (श्री. प्रदीप बांधेकर, साहा. सचिव मानव संसाधन विभाग व श्री. विष्णू मुरुडकर) या संस्था भेटी झाल्या. या शिवाय गोव्यातील नऊ परिचितांकडे गटशः गृहभेटी झाल्या.

या सहलीतून वर उल्लेखलेला हेतू नक्कीच साध्य झाला. सहलीनंतरच्या वर्षभरात या युवतींनी अन्य केंद्रांवरच्या युवती विभागाच्या कार्यक्रमांमध्ये आवर्जून प्रासंगिक सहभाग घेतला. सर्व केंद्रांवर चालणाऱ्या युवती संघटनाच्या कामाचा एकत्रित विचार होण्याच्या दृष्टीने निवडक गटाची बैठक सुरू करण्यापर्यंतचा टप्पा या सहलीच्या निमित्ताने आणि नंतर वर्षभर झालेल्या अनौपचारिक संपर्कातून गाठता आला.

◆ **युवती दलांचे नामकरण**

युवतींच्या दलांना प्रेरणादायी स्त्रियांची नावे द्यायला हवीत याविषयी सहविचार समितीत चर्चा झाली आणि त्यानुसार पुढीलप्रमाणे नावे निश्चित करण्यात आली. (पूर्वीची नावे सध्या वापरायचा पायंडा नव्हता; आता परत नव्याने नावे वापरली जाऊ लागली आहेत.)

▷ प्रशालेय युवती (इ. ५वी ते ७वी) : कमलाबाई सोहोनी दल

▷ प्रशालेय युवती (इ. ८वी ते १०वी) : कल्पना चावला दल

▷ महाविद्यालयीन युवती (इ. ११वी ते पदवीपूर्व) : अहिल्याबाई होळकर दल

◆ **प्रशालेय दले**

दरवर्षीप्रमाणे कमलाबाई सोहोनी दल व कल्पना चावला दलांच्या समूहगुण व नेतृत्वगुण विकसनासाठी वर्षभर नियमित दैनंदिन क्रीडादल व प्रासंगिक अभ्यासदल घेण्यात आले. याअंतर्गत आठवड्यातील चार दिवस विविध खेळांचे प्रशिक्षण आणि साप्ताहिक पथकशः दल तसेच वर्गबैठकी व अन्य काही उपक्रमांचे आयोजन केले. दलांवरील काही उपक्रम पुढीलप्रमाणे -

◆ **वर्गशः गडसहली**

▷ कल्पना चावला दल : इ. १०वी राजगड (निवासी), इ. ९वी तोरणा (निवासी), इ. ८वी सुधागड

▷ कमलाबाई सोहोनी दल : इ. ७वी तिकोना, इ. ६वी लोहगड, इ. ५वी शिवनेरी

◆ **पथकशः उपक्रम - किल्ले स्पर्धा**

दिवाळीच्या कालावधीत कमलाबाई सोहोनी दलाच्या इ. ६वी

च्या वर्गाची पथकशः व इ. ७वी च्या वर्गाची पथकशः अशी आठ गटांमध्ये किल्ले स्पर्धा झाली. गटांनी केलेल्या किल्ल्यांचे परीक्षण कल्पकता, सहभाग, सुबकता, सजावट, व निवेदन या निकषांवर झाले. यानिमित्त सुट्टीतही घरोघरी जमून चांगले गटकार्य झाले आणि ज्या गडांवर प्रत्यक्ष भ्रमण होते व महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाच्या गडांचा अजून परिचय झाला.

### ◆ अभ्यास दौरे

मे २०१८ मध्ये ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतून इ. दहावीची परीक्षा झालेल्या युवतींचे कर्नाटक आणि मध्यप्रदेश येथे दौरे आयोजित केले होते. यापूर्वी २०१६ साली या दोन्ही ठिकाणी दौरे झाले होते. यावेळच्या दौऱ्यांच्या दरम्यान आधीच्या दौऱ्यांनुसारच नियोजन ठेवले होते, जेणेकरून परत त्याच ठिकाणी जाऊन तेथील स्नेह-संबंध वृद्धिंगत करण्याची संधी घेता येईल. त्याशिवाय त्या ठिकाणचा सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक अशा विविध आयामांनी अभ्यास करणे हा देखील या दौऱ्यांचा उद्देश होता.

कर्नाटकातील बिजापूर, बदामी, पट्टडकल, ऐहोळ व हुबळी या ठिकाणी विविध भेटी दिल्या. यातील मुख्य संस्था भेटी म्हणजे हुबळीतील देशपांडे फाऊंडेशन, अक्षयपात्र योजनेचे काम व राष्ट्रध्वज उत्पादन केंद्र. या दौऱ्यात घेतलेल्या अनुभवांनंतर आम्हाला देशसेवा म्हणजे नक्की काय करायचं आहे? काय करता येईल? अशी विद्यार्थिनींची विचार प्रक्रिया सुरू झाली.

मध्यप्रदेश दौऱ्यादरम्यान महेश्वर येथील दत्तमंदिर, सहस्रधारा, पेशवे बाजीराव प्रथम यांची समाधी, अहिल्याबाई होळकरांचा किल्ला, महेश्वरी सिल्कचा हातमाग, मंडलेश्वर येथील राम मंदिर व नर्मदा घाट, रूपमती महाल, बाजबहादूर महाल, जहाज महाल, फडके Art Gallery, कमला बाई होळकरांची छत्री, लालबाग राजवाडा, धार या गावामधील पूर्वीचे सरस्वती मंदिर पण आता जामा मस्जिद असलेली वास्तू, सराफा बाजार, इंदोर राजवाडा, व नीलकंठेश्वर मंदिर, अशा पर्यटन स्थळांना, तसेच अग्निहोत्र संशोधन संस्था, Jimmy McGilligan Sustainable Development Centre, नर्मदालय व गायत्री धाम आश्रम या संस्थांना भेटी दिल्या.

### ◆ वैचारिक सत्रे व काही प्रासंगिके

▷ इ. ५वी ते १०वी - चौथा आंतरराष्ट्रीय योग दिन - विदुलाताई शेंडे (योगोपचार तज्ज्ञ व Institute of Yoga च्या संस्थापक अशा प्रशालेच्या १९८७ सालच्या तुकडीच्या माजी विद्यार्थिनी) - विविध आसने करायची योग्य पद्धती व त्या आसनांचे महत्त्व.

▷ इ. ७वी ते १०वी - शारदोत्सव - मीराताई शेटे - सीमोल्लंघनाचे आदर्श व आदर्शांचे सीमोल्लंघन-कमलाबाई सोहोनी यांच्या उदाहरणातून.

▷ इ. ८वी - वीणाताई बेडेकर (माजी युवती संघटन सचिव) - राष्ट्र-अर्चना व्रताच्या अनुषंगाने ती सध्या मणिपूर येथे करत असलेल्या कामाबद्दल अनुभवकथन व प्रश्नोत्तरे.

### ◆ हिवाळी शिबिरे

१. कमलाबाई सोहोनी दल - क्रीडा शिबिर

या शिबिरात दरवर्षीप्रमाणे क्रीडा सत्रे, गटकार्ये, पद्यसत्र आणि वैचारिक सत्र यांचे नियोजन केले होते. नवीन पद्य शिकणे, पद्याला स्वतः चाल लावणे, पद्य सादरीकरण यातून पद्य शिकण्यासाठी मुलींना प्रोत्साहित केले. विविध व्याख्याने आणि गटचर्चा यांमधून आजूबाजूच्या परिस्थितीची जाणीव व्हावी असा प्रयत्न केला. याशिवाय विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.

२. कल्पना चावला दल - इ. ८वी-९वी, तंबू शिबिर, कुसगाव

या शिबिरात दरवर्षीप्रमाणे विविध गटकार्ये, अनुभवकथने, गटचर्चा आणि पथकशः सत्रांचे आयोजन केले होते. त्याशिवाय गटागटांत काही कृतीसत्रांची योजना केली होती. त्यामध्ये सायकल चालवून वेगवेगळ्या गावांत वेगवेगळ्या प्रश्नांचा अभ्यास करायला जाणे आणि गृहभेटी व काही कामे करणे अपेक्षित होते. आल्यावर गटागटांत घेतलेल्या अनुभवांसंबंधी गटचर्चा घेण्यात आली. या शिबिरात गावात जुळलेली नाती, सांभाळलेल्या जबाबदाऱ्या, चुलीवरचा स्वयंपाक, विहिरीतून आणलेलं पाणी, शेकोटीभोवती म्हटलेली पद्ये अशा अनेक अनुभवांनी मुली संपन्न झाल्या.

३. अभ्यास शिबिर - इ. १०वी - शालांत परीक्षेच्या तयारीसाठी.

### ◆ अन्य उपक्रम

१. **वारीतील सहभाग** - इ. ८वी व ९वी - विश्रांतवाडी ते पुणे वारी सोबत चालण्याचा अनुभव घेत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील अविभाज्य घटक असणारी वारी अनुभवली व वर्षानुवर्षे सामाजिक भेदभाव बाजूला ठेवून विठुरायाच्या ओढीने चालत जाणाऱ्या वारकऱ्यांशी संवाद साधला.

२. **गणेशोत्सव** - इ.७वी ते १०वी आणि महाविद्यालयीन गट - लेझीम, बर्चीनृत्य व साथीला वादन यांद्वारे सहभाग - सहा प्रात्यक्षिके व तीन मिरवणुका - यावर्षी नव्याने महाविद्यालयीन युवतींना जोडून घेण्यासाठी सरावापूर्वी एक प्रात्यक्षिक करण्यात आले.

३. शारदोत्सवानिमित्त भोंडला

४. दिवाळीच्या दरम्यान वास्तूत दीपोत्सवानिमित्त पद्यगायनात विविध विभागांतील अनेक सदस्यांचा सहभाग.

### प्रबोध शालेय दले

यावर्षी दोन ठिकाणी साप्ताहिक शालेय दले झाली- १. स्नेह पॅराडाईज सोसायटी, पौड रस्ता, २. ज्ञान प्रबोधिनी भवन, सदाशिव पेठ. मुख्यतः इ.५वी ते ९वी चा गट या दलांवर सहभागी होतो. कला, क्रीडा, विज्ञान, गटकार्ये या माध्यमांचा दलांच्या कार्यक्रमांत अंतर्भाव केला जातो.

▲▲▲

# १७. उद्योजकता विकास केंद्र

### ◆ उद्योजकांची आश्वासक वाटचाल

श्री. तुषार कोतवाल, याचा 'कोतवाल ग्रीन्स' हा उद्योग गेल्या तीन वर्षांमध्ये चांगला वाढत असून मोठ्या उद्योग समूहांना त्याच्या कडून वैशिष्ट्यपूर्ण कुंड्यांचा व रोपांचा पुरवठा केला जातो. श्री. रोहन पानसे व श्री. केदार शुक्ल यांनी श्री. विनय चुटके यांच्या मार्गदर्शनाखाली जो 'कोडेक्स' उद्योग सुरू केला आहे, त्याने या वर्षी रु. दोन कोटी उलाढालीचा टप्पा ओलांडला. वैद्यकीय उपकरणांच्या उत्पादनाचा व हॉस्पिटल सेवांशी संबंधित अनेक उपक्रम हा उद्योग करीत असतो. उद्योजकता विकास केंद्रात विस्तार कार्यकर्ता म्हणून काम करणारे श्री. दीपक कोतकर यांनी त्यांच्या स्वतःच्या 'सनगेट एंटरप्राईजेस प्रा. लि.' या उद्योगाची भरीव वाढ केली व ते आता पुण्याबाहेरही सौर उपकरणे बसवून देण्याचा व्यवसाय करू लागले आहेत. प्रबोधिनीच्या युवक विभागाच्या अंतर्गत युवक प्रबोधन उद्योग या उपक्रमाच्या कार्यकर्त्यांनी वेळोवेळी विभागाशी चर्चा केल्या व आपले कामकाज भरीवपणे वाढवले. श्री. सचिन सुपेकर या कार्यकर्त्याने नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसायात पदार्पण केले. ज्या नव्या उद्योजकांनी BEAM चाचणीद्वारे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज घेतला होता त्यातील काही जण नियमितपणे चर्चेसाठी व मार्गदर्शनासाठी येऊन भेटून गेले.

वर्ष १७-१८ च्या तुलनेत वृत्तांत वर्षात BEAM चाचणी देणाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन ती वार्षिक ४१ वरून ६५ वर गेली. चाचणीनंतर देण्यात येणाऱ्या तपशीलवार वृत्तांतामध्ये काही महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या व रंगीत आलेखांसह हा वृत्तांत एका आकर्षक कव्हर मधून दिला जाऊ लागला. चाचणी देणाऱ्या उमेदवारांसोबत सौ. उर्मिला दीक्षित व श्री. सुनील भावे यांनी चर्चा केली. या वार्तालापामध्ये जे मुद्दे उपस्थित झाले, त्यावर विभागाच्या मासिक बैठकीत तपशीलवार चर्चा करण्यात आली. चाचण्यांद्वारे दिसणाऱ्या क्षमता व उद्योजकतेसाठी आवश्यक असणाऱ्या आणखी काही क्षमता यावर ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या कार्यवाह वा. सुजला वाटवे यांच्या उपस्थितीत वेळोवेळी चर्चा करण्यात आली. सध्या उद्योगांमध्ये काम करीत असलेल्या व्यक्तींबरोबर आणखी वार्तालाप होण्याची गरज व्यक्त करण्यात आली. त्यावर पाठपुरावा चालू आहे. प्रज्ञा मानस संशोधिकेबरोबर व अभिक्षमता मापन व करिअर सल्ला विभागासह दर महिना एकत्रित नियोजनाची बैठक नियमितपणे घेण्यात आली.

सौर शक्तीच्या वापरासंबंधी जे कौशल्य प्रशिक्षण प्रबोधिनीत दिले जाते त्यातून तयार होणाऱ्या युवकांनी या तंत्रज्ञानाचे उद्योगात रूपांतर करावे यासाठी आर्थिक मूल्यांकनाची मांडणी करण्यात आली. LED दिव्यांची जोडणी (assembly) करून तिची विक्री, असे उद्योजक भविष्यकाळात करू शकतील असे दिसते.

### ◆ BEAM चाचणीचा प्रसार

BEAM चाचणीचा प्रसार व्हावा या उद्देशाने MCED या शासकीय संस्थेशी संपर्क साधला. त्यांच्या औरंगाबाद येथील मुख्य कार्यालयातून प्रकशित होणाऱ्या 'उद्योजक' मासिकात चाचणी विषयी एक विस्तृत लेख मार्च १९ मध्ये प्रकाशित करण्यात आला. त्यामुळे परगावच्या तरुणांनीसुद्धा केंद्राकडे विचारणा करण्यास सुरुवात केली आहे.

ऑक्टोबरमध्ये JSPM कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी श्री. कोतकर यांचे व्याख्यान झाले. त्यांचे श्री. गजानन खैरनार यांनी पाठपुराव्याचे आश्वासन दिले.

नोव्हेंबर महिन्यामध्ये सन २०००च्या सुमारास प्रशालेतून उत्तीर्ण झालेल्या व आता नवउद्योजक म्हणून काम करणाऱ्या बारा उद्योजकांची एक बैठक घेण्यात आली. उद्योजकता विकास केंद्रातर्फे ज्येष्ठ माजी विद्यार्थी उद्योजकांचे या नवउद्योजकांना मार्गदर्शन मिळण्यासंबंधी उपयोगी चर्चा झाली. प्रा. विवेक पोंक्षे यांनी ही बैठक आवर्जून बोलाविली होती.

STARS FORUM यांच्या वतीने व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे वार्षिक अधिवेशन दि. १४ व १५ डिसें. रोजी वर्धा येथे झाले. त्यात मा. कार्यवाह श्री. सुभाष देशपांडे व श्री. दीपक कोतकर उपस्थित होते. चाचणी विषयी काही संस्थांनी विशेष उत्सुकता दाखवली. वर्ध्यामधील समाजोपयोगी विज्ञान केंद्र येथील कौशल्य प्रशिक्षण आणि ग्रामसेवा मंडळ यांच्या कारखान्यास तसेच मध शुद्धीकरण केंद्रास कार्यकर्त्यांनी भेट दिली.

उद्योजकता विकास केंद्राचे facebook पेज तयार करून केंद्राची माहिती सुमारे ३३,००० नवउद्योजकांपर्यंत पाठवण्यात आली. माहिती आवडल्याचे सुमारे २००० वाचकांनी आजवर कळवले आहे.

दि. २२ व २३ जाने. रोजी एक चाचणी महोत्सव योजण्यात आला. त्यासाठी चाररंगी प्रचारपत्रके तयार करून घेण्यात आली. ती विविध संस्था आणि facebook पेज मधून प्रसृत करण्यात आली. यानिमित्ताने चाचणी शुल्कामध्ये ५०% सवलत देण्यात आली. सात विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला. दोन तुकड्यांमध्ये त्यांच्या चाचणी वृत्तांतांवर तज्ज्ञांकरवी मार्गदर्शन करण्यात आले.

दि. २२ फेब्रु. रोजी दिल्ली येथे National Institute of Small Business Development या शासकीय प्रशिक्षण केंद्रास मा. कार्यवाह श्री. सुभाष देशपांडे व श्री. अभिजित कापरे यांनी भेट दिली. चाचणीच्या वापराची शक्यता आजमावण्याच्या दृष्टीने तेथील युवा केंद्राच्या अधिकाऱ्यांशी चांगल्या भेटी झाल्या.

▲▲▲

# ✯ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र

◆ **अटल मॅरेथॉन**

विविध राज्यांमधून अटल मॅरेथॉन मध्ये जिंकलेल्या पाच गटांचा दि. २५ ते २९ जून रोजी बेंगलोर येथील C-CAMP या संशोधन संस्थेमध्ये boot camp झाला. गुरुकुलातील 'Ayuspray' बनवणारे तीन विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक असा गट यात सहभागी झाला. दिल्ली, अंदमान निकोबार, पंजाब अशा वेगवेगळ्या ठिकाणाहून पाच गट एकत्र आले होते. प्रत्येक गटाचा त्यांच्या विषयानुसार एक एक मार्गदर्शक निवडून दिला होता व त्यानुसार प्रत्येकाने आपापल्या prototype development वर काम केले. मुलांनी आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण विविध संशोधकांसमोर केले. राष्ट्रीय स्तरावर 'आरोग्य' या विषयात हा प्रकल्प प्रथम ठरला. या प्रकल्पाला गुरुकुलाच्या अध्यापिका सौ. योगिनीताई कुलकर्णी व सौ. मेधा देवळेकर यांनी मार्गदर्शन केले होते. प्रकल्पातील जय आहेरकर, श्रावणी लिमये व श्रेया गायकवाड हे विद्यार्थी यात सहभागी झाले होते. सध्या या प्रॉडक्टचे पेटंट मिळविण्याचे काम सुरू आहे.

अटल इनोव्हेशन मिशन तर्फे आयोजित अटल इनोव्हेशन मॅरेथॉनचा यावर्षीचा निकाल जाहीर झाला. एकूण ५०,००० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. पैकी सर्वोत्तम २०० प्रकल्पांची दुसऱ्या फेरीत निवड करण्यात आली. यात विद्यालयातील चार प्रकल्पांची निवड झाली आहे. यात क्रीडाकुलच्या एका प्रकल्पाची Design प्रवर्गात, तर इंग्रजी माध्यमाच्या तीन प्रकल्पांची अनुक्रमे कचरा व्यवस्थापन, United Nations Sustainable Development Goals (food for all) व सुपरिवहन (smart mobility) या प्रवर्गात निवड झाली आहे.

## १. केंद्र स्तरावरील कार्यक्रम

▷ **गणेशोत्सव**

या वर्षी केंद्राचा गणेशोत्सव स्वच्छता विषय घेऊन नव्या कल्पनांसह सुरू झाला. महानगरपालिकेचे साहा. आयुक्त श्री. मनोज लोणकर यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा झाली. स्वच्छता हा विषय केंद्रस्थानी असलेल्या या उत्सवाला त्यांनी अतिशय आनंदाने संपूर्ण साहाय्य करण्याचे आश्वासन दिले. गणेशोत्सवाच्या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

१. या महिन्याभरात ज्ञान प्रबोधिनी पद्धतीच्या प्राणप्रतिष्ठा पोथीचे प्रशिक्षण वीस जणांनी घेतले.

२. पालकांसाठी निर्माल्यापासून खतनिर्मिती कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये सुमारे २०० पालकांनी सहभाग घेतला.

३. ज्ञान प्रबोधिनीच्या कामाविषयीचे प्रदर्शन, स्वच्छता विषयावरचे प्रदर्शन, तसेच पालक महासंघाच्या पुढाकाराने क्रांतिकारकांच्या कार्याविषयीचे प्रदर्शन अशी तीन नवीन प्रदर्शने मांडण्यात आली. या प्रदर्शनांना विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिकांनी भेट दिली.

४. दहा दिवसांत विविध विभागांचे आरतीचे कार्यक्रम झाले. त्याला जोडूनच उपस्थित विद्यार्थी व पालकांवर राष्ट्रीय एकात्मतेचा संस्कार व्हावा म्हणून 'मातृभूमि-पूजना'चे दहा कार्यक्रम केले गेले. आपापल्या देवता व धर्म-पंथ यांच्यापलीकडे आता आपण मातृभूमी हीच देवता मानून तिची पूजा केली पाहिजे असा विचार यामुळे सगळ्यांच्या मनावर ठसला. विविध धर्म-पंथांच्या व्यक्तींच्या हस्ते श्री गणेशाचे व मातृभूमीचे पूजन झाले. केंद्रातील जबाबदार व्यक्ती आणि पाहुण्यांपैकी एक अशांनी या विषयी सर्वांना मार्गदर्शन केले. त्यास किमान ५० ते २०० पालक-नागरिक उपस्थित होत. गणेशोत्सवाच्या निमित्ताने बाहेर पडलेल्या समाजावर हा संस्कार करण्याची संधी दरवर्षी घ्यावी असे वाटले.

५. स्वच्छता वर्षानिमित्त गणेशोत्सव व्याख्यानमालेमध्ये संशोधिका डॉ. नीलांगी सरदेशपांडे यांनी 'मानवाच्या उत्क्रांतीतील अस्वच्छता हा शाप' हा विषय मांडला. जगभरातील या विषयासंदर्भात होत असलेले संशोधन व धोरणांमधील बदल या पार्श्वभूमीवर भारताची स्थिती यावर त्यांनी भाष्य केले. सागरमित्र संस्थेचे प्रमुख श्री. विनोद बोधनकर यांनी अनेक धक्कादायक नकाशे, चित्रफिती यांच्या माध्यमातून प्लॅस्टिक कचऱ्याची अक्राळविक्राळ समस्या मांडली व त्यावर आपल्या स्तरावर काय उपाय करता येईल हे सांगितले. माजी प्रशासकीय अधिकारी श्री. अविनाश धर्माधिकारी यांनी स्वच्छता ही आपली वृत्ती व्हावी यासाठी काय करूया याविषयी काही अनुभवांच्या आधारे मार्गदर्शन केले. या व्याख्यानांना केंद्रातील सर्व सदस्य व इतर सुमारे २०० नागरिक उपस्थित होते.

६. शिल्पा पुणतांबेकर व सावनी दातार या भगिनींचा शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनाचा कार्यक्रम झाला. आपल्या घराण्यातील संगीताचा पिढीजात मिळालेला वारसा या दोन बहिणींनी आपल्या दमदार गायनातून आणि अभ्यासपूर्ण निवेदनातून सर्वांसमोर मांडला. अनेक बंदिशी व गीतांमधून त्यांनी भक्तिमय वातावरण निर्माण केले.

७. केंद्रातील सर्व सदस्यांनी व पालकांनी गणेशोत्सवात एकत्र स्वच्छता अभियान केले. दहा गटांमध्ये सुमारे २०० सदस्य प्राधिकरण परिसरात विविध भागात गेले. तासभर रस्ते व चौकांची स्वच्छता सगळ्यांनी मिळून केली. घराघरांमध्ये जाऊन कचरा विघटन संचांची विक्री केली. जास्तीत जास्त लोकांना स्वच्छता राखण्याचे आवाहन केले. या अनुभवातून सर्वांना भरपूर ऊर्जा मिळाली. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर यांनी सर्वांना

मार्गदर्शन केले. पिंपरी चिंचवड मध्ये कचरा कमी व्हावा यासाठी काय प्रयत्न होत आहेत हे त्यांनी मांडले. कचरा वर्गीकरण करण्याची प्रक्रिया सामान्य जनतेला समजेल अशा सोप्या भाषेत कशी सांगावी याची युक्ती सुचवा असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

केंद्राचे गणेश विसर्जनाचे लेझीम आणि बर्ची नृत्याचे स्थिर प्रात्यक्षिक अनंत चतुर्दशीला मैदानावर उत्साहात पार पडले. थेरगाव मित्र मंडळात आपल्या सहकाऱ्यांसह सार्वजनिक मालमत्ता जपण्याची शपथ घेणारे श्री. अनिकेत प्रभू व शरयूनगर मित्र मंडळात ऐतिहासिक देखाव्यातून प्रबोधन करणारे श्री. नितीन ढमाले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

▷ **शतगानवंदना**

महाकवी गदिमा, स्वरतीर्थ बाबूजी आणि महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु.ल. या त्रयींच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून मुक्तिसोपान संगीत विद्यालय आयोजित व मातृमंदिर विश्वस्त संस्था प्रायोजित शतगानवंदना ही या त्रयींच्या गीत-संगीतावर आधारित अनोखी गीत गायन स्पर्धा दि. ५ जाने. १९ रोजी संपन्न झाली. ७ ते ८२ या वयोगटातील सुमारे ३०० स्पर्धकांनी ४०० पेक्षा जास्त गीते गाऊन या दिग्गजांना मानवंदना दिली. श्रीमती लीनता माडगूळकर-आंबेकर (गदिमांची नात, लेखिका, निवेदिका) यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. संध्याकाळी सुरसुमनांजली ही प्रथितयश कलाकारांची याच त्रयींच्या गीत संगीतावर आधारित गायन सभा झाली. त्याला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. मुक्तिसोपानच्या सर्वच अध्यापकांनी मिळून संयोजन केले. या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड परिसरातील अनेक गायक, वादक व जाणकार श्रोते विद्यालयाच्या संपर्कात आले. उच्च अभिरुचीचे शब्द व संगीत असलेल्या भावगीतांनी परिसर संगीतमय झाला.

## २. विभाग स्तरावरील कार्यक्रम

### १. पूर्व प्राथमिक विभाग

'बालपण दे गा देवा, मुंगी साखरेचा मेवा!' खऱ्या अर्थी हा मेवा अनुभवायला मिळाला तो विभागाच्या दि. १० फेब्रु. रोजीच्या स्नेहसंमेलनात. नृत्य, नाटक, संगीत या सर्वांची सुरेख गुंफण यात होती. फक्त मराठी व इंग्रजी भाषेतच नव्हे तर संस्कृत भाषाही आपलीशी करून या भाषेतून नाटकातून, नृत्यातून चिमुकल्यांनी अभिनय साकारला. डोंबाऱ्याला लाजवेल अशा विविध उड्या संगीताच्या तालावर अगदी सहज मारून दाखवल्या. एवढेच नाही तर आमच्या कार्यक्रमाची प्रस्तावनाही आम्हीच करणार असा आग्रह ठेवून अगदी मोठ्यांसारखा माईक टेस्टिंगचा आव आणत तेही काम केले. या सर्व तयारीला पालकांचे मिळालेले मोलाचे सहकार्य खरंच कौतुकास्पद होते. फक्त मदतीसाठीच नव्हे तर प्रत्यक्ष सादरीकरणातही आपला सहभाग असायला हवा असा आग्रह पालकांनी धरला व तो समूहगीतातून साकारला. कार्यक्रमाला अनुजाताई भंडारी व शीतलताई कापशीकर प्रमुख अभ्यागत म्हणून लाभल्या. त्यांनी आपल्या मुलांच्या या लहानपणीच्या आठवणी या कुपीतल्या मोलाच्या अत्तराप्रमाणे सांभाळून ठेवाव्यात अशाच असतात. त्या कधीही उघडून पाहिल्या तरी तितक्याच ताज्या वाटतात, असे सांगून पालकांना व मुलांना शुभेच्छा दिल्या.

### २. प्राथमिक मराठी विभाग

प्राथमिक मराठी विभागातील दरवर्षी होणारा महत्त्वाचा उपक्रम म्हणजे पालक-शिक्षक सहल! या वर्षी दि. १६ मार्च रोजी अलिबाग-किहीम समुद्रकिनाऱ्यावर सहल गेली होती. ४६ पालक आणि ६ अध्यापक यात सहभागी झाले होते. तेथील वडके विद्यालयातील माध्यमिकच्या विद्यार्थ्यांशी या गटाने स्वच्छतेविषयी संवाद साधला. मुलांकडून स्वच्छता प्रतिज्ञा म्हणून घेतली. आपल्या गावाचे वैभव असणारा समुद्रकिनारा स्वच्छ राखण्याचे आवाहन केले. परिसर स्वच्छतेचे महत्त्व सांगणारी माहितीपत्रके विद्यार्थ्यांना व नागरिकांना वाटण्यात आली. या गटाने संपूर्ण समुद्रकिनारा स्वच्छ केला. कचरा गोळा केला व त्यातील प्लॅस्टिक वेगळे केले. नंतर आपण स्वच्छ केलेल्या समुद्रकिनाऱ्यावर, पाण्यात खेळण्याचा मनसोक्त आनंद घेऊन सहल परतली.

### ३. पूर्व माध्यमिक विभाग

दि. ९ मार्च रोजी नाट्य त्रिवेणी हा कार्यक्रम सादर करण्यात आला. इ. ५वी ते ७वी च्या विद्यार्थी गटासाठी अभिव्यक्ती प्रशिक्षण आणि अभिव्यक्ती सादरीकरण विशेषत्वाने प्रयत्नपूर्वक आयोजित केले जाते. नाट्य ही अभिव्यक्ती एका विशिष्ट कालावधीमध्ये, विशेष गती असलेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन प्रायोगिक तत्त्वावर आयोजित केली जाते. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रंगमंचाचा अनुभव घेता यावा, अभिनय व त्याबरोबर नाट्य सादरीकरण करण्यासाठी आवश्यक असणारे सातत्य, नाटक उत्तम होण्यासाठी द्यावे लागणारे योगदान, नाटकातील प्रत्येक पात्रांचा परिचय आणि ते प्रत्येकाच्या अंगी भिनविणे आणि नाटकातील प्रत्येक भूमिका महत्त्वाची असणे, याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन सक्षम व्हावा ही उद्दिष्टे लक्षात घेऊन दोन महिने नाट्य प्रशिक्षण प्रक्रिया राबविली जाते. यासाठी सौ. मानसीताई पाठक व सौ. मयुरीताई जेजुरीकर यांनी उत्तम मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे फलित म्हणजे नाट्य त्रिवेणी. विद्यार्थ्यांनी 'नदी उवाच', 'न संपणारी गोष्ट' आणि 'शाळा आमची आणि आम्ही शाळेचे' अशी तीन नाटके सादर केली. विद्यार्थ्यांच्या वयोगटाला साजेशा असलेल्या आशयसंपन्न विषयांना विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट अभिनयाने न्याय दिला आणि प्रेक्षक वर्ग असलेल्या पालकांची मने जिंकली.

### ४. माध्यमिक इंग्रजी विभाग

दि. १३ फेब्रु. रोजी इ. ९वीचे साधारण ४० विद्यार्थी व चार अध्यापकांनी मोशी येथील कचरा डेपोला भेट दिली. येथे मुलांनी कचरा संकलन, व्यवस्थापन व विल्हेवाट ही कामे कशी होतात हे समजून घेतले. तेथील कामगार व अधिकारी यांच्या मुलाखती घेतल्या. कचऱ्याचे वर्गीकरण व त्यावरील प्रक्रिया अतिशय सुनियोजित पद्धतीने चाललेल्या पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. कचऱ्यावर प्रक्रिया करून अनेक प्रकारच्या वस्तू येथे तयार होतात. तसेच कर्मचाऱ्यांची नियमित 'आरोग्य तपासणीही' होते. रोज येथे जमा होणाऱ्या कचऱ्याचे भयानक

वाढते प्रमाण पाहून आपल्या घरातील कचऱ्याचे वर्गीकरण आपण केले पाहिजे आणि कचरा कमी केला पाहिजे अशी तीव्र जाणीव मुलांना झाली.

माध्यमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थी या वर्षी प्रथमच बाहेरच्या राज्यात मातृभूमी परिचय शिबिरासाठी जाऊन आले. १० ते १६ ऑगस्ट या कालावधीत मुलींचे शिबिर भोपाळला तर मुलांचे अहमदाबाद येथे झाले. मुलांच्या शिबिरात गांधी आश्रमाशी संबंधित पर्यावरणीय सेवा संस्थान, सफाई विद्यालय, मानव साधना, ग्रामश्री या विविध कामांचा परिचय आणि त्यातील कार्यकर्त्यांशी गप्पा झाल्या. त्या बरोबर विनाशुल्क रिक्षा चालवणारे रिक्षावाले आणि विनाशुल्क चालणारे उपहारगृह पाहिले. Calico Textile संग्रहालयात देशभरातल्या वस्त्रकलेचे थक्क करणारे नमुने पाहिले. National Innovation Foundation, दांडी कुटीर संग्रहालय, खोज संग्रहालय येथे भेटी झाल्या. तसेच अहमदाबादचा heritage walk मुलांनी अनुभवला. शिबिरामुळे अहमदाबादचे ऐतिहासिक महत्त्व मुलांना समजले.

मुलींच्या शिबिरातील SAI - (भारतीय खेल प्राधिकरण) भेट व SAI चे निर्देशक श्री. राजेंद्र सिंग यांच्याशी चर्चा खूप प्रेरणादायी होती. भीमबेटका (अश्मयुगीन काळातील), जनजाती संग्रहालय, मानव संग्रहालय हे सर्व बघून देशातील विविध भागांतील आदिवासींच्या जीवनातील बऱ्याच गोष्टी समजल्या. सांची स्तूप बघताना गौतम बुद्धांचा इतिहास नजरेसमोर तरळला. शौर्य स्मारक बघून देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांबद्दल अभिमान वाटला. IAS ऑफिसर डॉ. सुदाम खाडे यांच्याशी झालेली भेट तर खूपच रंजक व त्याच बरोबर उत्तुंग भरारी घेण्यासाठी मिळालेली एक दृष्टीच होती. या शिबिरातील उच्च टोक म्हणजे नर्मदालयात झालेली भारतीताई ठाकूर यांनी भेट व फिरून बघितलेलं भट्याण गाव. सेवाभावाने काम करणाऱ्या अनेक व्यक्ती आणि भारताची अनेक रूपे मुलींनी पाहिली.

### ५. माध्यमिक मराठी विभाग

छात्र प्रबोधनच्या 'तुम्हीच संपादक व्हा' या हस्तलिखित स्पर्धेत विद्यालयातील मराठी माध्यम विभागाचे चार गट सहभागी झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांनी खूप मेहनतीने हस्तलिखितातील साहित्य स्वतः लिहिले व त्याची सुंदर मांडणी केली. त्यातील इ. ९वी क या वर्गातील 'पारिजात - शब्दांची फुले वेचताना' या हस्तलिखिताला शहर पातळीवर प्रथम क्रमांक आणि त्यानंतर झालेल्या राज्यस्तरीय परीक्षणात सुद्धा प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळालेले आहे. या स्पर्धेत एकूण ५५ गट सहभागी होते. झालेल्या यशस्वी गटात पुढील विद्यार्थी सहभागी झाले होते - १. कनक महात्मा, २. श्रावणी विधाते, ३. अनुष्का बच्छाव, ४. अवनी पाठक, ५. आरोही पाठक, ६. रसिका वाल्हेकर, ७. गौरी धसे.

### ६. गुरुकुल विभाग

देहू येथील गाथा मंदिराच्या परिसरातील संत ज्ञानेश्वर मंदिरात इ. ९वीसाठी दासबोध पारायणाची सुरुवात दि. २१ फेब्रुवारी रोजी केली. मुलांशी चर्चा करतांना लक्षात आले की सगळे मनापासून वाचत आहेत. एवढी दशके वाचूनही कुठेही मुलांना कंटाळा नव्हता, उलट पुढच्या समासात समर्थ काय सांगणार आहेत, अशी उत्सुकता होती. अनेक प्रश्नांची उत्तरे शोधत शोधत वाचन होत होते. पाठांतरामध्ये उत्तम पुरुष लक्षणे गुरुकुलात म्हणतात पण दासबोधात तीच लक्षणे वाचताना, त्या श्लोकांचा अर्थ अधिक उमजला. मुलांना 'आपला वाचनाचा वेग वाढला आहे, नवनवीन शब्द कळत आहेत, शब्दोच्चार सुधारले आहेत, एका जागी स्थिर बसण्याची वृत्ती वाढली आहे' हे जाणवू लागले होते. प्रत्येकाने आपले वेगवेगळे अनुभव आदित्य दादांकडे उत्स्फूर्तपणे मांडले. अगदी 'समर्थ रामदास प्रबोधिनीचे पथदर्शक का आहेत? हे समजले' इथपासून ते 'आम्हाला वाटले होते की हे कंटाळवाणे होणार पण तसे न होता वेळ कसा गेला ते कळले नाही, कंटाळा आला नाही' अशा बऱ्याच प्रतिक्रिया मुलांनी दिल्या. सर्व मुलांनी पाच दिवसांत दासबोधाचे संपूर्ण पारायण केले.

### ७. युवती विभाग

युवतींच्या नेतृत्वगुणांना व समूहगुणांना संधी देणे, तसेच त्यांना युवती विभागाच्या व प्रबोधिनीच्या कामाची ओळख करून देणे, असे उद्दिष्ट ठेवून या वर्षी काही जणींनी जोडीजोडीने व काहींनी गटागटाने वेल्ह्याला जावे असे ठरवले होते. या अंतर्गत निर्भया दलातील (इ. ८वी ते १०वी विद्यार्थिनी) इ. ९वी च्या विद्यार्थिनींसाठी ग्रामीण शिबिर वेल्हे येथे झाले. दि. ४, ५ मार्च रोजी इ. ९वी इंग्रजी माध्यमाच्या २० मुली, ऋचा मापारी, जाई जोशी या दोन युवती व स्मिताताई व श्वेताताई या दोन शिक्षिका या ग्रामीण शिबिरासाठी गेल्या होत्या. तसेच दि. १७, १८ एप्रिल रोजी दोन आणि २२, २३ एप्रिल रोजी तीन अशा महाविद्यालयीन प्रेरणा दलातील पाच युवती वेल्हे येथे जाऊन आल्या. या सगळ्यांनी गावांमध्ये प्रतिभा विकसन हे सूत्र समोर ठेवून मेळावे घेतले. युवतींनी गटागटांत वेल्हे, मार्गासनी, विंझर, दापोडे, आंबवणे, येथील सर्व गावात मिळून १६५ मुलींसाठीचे मेळावे घेतले. मुलींचे विहिरीतून पाणी भरण्याचे, गावातील निवासाचे, युवतींचे कातकरी वस्तीवर अभ्यास प्रश्नावली भरण्याचे, आतील गावांत जंत गोळ्या वाटण्याचे, सहनिवासातील मुलींना इंग्रजी शिकवण्याचे कृतीसत्र झाले. शिक्षिका स्मिताताई आणि श्वेताताई यांनी सहनिवासातल्या मुलींची वाचन कौशल्य आणि संस्कृत विषयावर शनिवार शाळा उपक्रमाच्या अंतर्गत सत्रे घेतली.

### ८. युवक विभाग

१४ एप्रिलला डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने युवक विभागातील जबाबदारी घेऊन काम करणाऱ्या पाच कार्यकर्त्यांनी प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा तर एका कार्यकर्त्याने द्वितीय प्रतिज्ञा ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह आ. सुभाषराव देशपांडे यांच्याकडून घेतली. वीर चाफेकर दल या चिंचवड मध्ये चालणाऱ्या दलातील अभिलाष देशपांडे, हिमांशू गपचूप, अथर्व देशपांडे या उपक्रमांच्या माध्यमातून प्रबोधिनीच्या संपर्कात आलेल्या तीन युवकांनी प्रतिज्ञेचा अर्थ समजून घेत आ. संचालकांना त्यासंदर्भातील पत्र लिहिले होते. तसेच केशव मावळे

आणि पार्थ देशपांडे हे निगडी येथे चालणाऱ्या सावरकर दलाचे मागील दोन वर्षांपासून नियमित सदस्य आहेत. यांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली. देवव्रत मुणगेकर हा मागील पाच वर्षांपासून युवक विभागाचा जबाबदार सदस्य म्हणून काम करत आहे. त्याने या कार्यक्रमात द्वितीय प्रतिज्ञा घेतली. आ. कार्यवाह सुभाषराव देशपांडे हे पहिल्यांदाच युवक विभागाच्या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन करण्यासाठी आले होते. 'छत्रपती शिवाजी महाराजांनी रायरेश्वरच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची केलेली प्रतिज्ञा, स्वा. सावरकरांनी चाफेकर बंधूंच्या फाशी नंतर घेतलेली 'मारिता मारिता मरतो झुंजेन' ही स्वातंत्र्य लढ्यातल्या सहभागाची प्रतिज्ञा, प्रबोधिनीचे संस्थापक संचालक आ. आप्पा पेंडसे यांनी स्वामी श्रद्धानंदांच्या हत्येनंतर त्यांचे काम पुढे चालू ठेवण्यासाठी केलेली समाज कार्याची प्रतिज्ञा' या तीन उदाहरणांच्याद्वारे प्रतिज्ञेचे महत्त्व, कामातील प्रेरणा याबद्दल त्यांनी युवकांना मार्गदर्शन केले.

### ९. पालक महासंघ

आपल्या पाल्यांचे उज्वल भविष्य पाहणाऱ्या पालकांनी यावर्षी स्वत: पुणे कन्याकुमारी सायकल सहल करून वज्रासमान शरीर व पोलादी मनाला घडवू पाहणाऱ्या आपल्याच पाल्यासमोर एक आदर्श ठेवला. तब्बल १६००कि. मी. चा प्रवास दि. १४ ते २३ डिसेंबर या फक्त दहा दिवसात पूर्ण करून वेगळेच विक्रमी धाडस या पालकांनी केले. यात २४ पालकांचा सहभाग होता. दौऱ्यामध्ये पर्यावरण रक्षण, आरोग्य संपादन व आनंदी जीवनाचा संदेश त्यांनी लोकांपर्यंत पोहोचविला. विद्यालयाच्या मातृभूमी परिचयाचा अनुभव पालकांनी घेतला. यासाठी निवास घरोघरी अथवा मंदिरात केला आणि रात्री तेथील लोकांशी संवाद केला. जागोजागी मिळणारा लोकांचा प्रतिसाद उत्साहवर्धक व आनंददायी होता. यामध्ये विजय नाईक यांनी पुढाकार घेऊन दौऱ्याचे आयोजन केले. केंद्र उपप्रमुख श्री. मनोजराव देवळेकर हे शेवटचे दोन दिवस दौऱ्यात सहभागी होते. गेले वर्षभर हा गट दैनंदिन व्यायामाच्या निमित्ताने सायकलिंग करत होता. या दौऱ्याची तयारी म्हणून निगडी-लोणावळा-निगडी दहा वेळा, निगडी-सातारा दोन वेळा असा सराव त्यांनी केला. सायकल सहलीचा शेवट विवेकानंद शिलास्मारकाच्या दर्शनाने झाला.

## ३. विशेष दखल

### ▷ प्लॅस्टिक एकत्रीकरण

सागरमित्र फौंडेशनचे श्री. विनोद बोधनकर यांचे डिसेंबर २०१७ मध्ये शाळेत पहिल्यांदा व्याख्यान झाले. प्लॅस्टिक कचऱ्याची महाकाय समस्या त्यांनी मुलांसमोर मांडली. तेव्हापासून शाळेत दरमहा या संस्थेची गाडी येते. सर्व विद्यार्थी व शिक्षक आपल्या घरचे कोरडे प्लॅस्टिक महिनाभर साठवून या संस्थेला देतात. त्यावर प्रक्रिया होते व हा कचरा समुद्रात जाणे टळते. यावर्षी स्वच्छता वर्षाच्या निमित्ताने या योजनेवर विशेष भर देऊन प्रयत्न केले. विद्यार्थी व पालकांशी अनेक प्रकारे वारंवार संवाद केला गेला. गेले काही महिने सातत्याने आपण दरमहा ३०० किलोपेक्षा जास्त प्लॅस्टिक पुनर्वापरासाठी पाठवत आहोत. एका महिन्यात हा आकडा ४३० किलो एवढा होता! यात माध्यमिक मराठी विभागाच्या पर्यवेक्षिका विद्याताई उदास यांनी पुढाकार घेतला. यामुळे शेकडो घरांमध्ये जागरूकता वाढली आहे. प्लॅस्टिक कचरा वेगळा करण्याची अनेकांना सवय लागली आहे. पालकांच्या माध्यमातून ही योजना काही सोसायट्यांमध्येही सुरू होते आहे.

### ▷ वास्तू विस्तार

३ डिसेंबर २०१८ रोजी श्री. नितिनभाई कारीया यांच्या हस्ते वास्तुपूजन झाले. मनोहर सभागृहाच्या वर आणखी दोन मजले बांधण्याच्या कामाला शुभारंभ झाला. यामुळे १६ नवीन वर्गखोल्या तयार होतील. दिवसेंदिवस हे नवीन मजले आकार घेत आहेत. त्यामध्ये प्राथमिक विभागाला अनुरूप विशेष वर्गरचना करण्याची योजना आहे. तसेच अभिव्यक्तीच्या विविध विषयांसाठी विशेष खोल्या तयार केल्या जाणार आहेत. या कामासाठी निधी संकलनाची जोरदार मोहीम चालू आहे. त्यात निगडी केंद्रातील अनेक सदस्य मन:पूर्वक सहभाग घेत आहेत.

### ▷ मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा पुरस्कार प्रदान सोहळा

दरवर्षी गुरुपौर्णिमेनिमित्त समाजातील आदरणीय व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध पुरस्कार दिले जातात. यावर्षी संस्थेच्या वतीने पुढील पुरस्कार प्रदान करण्यात आले.

- **गुरुगौरव** - प्रा. श्री. विवेकराव पोंक्षे (ज्ञान प्रबोधिनी)
- **समाजशिक्षक**- श्री. विद्याधरजी निमकर (चतुरंग प्रतिष्ठानसाठी)
- **राधामाता** - सौ. सुहासिनी जोशी, रत्नागिरी
  (कीर्तनकार अध्यापक श्री. किरण जोशी यांच्या मातोश्री)
- **अध्यापकोत्तम** - श्री. रवीजी सावदेकर
  (विवेकानंद केंद्र विद्यालय, दिब्रुगड, आसाम)

▲▲▲

# ज्ञान प्रबोधिनी सोलापूर

◆ **कागदी व कापडी पिशव्या निर्मिती व विक्री उपक्रम**

सोलापूरमध्ये विडी कामगार महिलांची खूप मोठी संख्या आहे. त्या महिलांना तंबाखूच्या सतत संपर्कामुळे आजार होत असतात. अशा विडी कामगार महिलांना पर्यायी रोजगार उपलब्ध करून देण्याकरता ज्ञान प्रबोधिनीच्या सोलापूर केंद्राने 'कागदी व कापडी पिशव्या निर्मिती व विक्री' हा उपक्रम नव्याने सुरू केला आहे. दि. १ नोव्हें. २०१८ ते दि. ३० एप्रिल २०१९ पर्यंत १५,००० पिशव्यांची विक्री झाली व त्यातून रु. १,३१,४५९/- रुपयांची उलाढाल झाली आहे. सुमारे सहा महिला या उपक्रमांतर्गत कापडी व कागदी पिशव्यांची निर्मिती करत आहेत. या उपक्रमाच्या निमित्ताने सोलापूर केंद्राच्या कामात नवीन भर पडली आहे व महिलांच्या प्रश्नावर काम सुरू झाले आहे.

### १. पूर्व प्राथमिक विभाग

अध्यापक शिबिरामध्ये सर्व विभाग शिक्षकांसाठी संचालक आ. गिरीशराव बापट यांचे 'त्रिवेणी शिक्षण पद्धती' यावर तर शिशु शिक्षिकांसाठी 'कथाकथन तंत्र व मंत्र' या विषयावर सौ. नीलिमाताई रास्ते यांचे मार्गदर्शन लाभले. शिशुप्रज्ञा, शब्दसंग्रह वाढ प्रकल्प या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या भाषा विकासास मदत होत आहे. त्याशिवाय शिरवळ व मंद्रुप येथे झालेल्या १२ दिवसीय शिबिरात १२० जणींना प्रशिक्षण देण्याचा अनुभव शिशुशिक्षिकांनी घेतला.

वृक्षसंवर्धन जाणीव हा विचार लक्षात घेऊन १६० विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या बियांची रोपांची रुजवण केली व काळजी घेतली. दीपपूजनानिमित्त मोठ्या गटातील ७२ मुलांनी घरून आणलेल्या दिव्याची घासून, पुसून, वाती वळून पूजा केली. स्वातंत्र्यदिनाला १६ मुलांनी भाषणाची तयारी केली व देशभक्तीपर गीतं मुलांनी समूहात म्हटली. नागपंचमीला सर्पमित्रांनी विषारी व बिनविषारी साप, नाग दाखवून माहिती दिली. राखी पौर्णिमेला कायदा व सुरक्षा विभागातील सदस्यांना राखी बांधण्यात आली. गोकुळाष्टमीला ज्वारीच्या लाह्या कशा करतात याचे व विज्ञान पाठांतर्गत दूधाचे दही कसे होते याचे प्रात्यक्षिक दाखवले. गणेश चतुर्थीनिमित्त गणपती तयार कसे केले जातात हे दाखविण्यातआले. विवेकानंद जयंतीनिमित्त आठवडाभर 'कथा विवेकानंदांच्या' या पुस्तकातील गोष्टी वाचून दाखवल्या. संक्रांतीनिमित्त पालेभाजी, फळभाजी, डाळी, कडधान्य यांची माहिती देण्यात आली. यावर्षी तीन मोठ्या कार्यक्रमातून स्नेहमेळावा झाला. वर्षभरात आत्मसात केलेली बालगीते, बडडगीते, अभिनयगीते, नाटुकले, छोट्या व मोठ्या गटाने सादर केले. आ. लताताईंनी लिहिलेल्या संगितिकेवर सादरीकरण झाले. विज्ञानदिनाला मोठ्या गटातील ७२ मुलांनी छोट्या गटातील मुलांना प्रयोग करून दाखवले.

### २. प्राथमिक विभाग

अध्यापक शिबिरात श्री. मिलिंदजी चिंधरकर यांचे गणित व इंग्रजी विषयावर मार्गदर्शन झाले. महानगरपालिकेच्या शाळेतील शिष्यवृत्ती वर्ग घेणाऱ्या अध्यापकांसाठी प्रशिक्षण झाले. यात प्रशालेतील चार अध्यापकांनी मार्गदर्शन केले.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी चंद्रग्रहण असल्याने विद्यार्थ्यांना छोटीशी चित्रफिती दाखवून माहिती सांगितली. लो. टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त इ. १ली ते ४थीतील एकूण ५३ विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली. त्यापैकी ३५ विद्यार्थ्यांनी खूप छान माहिती सांगितली. सहाध्याय दिनाला विद्यार्थ्यांना डोंबाऱ्याचा खेळ दाखविण्यात आला. गणेशोत्सवात विद्यार्थ्यांसाठी रांगोळी, हस्तकला, पाठांतर स्पर्धा व विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला. दि. २६ ऑक्टो. ला मिझेल्स व रूबेला लसीकरण मोहिमेंतर्गत पालक सभा, विविध कार्यक्रम व लसीकरण कार्यक्रम झाला. इ. चौथीच्या विद्यार्थ्यांची सहल आणि सहाध्याय दिनानिमित्त शेतीची प्रक्रिया समजून घेणे हा उपक्रम झाला. स्वामी विवेकानंद व हुतात्मा दिनानिमित्त सोलापुरातील चार हुतात्म्यांची माहिती सांगितली व चार हुतात्मा पुतळ्यांना पार्क चौकात जाऊन वंदन केले. दि. २४ जाने. ला स्नेहसंमेलन झाले. या वर्षीचा विषय पर्यावरण रक्षणाचा संदेश असा होता. आपली संस्कृती, देशभक्ती, स्वच्छता, वृक्षतोड व लागवड, प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम, निसर्ग इ.वर आधारीत नृत्य तसेच 'उर्जा बचत' यावर नाट्यछटा, पाणी बचतीवर भारूड, क्राफ्ट आर्ट अशी विविध सादरीकरणे झाली. विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान सप्ताहाचे नियोजन करण्यात आले. यामध्ये शास्त्रज्ञांची माहिती, माहितीपट, चर्चा तसेच छोटे छोटे प्रयोग, प्रश्न मंजुषा स्पर्धा असे कार्यक्रम होते.

### ३. माध्यमिक विभाग

अध्यापक शिबिरात श्री. अनंतराव अभंग यांनी 'स्वयंअध्ययन' या विषयांतर्गत अभ्यास कौशल्याविषयी मार्गदर्शन केले.

स्वातंत्र्यदिनी आदिवासी भागात काम करणारे श्री. दिनकर देशपांडे यांनी विद्यार्थ्यांसाठी कार्य परिचय व अनुभव कथन केले. जागतिक योग दिनानिमित्त योगासनांची प्रात्यक्षिके झाली व स्वामी कृपानंदजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि. १९ ऑगस्ट ला आ. लताताईंनी आ. आप्पांचे कार्य व त्यांच्या स्मृतीस उजाळा दिला. गणेश विसर्जन मिरवणुकीत बर्ची, लेझीम, झांज, रिंग, भांगडा इ. नृत्यप्रकार व काष्ठसंचलन, मल्लखांब, लाठीकाठी असे विविध १९ गट सहभागी होते. अग्रणी राखी विक्री उपक्रमातून झालेल्या नफ्यातून मणिपूर येथील विद्यार्थ्यांसाठी पुस्तके अग्रणी गटाने पाठविली. राष्ट्रीय विज्ञान

दिनानिमित्त इ. ७वी व ८वी विद्यार्थ्यांनी गणित व विज्ञान प्रकल्पांचे सादरीकरण केले. आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धेत सोलापुरातील नऊ शाळांमधील १२१ विद्यार्थी तसेच सात शाळांमधील वीस अध्यापक सहभागी झाले. आंतरशालेय बालविकास वक्तृत्व स्पर्धेत सोलापुरातील बारा शाळांमधील एकूण ७२ विद्यार्थी सहभागी झाले होते. इ. ८वीतील सर्व विद्यार्थ्यांचे हराळी येथे विद्याव्रत शिबिर झाले. बुद्धीचे स्वरूप व राष्ट्रअर्चना अशी सत्रे या शिबिरात घेण्यात आली. दि. २८ नोव्हें. रोजी नवीन अग्रणींचे प्रतिज्ञाग्रहण व दि. १ व २ फेब्रु. रोजी इ. ८वीच्या क्रमशः मुलांचा व मुलींचा विद्याव्रत दीक्षाग्रहण समारंभ झाला. विद्यार्थ्यांचे साहस शिबिर व विद्यार्थिनींचे निर्भयता शिबिर झाले.

'भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सोलापूरचा सहभाग' या समाजदर्शन उपक्रम विषयांतर्गत इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी, व्याख्याने, मुलाखती, स्थळभेटी, तत्कालीन वर्तमानपत्रे अभ्यास तसेच अनुभव कथन या माध्यमातून अभ्यास केला. इ. १०वीच्या विद्यार्थ्यांची मातृभूमी परिचय सहल पालघर, मोरवाडा, जव्हार या ठिकाणी गेली होती. कोकणा, ठाकर या जमातींच्या वनवासी पाड्यास भेट देवून त्यांची जीवनशैली अभ्यासली. तसेच ठाकरनृत्य पाहिले. वनवासी पाड्यावरील कुटुंबांस भेट दिली. या सर्व ठिकाणी विद्यार्थ्यांनी वनवासी आश्रमशाळेस भेट देवून तेथील विद्यार्थ्यांना काही पद्ये, विज्ञान प्रयोग व हस्तकला प्रकार यातून संवाद साधला.

### ४. शिशु अध्यापिका विद्यालय

शिशु अध्यापिका विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्य शासन व सोलापूर विद्यापीठ या दोन परीक्षा दिल्या व त्याचा १००% निकाल लागला. या अभ्यासक्रमा दरम्यान छात्राध्यापिकांना विविध ज्येष्ठांनी मार्गदर्शन केले. यात उपासनेचे महत्त्व व सातत्य, नेमकेपणा, नवीन गोष्टी शिकण्याची प्रेरणा, गटकार्य करत असताना प्रतिसाद देणं, एकमेकांना समजावून घेणं, एकमेकांशी जुळवून घेणं इ. गोष्टी, स्वतःला प्रेरित कसे करावे, मॅस्लोची (थेअरी) आत्मविष्काराच्या गरजांचे समाधान कसे करावे तसेत पंचविकासाची पाच अंगे व सहा गुणवैशिष्ट्ये अशा विषयांचा समावेश होता. माजी विद्यार्थिनी संघटन अंतर्गत किशोरी विकास गटाच्या बारा मार्गदर्शिका व सिद्धेश्वर शाळेतील सतरा अध्यापक यांच्या गटाची सहल पिठापूर व विशाखापट्टणम येथे झाली.

दि. ४ ते १५ ऑगस्ट अरुणाचलात किमीन येथे अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका यांचे शिबिर झाले. यात ५२ प्रशिक्षणार्थी सहभागी होते. या प्रशिक्षण वर्गात सौ. अंबिका म्याकल व सौ. मेघना परांजपे यांनी मार्गदर्शन केले. अक्कलकोट तालुक्यातील शिरवळ व मंद्रुप याठिकाणी प्रत्येकी सहा दिवसांचे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या प्रशिक्षणास १२० अंगणवाडी सेविका सहभागी होत्या. या प्रशिक्षणासाठी सौ. सुलभा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. वैशालीताई, पूर्व प्राथमिक विभागातील सात अध्यापक व सौ. मेघना परांजपे यांनी मार्गदर्शन केले.

छात्राध्यापिकांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी वेल्हा येथील आंबवणे या गावी बालवाडीताईंना प्रत्यक्ष पाठ घेऊन दाखवले. सहशालेय कामाच्या अनुभवासाठी इंग्रजी माध्यमाच्या नर्सरीमध्ये पंधरा दिवसांचे प्रशिक्षण योजण्यात आले. गटकार्य व जोडीकार्याचा अनुभव देण्यासाठी विद्यार्थिनींसाठी दिवाळी प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले. यात दिवाळी विषयी माहिती व महत्त्व याची प्रतीकांच्या व तक्त्यांच्या माध्यमातून मांडणी करण्यात आली.

### ५. प्रज्ञा विकास कार्यक्रम

श्री. शशिकांतजी सुपनेकर यांच्या अर्थ साहाय्यातून प्रज्ञा विकास कार्यक्रम सोलापूरात सन २०१३ पासून नियमित चालू आहे. यात बौद्धिक खेळ, मूलभूत गणिती संकल्पना, विज्ञान संकल्पना याविषयी विशेष सत्रे झाली. माजी विद्यार्थिनी डॉ. नेहा जोशी यांनी दंत रचना व आरोग्याविषयी माहिती सांगितली व दातांची तपासणी केली. द्वितीय सत्रातील तासांमध्ये मुलांनी अचूक मापन व भूमिती संकल्पना तसेच लेख, कथा, काव्य याविषयी जाणून घेतले. तसेच सुलतानशाही ते पेशवाई याविषयी व इंग्रजी व्याकरणाची सत्रे झाली. १६ मार्च ते १५ एप्रिल वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींचे सुट्टीतील शिबिर झाले. आ. उषाताई खिरे यांनी विद्यार्थ्यांना कसे शिकावे, काय शिकावे, मोठे होऊन काय करावे याबद्दल मार्गदर्शन केले.

### ६. किशोरी विकास उपक्रम

किशोरी विकास उपक्रमात सहभागी विद्यार्थिनींचा आत्मविश्वास, नेतृत्वगुण व वाचनकौशल्य वाढावे या उद्देशाने गेली पाच वर्षे हा उपक्रम सोलापुरातील चार शाळांमध्ये सुरू आहे. गणेशोत्सवानिमित्त गणपती स्तोत्र, पर्यावरणपूरक मूर्ती व गणेश प्रतिष्ठापना कशी करावी हे सांगण्यात आले. तसेच बर्ची नृत्य शिकवण्यात आले. विद्यार्थिनींना सहजीवनाचा अनुभव मिळावा यासाठी दि. १२ व १३ एप्रिल रोजी निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात प्रामुख्याने वाचनकौशल्य, परस्पर परिचय खेळ, हस्तकौशल्य व साहस प्रात्यक्षिकांचा अनुभव देण्यात आला. शहरीभागाप्रमाणेच यावर्षी ग्रामीण भागात पेनूर गावच्या शाळेत सत्रातून एक असे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एकूण दोन प्रशिक्षणे घेण्यात आली. या शिबिरात प्रामुख्याने ध्यान, पद्य, खेळ, कलाकौशल्य, सूर्यनमस्कार इ. विषय घेण्यात आले.

### ७. युवक विभाग - सामाजिक उद्योजकता

दरवर्षी प्रमाणे मातीचे व पर्यावरणपूरक रंग दिलेल्या श्रीगणेश मूर्ती तयार करणे व त्यांची विक्री करणे या उद्देशाने, यावर्षी २२० श्रीगणेश मूर्तींची विक्री झाली. या उपक्रमात दहा युवक-युवतींचा सहभाग होता व रु. १,०४,५००/- रुपयांची एकूण उलाढाल झाली आणि सुमारे ३४,०००/- रुपयांचा नफा झाला.

▲▲▲

# ☆ ज्ञान प्रबोधिनी सोलापूर : हराळी केंद्र

◆ **विद्यालय व गुरुकुल - विशेष कार्यक्रम**

राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन - बाल विज्ञान परिषदेच्या २६व्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या संयोजनाची जबाबदारी उस्मानाबाद जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ व ज्ञान प्रबोधिनी हराळी यांनी संयुक्तपणे स्वीकारली होती. दि. ३० नोव्हें. व १ डिसें. रोजी हराळी केंद्रावर झालेल्या कार्यक्रमासाठी राज्यभरातून सुमारे १५० विद्यार्थी व १०० शिक्षक आले होते. एकूण ७४ प्रकल्प सादर झाले. उद्घाटनास प्रमुख पाहुणे म्हणून आ. सुधाताई गोवारीकर आणि खासदार डॉ. रवी गायकवाड उपस्थित होते. उस्मानाबाद जिल्ह्यात प्रथमच घेण्यात आलेल्या या परिषदेच्या नेटक्या आयोजनाबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केले.

◆ **मराठवाडा मुक्ती दिन**

दर वर्षी साजऱ्या केल्या जाणाऱ्या मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त यावेळी इयत्ता ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांनी या लढ्यातील काही घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार असलेले गुंजोटीचे प्रा. दिनकर देशपांडे यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी १७ सप्टेंबरला केले.

## १. केंद्र स्तरावरील व विशेष कार्यक्रम

### ▷ विद्याव्रत संस्कार कार्यक्रम

दि. १२ जाने. रोजी विवेकानंद जयंतीच्या सुमुहूर्तावर विद्यालयातील इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांकरिता विद्याव्रत संस्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याआधी तीन महिने विद्यार्थ्यांकरिता विविध मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नर्मदालय संस्थेच्या भारतीताई ठाकूर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ श्री. राजीव भालेराव व वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. अतुलचंद्र कुलकर्णी आले होते.

### ▷ गुरुकुल स्वयंव्यवस्थापन प्रयोग

फेब्रुवारी महिन्यात गुरुकुलामध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वयंव्यवस्थापन प्रयोग करण्यात आला. गुरुकुलाचे दैनंदिन वेळापत्रक बनवण्याची व ते पाळण्याची पूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपवण्यात आली. दलावरील पथक रचनेचा वापर त्यासाठी केला गेला. सुमारे दीड महिना विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे ही जबाबदारी पार पाडली.

### ▷ आंतरदलीय सामने

पुणे येथील युवक विभागाने आयोजित केलेल्या कुमार वयोगटाच्या आंतरदलीय क्रीडा सामन्यांमध्ये सलग दुसऱ्या वर्षी हराळी केंद्रातील विद्यार्थी सहभागी झाले.

### ▷ प्रशिक्षणे

गुणवत्ता वाढीच्या उद्देशाने हराळी केंद्रातर्फे केंद्रातील व परिसरातील सदस्यांसाठी काही प्रशिक्षणे केंद्रावर आयोजित करण्यात आली तसेच काही जणांना अन्यत्र विविध प्रशिक्षणांना पाठवले गेले.

दि. ७ ते ९ जून या कालावधीत विद्यालयातील सर्व अध्यापक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. मा. संचालकांनी ज्ञान प्रबोधिनीची त्रिवेणी शिक्षण प्रणाली या विषयावर मार्गदर्शन केले.

दि. १२ व १३ डिसें. प्रदेश विकसन प्रभागाचा प्रशिक्षण वर्ग हराळी केंद्रावर आयोजित केला होता. या वर्गाला पुणे, हराळी, साळुंब्रे आणि अंबाजोगाई केंद्रांवरील सदस्य उपस्थित होते. प्रशिक्षण वर्गात मा. सुभाषराव, मा संचालक, श्री. प्रसाददादा चिक्षे तसेच हॅलो फौंडेशनचे डॉ. शशिकांत अहंकारी यांनी मार्गदर्शन केले.

## २. विभाग स्तरावरील कार्यक्रम

### १. कृषी विद्यालय व शेती

▷ **विद्यालयातील अनुभव शिक्षण उपक्रम :** या वर्षी प्रथमच कृषी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प शिबिर झाले. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी बाजार समितीचा अभ्यास, अझोला निर्मिती व वापर, शेतकऱ्यांमधील बियाणे वापराबाबत माहितीचे सर्वेक्षण, आवळा कॅन्डी बनवण्याच्या विविध पद्धती, गांडूळ पाणी निर्मिती व त्याचा पिकावर होणारा परिणाम अशा पाच विषयांवर गटांनी प्रकल्प करून मांडणी केली. तसेच प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी पिकावरील कीड व रोगांचा संग्रह, तणांचा संग्रह, माती परीक्षण व सेंद्रिय निविष्ठा निर्मिती इत्यादी विषयांवर प्रकल्प केले.

▷ **अभ्यास सहल :** दि. १७ ते १९ डिसें. या काळात कृषी विद्यालयाची अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती. सांगली जिल्ह्यातील युवा सेंद्रिय शेतकरी सचिन येवले व सौ. वर्षा येवले यांची भेट घेतली. त्यानंतर वारणानगर येथील सहकारी दुग्ध उत्पादक प्रक्रिया संघाच्या केंद्राला भेट, कण्हेरी मठ येथील सेंद्रीय शेतीचे प्रयोग, वेंगुर्ला येथील प्रादेशिक फळ संशोधन केंद्र तसेच डॉ. प्रसाद देवधर यांची भगीरथ संस्था इत्यादी भेटी झाल्या.

▷ **ट्रॅक्टर चालक प्रशिक्षण प्रकल्प उद्घाटन :** हराळी भागातील ग्रामीण युवक युवतींसाठी कृषी विद्यालयातर्फे 'कृषी अवजारे वापर व देखभाल दुरुस्ती प्रशिक्षण प्रकल्प' सुरू होतो आहे. या प्रकल्पांतर्गत ट्रॅक्टर चालन व दुरुस्ती देखभाल प्रशिक्षण प्रकल्पाचे उद्घाटन दि. १४ डिसें. रोजी हराळी केंद्रावर झाले.

▷ **कृषी आधारित उद्योग :** द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षीप्रमाणे कृषी आधारित उद्योगांचा अभ्यास करण्यासाठी फळप्रक्रिया, कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, भाजीपाला रोपवाटिका, ठिबक व तुषार सिंचन संच विक्री व्यवसाय इत्यादी यशस्वी कृषी आधारित उद्योग करणाऱ्या उद्योजकांच्या मुलाखती घेतल्या. आजूबाजूच्या परिसरातील यशस्वी शेती आधारित उद्योगांचा अभ्यास केला.

▷ **शेती :** गेल्या वर्षी प्रमाणे या वर्षीदेखील शेती क्षेत्रावरील तूर व जवस पिकामध्ये काही प्रयोग करण्यात आले. तुरीमधील BSMR ७३६ या वाणामध्ये ठिबक सिंचनाचा वापर करून लागवड व कोरडवाहू लागवड अशा दोन लागवड पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. ठिबक सिंचनाने लावलेल्या तुरीचे उत्पादन अडीच पटीने जास्त आले. तसेच दुसऱ्या प्रयोगामध्ये BSMR ७३६ आणि BDN ७१६ या दोन वाणांचा देखील तुलनात्मक प्रयोग करण्यात आला. यात BSMR ७३६ या वाणाचे उत्पन्न जास्त आले. जवस पिकामध्ये खुडणी चा प्रयोग करण्यात आला पण त्याचा फारसा परिणाम उत्पन्नामध्ये दिसला नाही.

▷ **शेती विस्तार :** या वर्षी हराळी परिसरातील १६ गावांमध्ये शेतकरी संपर्क करण्यात आला. गावांमध्ये नियमित शेतकरी बैठकी आणि शेतावरील भेटी असे या संपर्क उपक्रमाचे स्वरूप होते.

## २. पूरक शिक्षण

पूरक शिक्षण उपक्रमात या वर्षी चार विविध उपक्रमांद्वारे २३ गावांमधील सुमारे २८७५ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात यश मिळाले. नियमित शाळांमधील व काही ठिकाणी शाळाबाह्य तासिका तसेच काही प्रासंगिक शिबिरे असे स्वरूप मुख्यत्वे या उपक्रमांचे होते. प्रज्ञा विकास उपक्रमांतर्गत दर शनिवारी दहा शाळांतील इ.७वी च्या विद्यार्थ्यांची हराळी केंद्रावर शिबिरे घेण्यात आली. तसेच रविवारी स्वयंस्फूर्तीने केंद्रावर येणाऱ्या मुलांसाठीही संगणक शिक्षण, खटपट प्रयोगशाळा, शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी अशा उपक्रमांची योजना करण्यात आली.आधीच्या वर्षी प्रज्ञा विकास शिबिरांना येत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी १५ जुलैला वर्षारंभ उपासना ठेवण्यात आली होती. त्यासाठी ३४ विद्यार्थी उपस्थित होते.

मार्च महिन्यात होळी, आष्टा कासार व भोसगा येथील आश्रम शाळांमध्ये इ. ६वी व ७वीच्या एकूण ९३ विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय शिबिरे घेण्यात आली. यामध्ये गावातील माजी सैनिकांशी संवाद, गटकार्य, स्वच्छतेचे महत्त्व, पक्ष्यांसाठी पाण्याचे भांडे बनविणे, अशी विविध सत्रे झाली.

## ३. ग्रामविकसन

▷ **पाणी :** दि. २ सप्टेंबर रोजी जेवळी गावातील रुद्रवाडी तांडा येथे केलेला पेयजल प्रकल्प लोकार्पण करण्यात आला.

युनिसेफ आणि ACWADAM, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तीन जिल्ह्यात सुरू झालेल्या पेयजल सुरक्षा प्रकल्पात ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्राची उस्मानाबाद जिल्हा समन्वयक म्हणून निवड झाली. उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण ३३ गावे निवडली असून प्रथम टप्प्यात गोरेवाडी, बुकनवाडी व कावळेवाडी या तीन गावांमध्ये भूजल सर्वेक्षण, विहिरींच्या पाण्याची पातळी मोजणे, स्वयंचलित वेधशाळेची उभारणी, सरपंच व गावातील समित्यांची प्रशिक्षणे इ. कामे करण्यात आली. पुढील टप्प्यात अजून ३० गावांमध्ये काम होणार आहे. २२ मार्च रोजी जलदिनाच्या निमित्ताने तीनही गांवांमध्ये जलदिंडीचे आयोजन करण्यात आले तसेच हराळी परिसरातील नऊ गावांमध्ये व शाळांमध्ये त्या आठवड्यात जलजागृती अभियान करण्यात आले.

ऑक्टोबर महिन्यात महाराष्ट्र शासनाच्या 'जलसाक्षरता' प्रकल्पान्तर्गत 'पाण्याचा ताळेबंद आणि शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम

**पूरक शिक्षण**

| क्र. | उपक्रम | गावांची नावे | इयत्ता | विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १. | किशोरी विकास | धानुरी, लोहारा, माकणी, वडगाव, सास्तूर, जेवळी, बलसूर, कोराळ व तोरंबा येथे शाळाबाह्य | ८वी, ९वी | ९०० विद्यार्थिनी |
| २. | किशोर विकास | जेवळी, माकणी, लोहारा, वडगाव, बलसूर, धानुरी, कोराळ | ८वी, ९वी | ६६० विद्यार्थी |
| ३. | छोटे सायंटिस्ट | लोहारा, सालेगाव, तावशिगड, खेड, धानुरी, कोराळ, समुद्राळ, मुरूम, वडगाव, कलदेव निम्बाळा | ८वी,९ वी | ७९५ विद्यार्थी-विद्यार्थिनी |
| ४. | प्रज्ञा विकास | उदतपूर, तावशीगड, धानुरी, खेड, हिप्परगा, भोसगा, होर्टी, वडगाव, होळी, करजगाव, करवंजी, सालेगाव, आष्टा कासार | ६वी, ७वी | ५२० विद्यार्थी-विद्यार्थिनी |
| | | | | एकूण २८७५ |

वापर' या विषयावरील झालेल्या यशदा, पुणे आणि WOTR संस्था, दरेवाडी येथील प्रशिक्षणात हराळी केंद्रातील दोन सदस्य सहभागी झाले.

फेब्रुवारी महिन्यात पाणी फौंडेशन चे प्रशिक्षण घेण्यासाठी एकोंडी, सास्तूर, काटे चिंचोली व हराळी येथील एकूण १४ युवक सहभागी झाले.

### ४. स्त्री शक्ती प्रबोधन उपक्रम

स्त्री शक्ती प्रबोधन कार्यदिशेच्या अंतर्गत यावर्षी हराळी, धानुरी व तोरंबा या गावांमध्ये हिरकणी मेळावे घेण्यात आले. सावित्रीबाई फुले जयंतीच्या उपक्रमानिमित्त हराळी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी ११ विविध क्षेत्रांमधील यशस्वी महिलांची यादी तयार करून त्यातील काही जणींच्या चरित्राचा अभ्यास केला. महिला दिनाच्या निमित्ताने हराळी केंद्रावरील विद्यार्थिनी व महिला यांच्यासाठी प्रबोधनात्मक खेळ, सावित्रीबाई फुले, डॉ. आनंदीबाई जोशी आणि फ्लाईट लेफ्टनंट अवनी चतुर्वेदी यांच्या भूमिकांमधून काही महिला सदस्यांचे आत्मकथन सादरीकरण इ. कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

दि. ४ ते ९ मे या काळात झालेल्या युवती विभागाच्या गोवा अभ्यास सहलीमध्ये हराळी केंद्रावरून चौघीजणी सहभागी झाल्या.

### ५. अन्य कार्यक्रम व भेटी

१) दर वर्षी प्रमाणे दिनांक १८ ते २३ जून या कालवधीत ओमान येथील साधकांसाठी योग शिबिर संपन्न झाले. या वर्षी एकूण २३ जणांनी या शिबिरात सहभाग घेतला.

२) साबण निर्मिती उपक्रम -या वर्षी कु. सुरक्षा रसाळ या रसायन अभियंतीने केंद्रावर साबण निर्मिती प्रयोग केले व केंद्रावरील तसेच परिसरातील काही महिलांसाठी त्याचे प्रशिक्षण आयोजित केले.

३) गोवा गुरुकुल शिबिर - हराळी केंद्रावर दि. १२ ते १७ नोव्हें. या काळात गोवा येथील 'शांता दुर्गा समिती गुरुकुल' मधील इयत्ता ८वी , ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांचे शिबिर झाले.

४) यावर्षी नेहमीप्रमाणे मा. संचालकांच्या नियमित मासिक भेटी हराळी केंद्रावर झाल्या. मा. कार्यवाह सुभाषराव यांच्या देखील प्रासंगिक भेटी हराळी केंद्रावर झाल्या.

५) या शिवाय ज्ञान प्रबोधिनीचे माजी शिक्षक व आर्य समाजाचे स्वामी सत्येंद्र, विवेकानंद केंद्राचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. प्रवीणजी दाभोळकर व विश्वासजी लापालकर, प्रिझम फौंडेशन संस्थेच्या वृंदा कुलकर्णी आणि क्षमा उपासनी, HCL फौंडेशनची पाहणी समिती, हैद्राबाद येथील डॉ. विश्वनाथ गोगटे व सौ. गोगटे, शिवसेनेचे युवा नेते श्री. आदित्य ठाकरे, ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते श्री. पन्नालालजी सुराणा अशा अनेक मान्यवरांच्या भेटी केंद्रावर झाल्या.

### जलसंधारण

या वर्षीच्या उन्हाळ्यात लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली होती -

| क्र. | कामाचे स्वरूप | गावांची नावे | आर्थिक साहाय्य | परिणाम |
|---|---|---|---|---|
| १. | ओढा खोलीकरण | तावशी, काटे चिंचोली सालेगाव | रमा माधव फौंडेशन | ७५००० घनमी. गाळ उपसण्यात आला. |
| २. | ओढा खोलीकरण | सास्तूर | जिल्हा प्रशासन | ५५००० घनमी गाळ उपसण्यात आला. |
| ३. | शेतावर चर खोदणे | हराळी येथील १३ शेतकऱ्यांच्या शेतावर | रमा माधव फौंडेशन | शेतातील अतिरिक्त पाण्याचा निचरा |
| ४. | पिण्याच्या पाण्याची सुविधा | रुद्रवाडी तांडा | रमा माधव फौंडेशन | १५००० ली. क्षमतेची फेरोसिमेंट टाकी आणि फिल्टर संयत्र बसवण्यात आले. |
| ५. | विहीर पुनर्भरण | तोरंबा, हराळी, धानुरी, | रोटरीक्लब ऑफ उदतपूर, हिप्परगा | एकूण ४३ विहिरींचे पुनर्भरण सोलापूर व पुणे |

▲▲▲

# ☆ ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र

◆ **छोटे सायंटिस्ट्‌ची भरारी**

के. पी. आय. टी, दुर्गादेवी चॅरिटेबल ट्रस्ट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे व ग्राम प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने ‘छोटे सायंटिस्ट’ने सहाव्या वर्षात तर विज्ञान केंद्र, साळुंब्रे यांनी अकराव्या वर्षात पदार्पण केले आहे. २०१२ ते २०१८ या कालावधीत वीस शाळा व नऊ हजार विद्यार्थ्यांपर्यंत कृतिशील प्रयोगाच्या माध्यमातून ‘छोटे सायंटिस्ट’ मावळ तालुक्यात पोहोचले याचा आनंद आहे.

## १. उपक्रम

### १. मा. आप्पांचा स्मृतिदिन

कै. आप्पा पेंडसे यांचा स्मृतिदिन विद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक श्री. लासूरकर व मा. महेंद्रभाई यांनी आप्पांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. या प्रसंगी महेंद्रभाईंनी विद्यार्थ्यांना मा. आप्पांच्या आठवणी सांगून प्रेरणा दिली व वातावरण निर्मिती केली.

### २. माहेरवाशीण मेळावा

साळुंब्रे गावातील माहेरवाशीण मेळाव्याचे हे सलग २३वे वर्ष आहे. महिला संघटन, स्त्री शक्ती प्रबोधन व माहेरवाशीणींचा सत्कार या उद्देशाने हा कार्यक्रम विद्यालयात घेण्यात आला. या कार्यक्रमास साळुंब्रे, गोडुंब्रे, दारुंब्रे, शिरगाव, नेरे, दत्तवाडी, साखर, कासारसाई, कुसगाव, आळंदी व पुणे येथील ३५० महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. मंगलाताई मेंगडे, सौ. सारिका शेळके, नगरसेविका, तळेगाव व ज्ञान प्रबोधिनी, पुणे - संवादिनी गटप्रमुख मा. वीणाताई लिमये या उपस्थित होत्या.

या प्रसंगी नऊ नवविवाहितांचा ओटीभरण व सत्कार करण्यात आला. मा. वीणाताईंनी महिला सबलीकरण या विषयी मार्गदर्शन केले. या मेळाव्यात महिला शिक्षण, आरोग्य, सबलीकरण, उद्योजकता, बचतगट, संघटन अशा अनेक विषयांना स्पर्श करण्यात आला.

### ३. भव्य किल्ले स्पर्धा

पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांना कृतीशील अभ्यासाची जोड मिळावी या उद्देशाने विद्यालयात भव्य किल्ले स्पर्धा घेण्यात आली. इतिहास, भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास, वास्तूशास्त्र, परंपरा, युद्धनीती, प्रशासन, व्यवस्थापन, नेतृत्व याचा अभ्यास करून किल्ल्याच्या प्रतिकृती बनवून अभ्यासपूर्वक सादरीकरण केले.

किल्ले संख्या - ४०, सहभागी विद्यार्थी - ५वी ते १२वी - २१०. या स्पर्धेत इ. ५वी ते ८वी व ९वी ते १२वी असे सात क्रमांक काढून मानचिन्ह व प्रमाणपत्र बक्षीस स्वरूपात देऊन प्रोत्साहन देण्यात आले.

### ४. पवनामाई उत्सव

पाण्याची जनजागृती, बचत, शुद्धता व स्वच्छता हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आतवण येथील पवना नदीच्या उगम स्थानाचे पूजन करून उत्सवाची सुरुवात झाली व शेवट मोरया गोसावी मंदिर घाट चिंचवड येथे झाला.

हे उत्सवाचे २३वे वर्ष आहे. अठरा संस्था व वीस शाळा सहभागी झाल्या. जलदिंडी प्रतिष्ठान, ग्राम प्रबोधिनी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, ज्ञान प्रबोधिनी निगडी, परिसरातील प्राथमिक, माध्यमिक शाळा व सेवाभावी संस्था यांनी कार्यक्रमाचे संयुक्त संयोजन केले.

पवनानगर, भुगाव, शिवणे, बेबडओहळ, गोडुंब्रे, मोरया गोसावी मंदिर घाट, चिंचवड येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात पाण्याची उधळपट्टी व प्रदूषण रोखणे, तसेच स्वच्छता व काळजी घेणे यासाठी आवाहन केले गेले.

### ६. सायकल सहल व प्रकल्प भेट

विद्यार्थ्यांना परिसराचे ज्ञान व्हावे, प्रश्न काढता व विचारता यावेत, आपली क्षमता आजमावता यावी या उद्देशाने सायकल सहल काढण्यात आली. यामध्ये ४५ विद्यार्थी व चार शिक्षक (६वी ते ९वी) सहभागी झाले होते. कुसगाव धरण - इतिहास, क्षमता, भौगोलिक बाबी, साखर कारखाना - साखर प्रक्रिया व मुलाखती घेतल्या.

### ७. पर्यावरणपूरक होळी

विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणविषयक जागृती निर्माण व्हावी हा उद्देश. परिसरातील पालापाचोळा व कचरा जाळला (झाडे न तोडणे हा उद्देश). मुलांनी छोट्या कागदावर आपले वाईट विचार व गुण लिहून ते होळीत दहन केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयक महत्त्व कथा स्वरूपात सांगितले.

## २. यश

विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती जागृत व्हावी या उद्देशाने हिंजवडी येथील केपीआयटी कंपनीतर्फे छोटे सायंटिस्ट, विज्ञान प्रदर्शन व समस्या परिहार स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये वीस शाळांचे ८वी व ९वी चे विद्यार्थी सहभागी होते. या स्पर्धेत आपल्या विद्यालयाच्या मयुरी गडदे, स्नेहा चोरघे, वैष्णवी वाजे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व बॅगा असे बक्षीस प्राप्त झाले. या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे शिक्षक श्री. गणेश भताने व श्री. तुकाराम राक्षे यांनी मार्गदर्शन केले होते.

▲▲▲

# विस्तार केंद्रे

## १. डोंबिवली विस्तार केंद्र

### नियमित उपक्रमांचा आढावा

| उपक्रमाचे नाव | सहभागी सदस्य | कार्यकर्ते | उपक्रमाचे नाव | सहभागी सदस्य | कार्यकर्ते |
|---|---|---|---|---|---|
| प्रबोधक मंडळ (साप्ताहिक) | २५ | ७ | वाचक मेळावे | ८८ | १५ |
| विद्याव्रत संस्कार | २५ | ५ | विद्याव्रत जोपासना | २५ | ८ |
| सृजन गट | १२ | | युवा गट - रात्रशिबीरे (२) | १५० | २० |
| ग्रामीण विभाग- बाळेवाकळण इ.७ वी (साप्ताहिक) | ३३ | ८ | संवादिनी चार गट (मासिक बैठका) | ६२ | ८ |
| | | | पौरोहित्य विभाग | १०७१ | १३ |

### पौरोहित्य व्रत संस्कार

दि. १ ते ३ जून दरम्यान डोंबिवलीतील पौरोहित्य गटासाठी 'पौरोहित्य व्रत संस्कार' शिबिर झाले. पौरोहित्य गटातील तेरा सदस्यांपैकी अकरा सदस्या शिबिरात सहभागी झाल्या होत्या. दि. १ व २ रोजी दु. १ ते सं. ६ या वेळेत शिबिर घेण्यात आले व दि. ३ रोजी सकाळी मुख्य व्रत संस्कार करण्यात आला. रोजच्या सत्राची सुरूवात संपूर्ण उपासनेने झाली. त्यानंतर चिंतन या सत्रात रामायण व महाभारतातील पात्रांची, आपल्या मनोविकारांशी तसेच गुण व अवगुणांशी कशी सांगड आहे हे ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रुतीताई व वृंदाताई यांनी सांगितले. 'प्रबोधिनीची प्रार्थना' या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. अर्थासहित प्रार्थनेची पुस्तिका आधीच देण्यात आली होती. त्याआधारे 'मला भावलेल्या प्रार्थनेतील ओळी' यावर सर्व सदस्या बोलल्या. 'जिज्ञासापूर्तीतील काही निवडक प्रश्नांचे तसेच तत्त्वसप्तकातील 'धर्मसंस्थापना' व 'विज्ञानाभिमुखता' या दोन तत्त्वांविषयी गटात वाचन व चर्चा श्रुतीताई, वृंदाताई व ज्योतीताई यांनी घेतली.

दि. १ जून रोजी डोंबिवलीतील ज्येष्ठ तज्ज्ञ आ. लताताई नामजोशी यांनी 'बौद्ध धर्मातील भिक्खू संकल्पना' यावर मार्गदर्शन केले. दि. २ जून रोजी प्रबोधिनीच्या ज्येष्ठ आ. स्वर्णलताताई भिशीकर यांनी ध्यानाचे सत्र घेतले. काही पुरोहितांनी आपले वैशिष्ट्यपूर्ण अनुभव सांगितले. समारोपात प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते व पुरोहित आ. रामभाऊ डिंबळे यांनी 'प्रबोधिनीचा पुरोहित कसा असावा' याविषयी मार्गदर्शन केले.

दि. ३ जून रोजी संत्रिकेचे प्रमुख आ. विश्वनाथ उर्फ विसूभाऊ गुर्जर यांनी पुरोहितांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या एकूण प्रगतीबद्दल कौतुक करून गट पाहून समाधान वाटल्याचे नमूद केले. या प्रशिक्षण वर्गाला प्रशिक्षक म्हणून वा. मनीषाताई शेटे व वा. आर्याताई जोशी यांनी मार्गदर्शन केले. पौरोहित्य व्रत संस्कारास आचार्य म्हणून आ. स्वर्णलताताई भिशीकर यांनी मार्गदर्शन केले.

### अभ्यास शिबिर

दि. १४-१६ जून दरम्यान केंद्राचे अभ्यास शिबिर 'गुरुकुल द डे स्कूल' या शाळेत संपन्न झाले. डोंबिवली व ठाण्यातील ज्येष्ठ, नवीन असे एकूण २९ कार्यकर्ते शिबिरात सहभागी झाले होते. 'मनुष्य घडणीचे शिक्षण' ह्या सूत्र विषयावर आधारित शिबिराचे काटेकोर नियोजन आ. संचालकांनी स्वत: केले होते. स.१०.३० ते ५.३० या वेळेत झालेल्या शिबिरातील विविध सत्रांचे संचालन, अनुभवकथन, गटचर्चा घेण्यासाठी पुण्याहून आशुतोषदादा बारमुख, मीरा शेटे, अस्मिता बारसावडे, सुनीताताई गायकवाड व अनघाताई देशपांडे हे सदस्य आलेले होते.

रोजच्या सत्राची सुरुवात उपासनेने झाली. त्यानंतर उतारावाचन झाले. विविध सत्रांमध्ये प्रबोधिनीच्या खंड ४ मधील 'बुद्धिगुणांची डोळस जोपासना', 'प्रबोधिनीच्या एकात्म रूपाचे दर्शन', 'निकोप संघटनेचा पाया-सहविचार तंत्र' अशा निवडक लेखांचे वाचन व चर्चा घेण्यात आली. या साहित्याच्या बरोबरीने प्रकट चिंतन पुस्तिका ७ व ८ मधील काही लेखांचेही वाचन व चर्चा झाली.

अनुभवकथनाच्या सत्रात अस्मिताताईने ग्रामीण भागात केलेल्या 'सुमेधा' प्रकल्पाची माहिती सांगितली. सुनीताताईंनी छात्र प्रबोधन मासिकाची सुरुवात, त्यात वेळोवेळी झालेले बदल तसेच छात्र प्रबोधन वर आधारित घेतल्या जाणाऱ्या तासिका, मेळावे याबद्दल त्यांचे अनुभव सांगितले.

या शिबिरात 'पद्य का व कसे शिकवायचे?' या विषयीचे सत्र मीराताईने घेतले. कुठल्याही उपक्रमाची सुरुवात पद्याने का करायची, पद्य निवडताना काय काळजी घ्यायची, तयारी कशी करायची अशा मुद्द्यांवर सगळ्यांना बोलते केले. कधीही पद्य घेतलेले नाही अशा चार कार्यकर्त्यांना पद्य घ्यायला सांगितली.

प्रबोधिनीचे कार्यवाह आ. सुभाषराव देशपांडे शेवटच्या दिवशी उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या मनातील अनेक प्रश्नांची त्यांनी उदाहरणांसहित उत्तरे दिली. डोंबिवली विस्तार केंद्रातील युवक गंधार कुलकर्णी सायकलने भारतभ्रमणासाठी निघाला, त्याला शुभेच्छा देण्यासाठी त्याचे औक्षण करण्यात आले.

प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम यावेळी झाला. आ. सुभाषरावांनी १६ कार्यकर्त्यांना प्रथम तर एका कार्यकर्त्याला द्वितीय प्रतिज्ञा दिली. त्यानंतर प्रतिज्ञितांना त्यांनी मार्गदर्शन केले. मोठ्या संख्येने प्रतिज्ञाग्रहणाने अभ्यास शिबिराची सांगता झाल्याबद्दल आ. सुभाषरावांनी आनंद व्यक्त केला. संपूर्ण प्रार्थनेने शिबिराची सांगता झाली.

उपस्थित सर्वच कार्यकर्त्यांना खंड ४ चाळून आणि विविध सत्रांमधून प्रबोधिनीचे तत्त्व, कामाची दिशा, व्यक्ती व कार्यकर्ता म्हणून स्वतःची जडणघडण अशा विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन मिळाले. सर्वच कार्यकर्त्यांनी अभ्यास शिबिराच्या आयोजनाबद्दल आनंद व समाधान व्यक्त केले.

### ◆ विद्याव्रत जोपासना जोडीकार्य

जोडीकार्यासाठी चार जोड्या होत्या. सुचेताताईंनी मुलांना गणेश प्रतिष्ठापना पूजेची संथा देऊन प्रात्यक्षिकाचा सराव करून घेतला. चारही जोड्यांनी मिळून १३ सप्टेंबरला आठ ठिकाणी गणेश प्रतिष्ठापना पूजा सांगितली. त्यापैकी दोन त्यांच्या स्वतःच्या घरी, एक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात आणि पाच अनोळखी यजमानांच्या घरी पूजा सांगितली. खूप छान उपक्रम झाला. मुलांनी पावती बनवणे, फॉर्म भरून घेणे, ही कामे नीट केली. यजमानांकडून चांगला अभिप्राय जोड्यांना मिळाला.

### ◆ संवादिनीचे 'आरोग्यभान' शिबिर

दि. २ ऑक्टो. रोजी संवादिनीतर्फे स्व. आनंद दिघे सभागृह येथे 'आरोग्यभान' हे वैशिष्ट्यपूर्ण आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रथमच दुसऱ्या संस्थेबरोबर काम करण्याचा वेगळा अनुभव या निमित्ताने घेता आला. डोंबिवलीतील निसर्ग शिक्षण संस्थेच्या मदतीने घेण्यात आलेल्या या शिबिरात डोंबिवली विस्तार केंद्रातील संवादिनी सदस्या, महिला कार्यकर्त्या, महिला पालक व काही नवीन महिला अशा ६५ जणींनी सहभाग घेतला. आरोग्य तपासणीसाठी रु. ५००/- शुल्क आकारण्यात आले.

निसर्गोपचार पद्धतीने शारीरिक क्षमता तपासण्यासाठी विविध प्रकारच्या चाचण्या यावेळी घेण्यात आल्या. नेहमीच्या चाचण्यांबरोबर नाभी परीक्षण व ३० सेकंद चाचणी (चार प्रकार) या वेगळ्या चाचण्या यावेळी करण्यात आल्या. नाभी परीक्षणाद्वारे शरीरातील वात-पित्त-कफातील बिघाड समजून येतो व ३० सेकंद चाचणीत काही कृती (चार प्रकार) जसे ताडासन, खाली बसून butterfly, पायरी चढणे-उतरणे व vision-musscle co-ordination या चाचण्या झाल्या. कृती चाचण्यांमधून शारीरिक क्षमता समजून येते.

चाचण्या झाल्यानंतर आहार आणि योगाचा वैयक्तिक सल्लाही यावेळी देण्यात आला. स. ९.३० वा. नाचणीच्या इडल्या व उकडलेले मुग-हरभरा-शेंगदाणे सैंधव मीठ घालून तसेच आरोग्यवर्धक चहा (काढा) असा चविष्ट व पौष्टिक चहा-नाश्ता निसर्गोपचार शिक्षण संस्थेतर्फे देण्यात आला. नाश्ता चालू असताना एकीकडे संस्थेच्या डॉ. मृदुलाताई भट यांनी कृतीपर चाचण्यांचे प्रयोजन, त्या कृती सातत्याने केल्यामुळे होणारे फायदे, आहार इ. मुद्द्यांवर व्याख्यान दिले. सहभागी महिलांनी वेगळ्या स्वरूपाच्या चाचण्या व वैयक्तिक सल्ल्यामुळे समाधानी असल्याचे व पुन्हा अशा स्वरूपाचे शिबिर झाल्यास नक्की येऊ असे सांगितले.

### ◆ रात्रशिबिर

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा ज्ञान प्रबोधिनी डोंबिवली विस्तार केंद्राच्या युवक-युवती गटातर्फे आयोजित केले जाणारे, शालेय विद्यार्थ्यांसाठीचे रात्रशिबिर दि. १५ व २४ डिसें. १८ यादिवशी घेण्यात आले. शिबिराला दरवर्षीप्रमाणे भरघोस प्रतिसाद मिळाला. गेली १९ वर्षे युवक-युवती गट हे रात्रशिबिर घेत आहे. रात्रशिबिरात विद्यार्थ्यांसाठी रात्रभर विविध मनोरंजक आणि कौशल्यपूर्ण सत्रे घेतली जातात. दि. १५ डिसें. या दिवशी इ. ५वी ते ७वीचे शिबिर घेण्यात आले तसेच २४ डिसें. या दिवशी इ. ८वी ते १०वीचे शिबीर घेण्यात आले. शिबिरास नोंदणी अनुक्रमे १३९ व ९७ अशी झाली. शिबिराचा कालावधी संध्याकाळी ७:३० ते सकाळी ७:३० असा १२ तास सलग होता. शिबिरास मुलांनी उत्तम प्रतिसाद दिला.

मुलांच्या वयानुरूप तसेच बुद्धीला आणि कल्पनाशक्तीला वाव मिळेल अशा सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. मुलांचे विविध गट पाडून त्यांना गटात मार्गदर्शन करण्यासाठी कार्यकर्ते गटाचे 'ताई-दादा' म्हणून सहभागी होत होते. इ. ५वी ते ७वीसाठी अभिनय करून गोष्टीचा शेवट बदलणे, दिलेल्या साहित्यापासून कलाकृती बनवणे अशी अनेक सत्रे घेण्यात आली. इ. ८वी ते १०वीसाठी ही विविध खेळ घेण्यात आले. कागदाचे घर, फुग्याचे खेळ, अडथळ्यांची शर्यत, एक मिनिट खेळांचे फनफेअर, नाताळमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तू लिलावातून मुलांनी मिळवणे आणि बनवणे, कागदी विमान उडवणे इ. त्यामध्ये नेहमीच आकर्षक ठरणारा आणि बुद्धीला चालना देणारा 'खजिना खेळ' मुलांनी खूप उत्साहाने खेळला. दोन्ही शिबिरांनंतर प्रार्थना घेऊन शिबिराची सांगता करण्यात आली. प्रत्येक शिबिरानंतर कार्यकर्त्यांना वेगवेगळे अनुभव येत असतात. शिबिरानंतरच्या शोधबोधच्या बैठकीत ह्या अनुभवांवर चर्चा केली गेली आणि यावर्षी आलेल्या अडचणींवर पुढील वर्षीसाठी उपाय शोधले गेले.

▲▲▲

# २. बोरीवली विस्तार केंद्र

◆ **संचालक भेट**

२०१८-१९ या वर्षातील संचालक भेट दि. १७ ऑगस्टला झाली. सुरुवातीला सहविचार बैठक झाली. या बैठकीत सर्वांनी मनोगते मांडली. बोरीवली केंद्रातील उपक्रमांचा आढावा घेतला. संवादिनी गटाला आ. संचालकांनी भेट दिली. या दोन वर्षांत ज्या नवीन सभासद झाल्या आहेत त्यांना ज्ञान प्रबोधिनीची स्थापना, विस्तार, मा. आप्पांचे कार्य, पुण्यात संवादिनीची सुरुवात व प्रतिज्ञेसंबधी सविस्तर माहिती संचालकांनी सांगितली. सभासदांनी प्रश्न विचारले आणि त्यावर मनमोकळ्या वातावरणात चर्चा झाली. संस्थाभेट अंतर्गत ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी, हराळी, सोलापूरला भेट द्यावी असेही त्यांनी गटाला सुचविले . त्यानंतर बोरीवलीतील आदिवासी आश्रमाला भेट दिली. आ. संचालकांनी मुलींना गोष्ट सांगितली आणि नंतर मुलींसोबत प्रश्नोत्तरे झाली. त्यात मुलींनी आ. संचालकांना प्रश्न विचारून प्रबोधिनीबद्दल माहिती समजून घेतली.

१) दि. २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून विकासिका सुरू केल्या. वर्षभरात विकासिकांमध्ये सुविचार, स्वच्छता गीत, श्लोक, विवेकानंद विचार, ओंकार, ध्यान, गायत्रीमंत्र उपासना, योगदिनाविषयी माहिती, प्राणायाम, सूर्य नमस्कार, छोटे-मोठे योगासनांचे प्रकार, शवासन, खेळ व प्रार्थना असे झाले.

२) दि. १ जून रोजी संवादिनीचा (बोरीवली) चौदाव्या वर्षातला पहिला कार्यक्रम जयराजनगर उद्यानात झाला. सुरुवात नवीन सभासदांच्या माहितीकरिता विस्तारकेंद्राचा थोडा परिचय, व नंतर वर्षारंभ पोथी वाचन झाले. त्यानंतर अनिताताई कर्वे यांनी तेराव्या वर्धापनदिनाचा अहवाल सादर केला.

३) दि. १५ जून रोजी शिवसेवामध्ये संवादिनी बैटक झाली. ज्ञानसेतू उपक्रमाद्वारे पूर्वांचलात मेघालयला बोरीवलीहून गेलेल्या चार युवक-युवतींपैकी केवल मुळे, गौरी कुवर व अंकिता पंडित या तिघीजणी त्यांचे अनुभव सांगण्यासाठी आल्या होत्या. पुण्यातील त्यासाठीचे प्रशिक्षण, पुढे सुरू झालेला त्यांचा प्रवास व प्रत्यक्ष तिकडे गेल्यावर आलेले अनुभव अतिशय श्राव्य होते. तिघींना वेगवेगळ्या गावात पाठविण्यात आले होते. शाळाशाळांत जाऊन त्यांनी विज्ञान प्रयोग, गोष्टी, खेळ, गाणी वगैरे घेतले. अनुभव कथना नंतर सगळ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन शंकासमाधान केले.

४) दि. ६ जुलै रोजी जयराजनगर उद्यानात पद्याने सुरुवात झाली. त्यानंतर चित्रकूट/खजुराहो अभ्यासदौऱ्याची सविस्तर माहिती दिली. दि. २९ जुलै रोजी येणारा 'व्याघ्रदिन' याबद्दल अनिता कर्वे यांनी माहिती दिली. वाघांचे जंगलातील तसेच एकूणच अन्नसाखळीतील महत्त्वाचे स्थान, त्यांची झपाट्याने कमी होत जाणारी संख्या, त्यांचे संवर्धन करण्यासाठी जागतिक पातळीवर केले जाणारे प्रयत्न याविषयी सांगितले. 'राष्ट्रदेवो भव' या पुस्तकातील 'बुद्धिमान मुलांचे शिक्षण' ह्या लेखाचे स्मिता फडणीस यांनी वाचन केले. प्रार्थनेने सभा संपली.

५) केंद्रशः विस्तारित बैठकीसाठी ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे आले होते. केंद्राच्या उपक्रमांची वाटचाल कशा पद्धतीने व्हावी, त्यासाठी या बैठकीतल्या सदस्यांचे दायित्व काय हे प्रबोधिनीतील समित्यांची उतरंड मांडून त्यांनी समजावून सांगितले. वार्षिक संचालक भेटीत मा. गिरीशरावांनी सहविचार सदस्य व इतर कार्यकर्ते यांच्यातील बंध कसे वाढतील व त्यातून नवीन उपक्रम कसे सुचतील हे सांगितले. त्यानंतर संवादिनीच्या बैठकीत मार्गदर्शन व आदिवासी आश्रमाला भेट देऊन तेथील छोट्या मुलींशी गप्पागोष्टींमधून संवादही साधला.

६) दि. ७ सप्टें. रोजी दीप्ती गावडे यांनी जागतिक छायाचित्रण दिवस, जागतिक मैत्री दिन, जागतिक अवयव दिन, स्तन पान दिन या विषयावर माहिती सांगितली. तसेच अर्चना कोरे ह्यांनी इंजिनियर दिनानिमित्त सर विश्वेश्वरय्या यांच्यांबद्दल माहिती सांगितली. नंतर दोन वह्या व पेन प्रत्येक सखीने आणले होते ते गोळा केले. आश्रमातील मुलींना त्या भेटी दिल्या. मग मंगळागौरीचे खेळ खेळलो.

७) रूप पालटू ... प्रगती शाळा : दि. २५ ऑगस्ट नेहमी प्रमाणे ओंकाराने सुरुवात केली. उमाताईनी 'प्रबोधिनीत यायचे' पद्य घेतले व त्याच्या पहिल्या कडव्याचा अर्थ सांगितला. ६वी व ८वी वर्ग वेगळे केले. 'सण' हा विषय देऊन चित्र काढण्यास सांगितले. पद्य झाल्यावर शिक्षक दिनाची माहिती सांगितली. त्या नंतर गणपती ह्या विषयावर गप्पा मारल्या. गणपती उत्सवात काय काय नसावे यावर चर्चा केली. मुलांनी मुंबईतील व गावाकडच्या गणपतीचा सण साजरा करण्यातील फरक सांगितला.

८) अभ्यास सहल - चित्रकूट : दि. २८ सप्टें. ते ५ ऑक्टो. या कालावधीत चित्रकूट येथील राष्ट्रऋषी मा. नानाजी देशमुख यांनी स्थापन केलेल्या पं. दीनदयाळ उपाध्याय शोध संस्थान या संस्थेचे काम पाहण्यास अकरा जणी गेल्या होत्या. नानाजी देशमुखांनी कार्य खूप केले पण कोठेही आपले नाव येऊ दिले नाही. १९६८ मध्ये त्यांनी वरील संस्था स्थापन केली. या संस्थेतर्फे राबविल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांना भेट दिली. दि.

२ ऑक्टो. रोजी कृष्णादेवी वनवासी बालिका आवासी विद्यालयाला भेट दिली. आ. नानाजींनी ही शाळा आदिवासी मुलींच्या कल्याणासाठी उभी केली. येथे मुलींना पहिलीपासून आठवीपर्यंत सर्व शिक्षण मोफत दिले जाते. येथील मुली सुट्टीच्या दिवसात प्रौढांना शिक्षण देतात. आज येथे एकूण १२० मुली शिक्षण घेत आहेत. खजुराओ येथे जाताना वाटेत संत तुलसीदासांचे जन्मठिकाण राजापूर येथे सोळाव्या शतकातील त्यांच्या हस्ताक्षरातील रामचरितमानसचा शिल्लक राहिलेला एकमेव आठवा अध्याय जतन करून ठेवला आहे तो पाहिला.

९) दि. १९ ऑक्टो. ला सुषमाताई साने यांनी 'खेळ आणि खेळाडू' या सदरात दोन देशी खेळ कुस्ती व कबड्डी याविषयी सांगितले. कुस्तीचे निरनिराळे प्रकार तसेच कबड्डी, प्रो कबड्डी याविषयी रोचक पद्धतीने छान माहिती दिली. दि. १६ नोव्हें.ला खेळ व खेळाडू या मालिकेत सुषमाताई साने यांनी हॉकी या खेळाविषयी सुंदर माहिती दिली. विनोदी किस्से व विनोदी कथा सांगण्यात सगळ्या सहभागी झाल्या.

१०) दि. २८ जुलै २०१८ या दिवशी सेंट रॉक्स शाळा, गोराई येथे बोरीवली विस्तार केंद्राचा सार्थ भजन हा कार्यक्रम संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत झाला. यामध्ये गायिकांनी तबला पेटीच्या साथीने संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत नामदेव, संत बहिणाबाई, संत कबीर, संत एकनाथ, मोरया गोसावी इ. संतांच्या भावपूर्ण स्वरात निरुपणासह १३ रचना सादर केल्या. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनाने झाली, मध्ये विठ्ठल नामाचा गजर झाला व संत एकनाथांच्या 'दादला नको ग बाई' या भारुडाने सांगता झाली. सर्व प्रेक्षकही अभंगांना समूह स्वरात साथ देत होते. तबल्यावर श्री शशिकांत केळकर व पेटीवर केवल मुळे यांनी साथ केली. विद्याताई चितळे यांनी सूत्रसंचालन केले. सुमारे ३५ जणी उपस्थित होत्या.

▲▲▲


## कुमारांसाठी ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके /DVD

### ♣ कथासंग्रह

| | रु. |
|---|---|
| १,२. मृद्‌गंध व मोहोर (प्रत्येकी) | ६० |
| ३. बहर | ५० |
| ४. रस्काझी-रशियन कथा | ७० |
| ५. सफर विज्ञानकथांची | ८० |
| ६. प्रेरक कथा.. | ४० |
| ७. कहाणी दोन भावांची | ४० |

### ♣ ललित लेखसंग्रह

| | |
|---|---|
| ८. अलगुज | ५० |
| ९. केवड्याचं पान | ५० |
| १०. बकुळफुलं | ६० |

### ♣ कविता/काव्यपंक्ती संग्रह

| | |
|---|---|
| ११. कवितेच्या गावा | ७० |
| १२. शब्दांची रत्ने | ६० |

### ♣ काव्य-रसग्रहण लेखसंग्रह

| | |
|---|---|
| १३. गंध मोहवी काव्याचा भाग १ व २(प्रत्येकी) | ७० |
| १४. पाहिलेच पाहिजे असे काही | ८० |
| १५ ते १७. वाचलेच पाहिजे असे काही भाग १,२,३ (प्रत्येकी) | ४० |

### ♣ माहितीपर पुस्तके

| | |
|---|---|
| १८. आपला पाऊस | ३० |
| १९. छंद आकाश दर्शनाचा | १०० |
| २०. वनस्पतींचे अनोखे विश्व | ८० |

### ♣ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके

| | |
|---|---|
| २१. व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत | १०० |
| २२. कल्पक बनू या. | १०० |
| २३. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास | ७० |
| २४. Be Creative . | १५० |
| २५. तरंग मनाचे | ५० |
| २६. उजळती वाट | ४० |
| २७. निर्णय कौशल्य | ४० |
| २८. नियोजन कौशल्य | ४० |
| २९. भावनांच्या प्रांगणात | ७० |
| ३०. गीता-गीताई | २० |
| ३१. प्रबोधन गीते भाग १ | ४० |
| ३२. प्रबोधन गीते भाग २ | ३० |
| ३३. प्रबोधन गीते ऑडिओ सीडी.. | ५० |

### ♣ अभ्यासविषयक पुस्तके

| | |
|---|---|
| ३४. असे घडते सुंदर अक्षर | २० |
| ३५. प्रज्ञाबोध भाग-४ | |
| ३६. प्रज्ञाबोध भाग-५ | ७० |
| ३७,३८. अभ्यासातील स्वावलंबन | |
| अभ्यासाची पूर्वतयारी भाग १ | ६० |
| अभ्यासाची कौशल्ये भाग २ | ८० |
| ३९. चला प्रकल्प करूया | १०० |

### ♣ प्रेरणादायी, अनुभवपर पुस्तके

| | |
|---|---|
| ४०. जिद्दीची लोभस रूपं | ६० |
| ४१. आयुष्यातील वादळलाटा | ८० |
| ४२. कथा इस्रोची | ८० |
| ४३. आम्ही असे घडलो | ८० |
| ४४. हरिसिंह नलुआ | ६० |
| ४५. आमची जडणघडण | ८० |
| ४६. गोष्टीरूप आप्पा | ५० |
| ४७. आपले आप्पा | ५० |
| ४८. समाजशिल्पी आप्पा | ८० |

### ♣ विचार व कृतिप्रवर्तक लेखांचा संग्रह

| | |
|---|---|
| ४९. स्वीकारशील स्वदेशी | ५० |
| ५०. हरित संदेश | १५ |
| ५१. Green Messages | २० |
| ५२. हट्टी व्हा हट्टी | ७० |

### ♣ कलाकृतिपर पुस्तके

| | |
|---|---|
| ५३. त्रिमितीची किमया | ८० |
| ५४. 3D Magic | ९० |
| ५५. कागदी हस्तकलेच्या दुनियेत | ५० |
| ५६. हस्तकलांचा उत्सव | ७० |
| ५७. कलेच्या विश्वात | ७० |
| ५८. अभिवाचन एक कला | ७० |

# ३. अंबाजोगाई विस्तार केंद्र

### ◆ अन्य संस्था साहचर्य

पाणी फाउंडेशनच्या वॉटरकप स्पर्धेच्या माध्यमातून अंबाजोगाई विस्तार केंद्राने ३० गावांत काम, मार्गदर्शन व आर्थिक मदत केली. त्यापैकी एकूण १६ गावांना बक्षीसे मिळाली. रक्कम **१ कोटी ३२ लक्ष रु.** इतकी आहे. तालुक्यातील पहिला क्रमांक सात गावांना, द्वितीय क्रमांक पाच गावांना तर तृतीय क्रमांक चार गावांना मिळाला.

| तालुका | प्रथम | द्वितीय | तृतीय | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| अंबाजोगाई | पठाण मांडवा | हातोला | ममदापूर | बीड |
| केज | दीपे वडगांव | आनंदगाव | बावची | बीड |
| परळी | - | इंदिरा नगर | भिलेगाव | उस्मानाबाद |
| परांडा | लंगोटवाडी | सक्करवाडी | - | उस्मानाबाद |
| कळंब | पिंपळगावडोळा | - | - | लातूर |
| औसा | एकंबीवाडी | - | - | लातूर |

### ◆ वर्षारंभ उपासना

अंबाजोगाई विस्तार केंद्राची सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात दि. २१ जुलै २०१८ रोजी वर्षारंभ उपासनेने झाली. त्याअगोदर १५ जून पासून शिशुशाळेला सुरुवात झाली होती. वर्षारंभ उपासना म्हणजेच संकल्प दिन! सायं. ६.०० वा. वर्षारंभ उपासना झाली. यावेळी ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वा. गिरीशराव बापट यांनी मार्गदर्शन केले. विविध गटांनी आपले संकल्प सादर केले. यावेळी ८० प्रबोधकांची उपस्थिती होती.

### ◆ आषाढी एकादशी भजनसंध्या

दि. २५ जुलै रोजी डॉ. विश्वेश्वर चौधरी यांच्या घरी भजनसंध्येचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी १३७ प्रबोधकांची उपस्थिती होती. जवळपास १३ गटांनी भजने सादर केली. शिशुविहारच्या मुलांची दिंडी काढण्यात आली होती. या दिंडीचे स्वरूप वृक्षदिंडी असे होते. Yes ह्या ग्रुपच्या माध्यमातून पालकांना वृक्ष देण्यात आले व त्या वृक्षांचे संवर्धन करण्यास सांगण्यात आले.

### ◆ छात्र प्रबोधन उपक्रम

छात्र प्रबोधन अंकाची नोंदणी युवक गट, युवती गट व इतर प्रबोधक यांनी मिळून केली. एकूण सर्व प्रकारच्या अंकांची व दिनदर्शिकेची मिळून ४८५ नोंदणी झाली.

छात्र प्रबोधनद्वारे आयोजित हस्तलिखित स्पर्धेसाठी पाच शाळांनी सहभाग नोंदवला. त्यातून आठ हस्तलिखिते तयार झाली. श्रीमती गो. कुं. यो. क. शाळेस दोन पारितोषिके मिळाली. 'शब्दवेध' या हस्तलिखितास राज्यस्तरीय उत्तेजनार्थ तर लेखणीतून पडती मोती यास विभागीय स्तरावरील द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

### ◆ युवक-युवती गट

युवक व युवती गटातर्फे उन्हाळी शिबिरे आयोजित करण्यात आली होती. दि. १२ जाने. रोजी विवेकानंद जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी सामूहिक उपासना घेण्यात आली. सामूहिक उपासनेनंतर श्री. अभिजीत देशपांडे यांनी विवेकानंदांचा 'स्त्री विषयक दृष्टीकोन' हा विषय मांडला. तर माजी पालक सीमाताई लोमटे यांनी 'विवेकानंदांचे विचार व युवक, युवती' असा विषय मांडला. युवती गट व युवक गटाने काही कार्यक्रम आखून ते सुंदर रीत्या पार पाडले.

▷ युवक गट - ६ जाने. ते १२ जाने. विविध कार्यक्रम

१) शेपवाडी येथे युवक गटाची सायकल सहल.

२) स्वामी विवेकानंद एक प्रेरणा स्रोत पुस्तकाचे वाचन.

३) विवेकानंदांचे विचार - चर्चासत्र.

४) देशभक्तीपर कवितांचे सादरीकरण.

५) व्यावसायिक श्री. मंगेश चौसाळकर यांची मुलाखत

६) विवेकानंद यांच्यावरची पद्य सामूहिक म्हणणे.

▷ युवती गटाने पुस्तक वाचन, पद्यगायन, भाषण असे तीन उपक्रम घेतले.

### ◆ सौर ऊर्जा

बीड जिल्ह्यातील मागास गावांमध्ये निवडक कुटुंबांमध्ये सौर दिवे वितरण करण्यात आले. गावकऱ्यांना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या १५० व्यक्तिंना सौर दिवे देण्यात आले. ७०% घरे प्रकाशित झाली. शिवापूरच्या सौर प्रशिक्षण वर्गाला शिंगणवाडी व निम्बला येथील युवक जाऊन आले.

### ◆ गणेशोत्सव

दि. १३ सप्टें. रोजी युवक विभाग व युवती विभाग यांनी एकत्रित मिरवणूक काढत गणेश मूर्तीची स्थापना केली. यावेळी ६९ प्रबोधकांची उपस्थिती होती. गणेशोत्सवाच्या काळात मुलांनी खूप आनंद घेतला.

### ◆ शारदोत्सव

शारदा गटाच्या माध्यमातून शारदोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. व्याख्यान, विसरलेले पण भावलेले अंगणातले खेळ, ललित सादरीकरण, कीर्तन, देवीचे नाव लिहणे तसेच देवीची मिरवणूक काढून या उत्सवाची सांगता झाली. यात डॉ. अनघा पाठक, सौ. वैशाली गोस्वामी, श्री. अंबादास चिक्षे, श्री. दत्तप्रसाद गोस्वामी यांची व्याख्याने झाली.

### ◆ दीपोत्सव

दि. २ ऑक्टो. रोजी श्री योगेश्वरी देवी मंदीर परिसरात दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ८० उपस्थिती होती. या कार्यक्रमाची तयारी युवती गटाने केली होती. छात्र प्रबोधन अंकाची माहिती प्रितम दादांनी दिली. यावेळी श्री. श्रीकांत उमरीकर, श्री. प्रशांत बर्दापूरकर, श्री. निर्मळे, श्री. विनाश मुडेगावकर, श्री. गाठाळ यांची उपस्थिती होती. शिशुविहारच्या विद्यार्थ्यांनी गाणी, नृत्य यातून कार्यक्रमात रंगत आणली. विद्यार्थ्यांनी रोषणाई करून दीपोत्सवाचा आनंद घेतला.

### ◆ अभिव्यक्ती २०१९

या अंतर्गत दि. २३ जाने. रोजी आनंदनगरी घेण्यात आली. यात १८ पालकांनी सहभाग घेतला. परिक्षक म्हणून सौ. निशा चौसाळकर व सौ. रुपाली मुकादम यांनी काम पाहिले व दि. २४ जाने. रोजी पदार्थ सजावट स्पर्धा घेण्यात आली. याचे परिक्षण श्री. राजेंद्र फुलतांबकर व सौ. स्वप्नाली देशपांडे यांनी केले. दि. ३ फेब्रु. रोजी अभिव्यक्तीचा कार्यक्रम झाला. यात चिमणी गट, मयूर गट, युवक गट, युवती गट अशी सादरीकरणे झाली.

- ▷ सत्र पहिले - चिमणी गट, सादरीकरण ९ गाणी, उपस्थित पाहुणे श्री.जयसिंग चव्हाण, श्री. राजेंद्र फुलतांबकर
- ▷ सत्र दुसरे - मयूर गट, सादरीकरण ९ गाणी, उपस्थित पाहुणे श्री. रमेश सोनवळकर, श्री. युवराज माने
- ▷ सत्र दुसरे - युवक गट, सादरीकरण नाटिका 'घमेंडी अंजिराचे झाड'
- ▷ सत्र तिसरे - युवती गट, माँ शारदा गट, पालक गट, माजी विद्यार्थी गट, १२ सादरीकरणे, उपस्थित पाहुणे श्री. बन्सी पवार, डॉ. सौ. शुभदा लोहिया

### ◆ मातृभूमि-पूजन

दि. १५ ऑगस्ट रोजी माँ शारदा गट व प्रबोध महिला बचत गट यांनी एकत्रितपणे डॉ. सौ कल्पना चौसाळकर यांच्या घरी मातृभूमि-पूजन कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमास २२ प्रबोधकांची उपस्थिती होती. तसेच दि. ११ जाने. रोजी महिला पालकांसाठी मातृभूमि-पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यासाठी ३६ पालकांची उपस्थिती होती.

### ◆ विशेष

दि. १ डिसें. रोजी पाण्याच्या कामातील अनुभव 'पाण्याची गोष्ट' या मा. प्रसाद चिक्षे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन मुलुंड, मुंबई येथे पार पडले. यावेळी पाणी फाऊंडेशनचे मा. सत्यजीत भटकळ, ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे उपस्थित होते. या कार्यक्रमाला ४०० जणांची उपस्थिती होती.

### ◆ विविध भेटी

दि. २१ व २२ जुलै रोजी मा. संचालकांचा अंबाजोगाई दौरा झाला. वैयक्तिक भेटी, कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबिर, वॉटर कप स्पर्धेत सहभागी गावातील गावकऱ्यांशी संवाद असे ह्या दौऱ्याचे स्वरूप होते.

मुंबईच्या १२ सदस्यांनी दीपे वडगाव, वरकटवाडी, शिंगणवाडी येथे दि. २८ ऑक्टो. रोजी भेट दिली. दि. १५ ऑक्टो. ला वरकरवाडीला एका गटाने भेट दिली.

दि. ९ डिसें. रोजी हेडगेवार रुग्णालयातील सहा डॉक्टर अंबाजोगाई केंद्राचे काम पाहण्यासाठी आले होते.

### ◆ शिशुविहार

| अ.क्र | उपक्रम | दिनांक | वैशिष्ट्य | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | दहिहंडी | ०३ सप्टें. १८ | वेशभूषा | ३० पालक |
| २ | नागपंचमी-भूलई कार्यक्रम | १४ ऑगस्ट | गाणी/गोष्टी | -- |
| ३ | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट | झेंडावंदन/कवायत | ६५ विद्यार्थी |
| ४ | नारळी पोर्णिमा-रक्षाबंधन | २५ ऑगस्ट | राख्या बनवणे (सृजनशीलता) | -- |
| ५ | नवरात्र भोंडला | १६ ऑक्टो. | गाणी | -- |
| ६ | कोजागिरी | २३ ऑक्टो. | पालकांच्या स्पर्धा | -- |
| ७ | सहल - चिमणीगट | ०६ डिसें. | मज्जा/ खेळ | ४४ विद्यार्थी |
| ८ | रुबेला लसीकरण | ०८ डिसें. | माहिती बैठक | ६० पालक |
| ९ | विवेकानंद जयंती भाषण स्पर्धा | १२ जाने. १९ | भाषणे | १६ विद्यार्थी |
| १० | विज्ञान दिन | २८ फेब्रु. | प्रयोग | -- |
| ११ | होळी कचऱ्याची | २० मार्च | कचऱ्याची होळी | -- |
| १२ | मयूर गट सदिच्छा भेट कार्यक्रम | ०५ एप्रिल | प्रगती पुस्तक | -- |

▲▲▲

# ✭ विस्तार कार्य

## ◆ चिपळूण संपर्क केंद्र

**१) छोटे सायंटिस्ट** – चिपळूण व तालुक्यातील आंबडस, सती, पोफळी आणि माखजन या पाच ठिकाणी इ. ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविला गेला. विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष कृती करत समजून घेणे असे या उपक्रमाचे स्वरूप होते. वर्षभरात महाविद्यालयीन युवकांनी सहा संकल्पना शिकावल्या. याच विद्यार्थ्यांचा वर्षाच्या शेवटी विज्ञान मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला २५० विद्यार्थी उपस्थित होते.

**२) विद्याव्रत संस्कार** – विद्याव्रत संस्काराची पूर्वतयारी म्हणून मासिक विकासका वर्ग घेण्यात आले. या वर्गाला २५ विद्यार्थी उपस्थित होते. या विद्यार्थ्यांचे चिपळूणमधील युवकांनी तीन दिवसांचे अनिवासी शिबिर घेतले. पुढील वर्षी या विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार योजला जाईल.

**३) साप्ताहिक उपासना आणि अन्य उपक्रम** – नियमित जबाबदारी घेणाऱ्या सदस्यांची साप्ताहिक उपासना दर रविवारी होते. यावर्षी या उपासनेनंतर प्रबोधिनी साहित्याचे वाचन व चर्चा झाली. आदित्यदादा शिंदेंच्या उपस्थितीत सहविचार बैठकी झाल्या.

**४) शिक्षक प्रेरणा जागृती वर्ग** – चिपळूण, खेड, गुहागर तालुक्यातील वीस शाळांमधील ४० शिक्षकांसाठी चार टप्प्यांमध्ये पाच दिवसांचा निवासी वर्ग झाला. प्रबोधिनीचे शिक्षक प्रशिक्षण केंद्र आणि चतुरंग प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने हा वर्ग झाला.

## ◆ ठाणे संपर्क केंद्र

**१) मातृभूमिपूजन** – मधुमालती सोसायटी, Wings Vocational Center येथे दि. १५ ऑगस्ट रोजी मातृभूमीपूजनच्या कार्यक्रमाला जोडून पाणी फाउंडेशन, विवेकवाडी परिवार, डोंबिवली मित्र परिवार यांचे अनुभव कथन झाले. मीराताई लिमये यांच्या घरी व अन्य काही ठिकाणी असे पाच वेळा मातृभूमीपूजन झाले.

**२) जोपासना गट** – सदाशिव टेटविलकर यांच्या मार्गदर्शनाने ठाणे सफरीत, ठाण्यातील १०० वर्षे जुन्या वास्तूंची मुलांना नव्याने ओळख झाली. श्रुतीताई फाटक, शिल्पा म्हात्रे यांनी स्वयं-अध्ययनावर तर मधुराताई लुंकड यांनी पाठ्यपुस्तकाचा वापर करून टिपणे कशी काढावीत, सांकेतिक चिन्हांचा वापर इ. मार्गदर्शन केले.

**३) विद्याव्रत संस्कार** – गेली तीन वर्षे शिवसमर्थ शाळेत तासिका घेण्यात येत आहेत. यावर्षी विद्याव्रताची पूर्वतयारी म्हणून मानसिक व बौद्धिक विकसन सत्रे घेतली. तीन दिवसीय शिबिरात वेगवेगळ्या क्षेत्रातल्या व्यक्तींच्या मुलाखती, खेळ, लघु चित्रपट, हस्तकौशल्य, कथाकथन घेण्यात आले. दि. २१ एप्रिल १८ ला शाळेतील नऊ मुलांचा विद्याव्रत संस्कार झाला. डोंबिवली विस्तार केंद्राच्या प्रमुख श्रुतीताई यांनी आचार्य म्हणून विद्याव्रतींना दिक्षा दिली.

**४) विकासिका** – बेडेकर शाळेत १५ तासिका घेण्यात आल्या. त्रिवार ओंकार, प्रबोधन गीते, चिंतनात विविध व्यक्तींची ओळख, परिस्थिती ज्ञान, सणांची माहिती त्यामागील शास्त्रीय दृष्टीकोन, बोधपर गोष्टी, बौद्धिक-शाब्दिक कृती पर खेळ, हस्तकौशल्य, विक्री कौशल्य, व्यावहारिक कौशल्यात बँकेला भेट, प्रोत्साहनपर लघु चित्रपट इ. गोष्टी यात घेण्यात आल्या. एक दिवसीय गंमत शिबिर घेण्यात आले. वर्तक नगर, ब्राह्मण विद्यालयात इ. ९वीच्या मुलांचा छात्र प्रबोधनवर आधारित वाचक मेळावा घेण्यात आला.

**५) प्रथम प्रतिज्ञा** – केंद्रातील शिल्पा म्हात्रे, सुखदा करंदीकर, स्वरुपाताई दिघे, कविताताई मोकाशी यांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली. डोंबिवली येथे झालेल्या अभ्यास शिबिरात ठाणे केंद्रातील कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

## ◆ बदलापूर संपर्क केंद्र

**१) उन्हाळी शिबिर**– पिंपळोली या गावातील न्यू पिंपळोली हायस्कूल शाळेत किशोरी विकास प्रकल्पांतर्गत दि. ९ ते ११ एप्रिल १८ या कालावधीत 'जाणून घेऊया आपला गाव- बदलापूर' या विषयावर उन्हाळी शिबिर घेतले. यात इतिहासाचे अभ्यासक श्री. सचिन दारव्हेकर यांनी बदलापूर शहराचा सुमारे ९०० वर्षांचा इतिहास, बदलापूर परिसरात सापडलेले शिलालेख, वीरगळ, प्राचीन वास्तू याविषयी मुलींना सांगितले. गटकार्यात मुलींनी बदलापूरमधील पाच क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या भेटी व मुलाखती घेतल्या व त्यानंतर मुलाखतींचा सारांश सादर केला. आजचे बदलापूर जाणून घेण्याच्या दृष्टीने, बदलापूर नगरपरिषदेच्या कामाची माहिती सौ. सुमित्रा कुलकर्णी यांनी दिली.

**२) अभिवाचन स्पर्धा** – ऑक्टोबरमधे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धेत बदलापूरमधील चार शाळा सहभागी झाल्या. त्यापैकी कुळगाव बदलापूर नगरपरिषद शाळा क्र. १६, एरंजाड यांना डोंबिवली केंद्रातून द्वितीय क्रमांक तर अंतिम फेरीत उत्तेजनार्थ पारितोषिक आणि शिशुविहार विद्या मंदिर, बदलापूर गाव या शाळेला विशेष गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाले.

**३) विद्याव्रत** – शिशुविहार विद्या मंदिर या शाळेतील इ. ७वीच्या मुलांसाठी जुलै महिन्यात विद्यारंभ करून विद्याव्रत उपक्रमाची सुरूवात झाली. मार्च महिन्यापर्यंत शारीरिक विकसन, मानसिक विकसन, बौद्धिक विकसन, उपासना, राष्ट्र अर्चना हे विकसनाचे टप्पे, व्याख्याने व पूरक कार्यक्रमातून मुलांसमोर उलगडण्यात आले. दि. ९ ते १२ एप्रिल १९ विद्याव्रताचे उजळणी शिबिर घेण्यात आले. बदलापूर जवळील कान्होर गावातील श्री. गजानन महाराज मंदिरात दि. १३ एप्रिल रोजी विद्याव्रत संस्कार झाला. संस्कारांसाठी सोळा व्रतार्थी उपस्थित होते. प्रमुख अतिथी प्रतिभाताई स्वामी व मंगलताई तुपे आदल्या दिवसापासूनच शिबिरात आल्याने त्यांचा विद्यार्थ्यांशी छान संवाद झाला.

### ◆ भाईंदर संपर्क केंद्र - संवादिनी

जून महिन्यात वर्षारंभ उपासना करून नवीन वर्षाची सुरुवात केली. शारदोत्सवाच्यानिमित्ताने दहा दिवस, दहा सदस्यांकडे रोज एका विषयावर वाचन आणि त्यावर चर्चा झाली. दहा दिवसांत सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल माहिती, पेपर बॉक्स, पाकिटं बनवणे आणि कापडी पिशव्या शिवणे, प्लास्टिक बंदीला सक्रिय पाठिंबा असे उपक्रम झाले. या शिवाय शून्य कचरा नियोजन व अविरत पात्राचा उपयोग या विषयावर श्री. कौस्तुभ ताम्हनकर यांचे मार्गदर्शन, श्री. अशोक चिटणीस यांचे कथाकथन, सकाळी सहा वाजता महिलांसाठी मॉर्निंगवॉक असे उपक्रम झाले. पु. ल. देशपांडे या विषयावर वाचन झाले. सगळ्यांनी मिळून पु. ल. देशपांडे यांच्यावरील 'भाई' चित्रपट पाहिला. स्वामी विवेकानंदांच्या पुस्तकातील काही माहितीचे वाचन झाले. राजमाता जिजाबाईंविषयी माहितीचे वाचन आणि मातृभूमिपूजन होऊन शारदोत्सवाची सांगता झाली.

### ◆ संवादिनी - पौड रस्ता, पुणे

**१) मासिक बैठका** : निब्बान, अरुणाचल मधील प्रबोधिनीचे कार्य, मेघदूत- कालिदासाचे काव्य, घरबसल्या शेअरट्रेडींग, वीणा वर्ल्ड मधून १०० देशांची सहल व त्याचे नियोजन केलेल्या प्रतिमा फडके यांची मुलाखत, आनंदी-गोपाळच्या चित्रपटाच्या लेखकांशी चर्चा असे विषय बैठकींत झाले. सदस्यांना ओरिगामीच्या पणत्या व समया करायला शिकवल्या.

**२) तासिका** - विजयमाला कदम कन्यका शाळा येथे वर्षभर व्यक्तिमत्त्व विकासासाठी इ. ६वीच्या वर्गावर साप्ताहिक तासिका घेतल्या. ताम्हिणी व आसदे येथे छात्र प्रबोधनवर आधारित पाक्षिक तासिका घेतल्या. वेल्हा, विंझर, दापोडे येथील११वी व १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य आधारित सहा तासिका घेतल्या.

**३) मेळावे** - दि. ४ ते १२ जानेवारी सावित्रीबाई फुले जयंती ते जिजामाता जयंती असे औचित्य साधून नऊ वेगवेगळ्या शाळांमध्ये मैत्री, स्मरण आकलन या विषयांवर चार तासाचे मेळावे घेतले. आसदे, ताम्हिणी येथे विज्ञान मेळावे घेतले. 'जोडी तिची माझी' असा घरकाम करणाऱ्या महिलांचा गंमतमेळावा घेतला.

**४) अभ्यास भेटी** - ज्ञान प्रबोधिनीच्या वेल्हे सहनिवास, जीवनज्योती, शिवापूर केंद्र येथे भेट दिली. श्रीमती सुनंदाताई पटवर्धन यांचे जव्हार व मोखाडा येथील प्रकल्प पाहण्यासाठी दोन दिवसाचा अभ्यास दौरा आयोजित केला होता.

### ◆ संवादिनी- औंध, पुणे

या वर्षी वा. मनीषाताई शेटे व ओंकारदादा प्रधान यांची व्याख्याने झाली. मनीषाताईंनी 'निब्बान-बौद्ध धर्मातील वानप्रस्थाश्रम' ही संकल्पना सांगितली. ओंकारदादांनी दोन महिने अरुणाचल प्रदेश मध्ये राहून तेथील जनजीवनावर माहितीपट बनवला आहे. तो दाखवला व अनुभवकथन केले. गटचर्चा आणि एखाद्या विषयाचा अभ्यास करून त्यावर मांडणी या उपक्रमात मानसशास्त्रातील काही सिद्धांतावर चर्चा व अच्युत गोडबोले यांच्या पुस्तकावर मांडणी केली. दोन शाळांमध्ये होणाऱ्या तासिकांमध्ये ओंकार, पद्य, वेगवेगळ्या विषयांवर माहिती, भाषाज्ञान वाढवण्यासाठी म्हणी, शब्दांचे खेळ, शब्दकोडी इ. घेतले. तसेच भारतीय संस्कृतीची माहिती, भारतातील राज्ये, राजधान्या, बोधकथा, शास्त्रज्ञांची माहिती, कर्तृत्ववान स्त्री-पुरुषांची चरित्रे, राष्ट्रीय पुरस्कार, पाणी वाचवणे, प्लास्टिक बंदी इ. विषय घेतले. दोन्ही वर्गांचा मेळावा घेतला. त्यात विविध स्पर्धा घेतल्या.

### ◆ संवादिनी, सोलापूर

यावर्षीच्या मासिक बैठकांमध्ये पर्यावरण व वटपौर्णिमा या विषयावर चर्चा, मंजिरी कुलकर्णी यांचे अर्थिक नियोजन या विषयावर व्याख्यान, शिशू गटातील पालिकांचे मंगळागौरीच्या खेळाचे सादरीकरण, मुलांच्या शिक्षणाचे माध्यम या विषयावर चर्चा, ताणाचे व्यवस्थापन या विषयावर संवादिनी सदस्य डॉ. स्वाती कोरके यांचे सत्र आधुनिक संजीवनी या पुस्तकाचे वाचन व चचा, प्रार्थना, उपासना, वाचन चर्चा इ. झाले. सोलापूर केंद्राच्या उपक्रमात सहभागी होत आषाढी एकादशीच्या कार्यक्रमासाठी प्रसाद आणण्याचे व वाटपाचे काम गटाने केले तर प्रशालेच्या गणपती विसर्जन मिरवणूकीच्या वेळी औक्षण करण्याचे काम गटाकडे सोपवले होते. समाज दर्शनला मुलांबरोबर सहभागी झालेल्या सदस्यांचे अहवाल वाचन व अनुभव कथन झाले. मान्यवरांची भेट या उपक्रमात सोलापूर येथील प्रिसीजन कॅमशाफ्ट कंपनीच्या संचालिका मा. डॉ. सुहासिनी शहा यांची भेट घेतली. तसेच पर्यावरणा विषयी कळकळीने काम करणारे शेतीनिष्ठ असे व्यक्तिमत्व असणारे राष्ट्रपती पदक विजेते सुभेदार बाबुराव पेठकर यांची भेट घेतली.

### ◆ संवादिनी-शिरूर

या वर्षातील मासिक बैठकांमध्ये माझी सुट्टीची कल्पना, आधुनिक जीवनशैली व योग, बहुरूपी बुद्धिमत्ता यावर उमा बापट यांचे मार्गदर्शन, अंधश्रद्धा : पारंपरिक व आधुनिक या विषयावर चर्चा, समतोलच्या अंकातील लेखांवर लेखन व चर्चा असे विषय झाले. या देवी सर्वभूतेषु या विषयाच्या अनुषंगाने सदस्यांनी स्वतःमधील व इतरांमधील जाणवलेला दैवी गुण सांगितला. चला आपले हेल्थ कार्ड बनवू या, या विषयावर डॉ. स्मिता बोरा, डॉ. सोनाली हारदे यांचे मार्गदर्शन, ज्ञान प्रबोधिनीची उपासना या विषयावर माहिती, आपण घडतो कसे या विषयावर वा. अनघा लवळेकर यांचे मार्गदर्शन असे उपक्रम झाले. जुलै महिन्यात ओळख स्पर्शाची या कार्यशाळेचे प्रशिक्षक प्रशिक्षण झाले. त्यात ७८ जणांनी प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणानंतर जानेवारी महिन्यात विद्यार्थ्यांसाठी ओळख स्पर्शाची कार्यशाळा घेण्यात आली. त्याद्वारे एकूण दोन हजार मुलांपर्यंत पोहोचलो. कार्यशाळा घेतलेल्या ४८ सदस्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. सदस्यांची नोव्हेंबर महिन्यात हिवरे बाजार येथे संस्था-भेट झाली व डिसेंबर महिन्यात स्नेह मेळावा योजला होता.

▲▲▲

## ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास संचालित

# कमला मेहता नेत्र रुग्णालय

## (शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा)

◆ **रूग्णालयाविषयी..**

ग्रामीण भागात नेत्रसेवा करण्याच्या उद्देशाने या रुग्णालयाची स्थापना १९९७ मध्ये झाली. पुणे ते सातारा या १२५ किलोमीटरच्या अंतरात कमला मेहता नेत्र रुग्णालय हे एकमेव नेत्र रुग्णालय आहे. आजतागायत दोन लाखांहून अधिक रुग्णांना नेत्रसेवा पुरवण्यात आली आहे. रुग्णालयाचा उद्देश ग्रामीण सेवा हा असून पहिल्यापासून ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी, औद्योगिक संस्थांच्या कामगारांची नेत्र तपासणी, आठवड्यातून दोन वेळा नेत्रशिबिर, रुग्णांची विनामूल्य ने-आण व शस्त्रक्रिया इ. उपक्रम आग्रहपूर्वक केले जातात.

◆ **सध्याची परिस्थिती :**

▷ बाह्य रुग्ण विभाग : दोन द्विपदवीधर स्थायिक नेत्रविशारद उपलब्ध. दरमहा आठ शल्यविशारदांची भेट

▷ पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध

▷ महिन्यातून एकदा स्पेशॅलिटी ओ. पी. डी. रेटिना ओ.पी. डी., लेसर ओ. पी. डी.

▷ आठवड्यातून दोन वेळा फॅको शस्त्रक्रिया

▷ महिन्यातून एकदा टेरिजियम, लॅक्रीमल सॅक व ॲन्टीरियर सेगमेंट शस्त्रक्रिया

▷ महिन्यातून दोनदा ग्लुकोमा शस्त्रक्रिया

▷ शिकाऊ नेत्रविशारदांसाठी योग्य मार्गदर्शन व अनुभव

▷ अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णालय - सर्वोत्तम दर्जाची नेत्रचिकित्सा व चष्म्याचे दुकान.

◆ **चालू वर्षातील रुग्णसंख्या २०१८-१९**

| | | |
|---|---|---|
| **बाह्यरुग्ण विभाग** | | |
| | नवीन | ९६६५ |
| | जुने | २५४८ |
| | एकूण | १२२१३ |
| **शस्त्रक्रिया - मोतीबिंदू** | | |
| | सशुल्क | ५६२ |
| | मोफत | ३५१ |
| | इतर | ८३ |
| | एकूण | ९९६ |
| **मोफत नेत्रतपासणी शिबिरे** | | ३६ |

▲▲▲

## विस्तार कार्य : अस्थायी संपर्क केंद्रांची यादी

**१) पुणे केंद्र :**

१) प्रज्ञा मानस संशोधिका
- १) नाशिक
- २) शिरूर

२) संवादिनी
- ३) शिरूर
- ४) सोलापूर

३) युवक विभाग
- ६) छत्तीसगड
- ७) इंदोर

**२) निगडी केंद्र :**

१) गुरुकुल
- ८) बदलापूर
- ९) अंबरनाथ
- १०) रत्नागिरी
- ११) नाणीज (जि. रत्नागिरी)
- १२) बारामती
- १३) वडूज (जि. सातारा)
- १४) फोंडा (गोवा)
- १५) कर्वेनगर, पुणे
- १६) चिखली

**३) विस्तार केंद्रे :**

१) डोंबिवली विस्तार केंद्र
- १७) ठाणे
- १८) बदलापूर

२) बोरीवली विस्तार केंद्र
- १९) भाईंदर

**४) मध्यवर्ती योजनेतून :**
- २०) चिपळूण
- २१) कर्जत (जि. नगर)
- २२) कऱ्हाड

* युवक विभाग, युवती विभाग यांनी पुणे शहरात सुरू केलेली नवीन दले आणि संवादिनीचे पुणे शहरात सुरू झालेले औंध व पौड रस्ता येथील नवीन गट हे पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील संपर्क केंद्रासारखेच आहेत.

# ☆ सन्माननीय देणगीदार

♦ ज्ञान प्रबोधिनीच्या अनेक हितचिंतकांनी सन २०१७-१८ मध्ये देणग्या दिल्या आहेत. जागेअभावी रु. ५,००० वरील दात्यांचीच नावे दिली आहेत. तथापि सर्वांविषयी मनःपूर्वक कृतज्ञता आहे. अनवधानाने एखादे नाव राहिले असल्यास त्याबद्दल क्षमाप्रार्थी आहोत. ज्या व्यक्तींनी दि. १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीत एकापेक्षा अधिक वेळा देणग्या दिल्या आहेत, त्यांची रक्कम शक्यतो एकत्रित दर्शविली आहे. कार्यालयीन नोंदी परिपूर्ण होण्यासाठी आपल्या सूचनांचे स्वागत आहे व सहकार्याची अपेक्षा आहे.

♦ **५,०००/- पर्यंतच्या देणग्यांची एकूण वार्षिक रक्कम रु. ७,५७,१४९/-**

**रु. ५,०००/- प्रत्येकी**

१. शोभा आमडेकर
२. कमलेश अरथानी
३. चिंतामणी बने
४. अविनाश बर्वे
५. योगेश्वर बोडस
६. राजीव ब्रह्मे
७. मीना चितळे
८. आनंद दातार
९. जगदीश देसाई
१०. वैभव देसाई
११. मंदार देशपांडे
१२. नीता गडकरी
१३. दिनेश गणेशवाडे
१४. रमेश गोडबोले
१५. प्रभाकर गोळवलकर
१६. वर्षा जगदाळे
१७. सुहास जोग
१८. सुहास जोशी
१९. वृंदा कदम
२०. दशरथ केंकरे
२१. विवेक खचरे
२२. मयुर कोळवणकर
२३. विवेक क्षीरसागर
२४. सविता कुलकर्णी
२५. वर्षा कुलकर्णी
२६. वीणा लिमये
२७. विशाल मालू
२८. अरविंद मेढेकर
२९. गौरव मोडक
३०. राहुल मोरे
३१. मनोज नांदवलकर
३२. अनिल पालकर
३३. सुजाता परळीकर
३४. मीनल परांजपे
३५. समरजीत पाटील
३६. कुलकर्णी टायर्स ॲण्ड ऑटो सर्व्हिसेस
३८. आंबेडकर हॉस्पिटल
३९. आस्वाद फुडस्
४०. प्रशांत बनकर
४१. गिरीश बिरकोडी
४२. अजय ब्रह्मे
४३. संजय चक्रनारायण
४४. प्रशांत चौघुले
४५. रमेश दातार
४६. नरेंद्रकुमार देसाई
४७. रणजीत देशमुख
४८. भाग्यश्री देवकर
४९. सुरेंद्र गद्रे
५०. स्नेहा गिरीधारी
५१. गोपाळ एजन्सी
५२. संगीता हांडे
५३. नितीन जठार
५४. रेखा जोशी
५५. विद्या जोशी
५६. शुभांगी कानिटकर
५७. विनायक खांदवे
५८. रणजीत खोंपी
५९. विकास कोठारी
६०. अमृता कुलकर्णी
६१. सचिन पवार
७२. अचला फडके
६२. श्रीकांत लिमये
६३. अनघा मराठे
६४. नारायण मेहता
६५. प्रतिभा मोघे
६६. विमलाबाई मुद्देबिहाळकर
६७. सचिन पालव
६८. मेघा पंचनदीकर
६९. परांजपे लेजर सेंटर
७०. उदय परांजपे
७१. अलका पटवर्धन
३७. तुषार फुले
७४. पोरवाल आणि कं.
७५. अमोद रहाटकर
७६. रविशंकर विद्या मंदिर ट्रस्ट
७७. हरीश सरोदे
७८. शारदा विष्णु चॅरि.ट्रस्ट
७९. सुकृत उद्योग
८०. प्रभाकर वैशंपायन
८१. धनंजय वाघ
७३. मनोज पिंगळे
८२. सीमा प्रभु
८३. प्रसन्न राखे
८४. रोटरी क्लब ऑफ पुणे
८५. साधना सेठीया
८६. श्री. श्री. रविशंकर विद्या मंदिर
८७. विजय थत्ते
८८. दया व्याघ्र
८९. संभाजी वरे

**रु. ५,००१/- ते ६,०००/- पर्यंत**

१. संजीव गोखले
२. केतन म्हसकर
३. जेहान नोसर
४. एस.एन.डी.टी कन्या शाळा
५. विद्या विकास विद्यालय
६. निखील आपटे
७. बडवे इंजीनिअरर्स प्रा.ली.
८. राहुल भिडे
९. सुनील देवधर
१०. गायका पेस्ट कंट्रोल
११. सुचित्रा घनवट
१२. प्रमोद जोशी
१३. अजित कानिटकर
१४. निनाद कात्रे
१५. जगजीत कुलकर्णी
१६. रंजना कुलकर्णी
१७. मानसी मराठे
१८. आराधना निकम
१९. रविंद्र पालेकर
२०. उषा पुरंदरे
२१. हेमलता राव
२२. अनील रिसबुड
२३. मयुरेश सोहनी
२४. तुकाई टुरिझम
२५. नंदिता वझे
२६. समीर पाटील
२७. नीलम व प्रेमानंद गुणाजी
२८. निरामय
२९. वीणा सहस्त्रबुद्धे
३०. स्मिता चौबे
३१. कीर्ती आपटे
३२. असेंट हॉस्पीटॅलीटी प्रा.ली.
३३. वर्षा बखले
३४. मृदुला बुडुख
३५. स्नेहा डोंगरे
३६. गेल्टझर इंडिया प्रा.लि.
३७. गीतांजली जोशी
३८. संतोष काकडे
३९. संजीव करंदीकर
४०. साहिल कोठारी
४१. किरण कुलकर्णी
४२. विनोद कुलकर्णी
४३. नितीन नार्वेकर
४४. अतुल निसारकर
४५. प्रोसेसिंग इन्फोटेक प्रा. लि.
४६. जयेश रहाळकर
४७. निरज रायते
४८. संतोष साटम
४९. सागर सुराणा
५०. सारंग वरदपांडे
५१. विशाखा वेलणकर
५२. अशोक विद्यालय

**रु. ६,००१/- ते ९,९९९/- पर्यंत**

१. सावरकर दल
२. विनीता जोशी
३. अबोली पुरंदरे
४. प्रगतीपथ एज्यु. फौंडेशन
५. सुनील नानल
६. अमित शहा
७. जगदीश आफळे
८. अतुल इन्टेल सर्व्हिसेस
९. निरुपमा मोडक
१०. ज्योती वरुडकर
११. सतिशचंद्र गोरे
१२. अभय लिमये
१३. स्नेहल आपटे
१४. शैलेश म्हसकर
१५. विलास जावडेकर डेव्हलपर्स
१६. हर्षद कुलकर्णी
१७. प्रवीण सावंत
१८. सौरभ शिंदे
१९. ऋतुजा देशमुख
२०. ह्षीकेश कुलकर्णी
२१. न्यू इंडिया स्कुल
२२. अमित बागाईतदार
२३. सारिका पाठक

**रु. १०,०००/- प्रत्येकी**

१. आंबेकर हॉस्पीटल
२. ओंकार बाणाईत
३. उत्तरा दातार
४. शुभांगी देवधर
५. अनिल देशमुख
६. पराग गाडगीळ
७. सुरेंद्र गाढवे
८. मंदार गोडबोले
९. इनरव्हील क्लब पुणे
१०. अदिती जोशी
११. प्रशांत जोशी
१२. सुनीता करंदीकर
१३. अनुपमा केळकर
१४. अश्विनी कीर्तने
१५. सुजय कुलकर्णी
१६. आदित्य मोडक
१७. सुधा मोने
१८. किशोर पंडित
१९. शंतनू पटवर्धन
२०. दिपा पाठक
२१. राधा संगमनेरकर
२२. लक्ष्मी साठे
२३. किशोर शेलगीकर
२४. हेमंत सोळंकी
२५. प्रमोद उपाध्ये
२६. मनोहर केळकर
२७. अमित वझे
२८. मनोज देशपांडे
२९. प्रमोद जाधव
३०. दिगंबर दाभाडे
३१. वसंत आणि मंगला कुलकर्णी मेमो. ट्रस्ट
३२. रवी आवटे
३३. सुनिल चिंचणीकर
३४. सदानंद दाते
३५. सुचेता देसाई
३६. नंदिता गाडगीळ
३७. राम गद्रे
३८. संतोष घारपुरे
३९. हेकी-कुशल चॅरिटेबल ट्रस्ट
४०. रवींद्र जगताप
४१. गजानन जोशी
४२. सुवर्णा काळे
४३. दिपाली केळकर
४४. दिनेश खैरे
४५. सतिश कुलकर्णी
४६. एम.जी. कोटीभास्कर ट्रस्ट
४७. मिलिंद मोडक
४८. राहुल नांगरे
४९. नीता पारखे
५०. वनिता पटवर्धन
५१. प्रतिज्ञा हॉल
५२. सी. बी. साठे
५३. राजेश शर्मा
५४. जगन्नाथ शेट्टी
५५. उद्धव सोमण
५६. अविनाश उदगीकर
५७. सदाशिव वझे
५८. अश्विनी गानू
५९. अरुण पुराणिक
६०. प्रसाद गाडगीळ

**रु. १०,००१/- ते २०,०००/- पर्यंत**

| | | |
|---|---|---|
| १. | विजय पानवलकर | १०००१.०० |
| २. | विद्यानंद देवधर | ११०००.०० |
| ३. | सुप्रिया क्षीरसागर | ११०००.०० |
| ४. | रावजीभाई पटेल | ११०००.०० |
| ५. | समर्थ ग्राफिक्स | ११०००.०० |
| ६. | भालचंद्र सात्विक | ११०००.०० |
| ७. | संतोष शिंदे | ११०००.०० |
| ८. | अमित हरताळकर | ११५५०.०० |
| ९. | हर्षा किर्वे | ११७३०.०० |
| १०. | पोतदार इंग्लिश मिडियम स्कुल | ११७५०.०० |
| ११. | प्रशांत दिवेकर | १२०००.०० |
| १२. | नीलिमा करमरकर | १२०००.०० |
| १३. | स्वाती कर्पूर | १२०००.०० |
| १४. | अतुल नेने | १२०००.०० |
| १५. | अमर परांजपे | १२०००.०० |
| १६. | नितीन पटवर्धन | १२०००.०० |
| १७. | गुरुदत्त सोहनी | १२०००.०० |
| १८. | विलास जावडेकर | १२५००.०० |
| १९. | शिवप्रसाद आगटे | १३०००.०० |
| २०. | सीमा परांजपे | १३०००.०० |
| २१. | स्वप्नील गोरे | १४१४०.०० |
| २२. | अदिती नातू | १५०००.०० |
| २३. | अनुजा बर्वे | १५०००.०० |
| २४. | देवधर संदिप | १५०००.०० |
| २५. | राहुल लिमये | १५०००.०० |
| २६. | प्रशांत माने | १५०००.०० |
| २७. | परिणीता मराठे | १५०००.०० |
| २८. | स्वप्ना मराठे | १५०००.०० |
| २९. | निनाद प्रधान | १५०००.०० |
| ३०. | संजय प्रधान | १५०००.०० |
| ३१. | रोटरी क्लब डोंबिवली | १५०००.०० |
| ३२. | अतुल साठे | १५०००.०० |
| ३३. | कांबरे गाव | १६३००.०० |
| ३४. | मिलिंद नाईक | १७२०३.०० |
| ३५. | गिरीश पळसकर | १७५००.०० |
| ३६. | बिपीन अदवंत | १७५००.०० |
| ३७. | केंब्रिज विद्यालय | १८३०५.०० |
| ३८. | सुधीर आगाशे | २००००.०० |
| ३९. | प्रसाद दातार | २००००.०० |
| ४०. | अनिता देशमुख | २००००.०० |

**रु. २०,००१/- ते ३०,०००/- पर्यंत**

| | | |
|---|---|---|
| १. | एम.एस.स्वीसगर प्रा.लि. | २१०००.०० |
| २. | विरेश पराडकर | २१०००.०० |
| ३. | विक्रम कामठे | २१०००.०० |
| ४. | अजय फाटक | २४०००.०० |
| ५. | सुबोध इंजिनीअरर्स | २४०००.०० |
| ६. | देहणे गाव | २४२५०.०० |
| ७. | स्मिता चावरे | २४५००.०० |
| ८. | ॲडप्ट फ्लूइडाईन प्रा.लि. | २५०००.०० |

०९. असित अरगडे २५०००.००
१०. कल्पना आठल्ये २५०००.००
११. मंदार चंद्रचूड २५०००.००
१२. कल्पना देसाई २५०००.००
१३. प्रदीप देव २५०००.००
१४. ग्राहक पेठ २५०००.००
१५. दिलीप गुरुजी २५०००.००
१६. प्रसाद हेंद्रे २५०००.००
१७. नितीन इंगळे २५०००.००
१८. चंद्रकांत लेले २५०००.००
१९. मांडके हिअरिंग सर्व्हिसेस २५०००.००
२०. पंकज मुंडे २५०००.००
२१. हर्षल नेमाडे २५०००.००
२२. सायली पाटे २५०००.००
२३. गुणेश पाटिल २५०००.००
२४. वसंत पेंढारकर २५०००.००
२५. रोटरी क्लब ऑफ पुणे २५०००.००
२६. सुलोचना नातू ट्रस्ट २५०००.००
२७. स्वप्ना उद्योग प्रा.लि. २५०००.००
२८. शशिकांत पुजारी २८०००.००
२९. सारंग खरे २८००१.००
३०. अंबुताई नागेशराव मारुळकर ट्रस्ट ३००००.००
३१. चिन्मय पंडित ३००००.००

**रु. ३०,००१/– ते ५०,०००/– पर्यंत**

१. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ ३००००.००
२. जयदिप मराठे ३२६८०.००
३. श्रीराम आणि सन्स ३५०००.००
४. गायत्री सेवक ३६०००.००
५. प्रदिप चिकटे ४००००.००
६. सुवर्णा गोखले ४००००.००
७. मनीष टेपन ४००००.००
८. जयश्री कुर्तकुट्टी ४५०००.००
९. मृण्मयी साठे ४५०००.००
१०. बासुरी फौंडेशन ४५५००.००
११. सदाशिव आपटे ५००००.००
१२. दीपक चक्रदेव ५००००.००
१३. डी.व्ही. ब्रम्हे आणि सन्स ५००००.००
१४. श्रीकांत कुलकर्णी ५००००.००
१५. रेणुका कुंटे ५००००.००
१६. महात्मा फुले वस्तु संग्रहालय ५००००.००
१७. सतीश मराठे ५००००.००
१८. सदानंद पळणीकर ५००००.००
१९. मंगेश परांजपे ५००००.००
२०. श्रीकृष्ण पटवर्धन ५००००.००
२१. अनुप साबळे ५००००.००
२१. सुवर्णराज धुमस सप्लायर्स ५००००.००
२२. दिप्ती वाघमारे ५००००.००
२३. प्रबोध तेरेदेसाई ५००००.००

**रु. ५०००१/– ते ९९,९९९/– पर्यंत**

१. अरुण फाटक ५०,०५१.००
२. स्वाती अंबर्डेकर ५१,०००.००
३. रोटरी क्लब मुंबई ५२,५००.००
४. श्रुती कुलकर्णी ६०,०००.००
५. निर्माण संकल्प डेव्हलपर्स ६०,०००.००
६. सचिन गाडगीळ ६०,५००.००
७. अद्वय जोशी ६५,४००.००
८. प्रदीप मराठे ७२,०००.००
९. अजित शिंदे ७९,०००.००

**रु. १,००,०००/– व पुढील**

१. बायोवेद फार्मास्युटिकल्स प्रा. लि. १,००,०००.००
२. वृंदा भुस्कुटे १,००,०००.००
३. मोहना बोडस १,००,०००.००
४. अपर्णा गोडबोले १,००,०००.००
५. सलिल गोरे १,००,०००.००
६. स्वप्ना नवाथे १,००,०००.००
७. अरविंद परांजपे १,००,०००.००
८. किशोर पाटील १,००,०००.००
९. विवेक पोंक्षे १,००,०००.००
१०. संजय वाशिवले १,००,०००.००
११. दत्ता टोळ १,००,०००.००
१२. आनंद राव १,००,०००.००
१३. मिलींद पटवर्धन १,००,०००.००
१४. सुनिल दाढे १,००,००१.००
१५. शशांक चांदोरकर १,०६,०००.००
१६. चतुरंग प्रतिष्ठान १,०८,७५०.००
१७. इन्टॉक्स प्रा. लि. १,३५,०००.००
१८. ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट १,८०,०००.००
१९. शिवशक्ती पेंटस् २,००,०००.००
२०. डोंबिवली नागरी सह. बँक २,००,०००.००
२१. रंगनाथ कुलकर्णी २,००,०००.००
२२. दाबके ट्रस्ट २,००,०००.००
२३. विजय कुलकर्णी २,०६,०००.००
२३. रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवन २,१०,३८०.००
२४. विनायक देसुरकर २,१९,५००.००
२५. अमित घैसास २,२५,०००.००
२६. मिलिंद संत २,२६,०००.००
२७. एम.आय.बी.ए. ड्राव्हेटेक इंडिया प्रा. लि. २,५०,०००.००
२८. मोहन गुजराथी २,५०,०००.००
२९. किरण कीर्तने २,५१,०००.००
३०. ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. २,६६,०००.००
३१. मुकुंद जोशी ३,००,०००.००
३२. एक्सेल इंडस्ट्रीज लि. ४,३३,०००.००
३३. गिरीश बापट ५,००,०००.००
३४. पूजा कास्टींग प्रा. लि. ५,००,०००.००
३५. विजय केळकर ५,००,०००.००
३६. रोटरी क्लब ऑफ पुणे बावधन ५,००,०००.००

| | | | |
|---|---|---|---|
| ३७. इनरव्हिल क्लब ऑफ निगडी | ५,००,०००.०० | ४४. अनंत सेटलवाड | २०,००,०००.०० |
| ३८. रामचंद्र ढवळे | ५,७८,९४९.०० | ४५. चंद्रशेखर देसाई | २५,००,०००.०० |
| ३९. एन.जी. परांजपे प्रतिष्ठान | ५,९०,०००.०० | ४६. एच. सी. एल फौंडेशन | २५,००,०००.०० |
| ४०. के.पी.आय.टी. इंजिनिअरर्स लि. | ८,५०,०००.०० | ४७. के.पी.आय.टी. टेक्नॉलॉजीज् लि. | ३४,००,०००.०० |
| ४१. सुमंत मुळगावकर डेव्हलपमेंट फौंडेशन | ९,२१,६९८.०० | ४८. स्टरलाईट टेक फाउंडेशन | ३७,०९,२६९.०० |
| ४२. प्रिसीयंट टेक्नॉलॉजी | ९,४५,०००.०० | ४९. बजाज होल्डींग प्रा. लि. | ५५,००,०००.०० |
| ४३. रमा-पुरुषोत्तम फौंडेशन | १०,००,०००.०० | ५०. पर्सिस्टंट फाऊंडेशन | ७०,५२,०००.०० |

## ★ देणगीदारांसाठी आवश्यक माहिती ★

### ❖ परदेशातून परदेशी नागरिकांसाठी

१) ज्ञान प्रबोधिनीसाठी परदेशातून परदेशी नागरिकांनी पाठवलेली देणगी रक्कम पुढील खात्यात जमा करावी.

1) A/c Name - Jnana Prabodhini
2) Name of the Bank and Branch - Bank of Maharashtra, Bajirao Road
3) Address of Bank - Janamangal, 1177, Budhwar Peth, Pune
4) Account Number - 20097728834
5) IFSC Code - MAHB 0000001
6) SWIFT Code - MAHBINBBOCP

### ❖ परदेशातून भारतीय नागरिकांसाठी

२) ज्ञान प्रबोधिनीसाठी परदेशातून (परंतु) भारतीय नागरिकांनी पाठवलेली देणगी रक्कम पुढील खात्यात जमा करावी. तसेच स्वत:चे नाव, पत्ता, आणि भारतीय नागरिकत्त्व असलेल्या पासपोर्टच्या पानाची प्रत jpco@jnanaprabodhini.org या वर इ-मेल करावी.

1) A/c Name - Jnana Prabodhini
2) Name of the Bank and Branch - Bank of India, Shanipar Branch
3) Address of Bank - Shanipar, Pune
4) Type of A/c - Current, GENERAL
5) Account Number - 051520100000286
6) IFSC Code - BKID0000515

### ❖ भारतीय नागरिकांनी भारतातून सशर्त किंवा विनाशर्त

३) ज्ञान प्रबोधिनीसाठी भारतीय नागरिकांनी भारतातून पाठवलेली सशर्त किंवा विनाशर्त देणगी रक्कम पुढील खात्यात जमा करावी. तसेच स्वत:चे नाव, पत्ता आणि पॅन नं. इ. देणगीदारांच्या माहितीपत्रकामध्ये भरून द्यावे.

1) A/c Name - Jnana Prabodhini Ex-student Donation
2) Name of the Bank and Branch - State Bank of India, Deccan Gymkhana Branch
3) Address of Bank - Shirole Bhavan, PMT Building Pune
4) Type of A/c - Saving Bank Account
5) Account Number - 30190368573
6)IFSC Code - SBIN0001110

४) या व्यतिरिक्त ज्ञान प्रबोधिनीच्या एखाद्या विशिष्ट विभागाला त्यांच्या विशिष्ट उपक्रमासाठी, भारतीय नागरिकांना, भारतातूनच देणगी द्यायची असेल तर त्यांनी विभागातील संबंधित व्यक्तीशी बोलून, ते सांगतील त्या बँक खात्यात जमा करावी.

टीप : NEFT/RTGS द्वारे बँकेतील खात्यात परस्पर देणगी रक्कम जमा करणाऱ्या देणगीदारांनी कृपया इ-मेल वरून स्वत:चे पूर्ण नाव व पत्ता तसेच देणगी रक्कम रुपयांमध्ये व NEFT/RTGS चा दिनांक व कोड, आणि देणगीचे प्रयोजन jpco@jnanaprabodhini.org या संकेतस्थळावर (इ-मेल) कळवावे ही विनंती.

## ★ देणगीदारांना विनंती ★

आपले नाव व संबंधित आर्थिक वर्षातील देणगीची रक्कम यांचा हा गोषवारा देणगीच्या पावत्यांवरून तयार केला जातो. त्यातील तपशीलात अचूकता येण्यासाठी आपले संपूर्ण नाव, पत्ता, व पॅन क्रमांक व ई-मेल लेखी स्वरूपात कार्यालयाकडे त्या-त्या वेळी पुन्हा नव्याने दिल्यास सोयीचे जाते.

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

# ☆ संपर्क यादी

| | संपर्क | संपर्क क्र. | ई-मेल |
|---|---|---|---|
| ✦ **ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र** | | ०२०-२४२०७००० | contact@jnanaprabodhini.org |
| ▸ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला | वा. मिलिंद नाईक | ०२०-२४२०७१२०/१२२ | prashala@jnanaprabodhini.org |
| ▸ शैक्षणिक उपक्रम संशोधिका | प्रा. प्रशांत दिवेकर<br>पल्लवीताई पराडकर | ०२०-२४२०७११२/१९४ | erc@jnanaprabodhini.org |
| ▸ छात्र प्रबोधन | प्रा. महेन्द्र सेठिया | ०२०-२४२०७१७४ | chhatraprabodhan@jnanaprabodhini.org |
| ▸ नेतृत्व संवर्धन केंद्र | प्रा. महेन्द्र सेठिया | ०२०-२४२०७१७९ | |
| ▸ स्पर्धा परीक्षा केंद्र<br>मार्गदर्शक | सौ. सविता कुलकर्णी<br>डॉ. विवेक कुलकर्णी | ०२०-२४२०७११५/१३४ | jpcc@jnanaprabodhini.org |
| ▸ प्रज्ञा मानस संशोधिका | वा. अनघा लवळेकर | ०२०-२४२०७१४१ | info@jpip.org |
| ▸ संत्रिका | प्रा. विसूभाऊ गुर्जर | ०२०-२४२०७१४६ | santrika@jnanaprabodhini.org |
| ▸ ग्रामविकसन | श्री. विवेक गिरीधारी | ०२०-२४२०७१७६ | gram@jnanaprabodhini.org |
| ▸ स्त्री शक्ती प्रबोधन-ग्रामीण | प्रा. सुवर्णा गोखले | ०२०-२४२०७१३३<br>२४२०७१६२ | suvarna.gokhale@jnanaprabodhini.org |
| ▸ स्त्री शक्ती प्रबोधन - शहरी<br>विस्तार : | सौ. वीणा लिमये<br>सौ. मानसी बोडस | ०२०-२४२०७२२२<br>९८९०४५५७६५ | samvadini@jnanaprabodhini.org<br>manasee.bodas@jnanaprabodhini.org |
| ▸ नागरी वस्ती सल्ला व प्रशिक्षण केंद्र | श्रीमती हर्षा किर्वे | ०२०-२४२०७१७२<br>२४२०७२२१ | harsha.kirve@jnanaprabodhini.org |
| ▸ युवक विभाग | श्री. आशुतोष बारमुख | ०२०-२४२०७१७७ | ashutosh.barmukh@ jnanaprabodhini.org |
| ▸ युवती विभाग | कु. मेधाविनी वाटवे | ०२०-२४२०७१४८ | yuvati.vibhag@jnanaprabodhini.org |
| ▸ जिजामाता दल | श्रीमती सायलीताई कुलकर्णी | | |
| ▸ उद्योजकता विकास केंद्र | श्री. सुभाष देशपांडे | २०२-२४२०७१६१ | subhash.deshpande@jnanaprabodhini.org |
| ✦ **ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र**<br>केंद्र उपप्रमुख : | श्री. वामनराव अभ्यंकर<br>श्री. मनोज देवळेकर | ०२०-२७६५४३८०<br>९४२२०१४२२३ | nigdi@jnanaprabodhini.org<br>manoj.deolekar@jnanaprabodhini.org |
| ✦ **ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र** | श्री. अमोल गांगजी | ०२१७-२३१७७८२ | solapur@jnanaprabodhini.org |
| ✦ **ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र** | श्री. अभिजित कापरे | ८८८८८०२६२८ | abhijeet.kapre@gmail.com |
| ✦ **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र** | श्री. व्यंकटराव भताने | ९८५००११५२७ | gpvs@jnanaprabodhini.org |
| ✦ **विस्तार केंद्रे** | | | |
| १) डोंबिवली | सौ. ज्योती कर्वे | ९१६७७५०६१९ | jyoti2265@gmail.com |
| २) बोरीवली | सौ. सुमिता पांढरे | ०२२-२८९११६४१ | sumitapandhare@yahoo.com |
| ३) अंबाजोगाई | श्री. प्रसाद चिक्षे<br>श्री. अभिजित जोंधळे | ९४०३७७६४१९<br>९४२०३८४२६८ | prasad.chikshe@jnanaprabodhini.org<br>abhijeetjondhale123@gmail.com |
| ✦ **कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ** | डॉ. अनिरुद्ध जोशी | ०२०-६६०२३००० | |

▲▲▲